

# पुत्र विश्वस्ताचा



गौरव ग्रंथ -
ज्ञानेश्वर आगाशे षष्ट्यब्दिपूर्ति निमित्त


चंद्रशेखर

© ज्ञानेश्वर आगाशे गौरव समिती

*मुद्रक*
सिध्दीविनायक डिझायनर्स अॅन्ड प्रिंटर्स
जीडी -२, ४९९ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

*सजावट व मांडणी*
सागर पारुंडेकर
आर्ट अॅण्ड डिझाईन स्टुडिओ,
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

(खासगी वितरणासाठी)



विश्वस्त
कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे



जो [illegible] न कर्मी गुंतला ।
विश्वस्त धर्मी रंगला ।
तो पुत्रधर्म सांभाळला

# मनोगत : संपादकांचे

आपुल्या ज्ञानोबाच्या आठवणी ।
दाटल्या सुहृदांच्या मनी ।
प्रकटल्या सहजभावे पानोपानी ।
ग्रंथी इये ॥

हे नोहे ग्रंथ निर्माण करणे ।
नच संपादितहि करणे ।
हे आनंदाचे भार वाहणे ।
भक्तिभावे ॥

- शरच्चंद्र बेलवलकर
- ताराप्रकाश वर्तक
- रमेश बर्वे

टीप : या ग्रंथात प्रकट झालेल्या लेखकांच्या विचारांशी
आम्ही संपादक सहमतच आहोत.

श्री अरविन्द
स्वामी विवेकानंद नगर
फलटण

प्राचार्य शिवाजीराव भोसले
माजी कुलगुरू,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

२/४/2002

# प्रस्तावना

लोकशाहीच्या या कालखंडात कोणीच कोणाला मानत नाही असे दिसते. अशा काळात एका ज्ञानेश्वराला मालक म्हणून गौरवणारे कर्मचारीरूपी वारकरी ज्या पंढरीत आढळतात तिला श्रीपूर हे नाव शोभते.

या श्रीपूरात फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाचे काही विद्यार्थी "जय ज्ञानेश्वर - चंद्रशेखर" हा मंत्र जपत कामाचे डोंगर उभे करीत आहेत हे पाहून माझे मन मोहरून येते.


ज्ञानेश्वर आगाशे यांच्यासारखा एक उद्योगपती हा क्रीडापती असावा व प्रामाणिक कर्मचाऱ्यांचा तो छत्रपती व्हावा याचा अभिमान एखाद्या शिवाजीला का वाटू नये?

ज्ञानेश्वर आगाशे हे ६० वर्षांचे झाले. त्यांनी क्रीडाक्षेत्राला कुरूक्षेत्राचा गौरव प्राप्त करून दिला. या समर्थ पुरुषाचा संसार नेटका करणाऱ्या प्रपंचलक्ष्मीचे पुण्य कोणत्या शब्दांनी जोखणार ?

या गौरविकेतील लेख पाहिले. आनंद वाटला! पंढरपूरच्या वासुदेवशास्त्री उत्पातांपासून महाराष्ट्राच्या आजी आणि माजी मुख्यमंत्र्यांपर्यंत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

राजकारणापासून दूर असणारा हा अजातशत्रू पुरुषोत्तम आपला परम मित्र आहे हे सांगण्याचा मोह अनेक कर्तृत्ववंतांना पडावा यात सर्वांचाच गौरव आहे. ही गौरविका म्हणजे "आगाशे मालकांच्या" चरणी कर्मचाऱ्यांनी वाहिलेले सद्भावना पुष्प होय!

प्राचार्य शिवाजीराव भोसले



# अनुक्रमणिका


अजातशत्रू ..................... आशुतोष आगाशे ..................... १
My Father ..................... Mandar Agashe ..................... ३
Father's Daughter ..................... Sheetal Agashe ..................... ४
शुभेच्छा संदेश ..................... ६
श्रीमंत योगी ..................... बाळ इनामदार ..................... २१
नावं तरी किती ठेवायची ..................... रेखा आगाशे ..................... २४
Baba... A Narration ..................... Shalini Agashe ..................... २७
चालता बोलता वटवृक्ष ..................... माधुरी पुरंदरे ..................... २९
विश्वस्तांचे वारस ..................... रमेश मांगडे ..................... ३१
रंगल्या रात्री अशा ..................... अरविंद मेहेंदळे ..................... ३४
इंटरनॅशनल कॅलेंडर शो ..................... रमाकांत पेठकर ..................... ३६
ज्ञानेश्वर व श्री सुवर्ण सहकारी बँक ..................... विलास एकबोटे ..................... ३९
॥ चंदनाते कायसेनि चर्चावे ॥ ..................... शरच्चंद्र बेलवलकर ..................... ४३
शुभास्ते पंथान: सन्तु। ..................... मुकुंद चोपडे ..................... ४७
गाठा हसत शंभरी ..................... विजयकांत कुदळे ..................... ४९
शब्दास जपणारा मालक ..................... भास्करराव गायकवाड ..................... ५१
आमचे पेशवे ..................... मधु गुप्ते ..................... ५३
My association with Dnyaneshwar ..................... Prakash Joshi ..................... ५५
क्षण आला भाग्याचा ! ..................... जयंत भिडे ..................... ५७
मित्रसंपन्न आगाशे ..................... अण्णा जोशी ..................... ५८
हसतमुख उद्योगपती ..................... मोहन धारिया ..................... ६०
कर्तृत्व व समृद्धी याचा सुरेख समन्वय ..................... वसंत काणे ..................... ६२
एक स्वगत ..................... जयराम कुलकर्णी ..................... ६४
आवडीची निवड ..................... अरविंद गोगटे ..................... ६६
बहुत सुकृतांची जोडी ..................... ह. भ. प. रामदास महाराज ..................... ६८
एक योगी उद्योगपती ..................... रमेश बर्वे ..................... ७०
मित्रत्त्वाचे नाते ..................... मुकुंद अनगळ ..................... ७३
झाले बहू, आहेत बहू, होतील बहू - पण या सम हाच ........ रेवणसिद्ध भादुले ..................... ७६
विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई रंगा येई गो ये ... ........ डॉ. सुरेश गोगटे ..................... ७७

| | | |
|---|---|---|
| ज्ञानेश्वर | बाळ पंडित | ७९ |
| नामानिराळा | रमेश दामले | ८२ |
| माझा मित्र | मनोहर भिडे | ८४ |
| शिरीन ... माझा भाऊ | शकुंतला करंदीकर | ८६ |
| अथ श्री ज्ञानेश्वरी | नीला (सरला) भिडे | ८९ |
| निगर्वी उद्योगपती | नितीन दाबक | ९२ |
| एक नामवंत पेढी ! | विजय वाडेकर | ९३ |
| प्रसन्न मित्र | डॉ. जब्बार पटेल | ९६ |
| Unique Relationship | Jaywant Lele | ९९ |
| एक सच्चा स्नेही | डॉ. वि. वि. घाणेकर | १०१ |
| तुका आकाशा एवढा | श. वि. दप्तरदार | १०३ |
| कामगार मित्र | म. वि. पोंक्षे | १०५ |
| एक वचनी ... | ॲड. सुहास देव | १०७ |
| पाठीराखा | अरुणा भट | १०९ |
| कर्मयोगी | डॉ. चिंतामणी मराठे | १११ |
| ज्ञानेशो भगवान विष्णू ! | राम जोशी | ११३ |
| आमच्या रमणबागेचे भूषण | प्रा. पद्माकर शंकर पुरंदरे | ११५ |
| दाता | काका जोशी | ११७ |
| दीपस्तंभ | आशा निरखे | ११९ |
| श्रध्दावंत आगाशे | अचला जोशी | १२१ |
| माझे साहेब | विजय थत्ते | १२३ |
| माझे शिरीन साहेब | विनायक गांगल | १२४ |
| आमचा कॅनेडियन प्रकल्प | अ. गं. स्वामी | १२५ |
| आमचे मालक | के. एन. निबे | १२८ |
| ग्रहमान काय सांगते ! | श्रीनिवास कुलकर्णी | १३१ |
| दिल्या शब्दाला जागणारा माणूस | वा. ना. उत्पात | १३३ |
| एक द्रष्टा उद्योजक | ॲड. प्रकाशराव पाटील | १३५ |
| कर्तृत्वाचा महामेरू | विजयकुमार पाटील | १३८ |
| श्रीपूरवर प्रेम करणारा माणूस | मुकुंद चोपडे | १४० |
| खिलाडी | रमाकांत पेठकर | १४२ |
| परीसस्पर्श | मिलिंद फडे | १४४ |
| चिरायू भव | डॉ. ह. वि. सरदेसाई | १४६ |



आगाशे कुटुंबिय



आगाशे साहेब त्यांच्या
लाडक्या नातवा समवेत



ज्ञानेश्वर आगाशे, ब्रिटीश पंतप्रधान जॉन मेजर व प्रधान प्रतिस्पर्धी श्री. दालमिया यांच्या समवेत

# अजातशत्रू ...

## आशुतोष आगाशे

१९९३ साली मी बी.कॉम्.ची परीक्षा पास झालो. अनेक उद्योगपतींच्या घरातली मुलं सामान्यतः परदेशी जाऊन एखादी एम्.बी.ए. सारखी डिग्री हाती घेऊन परत येतात. मलाही हे करणं अजिबात अवघड नव्हतं. परंतु माझ्या मनात वेगळाच विचार आला. परदेशी जाण्याचं कौतुक उरलेलंच नव्हतं. अजून एखादी डिग्री घ्यावी तर त्यासाठी दोनतीन वर्षं घालवावी लागली असती. त्याऐवजी इतकाच काळ मी बाबांच्या संपूर्ण सहवासात घालवू शकलो तर मी खूप अधिक शिकू शकेन, असं मला वाटलं. म्हणून मी लगेचच माझा हा निर्णय बाबांना सांगितला. त्यांच्या नेहमीच्याच पध्दतीने त्यांनी तो हसत हसत स्वीकारला आणि गेली चार वर्षे मी बाबांच्या ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेत आहे.

आम्हा भावंडांच्या लहानपणी आम्हा कोणालाच बाबांचा खूप असा सहवास मिळू शकला नाही. बाबा सतत कुठल्या ना कुठल्या व्यवसायात गढलेले असल्यामुळे आमच्या आणि त्यांच्या घरी एकत्र असण्याच्या वेळा जमणं फार कठीण होतं. अर्थात् आम्हाला त्या काळातही त्यांची गैरहजेरीदेखील त्यांनी कधी भासू दिली नाही. आमच्यावरचं त्यांचं लक्ष आकाशी उडणाऱ्या घारीसारखं होतं. पण सहवास मात्र कमी मिळाला हे तर खरंच. गेल्या चार वर्षांत मात्र याची सगळी कसर भरून निघाली. बाबांचा मनसोक्त सहवास मला लाभला.

बाबा वयाची साठ वर्षे पूर्ण करताहेत आणि मला मूठभर मिळालेल्या अनुभवावर मी बाबांच्याबद्दल काही लिहायला घेतलंय. हे धाडससुध्दा मला वाटतं बाबांचीच देणगी आहे.

बाबांचा मित्रपरिवार मोठा, आगाशे कुटुंबाच्या नातेवाईकांची संख्याही मोठी. अनेक व्यवसायातील भागीदार, उच्चपदस्थ अधिकारी, कामगार हाही सर्व पसारा, तसं म्हटलं तर मोठाच. या साऱ्यांना बाबा जवळचे वाटतात, थोर वाटतात, सहृदय वाटतात, मित्र वाटतात यात तर शंकाच नाही. या एकसष्टीच्या निमित्तानं यातील अनेक माणसं बाबांच्या अनेक गुणांबद्दल आपले स्वानुभवही लिहितील. या सर्वांपेक्षाही मला माझे दोन खास वेगळे अनुभव आवर्जून सांगावेसे वाटतात.

क्रिकेट जगतात बाबांचं नाव माहीत नाही असा माणूस विरळा. कपिल देव, सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर या क्रिकेटमधल्या धडाकेबाज व्यक्तींशी बाबांची असलेली मैत्री मी अगदी जवळून बघितलेली आहे. क्रिकेटमधलं असंच एक मोठं नाव म्हणजे जगमोहन दालमिया. भारतीय

क्रिकेटचेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्रिकेट बोर्डाचे मोठे पद जबाबदारीने सांभाळणारी ही अत्युच्च पदावरची व्यक्ती. मी जो प्रसंग सांगणार आहे तो कलकत्त्याचा. त्याआधी नुकतीच भारतीय क्रिकेट मंडळाच्या अध्यक्षपदाची निवडणूक होऊन गेली होती आणि बाबांच्या विरोधात दालमियांनी ती निवडणूक जिंकली होती. मी महाराष्ट्रातर्फे रणजी क्रिकेट मॅच खेळण्यासाठी कलकत्त्याला गेलो होतो.

दालमिया यांच्या पर्सनल मॅनेजरला भेटून त्यांची नमस्कारापुरती तरी ओळख करून घ्यावी म्हणून फक्त ५ मिनिटांची भेट मिळण्यासाठी विनंती केली. दोन-तीन वेळा विनंती करूनही दालमियांच्या भरगच्च कार्यक्रमांमुळे माझ्या वाट्याला नकारघंटा आली. शेवटी एकदा ते दुपारच्या लंचसाठी क्लबवर आले होते. ते समोर दिसत असतांना साधी ओळखसुध्दा करून घ्यायची नाही हे काही माझ्या बुध्दीला पटेना. म्हणून मी परवानगीविनाच बेधडक भेटायचं ठरवलं आणि त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिलो. माझ्याकडे लक्ष जाताच त्यांनी दुसऱ्याशी बोलता बोलता मला विचारलं, "येस, व्हॉट डू यू वॉन्ट". मी उत्तर दिलं, "आपली ओळख व्हावी, आपल्याला शुभेच्छा द्याव्यात म्हणून मी आलो. माझं नाव आशुतोष ज्ञानेश्वर आगाशे". लगेच त्यांनी समोरच्या व्यक्तीबरोबरचं बोलणं अर्धवट टाकलं आणि माझा हात धरून मला म्हणाले, "अरे तू इथं कसा. बरं ते असू दे. बाबांची तब्येत कशी आहे, आईची तब्येत कशी आहे". मी आश्चर्याने थक्क. आईचं ऑपरेशन व बाबांची अँजिओप्लॅस्टी झाल्याची बातमी त्यांच्यापर्यंत पोहोचलेली होती. दोघांच्या तब्येतीबद्दलची काळजी त्यांच्या शब्दा शब्दातून जाणवत होती. मी दोघांच्या तब्येती समाधानकारक असल्याबद्दल त्यांना सांगितलं. ते ऐकल्यानंतर त्यांनी माझी विचारपूस तर केलीच पण मला म्हणाले, "इथे कलकत्त्यात येऊन तू हॉटेलमधे राहतो आहेस हे काही मला प्रशस्त वाटत नाही. तेव्हा ताबडतोब सामान उचल आणि माझ्या घरी चल". आमचा मुक्काम जवळजवळ संपत आला होता, त्यामुळे मी त्यांच्या या सूचनेला नम्रतेने नकार दिला.

दुसरा एक प्रसंग असाच मनात कोरला गेलाय. आय्.एस.बिंद्रा हे नावही क्रिकेट क्षेत्रात असंच वजनदार समजलं जाते. मी आणि बाबा दिल्लीत होतो. बिंद्रा साहेबांबरोबर काही बोलणं चालू असतांना त्यांना सहज समजलं की मी तिथून चंदिगडला जाणार होतो. बोलता बोलता बिंद्रा साहेबांनी फोन उचलला आणि ते चंदिगडजवळच्या मोहाली क्रिकेट क्लबशी बोलू लागले. त्या बोलण्यातून मला कळलं की त्यांनी माझी सारी व्यवस्था क्लबच्या गेस्ट हाऊसमधे केलेली आहे. फोन संपवण्याच्या आधी त्यांनी दोनदा बजावून सांगितलं की 'आशुतोष आगाशे' ही व्यक्ती माझ्या घरातलीच आहे.

या दोन्ही प्रसंगात माझ्या लक्षात आलं की वर्तमानपत्रात बातम्या येतात. त्यामध्ये ही नावे बाबांच्या विरोधकात असतात. एवढंच नव्हे तर या विरोधाचं स्वरूप चक्क लढाईसारखं असतं आणि इतकं असूनही या लढाईचा त्यांच्या मूळ स्नेहावर काडीचाही परिणाम झालेला नसतो. मी जेव्हा स्वतःशी विचार करतो, तेव्हा मला वाटतं बाबा खरंच अजातशत्रू आहेत. कारण खुद्द तथाकथित शत्रूसुध्दा बाबांशी मित्रासारखेच वागतात. मला वाटतं आगाशे घराण्याचं नाव चालवायचं म्हणजे खूप काही जबाबदाऱ्या पार पाडणं. त्यातील सर्वात अवघड जबाबदारी मला हे अजातशत्रुत्व सांभाळणं ही वाटते. कारण हा गुण बाबांच्या मूळ स्वभावातच आहे. कोणी म्हणतील हा त्यांच्या रक्तातच गुण आहे. मी म्हणेन जर हा रक्ताचाच गुण असेल तर हा गुण अंगी येण्यासाठी बाबांनी जी अपार सहनशीलता आणि दुसऱ्याला समजून घेण्याची वृत्ती जोपासली, ती परमेश्वरानं मला द्यावी. बाबांच्या सहवासाची आणि त्यातून शिकण्याची संधी गेली फक्त चारच वर्षे मला मिळाली ती अजून चाळीस वर्षे मिळावी, अशी ईशचरणी प्रार्थना.

•



ज्ञानेश्वर आगाशे सुपुत्र मंदारसह

# *My Father*

**Mandar Agashe**

There are so many things I want to write about my dad but I will stick to one particular aspect about the relationship between father and son.

It is always said that it is most difficult to be son of a famous father and usually the son falls flat on his face when he tries to imitate his father.

In such cases, the son is always blamed for not being capable enough and nobody pays attention to the fact that the father might not have given enough support and guidance to the son.

I think I am very lucky not only to have a famous and successful father, but a father who gave me my space in life to do what I felt was correct and played an important role in building my self-confidence during the early days of my carreer.

Whether it was my music interest or my interest in the fields of Information & Technology and Biotech, I dared to do things differently because of not only financial help but time to time guidance and moral support of my father.

One more thing that I am proud of, his friends circle and the trust he enjoys with them. No matter which field I venture into I am bound to meet some of his friends who will go all out to help me because of their love for my father.

I think he is born with a magnetic personality otherwise why would my son that is his grandson Aditya could be so close to him ever since he was 3 months old!

He is also very practical in life and always seems to know the future. Initially I thought it, his business experience but after working 10 years along with him now I have realised that it is his inborn talent.

Such people are rare and being son of such a person is my greatest luck.

•



मंदार आगाशे

सुपुत्र आदित्यसह



Baba with beloved daughter Sheetal and grandson Aditya

# Father's Daughter

**Sheetal Agashe**

When God decided to send me to earth, he gave me a choice, to be his angel or to be my father's daughter. I am glad I made the right choice. So here I am today, blessed to be a part of the Agashe family.

When I was asked to write something about my father I didn't know where to start. I still doubt. May be from the time of my birth?

My mother tells me that I was born as an answer to the numerous prayers she offered God for a baby girl after having had two sons. She always says that my father just wrapped up my naming ceremony in a hurry because he had to go abroad for some work.

But I guess, my father more than made up for that hurry. As a child, I remember my father as someone who adored me and pampered me. Someone who never said 'No' to me for anything. But yet didn't spoil me. He used to travel a lot throughout my childhood but he never let me or my brothers feel neglected. He was always there when we needed him.

As I grew up, my relationship with my father has become stronger though because of different reasons. First, he was someone who would always bring me gifts. My mom tells me that as a baby he even got my nappies and milk bottle from London, leave alone clothes and toys. He was a Santa Claus to me then. Well, he still is .....

When I was in school, he was more of an elderly person whom I respected and was a little scared of. He was the one who would show me what is right and what is wrong and why it is so. Why somethings have to be done and somethings not to be.

Then I entered college. I was a big girl wanting to discover life. This was the time when I dared to cross the line between an elder - younger person relationship towards friendship. I was more free with my father. I would take my problems to him, ask for his opinions, talk about things. And all this made me respect him and love him even more.

And in these times, that is today, when I myself am an adult, have my own thoughts and opinions about things, have made my own choices, my father is my friend, philosopher and guide. Dad and mom wanted me to get married some 2-3 years back. But I'm glad I didn't. Or

else I would have never known them, understood them, as I do today. We can talk about things discuss and argue about things, about me, my family, about them, about work... almost anything and everything. And that too considering me as an adult. And this gives me a totally new bonding to our relationship. (Though otherwise, they still treat me like a kid!).

It goes without saying that I respect and look up to my father for all his dynamic qualities. But the one quality I am proud of is the way he adapts himself to life's offerings whether happy times or sad times, relaxed moments or tensed moments, he has an amazing capacity to accept it and deal with what life brings him. I have seen him change with the changing times with so much of ease, whether at work, in business techniques or in the habits, traditions and style of living, at home.

Well, one thing I know is that I hate change. Maybe that's why I admire this quality of his the most.

To people, my father might be Mr. Dnyaneshwar Agashe, a banker, a cricketer, a businessman a dynamic personality. But to me, more than all this, he is my "baba" and always will be my "baba".

Baba,

"I love you and am really grateful to you for giving me such a great life, and for making me the person I am today."

Love,

Sheetal

मेसर्स आर. पी. वैद्य व पी. वाय्. वैद्य ही आमची जिमखान्यावरची दोन जुन्या काळापासूनची दुकाने. ही दुकाने चालविणारे आम्ही दोघेही भाऊ रमण बागेतील. ज्ञानेश्वर हे माझेपेक्षा वयाने मोठे. खेळामध्ये प्रवीण. मला एवढे पक्के आठवते की हॉकी शिकताना मी हॉकी स्टिक बरोबर धरली नाही म्हणून त्यांनी मला बोलावून चुकीची दुरुस्ती केली. तेव्हापासून ते माझे गुरू.

आपला मोठेपणा बाजूला ठेवून आगाशे सर्वांमध्ये मिसळत. डेक्कन जिमखान्यावर जेव्हा सुवर्ण सहकारी बँक उघडली तेव्हा ते स्वतः आजूबाजूच्या दुकानदारांकडे जात व आमच्या बँकेत खाते उघडा असे आर्जवाने सांगत. बँकेत आम्ही खाते उघडल्यावर बँक प्रत्येक अडचणीचे वेळी पाठीशी उभी राहिल्याने आमचा व्यापार आज उत्तम स्थितीत आहे. त्यांचे जणू सांगणेच असते "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे". आगाशेसाहेबांना एकसष्टीच्या शुभेच्छा.

**रवींद्र परशुराम वैद्य**

सत्यमेव जयते

# SHARAD PAWAR

Member of Parliament
(Lok Sabha)

जीवनातील उद्दिष्टे साद्य करण्याकरीता शारिरीक परिश्रमाबरोबर मनातील आत्मविश्वासाचीही आवश्यकता असते. आणि स्वत:ची उद्दिष्टे साध्य करताना सामाजाचेही हित साधण्याचे जे संकल्प करण्यात येतात त्यासाठी सहकारी आणि मित्रांचे सहकार्यही मोलाचे ठरत असते. श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांनी हे अचूकपणे ओळखले होते. आणि म्हणूनच औद्योगिक, सांस्कृतिक, साहित्य, क्रीडा आणि अध्यात्म आदि विविध क्षेत्रांत त्यांनी अजोड यशसिद्धी प्राप्त केली आहे. श्री. आगाशे यांनी सर्वच क्षेत्रात केलेले प्रयत्न मी जवळून पाहिले असून त्यांच्या सेवाभावी कार्यापासून यशसिद्धीचे संकल्प करण्यास निश्चितच प्रेरणा मिळू शकेल. त्यांच्या षष्ठब्दीनिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा.

आपला

**शरद पवार**
लोकसभा सदस्य



सत्यमेव जयते

# मुख्य मंत्री

## महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा

उद्योगपती श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांच्या षष्ट्यब्दिपूर्ति निमित्त एक गौरव अंक प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद वाटला.

श्री. आगाशे यांनी औद्योगिक क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा, अध्यात्म इत्यादी क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे. यशस्वी उद्योगपती, कुशल कारखानदार, उत्तम क्रीडा संघटक, अत्याधुनिक अपरंपारिक ऊर्जा प्रकल्पाचा निर्माता अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे आहेत. गौरव अंकामध्ये त्यांच्या विविधस्पर्शी व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा आढावा घेतला जाईल अशी आशा वाटते.

श्री. आगाशे यांचे अभीष्टचिंतन करून मी त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो.

गौरवांकाच्या प्रकाशनास माझ्या हार्दिक शुभेच्छा.



**विलासराव देशमुख**
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

मनोहर जोशी
**MANOHAR JOSHI**

सत्यमेव जयते

**उद्योग मंत्री**
(भारी उद्योग एवं लोक उद्यम मंत्रालय)
भारत सरकार
**MINISTER OF INDUSTRY**
(HEAVY INDUSTRIES & PUBLIC ENTERPRI:
GOVERNMENT OF INDIA

दिनांक :- ७ फेब्रुवारी,

मा. अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर आगाशे गौरव अंक समिती,

महोदय,

आपले दिनांक १ जानेवारी, २००२ चे पत्र वाचून अतिशय आनंद झाला. श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांचा षष्ठब्दीपूर्ती महोत्सव साजरा केला जात आहे याबद्दल मला खूपच समाधान वाटले.

श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांचे जीवन अनेकांना प्रेरणा देईल असेच आहे. त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. जीवनाच्या अनेक कार्यक्षेत्रात अनेक वेळा एकाच वेळी काम करून यशस्वी होणे किती कठीण आहे हे मला माहीत आहे. श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांनी ते करून दाखविले आहे. यशस्वी उद्योजक, श्रेष्ठ क्रीडा संघटक, साहित्य रसिक अशा अनेक भूमिका त्यांनी उत्तमरित्या वठविल्या त्यामुळे आयुष्यात यशस्वी होऊ इच्छिणाऱ्यांना श्री. ज्ञानेश्वर आगाशे दिपस्तंभत आहेत.

वेगवेगळ्या विचारसरणीच्या राजकीय नेत्याबरोबर आपुलकीचे संबंध प्रस्थापित करण्याबद्दल त्यांचा हातखंडा आहे. सुहास्यवदनाने, सौम्य हास्याने अलगदपणे ते आपल्या मनातून अंत:करणात कधीच जातात हे समजत नाही. असेच सामाजिक जीवनातील उर्ध्वयु श्री. ज्ञानेश्वर आगाशे हे वयाची ६० वर्षे पूर्ण करीत आहेत याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देत आहे आणि त्यांनी धुवाधार आयुष्याचे शतक काढावे अशी अपेक्षा करीत आहे.



कळावे
आपला विश्वासू

**मनोहर जोशी**
उद्योग मंत्री, भारत सरकार

उप मुख्यमंत्री

सत्यमेव जयते

महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २५ फेब्रुवारी,२००२

शुभेच्छा

ज्येष्ठ उद्योगपती श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांच्या षष्ट्यब्दिपूर्ति निमित्त गौरव अंक समितीतर्फे गौरव अंक प्रकाशित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद वाटला.

स्वातंत्र्यापूर्वी पर्जन्य छायेत असलेल्या श्रीपूरच्या माळरानावर साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवून श्री. आगाशे यांनी छोट्याशा औद्योगिक क्रांतीची सुरुवात केली. अविश्रांत परिश्रम, परिसरातील शेतकऱ्यांच्या हिताची काळजी आणि श्रमावर निष्ठा या गुणांच्या आधारे हा उद्योग समुहाच्या रूपाने वटवृक्षात रुपांतरित झाला. आपल्या बुद्धीची झेप केवळ औद्योगिक क्षेत्रापुरतीच मर्यादित न ठेवता साहित्य, क्रीडा, संस्कृती, बँक अशा बहुविध क्षेत्रामध्ये श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांनी आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा उमटविला. या ऋजु व्यक्तिमत्त्वाचा गौरव अंकात विविधांगाने वेध घेतला जाईल, अशी मला आशा आहे.

षष्ट्यब्दिपूर्ति गौरव अंकास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**छगन भुजबळ**
उप-मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

**नारायण राणे**
विरोधी पक्षनेता
महाराष्ट्र विधानसभा

विरोधी पक्ष नेता
महाराष्ट्र विधान सभा

E-Mail : ntrane @ bom8.vsnl.net.in
कार्यालय : दू. क्र. २०२४२६२, फॅक्स क्र. २०४ १७०२
निवास : दू. क्र. २०२४६५१, फॅक्स क्र. २८४ २३६४
विधान भवन, मुंबई ४०० ०३२/नागपूर ४४० ००१

दिनांक : २४ जानेवारी, २००२

शुभेच्छा

ज्येष्ठ उद्योगपती श्री. ज्ञानेश्वर आगाशे वयाची ६० वर्षे पूर्ण करीत असल्याने त्यांच्या कारकिर्दीच्या गौरवाप्रित्यर्थ 'षष्ट्यब्दिपूर्ति सोहळा' संपन्न होत असल्याचे समजून मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. आगाशे यांनी श्रीपूरच्या माळरानावर साखर कारखाना सुरूकरून उद्योगक्षेत्रात यशस्वीपणे पदार्पण केले व उद्योगाचे व खऱ्या अर्थाने आपल्या कर्तृत्वाचे बीज रोवले व त्याचे आज अनेकविध उद्योग समुहाच्या विस्तीर्ण अशा वटवृक्षात रुपांतर झाले आहे, ही बाब निश्चितच अभिमानास्पद असून मराठी माणसाची कीर्ती सर्वदूर पसरविणारी व आदर्श ठरणारी आहे. श्री. आगाशे यांनी जिद्द, मेहनत व कौशल्यपूर्ण प्रयत्नांची पराकाष्ठा यांचा उत्तम त्रिवेणी संगम साधून गाठलेली उद्दिष्टपूर्ती ही तमाम मराठी उद्योजक बांधवांना स्फूर्ती देणारी व सदैव मार्गदर्शक ठरणारी आहे. श्री. आगाशे यांचा त्यांच्या पष्ट्यब्दिपूर्तिचे औचित्य साधून करण्यात येणारा गौरव म्हणजे त्यांच्या उद्योगक्षेत्रातील एकूणच यशस्वी कामगिरीचा व यशाचे शिखर गाठणाऱ्या ध्येयपूर्तीचा गौरव आहे, असे मी मानतो. औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त सांस्कृतिक, क्रीडा, अध्यात्म व बँक या क्षेत्रातील योगदान देखील त्यांच्यातील अष्टपैलु गुणांची साक्ष देणारे आहेत.

श्री. आगाशे यांच्या षष्ट्यब्दिपूर्ति निमित्त त्यांना उत्तम दीर्घायुरारोग्य लाभो व उद्योगक्षेत्राची सेवा त्यांच्याकडून सतत घडत राहो, अशी आई जगदंबेचरणी विनम्र प्रार्थना करतो.

**नारायण राणे**
विरोधी पक्षनेता,
महाराष्ट्र विधानसभा

Mr. PRADEEP RAWAT
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

1892 SADASHIV PETH,
OPP. DATEWADI,
NATU BAG, PUNE 411 030
PH. 448 5050

सत्यमेव जयते

दिनांक :- २६/०२/२००२

शुभेच्छा

मा. श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांचे वयाला साठ वर्षे पूर्ण होताना त्यांचा गौरव अंक प्रकाशित होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट असून एका कर्तृत्ववान पुणेवासी सुपुत्रांचे पूर्वायुष्य व आजच्या त्यांचे जीवनाचे वाटचालीची ओळख सर्वांना होणे अगत्याचे असताना गौरव अंक समितीने उचललेले पाऊल स्वागतार्हच आहे.

श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांचे वडील कै. चंद्रशेखर आगाशे यांची कारकीर्द त्यांनी अतिशय मेहनतीने उभा केलेला साखर कारखाना याचे साक्षीने सर्वश्रुतच आहे. वडीलांचे पश्चात अत्यंत अभ्यासूवृत्तीने व चिकाटीने त्यांनी कारखान्याची भरभराट केलीच परंतु सर्व कामगार वर्गाला विश्वासात घेऊन कारखान्याची घडी सुस्थितीत राहण्यासाठी सहकार चळवळीला हातभार लावला असे मला वाटते. केवळ वडीलांनी चालू केलेला कारखाना यावरच त्यांनी भर न देता विविध क्षेत्रात जी भरारी मारली त्यात त्यांचे कौशल्य दिसून येते. अत्यंत मितभाषी असुनही विषयाची जाण व त्या विषयातील पारंगत होण्यासाठी त्यांचे प्रयत्न व त्यात मिळवलेले यश हेच त्यांच्या कौशल्याचे प्रतिक आहे.

लहान वयात पडलेली जबाबदारी समर्थपणे पार पाडत असताना औद्योगिक, सांस्कृतिक, क्रीडा, साहित्य व बॅकींग व्यवस्थापन यात मिळवलेले यश हे सर्व नवोदित तरुण उद्योजकांना मार्गदर्शक असेच आहे. क्रिकेट हा त्यांचा आवडता खेळ. त्यात राष्ट्रीय सहभागात एक उत्कृष्ठ यष्टीरक्षक म्हणून नावारूपास आलेले असुनही नुसतेच खेळात रमले नाहीत तर भावी पिढीसाठी उत्कृष्ठ मार्गदर्शक म्हणुन ते जी कामगिरी करीत आहेत ती वाखाणण्यासारखी आहे. श्री आगाशे यांचे भूतकाळातील काम सर्वांना मार्गदर्शनपर राहणार आहेच. परंतु त्यांची भविष्यातील कामगिरी ही उत्तम प्रशासक, बँक व्यवस्थापक अशा विविध क्षेत्रात उपयुक्त ठरणार आहे. त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी माझी प्रामाणिक इच्छा.

आपला

**प्रदीप रावत**
लोकसभा सदस्य

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

आमदार गिरीष बापट

२१२, शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०.
फोन : ४४५४५५४

दि. २० मार्च २००२

मा. श्री. ज्ञानेश्वर आगाशे,

यांसी स. न.

महोदय,

आपल्या वयाला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. षष्ट्यब्दिपूर्ति निमित्त आपणांस शुभेच्छा. आपण औद्योगिक, सांस्कृतिक, साहित्य, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात केलेले मार्गदर्शन व प्रगती आम्हांस प्रेरणादायी ठरणार आहे.

अशा ज्येष्ठ उद्योगपतीस उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वरास प्रार्थना.

कळावे,

आपला,

आ. गिरीष बापट
महाराष्ट्र विधानसभा

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
सार्वजनिक बांधकाम
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : 21/4/2002

प्रति,

मा. अध्यक्ष,
श्री ज्ञानेश्वर आगाशे गौरव समिती,
श्रीपूर

यांना स. न. वि. वि.

माळशिरस तालुक्यातील श्रीपूर येथील उद्योग समुहाचे आध्वर्यु श्री ज्ञानेश्वर आगाशे यांचे वयास साठ वर्षे पूर्ण होत असून त्यासाठी त्यांचे कार्याचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने आपण दि. २५ एप्रिल २००२ रोजी त्यांचा षष्ट्यब्दि समारंभ आयोजित केला आहे. त्याबद्दल अत्यंत आनंद झाला. आगाशे यांनी सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये केलेले कार्य अतुलनीय आहे व त्या कार्याचा गौरव करणे क्रमप्राप्त आहे. सदर सत्कार समारंभ मान्यवरांचे उपस्थितीत पार पडत आहे हे वाचून आनंद झाला.

श्री आगाशे यांना दीर्घायुष्य लाभो व यापुढे त्यांचे हातून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा तसेच औद्योगिक कामे होत राहोत ही सदिच्छा.

आपले कार्यक्रमास हार्दिक शुभेच्छा.

आपला

**विजयसिंह मोहिते**
सार्वजनिक बांधकाम मंत्री
महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

*Suresh Kalmadi*

Member of Parliament (R.S.)

दि. ४.४.२००२

मा. श्री. ज्ञानेश्वर आगाशे,
यांस,

महोदय,

आपण येत्या १७ एप्रिल २००२ रोजी वयाची ६० वर्षे पूर्ण करीत आहात, हे समजले. त्यानिमित्त आपला गौरव अंक निघत आहे. याचा आनंद होत आहे.

क्रीडा व उद्योग क्षेत्रात आपण घेतलेली भरारी मी जवळुन पाहिली आहे. पुण्यात क्रिकेटचे आंतरराष्ट्रीय सामने घेण्यास आपण नेहमीच पुढाकार घेता. यापुढील काळात असे सामने आपल्या पुढाकाराने भरविले जावेत अशी इच्छा मी व्यक्त करतो. मी या गौरव सोहळा प्रसंगी आपणास दीर्घ आयुष्य लाभावे ही परमेश्वर चरणी प्रार्थना करतो.

60 years young!

आपला

सुरेश कलमाडी

**खा. सुरेश कलमाडी**
राज्यसभा सदस्य



# सौ. दीप्ती चौधरी
महापौर, पुणे

मा. अध्यक्ष,
मा. ज्ञानेश्वर आगाशे गौरव समिती, पुणे.

यांसी...
स. न. वि. वि.

आपले दिनांक १० मार्च, २००२ रोजीचे पत्र मिळाले. ज्येष्ठ उद्योगपती मा. ज्ञानेश्वर आगाशे यांच्या षष्ट्यब्दिपूर्ति निमित्त आपण गौरव अंक प्रसिद्ध करीत आहात हे वाचून आनंद झाला.

आपल्या अभ्यासू वृत्तीने आणि कर्तृत्वाने औद्योगिक, सांस्कृतिक, साहित्य, क्रीडा, अध्यात्म आणि बँकिंग क्षेत्रांत विविध शिखरे पादाक्रांत करण्याबरोबरच विनयता, सहकार्य इ. दुर्मिळ होत चाललेल्या गुणांना त्यांनी कधी अंतर दिले नाही. खऱ्या अर्थाने जीवनात सर्वंकष यशस्वी होऊन त्यांच्या स्वभावातील विनय व ऋजुता आजही अनेक जणांना भावते. अनेक क्रिकेटपटूंचे जीवन घडविण्यात त्यांचे योगदान अतिशय मोलाचे आणि इतरांना अनुकरणीय आणि मार्गदर्शक असेच आहे. या गौरव अंकास हार्दिक शुभेच्छा.

कळावे,

आपली विश्वासू

**सौ. दीप्ती चौधरी**
महापौर, पुणे

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

आ. सुधाकर रामचंद्र परिचारक
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४००००८
दु. क्र. कार्यालय : ३०७२८१६ / ३०७२८१७

मा. अध्यक्ष,
श्री. ज्ञानेश्वर आगाशे गौरव समिती,

महाशय,

आपण श्री. ज्ञानेश्वर आगाशे (मालक) यांचा षष्ट्यब्दिपूर्ति महोत्सव साजरा करीत आहात ही नक्कीच त्यांच्यावर मनापासून प्रेम करणाऱ्यांच्या दृष्टीने आनंदाची बाब आहे.

आदरणीय कै. चंद्रशेखर आगाशे यांचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे चालविला आहे व त्यात अनेक नव्या उद्योगांची भरच टाकली आहे. शक्यतो खाजगी उद्योगपती असणाऱ्या व्यक्ति सहकारी क्षेत्रामध्ये डोकावत नाहीत. पण त्यांनी श्री सुवर्ण सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकारी क्षेत्रातही आपण कोठे कमी नाही हे दाखवून दिले आहे.

खाजगी क्षेत्रातील उद्योगपती, सहकारी बँकेचे संस्थापक, विविध शिक्षण संस्थांचे मार्गदर्शक, क्रीडा क्षेत्राचे विशेषत: क्रिकेटचे श्रेष्ठ संघटक, नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे भूषविलेले स्वागताध्यक्षपद, अनेक संस्थांचे आश्रयदाते, विविध राजकीय पक्षातील नेत्यांशी जोडलेले वैयक्तिक संबंध अशारितीने त्यांनी आपले जीवनातील अष्टपैलुत्त्व सिद्ध केले आहे.

दिलेले शब्द पाळण्याचे त्यांचे औदार्य : ब्रिमा शुगर लिमिटेड, श्रीपूर हा खाजगी साखर कारखाना सहकारीकरणासाठी घेण्याबाबत आमची चर्चा झालेली होती व व्यवहारही ठरलेला होता. परंतु व्यवहारास विलंब होत होता. दरम्यानच्या काळात रुपये एक कोटी जादा रक्कम येत असतानाही त्यांनी आम्हालाच कारखाना दिला. आजकालच्या जगाच असे औदार्य दाखविणे ही दुर्मिळ बाब झाली आहे.

उद्योगपती असूनही साधी राहणी, राजकारणी नसूनही हजारो लोकांशी गेली कित्येक वर्षे जोडलेले व टिकविलेले वैयक्तिक संबंध, चांगल्याला चांगले म्हणण्याची त्यांची वृत्ती यामुळे आगाशे मालक यांनी जनमानसात आपले असे एक स्वत:चे स्थान निर्माण केले आहे.

असे हे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व आपल्या वयाची ६० वर्षे पूर्ण करीत आहे याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो व वास्तव जीवनांत शतक साजरे करणेसाठी त्यांना चांगली प्रकृती लाभावी अशी 'पंढरपूरच्या पांडुरंग' चरणी प्रार्थना करतो.

कळावे,

आपला विश्वासू,

सुधाकर रामचंद्र परिचारक

# *Sunil Gavaskar*

I am delighted to know that Shri Dnyaneshwar Agashe is to be felicitated on the completion of 60 years. Time certainly has passed unnoticed so to speak. I remember as a schoolboy seeing Shri Agashe's photo as a promising wicketkeeper in the Sport & Pastime, which used to be the bible of a budding sportsperson then. It was a magazine that reported sporting events and happenings all around the world but also concentrated on domestic tournaments.

Though Shri Agashe did not go on to play for India, he played for Maharashtra for a number of years and after retirement has looked after the administration of Maharashtra Cricket Association which he heads today.

As a batsman who believed the batsman's first target is to score a century, I would like to extend my best wishes to Shri Agashe on his 60th birthday and pray that he goes on to achieve a very rare century of life.

With good wishes,

**Sunil Gavaskar**



It is indeed a very pleasant sentiment to learn that Shri Dnyaneshwar Agashe will be attaining a milestone in his life on 17th April 2002, his 61st Birthday.

I know him as a cricketer and a businessman since long time. As a cricketer he represented Maharashtra as a wicketkeeper in the Ranji Trophy Tournament for which I was leading the side. His wicketkeeping was very sound and he had a very safe pair of hands behind the stumps. In addition to his wicketkeeping abilities, he was also a very fine batsman. He served Maharashtra cricket earnestly during his cricketing days.

The other side of the coin, He, as a businessman, has always been helpful to his friends who approached him for financial assistance. I have experienced it for my Company, whenever we were badly in need of funds. Indeed He is a friend of "ALL"

Maharashtra cricket is really fortunate to have him as a Chairman of the Association and under his able leadership the Association is functioning very well.

I wish him a long life and pray for his grand success.

**C. G. Borde**

सकाळ

सकाळ पेपर्स लिमिटेड

ज्ञानेश्वर आगाशे यांचा आणि माझा जुजबी परिचय बरीच वर्षे होता. माझे बंधू आप्पासाहेब हे अकलूजला व्यवस्थापकीय संचालक होते. तेथे माझे जाणे होत असे. सहकारी चळवळ, साखर कारखाने हे विषय घरांत चर्चेमध्ये असत. आगाशे, आपटे, वालचंद हिराचंद, डहाणूकर अशी नावे घेतली जात.

पिलानीहून अभियांत्रिकीची पदवी मिळाल्यावर मी व्यवसायाला लागलो. खेळाची आवड असल्याने मी बॅडमिंटन नियमितपणे खेळत असे. १९७६-७७ सालामध्ये मी आगाशे यांच्या ग्रुपमध्ये बॅडमिंटन खेळू लागलो. तेथून खरी आमच्या मैत्रीला सुरुवात झाली. त्याच सुमारास बारामतीमध्ये वाइनरी अडचणींत आली होती. त्याची जबाबदारी मी घ्यावी असे सर्वांनी सुचविले. आगाशेंना द्राक्षापासून ब्रँडी करावयाची आहे असे गप्पांमध्ये माझ्या ध्यानांत आले. त्यांनी सर्व माल तर उचललाच, पण योग्य किंमतही पुढील काळात दिली. द्राक्षापासून वाईन बनविण्याच्या शेतकऱ्यांच्या कारखान्याला पुनर्जीवन मिळाले. त्यांत पहिली पायरी या व्यवहाराची होती.

नंतरच्या काळात बँकेमुळे, 'सकाळ'मुळे आमचे संबंध वृद्धिंगत होत गेले. ते आजतागायत. 'सकाळ'च्या सर्व बाबतीत आगाशेंनी मला मन:पूर्वक आणि निरपेक्ष पाठिंबा दिला. अडीअडचणींत महत्त्वाची मदत कली. त्यांचे ऋण कायमचे स्मरणात राहतील.

या सर्व सुमारे २५ वर्षांच्या काळात अनेक भेटीगाठी, चर्चा एकमेकांमध्ये होत होत्या. त्यांनी अनेकांना केलेल्या मदतीचे, मार्गदर्शनाचे प्रसंग मी पाहात होतो, अनुभवत होतो. अनेक आर्थिक, मानसिक कटू प्रसंग त्यांनी मित्रांसाठी, इतरांसाठी सोसले, हेही मी पाहिले. पण हे सर्व चालू असताना क्रिकेटपासून साहित्यापर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये प्रांतीय, देशपातळीवर सहभाग किंवा नेतृत्व केले. कोणत्याही मित्राला याचा अभिमानच वाटेल. अडीअडचणीत साथ देणाऱ्या अशा निगर्वी मित्राला भविष्य काळासाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

प्रताप गो. पवार

॥ श्री आदिशक्ति तुळजाभवानी ॥

**महाराजा शिवछत्रपति प्रतिष्ठान ( ट्रस्ट )**

द्वारा : विश्रामबागवाडा, सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०. ☎ ४४५२८२२ E-mail - janataraja@vsnl.net

विश्वस्त : श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे


दिनांक : 8/4/2002

॥ श्रीशान्ति ॥

उद्यमशीलता आणि रसिकता हा श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांचा स्वभावधर्मच आहे. आपल्या वडीलांच्या कर्तृत्वाचा वारसा श्री. ज्ञानेश्वर आगाशे यांनी अगदी ओळंब्यात सांभाळला आहे. एवढ्या तरूणपणी ते एकसष्ठ वर्षाचे झाले ह्याचा आम्हा धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना अभिमान वाटतो, कौतुक वाटते. अशाच तरूण वयात त्यांना शंभरावे वर्षही लागावे आणि त्यांच्या कर्तृत्वाचा समाजाला आणि देशाला अलोट लाभ व्हावा हीच श्री जगदंबेच्या चरणी आमची मन:पूर्वक प्रार्थना.

त्यांचे हसरे आणि हौशी व्यक्तिमत्व म्हणजे महाराष्ट्राच्या जामदारखान्यातील जडावांचा कंठाच आहे. चांगले काम करणाऱ्या तरूणांना आपल्या दोन्हीही हातांनी हसतहसत आधार देणारे आणि उत्तुंग उंचीवर नेणारे श्री. ज्ञानेश्वर आगाशे हे आकाशासारखेच विशाल मनाचे आणि पसायदानातील सद्भावनांचे गंगौघ आहेत. श्रीसरस्वती, श्रीलक्ष्मी आणि श्रीभवानी त्यांस उदंड, उदंड यश आणि आयुष्य देवो.

राजते लेखनावधिः ॥

— बाबासाहेब पुरंदरे

श्रीशिवराज्य शके ३२८
चैत्र शुद्ध ९



श्रीमंत व राणीसाहेब .... !

# श्रीमंत योगी

**बाळ इनामदार**

ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे हे भरघोस आणि भरगच्च नाव नुसतं उच्चारलं तरी शेरवानी, पगडी व उपरणे या वेषातील पुणेरी ब्राह्मणाचं रूप डोळ्यासमोर उभं राहतं ना? हे एक रूप तर आमच्या ज्ञानेश्वरचं आहेच. पण त्याची अनेक लोभवणारी रूपं आहेत. कुणाच्या लेखी तो 'श्रीमंत' आहे, तर कुणाच्या लेखी 'माऊली' आहे, कुणाचे ते आगाशेसाहेब आहेत तर कुणाचा 'शिरीन' आहे. आणि कुणाचा तर चक्क 'छब्या' आहे !

पण ह्या सगळ्या रूपांमधला आत्मा एकच आहे. एका निर्मळ मनाच्या माणसाचा! दिलदार उमद्या मित्राचा!!

ज्ञानेश्वरला मी १९५८ सालापासून पाहतो आहे. ओळखतो आहे म्हणणं थोडंसं धाडसाचं होईल. कारण माझ्या मते ज्ञानेश्वरला संपूर्णपणे कुणीच ओळखलेलं नाही. बहुतेकांची ओळख ही हत्ती आणि सात आंधळे ह्या गोष्टीसारखी आहे. पण प्रत्येकाला हेही माहीत आहे की आपल्या दाट ओळखीच्यावरही हा ज्ञानेश्वर दशांगुळे उरतोच !

माझ्या डोळ्यांसमोर त्याची पहिली मूर्ती म्हणजे एस.पीच्या मैदानावर चार चौकार मारून सोळा धावा फटकावल्यानंतर, मारूती खांद्यावर गदा टाकून असतो, तसा बॅट टाकून एका मस्तीत परतणारा - 'आऊट झालो, पण कसा ठोकला !' या गुर्मीत आणि जणू पॅव्हिलियन मधे आपला सत्कार आहे अशा ऐटीत! सामना नू.म.वि. विरुद्ध होता. आणि त्यावेळी पदमजी ढाल मिळवण्याचा आमचा उत्साह म्हणजे 'लगान'ला ऑस्कर मिळवण्यापेक्षा कमी नव्हता !

त्यावेळीही आम्ही रमणबागेची क्रिकेटवेडी मुलं नायक-पूजा (Hero worship) करायचोच. त्यात मधु गुप्ते, शरद धायगुडे ( फायनलला ६३ धावात १० बळी ) हे होतेच. पण अग्रपूजेचा मान मात्र ज्ञानेश्वरचा ! शाळा सुटल्यानंतर आणि मी मुंबईला स्थलांतर केल्यानंतर माझा फारसा संबंध आला नाही. पण १९७३ साली माझ्या आयुष्यात नंदू गोरे नावाचं एक चंदनाचं झाड आलं ! नंदू हा पण क्रिकेटर आणि ज्ञानेश्वरसारखाच जानदार माणूस. समान मैत्रीमुळे जुन्या संबंधाना उजाळा मिळाला आणि मैत्री आजतागायत कायम आहे.

ज्ञानेश्वरचा एक गुण किंवा त्याच्या यशाचे एक कारण कुठले असं जर मला विचारलं , तर मी ठामपणे सांगेन की माणसं जमवणं आणि ती सांभाळणं. इतक्या उदार मनाचा (आणि हाताचासुध्दा) दुसरा मित्र माझ्या पाहण्यात नाही.

'जगापाशी जगन्मित्र, जिव्हेपाशी आहे सूत्र' हा समर्थांचा मूलमंत्र त्याच्या स्वभावातच आहे. कित्येकांनी त्याचा फायदा-गैरफायदा घेतला, फसवलं, कुणी नाराज झाले, कुणी कान भरले, कुणी आकस धरला, पण ज्ञानेश्वरनं या कुणाबद्दल कधीही आकस बाळगला नाही की डूरव धरला नाही. तो आपला हत्तीसारखा दमदार चाल चालतच राहिला !

असंख्य मित्रांना त्याने जी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत केली आहे त्याची नुसती आठवण केली तरी अचंबायला होतं ! बरं, कधीच काही केल्याचा गवगवा नाही की टेंभा नाही. जे लोक गैरसमजाने वा अन्य कारणाने काहीसे दूर गेले होते, त्यांना जणू पूर्वी काही घडलेच नाही असे समजून ज्ञानेश्वरने सामावून घेतले आणि वर मदतच केली हे मला स्वत: ला माहीत आहे. 'जगाच्या बागेत मैत्री इतके सुंदर फूल नाही,' असं साने गुरुजी म्हणायचे. तसं असेल तर देवाने ज्ञानेश्वरला एक सुंदर पुष्पगुच्छच दिला आहे (साठीच्या समारंभाच्या फार आधी !) असंच म्हटलं पाहिजे. पण याचं श्रेय त्याचा स्वभाव आणि त्याने मित्रांची जी कदर केली त्याला आहे. विलास एकबोटे, मुकुंदा चोपडे यासारख्या अत्यंत निष्ठावंत मित्रांची साथ तर होतीच पण बृहन्महाराष्ट्राच्या किंवा सुवर्ण सहकारीच्या व्यवहारात मोलाचा सक्रिय सहभागही होता. ज्ञानेश्वर आयुष्यात जे जे काही साधू शकला त्यात या मित्रांचा बहुमोल वाटा आहे आणि मुख्य म्हणजे ज्ञानेश्वरला त्याची पूर्ण जाणीव आहे !

मला एक गोष्ट आठवते. खूप वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरला शिव छत्रपती पुरस्कार मिळाल्याची बातमी आली आणि आम्ही मित्रांनी संध्याकाळी पूनम मधे जेवणाचा घाट घातला. ऐनवेळी त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर आनंद भडकमकर यांना रात्री ९ वाजता प्रमुख पाहुणे म्हणून यायची विनंती केली. ते अक्षरश: अंगावरच्या कपड्यानिशी आले आणि अभिनंदनाचं भाषण करताना पहिलंच वाक्य म्हणाले, 'पुण्याच्या कलेक्टरला कुठल्याही वेळी झब्बा पायजम्यात ओढून आणणं फक्त ज्ञानेश्वरलाच शक्य आहे!' मला वाटतं हे एकच वाक्य ज्ञानेश्वरबद्दल खूप काही सांगून जातं!

खरं म्हणजे वरपांगी खुशालचेंडू किंवा Casual वाटणारा (किंवा दाखवणारा म्हणा!) ज्ञानेश्वर मुळातून अतिशय समतोल आणि विचारी आहे. त्याच्याकडे एक खास गावाकडचा असतो तसा robust common sense आहे. धंद्याची विलक्षण जाण आहे, पण वागण्यात धंदेवाईकपणा नाही. आयुष्याबद्दल आसक्ति आहे पण वखवख नाही. खानदानी श्रीमंतीची जाणीव आहे, पण माज नाही. उदारता आहे पण उधळेपणा नाही!

कमलाकराने अनंत हस्ते देऊन आणि याने दोन्ही करांनी घेऊनसुध्दा त्याच्याकडे एक प्रकारची अलिप्तता आहे. 'जशी असावी रवीची अलिप्त वृत्ती, प्रकाश देऊन झाल्यावर मावळता यावे' अशा विलक्षण विरक्तीने वागण्याचं कसब त्याला साधलं आहे.

त्यामुळेच त्याच्या सहवासात येणारी माणसं त्याच्यावर नुसतं प्रेम करीत नाहीत, तर भक्ती करतात. मग तो श्रीपूरचा शेतकरी असो नाहीतर पुण्याचा शाळकरी असो! मी तर त्याला अनेक कारणांनी पुण्यातला 'अखेरचा पेशवा' म्हणतो. पुण्यातला त्याचा दरबारं ज्यांनी पाहिला असेल त्यांना मी काय म्हणतोय् ते लगेच कळेल ! अर्थात् हा दरबार शनिवारवाड्यात न भरता रूपाली (आता रणजीत!), पी.वाय्.सी. अशा अधिक शानदार जागी भरतो. ऑफिसचा थाटही तसा पेशवाईच. त्याच्या कंपनीतली पदे मॅनेजर, जनरल मॅनेजर वगैरे नसून सरदार, अमात्य, सुमंत वगैरे असावीत असा मला पुसट संशय आहे! 'मागेल त्याला मदत' हा स्वभाव असल्याने मला पेशवे पर्वतीच्या पायथ्याशी रमणा भरवून दक्षिणा वाटत त्याची आठवण येते. म्हणून मी सुवर्ण सहकारीला 'रमणा'हे नावही दिले पण हे सर्व करतांना सहकार क्षेत्रातली अत्यंत यशस्वी बँक हा लौकिक सुवर्ण सहकारीने कमावला आहे, हे विसरून चालणार नाही.

कोवळं वय असतांना झालेला वडिलांचा निधनाचा आघात, सात बहिणी, आई, भाऊ असं मोठं कुटुंब,

साखरेसारख्या राजकीयदृष्ट्या Volatile Commodity चा वडिलोपार्जित धंदा, ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर ज्ञानेश्वरनं काय ताकदीनं आयुष्य पेललं ते लक्षात येतं. दुःख आणि अडचणींचा बाऊ तर कधी केलाच नाही, पण सबब म्हणूनसुध्दा कधी वापरल्या नाहीत.

या सगळ्या प्रवासात सौ. रेखा त्याच्यामागे (खरं तर माझ्या मते उगीचच मागे मागे) राहिली! लग्नानंतरची काही वर्षे केवळ गृहिणी ही भूमिका भक्कमपणे निभावणारी रेखा पुढे सचिव, सखी, प्रिय भार्या, ललिते कलाविधौ या भूमिकाही समर्थपणे पेलू लागली. व्यवसायात लक्ष घालू लागली. ज्ञानेश्वरला 'साठी' च्या शुभेच्छा देताना या 'काठी' चा आधार विसरून चालणार नाही.

आम्हा मित्रांची ज्ञानेश्वरबद्दल एकच तक्रार आहे. जेवढ्या महत्त्वाकांक्षा त्याने बाळगायला पाहिजेत तेवढ्या तो बाळगत नाही. वरकरणी तरी अल्पसंतुष्ट वाटतो! वास्तविक त्याचे गुण आणि जनसंपर्क पाहता तो महाराष्ट्र च्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक आयुष्यात खूप काही करून दाखवू शकेल ही माझी खात्री आहे. बोलताना सारखी निवृत्तीची भाषा बोलतो. त्याला एकदा सांगायला हवं की 'तू निवृत्ती नाहीस, ज्ञानेश्वर आहेस!'

क्रिकेट नियामक मंडळाचं अध्यक्षपद हुकलं तेव्हा आम्हाला सगळ्यांनाच फार वाईट वाटलं. ज्ञानेश्वर इतका त्या पदाला लायक दुसरा माणूसच नाही. पण 'गर्दीत गारद्यांच्या, सामील रामशास्त्री' अशी अवस्था असल्यामुळे राजकारण्यांची सरशी झाली आणि क्रिकेटप्रेमी मागे पडले.

ज्ञानेश्वरबद्दल विचार करतांना मला नेहमी समर्थांच्या या ओळी आठवतात आणि असं वाटतं की जणू त्याला समोर ठेवूनच त्यांनी त्या लिहिल्या आहेत -

समय प्रसंग ओळखावा।<br>
राग कदापि नसावा।<br>
आला तरी कळो नेदावा।<br>
जनामध्ये ॥<br>
मागील अपराध क्षमावे।<br>
कारभारी हाती धरावे।<br>
सुखी करून सोडावे।<br>
कामाकडे ॥

चार चौकारांनी सोळा धावा ठोकणारा तो ज्ञानेश्वर आज त्याच ऐटीत साठी पूर्ण करत आहे. मधल्या काळात उत्तम वेव्हारे धन तर जोडलेच पण असंख्य लोकांचे दुवे पण मिळवले. फार अवघड गोष्ट आहे ही. आयुष्यातल्या अनेक प्रसंगी तो निश्चयाचा महामेरू असल्याचा अनुभव आलाच. बहुत जनांसी आधारू आहे ह्याचीही प्रचीती आली. पु. लं. नी एक ठिकाणी म्हटलं आहे की, श्रीमंतीचं वारं अंगावरून गेलं की बऱ्याच जणांना लकवा भरतो. पण या खानदानी श्रीमंतानं आपल्या साध्या, सुसंस्कृत, शालीन आयुष्याला तसलं वारं लागू सुध्दा दिलं नाही. इतर मित्र त्याला श्रीमंत म्हणतात पण श्रीमंत योगी हेच वर्णन जास्त बरोबर नाही का?

•



महाबळेश्वर ... ज्ञानेश्वरमामा अन् भाचे कंपनी

# नावं तरी किती ठेवायची

**रेखा आगाशे**

स्थळ - "चंद्रशेखर" शनिवार पेठ, पुणे. मी सौ. रेखा ज्ञानेश्वर आगाशे, बैठकीच्या खोलीत बसून अखंड येणारी माणसं आणि फोन यांना तोंड देत आहे. खरंच कधी कधी असा दिवस उजाडतो की या बैठकीच्या खोलीतच संपूर्ण सकाळ कशी संपून जाते हेच कळत नाही. आता हा दिवससुध्दा त्याच जातीतला. नुकतीच ओळख झालेल्या एक बाई काही सामाजिक स्वरूपाचे काम घेऊन माझ्याकडे आल्या होत्या. 'हे' नेमके मुंबईला गेले होते. त्यामुळे त्या बाईंशी बोलता बोलतांनाच मी फोनही घेत होते आणि भेटायला येणाऱ्या लोकांना उत्तरेही देत होते.

'ह्यांचे' एक मित्र घरात शिरले ते गर्जना करीतच. "हा छब्या नेमका आजच कसा मुंबईला गेला?". मी गप्प बसलेली. ते पुढे म्हणाले, "वहिनी, शेतावरून शेंगा आल्या, मी म्हटलं जरा छब्याबरोबर गप्पा मारीत खाव्यात. खाली चौकशी केली तर कळलं की छब्या मुंबईला. आता रात्री तो आला की तुम्ही दोघं तरी माझी आठवण करीत खा". मी हसत हसत पिशवी स्वीकारली आणि त्यांना निरोप दिला.

तेवढ्यात टेलिफोनची घंटा खणखणली. टीपींचा फोन होता. "रेखावहिनी 'श्रीमंत' आहेत का हो?". "नाही हो. तुमचे श्रीमंत मुंबईला गेलेत. उद्या सकाळी मात्र नक्की भेटतील". असं सांगून मी फोन ठेवला. समोर बसलेल्या बाईंशी बोलणं पुढं चालू केलं आणि पाचदहा मिनिटांत ते तुटलं. आमच्या विमलताईंनी घरात प्रवेश केला. "अगं रेखा, शिरीन आहे का गं घरी?".

"नाही हो पहाटेच मुंबईला गेलेत". मी म्हणाले. त्यावर विमलताई म्हणाल्या. "थोडं काम होतं शिरीनशी, उद्या सकाळी मला फोन करायला सांगशील? मी आत्ता मंदारच्याही कानावर घालून ठेवते". मंदारला हाका मारीत त्या आतल्या खोलीत अंतर्धान पावल्या.

आमची बैठक पुन्हा सुरू झाली. मधेच एकदा बँकेतून माणूस आला. हातातली फाईल ठेवत म्हणाला. "आगाशे साहेब आले की त्यांच्या सह्या घेऊन ठेवा. मी उद्या दुपारी येऊन फाईल घेऊन जाईन". माझ्यासमोर बसलेल्या बाई मला म्हणाल्या, "एक विचारूका तुम्हाला?" मी प्रश्नार्थक मुद्रेनं त्यांच्याकडे बघितलं. त्या पुढे म्हणाल्या, "आगाशेसाहेब, श्रीमंत, छब्या, शिरीन ही सगळी नावं 'ज्ञानेश्वर आगाशे' याच व्यक्तीची आहेत का?"

मी हसत हसत मान डोलावली आणि म्हणाले, "आपण बायका नवऱ्याला 'नावं' ठेवण्यात पटाईत असतो. पण ही सगळी 'नावं' त्यांच्याच प्रेमाच्या आणि कौतुकाच्या माणसांनी ठेवलेली आहेत". बाई त्यांच्या कामाचा विषय संपवून निघून गेल्या तरीहि त्या अनेकविध टोपण नावांचा विचार मात्र माझ्या मनातनं गेला नाही.

पंचवीस तीस वर्षांपूर्वीचा काळ. आमच्या ऐन तारुण्यातला. आमचं आगाशे कुटुंब चांगलं पाचपंचवीस माणसांचं. आणि मी मात्र माहेरच्या चक्क चौकोनी कुटुंबातून येथे आलेली. मग कधी मी म्हणावं, "अहो जरा दोनचार दिवस कुठेतरी बाहेर जाऊन येऊ या ना", आणि लगेच महाबळेश्वरची ट्रिप ठरे. पण आमची दोघाचौघांची नव्हे हं. निदान आठदहा तरी भाचेमंडळी बरोबर असायची.. त्या मुलांच्यामधे गप्पाटप्पा, चेष्टामस्करी यात वेळ मजेत जायचा.क्रिकेट हा त्यांच्या आवडीचा विषय, पण हॉकी, फुटबॉल या खेळातही त्यांना मोठा रस होता. त्यांचे भाऊ पंडितराव आणि ते स्वतः, दोघांनीही वडिलांच्या हौशीखातर आखाड्यामधे कुस्त्या मारलेल्या. या कुस्तीतूनच त्यांना 'छब्या' हे नाव चिकटलं. त्याकाळी नगरला 'छबू रानबोके' नावाचा प्रसिध्द मल्ल होता. महाबळेश्वरात या मुलांबरोबर खेळण्यात आणि दांडगाई करण्यात हे अगदी रंगून गेलेले असायचे. ते चित्र आता डोळ्यासमोर उभं राहिलं की वाटतं, "ह्यांना", मित्रांनी जे 'छब्या' नाव ठेवलं ते योग्यच आहे. आता वयाची साठी आली तरी त्यांच्यातलं हे 'छब्यापण' टवटवीत ताजं आहे.

ऐन तारुण्यातल्या या आठवणींनी मन अजून थोडं भूतकाळात गेलं. आम्ही सगळेच गोगटे लग्नानिमित्त पुण्यात आलो होतो. माझं वय वर्षे अठरा. मी मुंबईला ज्युनिअर बी.ए. करीत होते. माझ्या लग्नाचा विचार माझ्यासकट कोणाच्याच डोक्यात नव्हता. पण अचानकपणे आगाशांच्या घरी मुलगी दाखवायला न्यायची माझ्या आजीची कल्पना माझ्या वडिलांनी मान्य केली. बाबांबरोबर मी प्रथमच 'चंद्रशेखर' घराच्या पायऱ्या चढले. तेव्हा एका मध्यमवयीन नऊवारी साडीतल्या स्त्रीनं आमचं स्वागत केलं. मला वाटलं ह्याच बहुधा माझ्या भावी सासूबाई असाव्यात. नमस्कार चमत्कार, या बसा, झालं. त्यांनी कोणाला तरी सांगितलं, 'जा रे जरा शिरीनला बोलावून आण'. शिरीन या पारशी नावाची कोण मुलगी येणार आणि तिला का आवर्जून बोलावलंय? याचा उलगडा मला काही होईना. पण मग खुद्द 'हेच' जेव्हा हजर झाले तेव्हा या टोपण नावाची मला मोठी गंमत वाटली. पुढे आणखीनही उलगडा असा झाला की ज्या स्त्रीला मी सासू समजले ती 'ह्यांची' थोरली बहीण 'सौ. लीला मेहेंदळे' होती. पुढे या घरची मी सून झाले, तेव्हा गप्पांमधून हे कळलं की 'शिरीन' नावाचं बारसं हे ह्या थोरल्या बहिणीचं मोठं कौतुक. लहानपणी दिसणारं ह्यांचं 'पारशी गोरेपण' आणि 'घारे डोळे' हे त्यामागचं कारण. गेल्या पस्तीस वर्षात 'ह्यांच्या' बहिणी जो वात्सल्याचा आणि प्रेमाचा वर्षाव 'ह्यांच्यावर' करीत आल्या आहेत त्यानं मी अनेकदा भारावून गेली आहे. त्या प्रत्येकीच्या 'शिरीन' या हाकेतच त्या प्रेमाची प्रचीती मला येते.

'श्रीमंत' हे नामाभिधान 'ह्यांना' का चिकटलं याचा मात्र मला उलगडा लवकर झाला नाही. मी "चंद्रशेखर" मधे पाऊल ठेवल्यापासून या घरावर लक्ष्मीची कृपा आहे हे खरं आहे. पण साऱ्याच आगाशे मंडळींची वृत्ती श्रीमंतीचं, वैभवाचं प्रदर्शन करण्याची नाही. या घरामधे माझ्यावर जे संस्कार झाले ते सारे पुण्यातील कुठल्याही मध्यमवर्गीय घरात घडतात तसेच घडले. सासूबाईंचं माझ्यावर अपार प्रेम होतं. त्यांचं कडक सोवळं मी मनापासून सांभाळलं होतं. त्यांच्या कठोर शिस्तीच्या परीक्षाही मी पास झाले. अशा वातावरणात 'श्रीमंत' हे नाव कुठून आलं? 'ह्यांची' पुणेरी पोशाखाची हौस, हे त्याचं कारण. हे नाव किती समर्पक आहे याची साक्ष, त्यांचा पगडी घातलेला फोटो .

'ह्यांचा' मित्रपरिवार अफाट. कुठल्याहि ठिकाणी जायला निघालं की वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक मित्राबरोबर, नातेवाईकाबरोबर दोन चार मिनिटं तरी खर्च केल्याविना प्रवास पुरा व्हायचा नाही. 'ह्यांचे' मित्र म्हणत, 'या 'ज्ञानोबाची पालखी' प्रत्येक मुक्कामी टेकल्याशिवाय पंढरपुरी पोहोचणार नाही'. असा हा 'पालखीवाला'!

यावरून आठवलं, यांना अजून एक टोपण नाव आहे. ते म्हणजे "माऊली". खरं म्हणजे कै. चंद्रशेखर आगाशे 'ज्ञानेश्वरी' चे अभ्यासक आणि भक्त. मोठ्या श्रध्देनं त्यांनी

ह्यांच नाव ज्ञानेश्वर ठेवलं. या नावाला आपली मराठी मनं आपोआपच 'माऊली' हा शब्द जोडून टाकतात. मा. शरद पवार तर ह्यांचा उल्लेख कायमच 'माऊली' असाच करतात. श्रीपूर, पंढरपूर इथं आम्ही गेलो की सारीच जणं त्यांना माऊली म्हणत. माझ्या मनात येतं ज्ञानेश्वर माऊली सारखी आपल्या मायेची पाखर यांनी साऱ्यांना घातली आहे.

बृहन् महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे संस्थापक, माझे सासरे कै. चंद्रशेखर आगाशे यांना खासगीत जरी खूप जण 'मामा' म्हणत, तरी कारखान्याच्या सबंध पंचक्रोशीत आणि व्यवसाय वर्तुळात ते 'आगाशेसाहेब' या नावाने ओळखले जात. त्यांच्या पश्चात या साऱ्या कामाची धुरा पंडितरावांच्या - भाऊजींच्या - खांद्यावर आली आणि त्यांनी ती समर्थपणे पेलली. शुगर सिंडिकेटला अनेक अडचणीतून पंडितरावांनी बाहेर काढलं. त्या काळात 'आगाशेसाहेब' म्हणजे पंडितराव असं समीकरण होतं. पंडितरावांच्या अकाली मृत्यूनंतर 'आगाशेसाहेब' या नावाची प्रतिष्ठा सांभाळण्याचं काम 'ह्यांनी' स्वीकारलं, सहजपणे सांभाळलं. इतकंच कशाला पण त्या दोघांची अपुरी राहिलेली स्वप्नं 'ह्यांनी' समर्थपणे पूर्ण करून 'आगाशेसाहेब' या शब्दाचा नावलौकिक वाढवला.

आता घरात मात्र 'ह्यांना' तीनहि मुलं 'बाबा' म्हणतात. आमच्या घराला जी सांस्कृतिक, धार्मिक पार्श्वभूमी होती, त्यावर आमचे 'मंदार', 'आशुतोष' आणि 'शीतल' त्यांना 'डॅडी' म्हणणं शक्यच नव्हतं. आजही आमची मुलं ज्या आदराने, प्रेमाने त्यांच्या 'बाबांचा' उल्लेख करतात. बाबांच्या सल्ल्याचं अचूक मोल जाणतात, ते पाहून ऊर अभिमानाने भरून येतो.

एक परवाचा प्रसंग. माझ्या नातवानं, 'आदित्य' नं मला विचारलं, "आजी गं तू 'आजोबा'ला काय म्हणतेस?" मी निरुत्तर झाले. इतकी सारी नावं असून मी त्याला नाही उत्तर देऊ शकले. आमच्या घरी सगळं जुनं वातावरण. सासूबाईंच्या समोर ह्यांना नावानं हाक मारणं अशक्यच होतं. त्यामुळे ह्यांचं नाव फक्त मनात ते जिभेवर कधी आलंच नाही. सासूबाईंवरून आठवलं, त्या म्हणायच्या, "कुठल्याही पक्वान्नाला चव येण्यासाठी भरपूर साखरेची गोडी पुरत नाही तर चिमूटभर मिठाची जोड लागतेच". आता माझ्या सासरी साखर कारखाना आणि माहेरी मिठागरे. मला वाटायचं ते चिमूटभर मीठ म्हणजे आगाशांच्या घरातली मी!

बघता बघता मन गेल्या पस्तीस वर्षांच्या भूतकाळात भटकून आलं. हे नुसते उद्योगपती न राहता उद्योगपिताही बनले. अनेक वादळे आली आणि गेलीही. संसार म्हटला की काही अधिक काही उणे, असं असायचंच. पण ह्या बेरीज वजाबाकीच्या गणितातून माझ्या हाती राहिलेली सुखासमाधानाची शिल्लक मात्र खूपच जास्त आहे. कुणा एका 'रेखा गोगटे' ला 'ज्ञानेश्वरा' ची साथ मिळाली, आणि तिला एक विशेष अस्तित्व प्राप्त झालं.

'ह्यांना' जरी इतकी नावं मिळाली असली तरी मला मात्र एकच नाव आहे, आणि ही 'रेखा' थोडी स्वार्थीसुध्दा आहे. जर देव म्हणाला, 'वर माग' तर मी म्हणेन 'पुढच्याही जन्मी तू मला "सौ. रेखा ज्ञानेश्वर आगाशे" हेच नाव दे.

•



रेखाताई लाडक्या नातवासह



Agashe Home Front
Mrs. Shalini, Mrs Jijai, Mrs. Rekha
and Miss Sheetal

# Baba... A Narration

**Shalini Agashe**

Should I, Shouldn't I, Should I, Shouldn't I write....... I want to.

I read Aai's and Sheetal's essays on Baba, both overwhelmingly personal & dotted with many experiences & anectdotes. I wanted to write my two-bit too but as I do so now, I realize that it is exactly that - two bit. My frame of reference spans just over 5 years since I have been Mrs. Ashutosh Agashe, the younger Bahu of the Agashe family. I hope to do justice to the subject.

My father & I have shared a typical father daughter relationship- he the doting father & me the adored daughter. In many ways I was unprepared for the transition from daughter to daughter-in-law, as I am sure most young girls are. But most young girls are not fortunate enough to have fathers-in-law who guide them patiently through that very trying phase... however I was.

Baba's roles as head of a large business empire, a friend & guide to all around him and above all as a very committed father & head of our family, is indeed a Herculean task.

Instances & experiences are many & yet not enough to portray the exact picture but I shall try.

Moving from *Dilli* to Pune, different family backgrounds were all overwhelming changes & for the longest time I remember turning to Baba for support. There is one incident that will always remain fresh in my memory. The first time Aai & Baba were in Delhi before our wedding & Ashutosh was not there. I had gone to their hotel to see them & I can safely say now that I wish I didn't have to! I wasn't dressed up & demure but wore my oldest jeans & T-shirt much against my mother's will! Purely because I was so uncomfortable from inside that I had to at least wear something comfortable! I think Baba & Aai must have sensed it because on the way up in the elevator Aai laughed & said I

look like a schoolgirl & Baba ruffled my hair!! I couldn't get over it! I don't know if they remember this but that was the first of enumerous gestures extended by Baba that put me at ease.

After I came to Pune there was much leg-pulling about me & my typical *Dilli* habits! Especially the food! I think I fairly stumped everyone by claiming to dislike आंबा especially हापूस ! Since then Baba made it a point to get "लंगडा" & "दसेरी" Mangoes for me from his trips to Delhi in summer.

I have seen Baba interact with people from all walks of life; politicians to pilgrims, with incredible ease. It's a humbling experience.

All of the above has been a purely I, me, myself & Baba narrative! It seems that a few hundred words will not be sufficient to narrate all I want to!

It is seen that the nucleus commands the character of the mass. Baba's persona is seen in all his children which in turn have touched my life in a big way; as Ashu's wife, Sheetal's bhabhi & Mandar's वहिनी.

As is expected & natural, there is a gamut of emotions I have felt for Baba-love, respect, awe, occasionally anger!! But the feeling most predominant is gratitude. I am grateful to Baba for being there. At the risk of sounding politically incorrect & cliche`d I might add that he always gauged our needs & stepped into the role of a father, father-in-law, guide, friend & sometimes all of the above. Like I said a Herculean task!

I have learnt from him among many things that everything and everyone has a time & purpose for being & everything that happens only happens for the best.

At the end of the day I'm grateful to Baba for all that he stands for & am indeed blessed to be a small part of his large life.

Happy 60' th Birthday!!

•

माझे व आगाशे साहेबांचे नाते कसे बदलत गेले ही मोठी मजेदार गोष्ट आहे. माझे काका रमाकांत पेठकर हे आगाशेसाहेबांचे बालमित्र. त्यामुळे मी लहानपणी त्यांचे बॅडमिंटन पहायला जाई त्यावेळी ते माझे काका होते. नंतर मी सुवर्ण सहकारी बँकेत नोकरीला लागले तेव्हा ते माझे सर झाले. नंतर त्यांचा भाचा अभय याचेशी माझा विवाह झाल्यावर ते माझे सासरे झाले.

आगाशेसाहेबांचे हाताखाली काम करणे म्हणजे एका बाजूने आनंद तर दुसऱ्या बाजूने शिस्तीचा बडगा असतो. आनंद म्हणायचे कारण आमच्याकडून चूक होते असे वाटले तर योग्य मार्गदर्शन मिळते, चांगले काम केले तर उत्तेजन मिळते. शिस्तीचा बडगा असा की त्यांचेकडे जाताना अचूक आकडेवारी व पूर्ण होमवर्क नसेल तर एखादेच असे कडक वाक्य बोलतात की पुढचे वेळी ढिलाई होणे नाहीच.

बँकेतील आम्हा सर्व कर्मचाऱ्यांना आगाशेसाहेब हे पितृस्थानी असून त्यांच्या एकसष्टीनिमित्त सर्वांतर्फे प्रेम, जिव्हाळा व कृतज्ञता व्यक्त करते. त्यांचे सहवासाच्या आठवणींची बकुळ फुले आमच्या काळजात कायम राहतील.

Grow old alongwith me because the best of life is yet to be....

**निलन सहस्त्रबुध्दे**

# चालता बोलता वटवृक्ष

**माधुरी पुरंदरे**

'चालता बोलता वटवृक्ष' तुम्ही कधी पाहिलात कां ? विशाल वृक्षाच्या शीतल, डेरेदार छायेखाली दमलेल्या, थकलेल्या वाटसरूंना निवांत बसलेले, मानसिक, शारीरिक श्रमकरणाऱ्या असंख्य प्राणिमात्रांना आपण सगळ्यांनी बघितले असेलच !

जेव्हा मनुष्य अनाकलनीय नियतीच्या सुखदु:खाच्या दोन भात्यांमध्ये अडकला जाऊ लागतो, वारंवार जीवनमरणाची अशाश्वती,अग्निदिव्य करायला लावते, तेव्हा आठवण होते ती मानसिक आधार देणाऱ्या त्या ईश्वराची व ज्याच्या खांद्यावर मान ठेवून मनमोकळं करता येईल अशा आधाराची ! नुसते हाक मारायची खोटी हा आमचा चालता बोलता वटवृक्ष तुम्हांला तुमच्या जवळच दिसेल. आपल्या आधारदायी शब्दांनी, त्वरीत कृतीने व मी काहीतरी तुमच्यासाठी केले आहे ह्याची अजिबात जाणीव न होऊ देता सातत्याने मदतीचा हात पुढे करणारा हा आमचा चालता बोलता वटवृक्ष त्याच्या भारदस्त शीतल छायेखाली, तुमच्या दु:खी कष्टी मनाला कधी शांत, आशावादी व चैतन्यपूर्ण करतो हे कळतच नाही!

आमच्या कुटुंबात १९६७ सालापासून आलेले माझे मेहुणे गेल्या काही वर्षात कधी माझे आधारस्तंभ झाले, माझे मलाच कळले नाही !

पैशाची श्रीमंती आणि मनाची श्रीमंती ह्या दोन्ही धाग्यांनी उत्तम वीण विणणारा विणकर विरळा ! तर ही विणलेली शाल सतत दुसऱ्यांच्या सुखासाठी त्यांच्यावर पांघरणारा तर फारच विरळा !

आयुष्यातले आनंदी क्षण फुलपाखराप्रमाणे कधीच उडून गेले. जीवनप्रवाहाच्या वादळी लाटा व शीड नसलेल्या गलबताप्रमाणे दिशाहीन आयुष्य, हताश व्हायला कितीसा वेळ लागणार ! परमेश्वर, देव हाच फक्त तेव्हा तुमचा दीपस्तंभ बनतो. वादळी वाऱ्यांशी झगणारं जीवनरुपी गलबत, ह्या आशेच्या किरणांकडे जाण्याचा मार्ग शोधू लागते. शारीरिक व मानसिक इच्छाशक्तीच्या बळावर प्रवाहाविरुध्द पोहायचे धाडस 'त्याच्या' मार्गदर्शनाखाली करू लागते. हा देव आपल्या भक्तांच्या मदतीला नेहमीच धावून येतो. प्रारब्धाचे भोग कोणाला चुकत नाहीत पण ते सहन करायची ताकद 'तो' देतो.

पण .. आता हीच गंमत आहे ! चराचरात, कणाकणात व्यापलेला, जळी,स्थळी, काष्ठी, पाषाणी असलेला हा देव आपल्याला त्याच्या सगुण, मानवी रूपात कधीच दिसत


नाही. स्वत: प्रत्यक्ष नाही पण कुठल्या ना कुठल्या रूपात देव नेहमीच आपल्याला मदत करतो, आपल्या पाठीशी उभा असतो, असा माझा पूर्ण विश्वास आहे. माझ्या व माझ्या कुटुंबीयांच्या मदतीला धावून आलेले माझे हितचिंतक, सहायक, शत्रु-मित्र तसेच माझ्यासाठी आयुष्याची संजीवनी घेऊन येणारे डॉक्टर, हे सारे मला देवदूताप्रमाणे वाटतात. ज्ञानेश्वर हे त्यांच्यातलेच एक माझे देवदूत आहेत !

ज्ञानेश्वरांचे राजस, उमदे, पेशवाई रुप, लक्ष्मीचा वरदहस्त लाभलेले त्यांचे जीवन, गीतेतील श्रीकृष्णाच्या वचनाप्रमाणे फळाची अपेक्षा न करता सतत दुसऱ्याच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती, स्वत:च्या आयुष्यातील शारीरिक, मानसिक आघात सहन करण्याची त्यांची ताकद, एक वा अनेक असे व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू एकमेकात मिसळून जे हिऱ्यासारखे व्यक्तिमत्व तयार झाले ते म्हणजे आमचा कोहिनूर हिरा - ज्ञानेश्वर !

प्रकाशाचा एक छोटासा किरण सुध्दा जर हिऱ्यावर पडला तर तो तेज:पुंज होऊन सप्तरंगांची उधळण सर्वत्र करतो व सर्वत्र नवचैतन्य निर्माण करतो. या किरणाचे काम आमची रेखा करते. तिच्याकडे पाहून नेहमी मला त्यांच्या देवघरात सतत तेवत असलेल्या समईची आठवण होते. एवढीशी ती समईची ज्योत पण सबंध देवघर उजळवून टाकते. शांत, प्रसन्न वातावरण निर्माण करते. म्हणूनच ही विठ्ठल-रखुमाईप्रमाणे असलेली रेखा-ज्ञानेश्वरची जोडी मला सतत पूजनीय आहे. माझा आधार, माझे विश्वस्त आहेत.

आजच्या ह्या ज्ञानेश्वरांच्या षष्ठ्यब्दिच्या निमित्ताने माझी ईश्वरचरणी हीच प्रार्थना आहे की, ह्या आमच्या वटवृक्षाची छाया आम्हाला सतत लाभो ! त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य लाभो ! त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्वाच्या प्रकाशात खूपजणांना प्रकाशित व्हायचं आहे. त्यांच्या पाऊलखुणांचा खूप जणांना मागोवा घ्यायचा आहे ! ह्या विशाल डेरेदार वटवृक्षाच्या छायेखाली खूप जणांना शारीरिक, मानसिक श्रमपरिहार करायचा आहे ! ह्या चैतन्यरुपी ऊर्जास्रोतात खूपजणांना खूप काही शिकायचं आहे ! शुभम् भवतु. इति.

•



पंढरीच्या विठ्ठलाची पूजा करताना

# विश्वस्तांचे वारस

**रमेश मांगडे**

पुण्यापासून पन्नास किलोमीटर अंतरावर, वेल्हे महाल या परगण्यात निसर्गाच्या कुशीत दडलेलं शंभर उंबरठ्यांचे मांगदरी हे छोटेसे खेडेगाव. डोंगर उतारावर वसलेल्या या गावाला निसर्गाचे वरदान आहे, तसेच अठरा विश्वे दारिद्र्य हा शापही आहे. मांगदरी परिसरात पावसाळ्यात धो-धो पाऊस पडतो. परंतु डोंगर उताराची जमीन असल्यामुळे सर्व पाणी वाहून जाते. उन्हाळ्यात पिण्यासही पाणी मिळत नाही. भात शेतीचे उत्पन्न जेमतेमच, तेही सर्वस्वी पावसावर अवलंबीत. शिक्षणाचा फारसा प्रसार नसल्याने शेतकरी एकंदरीत अज्ञानीच. पर्यायाने मांगदरीतील शेतकरी हा पिढ्यान् पिढ्या दारिद्र्यातच खितपत पडला होता. अशा या शेतकऱ्यांना पेशाने सावकार असलेल्या आगाशे कुटुंबीयांचा फारच मोठा आधार होता. शेतकऱ्यांना पैशाची तसेच धनधान्याची, अडचणीच्या वेळेला मदत करणे हाच आगाशे कुटुंबीयांचा स्थायिभाव होता. साहेबांचे पूर्वज जरी पेशाने सावकार होते तरी सावकारी वृत्ती त्यांनी कधीच दाखविली नाही. हिशोबाच्या चोपड्या त्यांनी ठेवल्याचे आढळत नाही.जर चुकून एखादी चोपडी सापडली आणि तिचा धांडोळा घेतल्यास जमेस एकही नोंद सापणार नाही. याचे कारण परिस्थितीने गांजलेला शेतकरी घेतलेल्या कर्जांची परतफेड करूच शकत नव्हता. म्हणून आगाशे कुटुंबीयांनी कोणाकडूनही कर्जापोटी जमीन, घरदार अथवा दागदागिने गहाण ठेवून घेतले नाहीत, एवढेच नव्हे तर आपल्या स्वतःच्या जमिनी शेतकऱ्यांना कसायला दिल्या. शेतकऱ्याने शेतात कष्ट करून धान्य पिकवावे व त्याचे कुटुंब चालवून स्वतःच्या पायावर उभे राहावे, हीच त्यामागची भावना होती. शेतात उत्पन्न किती आले याची चौकशी साहेबांनी कधीही केली नाही किंवा त्या उत्पन्नातील अमुक एक वाटा मला द्या अशी मागणीही आजतागायत केली नाही.

दुर्दैवाने १९४८ मध्ये झालेल्या दंगलीची झळ आगाशे कुटुंबीयांना मोठ्या प्रमाणावर लागली. राहता चौसोपी वाडा जळला. वाड्याशेजारी असलेले रामाचे मंदिरही अग्नेय स्वाहा झाले. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली परंतु त्यातूनही आगाशे कुटुंबीय फिनिक्स पक्षाप्रमाणे अक्षरशः राखेतून पुनः उभे राहिले. या कटू आठवणी ज्ञानेश्वर साहेबांच्या बालमनावर निश्चितच कोरल्या गेल्या असतील. झाले गेले ते गंगेला मिळाले या न्यायाने भविष्यामध्ये जेव्हा जेव्हा मांगदरीतील शेतकऱ्यांना, गावकऱ्यांना साहेबांच्या मदतीची गरज लागली तेव्हा तेव्हा त्यांनी ती सढळ हाताने

दिली. मनामध्ये कोणताही पूर्वग्रह ठेवला नाही. मग तो गावच्या पिण्याच्या पाण्याचा अथवा मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असो.

गावकरी पिण्याचे पाणी साहेबांच्या वाड्यामागे असलेल्या विहिरीवरून नेत असत व विहीर आटल्यानंतर गावापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या साहेबांच्या शेतामधील झऱ्यावरून भरत. उन्हाळ्यामध्ये दोन किलोमीटर अंतरावरून पाणी आणताना स्त्रियांचे खूप हाल होत. त्यातच १९७२ चा भयंकर दुष्काळ पडला. त्यावेळी ज्ञानेश्वरसाहेबांनी स्वतःच्या शेतात असलेल्या पाण्याचा झरा स्वखुशीने जिल्हा परिषदेच्या ताब्यात दिला. त्या झऱ्यावर जिल्हा परिषदेने विहीर बांधली व गावाला नळाने पाणीपुरवठा सुरू केला. या योजनेचा आणखी एक फार मोठा फायदा झाला तो म्हणजे पावसाळ्यामध्ये विहिरीचे पाणी दूषित होत असे व हे दूषित पाणी प्यायल्याने नारूसारखा एक भयंकर आजार लोकांना होत असे. घरटी एक दोन तरी व्यक्ती नारूचा पाय धरून बसलेल्या असत. नळातून पाणीपुरवठा ज्या वर्षी सुरू झाला त्या वर्षापासूनच नारूसारखा दुर्धर रोगहि अदृश्य झाला. याचे श्रेय अप्रत्यक्षपणे ज्ञानेश्वर साहेबांकडेच जाते.

गावामध्ये दहावी पर्यंत शिक्षणाची सोय होती. परंतु बसण्यास पुरेसे वर्ग नव्हते. झाडाखाली, चावडीवर, देवळात वर्ग भरत. विद्यार्थ्यांचे खूप हाल होत. ही अडचण ओळखून ज्ञानेश्वर साहेबांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ मांगदरीमध्ये अलीकडेच शाळेसाठी चार खोल्या बांधून दिल्या व शिक्षणासाठी मुलांची होणारी वणवण दूर केली. गावातील अनेक तरुणांना आपल्या विविध व्यवसायामध्ये सामावून घेतले. आज ते युवक पुण्यासारख्या शहरात फ्लॅट घेऊन सुखाने संसार करत आहेत. आपल्या मुला-बाळांना चांगल्या शैक्षणिक संस्थामध्ये घालून शिक्षणाचे फायदे घेत आहे. या प्रगतीला साहेबांनी वेळीच दिलेला हातभार फार मोलाचा आहे. गावासाठी आपण काहीतरी करावे ही सामाजिक जाणीव साहेबांच्या मनामध्ये असून व ती प्रत्यक्ष कृतीतून दाखविली. व्यक्ती मोठी झाली की तिला आपली नाळ कोठे आहे याचा विसर पडतो. आगाशे साहेब हे इतक्या उच्च स्थानावर असून देखील आपल्या मूळ गावाला व पिढीजात शेतकऱ्यांना विसरले नाहीत, असे क्वचितच घडते.

संगणकीकरण व औद्योगिक मंदी या कारणास्तव अनेक उद्योगधंद्यामध्ये कर्मचारी कपात करण्यात येत आहे. मंदीची झळ साहेबांच्या उद्योग क्षेत्रालाही जाणवत आहे. संगणकीकरणामुळे अतिरिक्त ठरलेला कर्मचारीवर्ग व बंद कराव्या लागणाऱ्या व्यवसायातील कर्मचारी यांना कामावरून काढून न टाकता इतर उद्योगात सामावून घेतले. जेणेकरून कामगार हा शेवटी जगला पाहिजे हा उदात्त हेतू मनात बाळगला. माझा व्यवसाय हा नफ्यातच चालला पाहिजे, हे केवळ एकच उद्दिष्ट न ठेवता त्या व्यवसायामध्ये काम करणारा प्रत्येक कर्मचारी हा मानाने, सुखाने व समृध्दीने जगला पाहिजे. कारण तो आगाशे उद्योग समुहाचा नव्हे तर आगाशे कुटुंबाचा घटक समजला जातो. इथे मालक आणि नोकर असे कायदेशीर नाते नाही तर कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सदस्य असे भावनिक नाते आहे. व्यवस्थापन शास्त्राच्या तथाकथित नियमांच्या चौकटीत कामगार व अधिकारी वर्ग यांना जखडून न ठेवता व्यक्तीच्या अंगातील कलागुणांना पूर्णपणे वाव देऊन त्यांचा व्यवसायाच्या वाढीसाठी जास्तीत जास्त कसा उपयोग करावा याचे मर्म साहेबांना पूर्ण ठाऊक आहे. म्हणूनच एवढा मोठा उद्योग सुरळीतपणे चालू आहे. याचे श्रेय साहेबांच्या अंगी असलेले संघटन कौशल्य व व्यक्तीची पारख करण्याची क्षमता याला जाते.

व्यवसायामधे अनेक वेळा आर्थिक अडचणी आल्या त्याला तोंड देत आगाशे साहेबांनी कामगारांच्या पगाराची व ठेवींवर देय असलेल्या व्याजाची तारीख कधीही चुकलेली नाही. मध्यमवर्ग हा पगार व व्याजाच्या तारखांकडे डोळे लावून बसलेला असतो, याची जाणीव साहेबांना पूर्णतः आहे. पुण्यातील अनेक नावाजलेले उद्योगधंदे बंद पडले

व त्यांनी ठेवीदारांना वाऱ्यावर सोडले. मध्यमवर्गीयांच्या ठेवी बुडाल्या, परंतु आगाशेसाहेबांच्या व्यवसायातील ठेवी या नुसत्याच सुरक्षित नसून ठेवीची पावती म्हणजे डिमांड ड्राफ्टच समजली जाते. इतका विश्वास आजच्या अविश्वासाच्या दिवसांमध्ये सामान्य जनतेकडून साहेबांनी मिळवीला आहे. ही त्यांची व्यवसायावरील निष्ठा दाखवते. समाजाने दिलेला पैसा हा सुरक्षित राहावा व आपण त्या पैशाचे विश्वस्त आहोत. त्याचा वापर योग्य कारणासाठीच व्हावा आणि ती नैतिक जबाबदारी माझीच आहे. याचे भान साहेबांनी सदैव ठेवले. हा विश्वस्ताचा वसा साहेबांकडे वडिलांकडून आलेला आहे.

अनेक अडचणी आल्या तरीही साहेब कधीही निराश होत नाहीत. पंढरपूरचा पांडुरंग आपल्या पाठीशी आहे, ही भावना सतत मनामध्ये बाळगून अडचणींना तोंड देऊन साहेब पुढे जात असतात. त्यांच्या अंगी असलेला हा धीरोदात्तपणा केव्हा केव्हा आम्हाला जगण्याची ऊर्मी देऊन जातो. साहेबांच्या रूपाने केवळ आळंदीची माऊलीच आमचे पाठीशी असून पंढरपूरचा श्री विठ्ठलही आहे. खरोखरच आम्ही भाग्यवान आहोत. आगाशे कुटुंबीयांचे सर्व व्यवसाय हे केवळ कामगारांचे परिश्रम व श्री पांडुरंगांचा वरदहस्त यावरच उभे आहेत. आम्ही आगाशे कुटुंबीय निमित्त मात्र आहोत, हा विचार साहेबांनी सदैव उराशी जपला. केवढी ही नम्रता.

खऱ्या अर्थाने विश्वस्तांचे वारस असलेले ज्ञानेश्वर साहेब आज एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. या निमित्ताने माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

•



ज्ञानेश्वर साहेबांनी मातोश्रींच्या स्मरणार्थ बांधलेली मांगदरीतील शाळेची इमारत



क्षण ... मित्रांच्या संगतीत रंगलेले

# रंगल्या रात्री अशा

**अरविंद मेहेंदळे**

सप्टेंबर-ऑक्टोबर १९५९ मध्ये ज्ञानेश्वर ही व्यक्ती प्रथम जवळून बघितली. प्रसंग होता नू. म. वि. विरुद्ध रमणबाग सीनियर टीमचा क्रिकेट सामना. सामना सुरू होण्याआधीच आमचे क्रिकेट शिक्षक राजाभाऊ वैद्य यांनी आगाशे किंवा मधु गुप्ते ह्यांचा ५० धावा करण्याच्या आत बळी घेतल्यास रु. ५/- रोख बक्षीस जाहीर केले होते. त्यामुळे गोलंदाजी करताना हा आगाशे आहे तरी कोण? हे बघण्याची अतिशय उत्सुकता होती. तेव्हाचा शत्रुपक्षातील मुलगा नंतरच्या आयुष्यात एवढा जवळचा मित्र होईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. त्यावेळी आगाशेची प्रतिमा म्हणजे एक कुस्त्या खेळणारा, आखूड पायजमा, नेहरूशर्ट व गांधी टोपी घालून दादागिरी करत शनिवारात हिंडणारा क्रिकेटिअर अशी होती. पुढे १९६० साली स. प. महाविद्यालयात आम्ही दोघे एकाच संघात दाखल झालो आणि त्यानंतर गेली ४२ वर्षेही आम्ही दोघे एकाच संघात अजूनही खेळत आहोत, ह्याची गंमत वाटते.

शालेय जीवनातील एक वांड खेळाडू व सध्याची पुण्यातील एक प्रतिष्ठित व्यक्ती हा त्याचा प्रवास मला अतिशय जवळून बघायला मिळाला. लहानपणी वडिलांचे निधन, पानशेतच्या पुरात झालेले प्रचंड नुकसान, मोठ्या कुटुंबाची जबाबदारी यातून तावून सुलाखून निघून लहान वयातच तो एक जबाबदार माणूस बनला. शनिवार पेठेतल्या छोट्या विश्वातून परदेश गमनाने बाहेरचे जग बघून त्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला व एक धडाडीचा कारखानदार त्यातून निर्माण झाला. क्रिकेटमध्ये झालेल्या अन्यायाला कंटाळून, क्रिकेट खेळण्याच्या वयातच जुन्या मातब्बरांच्या विरुध्द निवडणूक लढवून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनमध्ये प्रवेश करून असोसिएशन स्वतःच्या हिंमतीवर नावारूपाला आणली व अनेक आंतरराष्ट्रीय सामने पुण्यात भरवून असोसिएशनचीही आर्थिक भरभराट केली.

माणूस म्हणून त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. मित्रांना तर वेळोवेळी सर्व प्रकारची मदत केलीच पण विरोधकांचा सुद्धा मनांत आकस न बाळगता तेवढ्याच निःस्वार्थीपणे मदत केली. कित्येक कुटुंबे सावरण्यास त्याने कुठलीही अपेक्षा न बाळगता येवढी मदत केली की, एखाद्याने त्याचा फोटो आपल्या देवघरात ठेवला तर मला नवल वाटणार नाही. त्याचा नातेवाईक व मित्र यांचा परिवार देखील प्रचंड आहे पण प्रत्येकाच्या गरजेला तो धावून जातो. त्यामुळे प्रत्येकाला तो फक्त आपलाच जवळचा मित्र आहे असे वाटते. ही त्याची खुबी म्हणा किंवा चालूपणा म्हणा,

प्रशंसनीय आहे.

ज्ञानेश्वर खऱ्या अर्थाने 'नटवर्य' आहे. क्रिकेटसाठी लंडनला जाऊन तिथल्या पंतप्रधानांना सुटा-बुटांत भेटणे तर मराठी साहित्य संमेलनाला पुणेरी पगडीसहित पोषाख घालून दिंडीबरोबर फिरणे, तसेच पंढरपूरच्या पांडुरंगाची सोवळे नेसून पूजा करण्यापर्यंतची त्याची अनेक रूपे गेल्या ४० वर्षात मी बघितली आणि म्हणनूच नटवर्य ही संज्ञा त्याला सार्थ आहे असे मला वाटते.


आमच्या ४२ वर्षाच्या मैत्रीत बऱ्याचदा आम्ही दिवसभर बरोबर असायचोच पण त्याहीपेक्षा आमच्या मित्रमंडळींच्या रंगलेल्या रात्री म्हणजे आनंदोत्सवच असायचा. सुरुवातीला शिवाजी प्रिंटींग प्रेस मध्ये आम्ही गप्पा मारत बसायचो. नंतर कधी माझ्या बंगल्यावर, कधी विलास एकबोटेच्या आपटे रोडवरील फ्लॅटवर तर कधी स्वस्ति सारख्या कुठल्यातरी हॉटेलच्या गच्चीवर आमचा काव्यशास्त्रविनोदांचा जल्लोष चालायचा. अशावेळी विलासचे नर्म विनोद तर वर्तकचे चावट विनोद, ज्ञानेश्वरची आलटून पालटून सर्वांची थट्टामस्करी, माझे व त्याचे क्रिकेटवरून होणारे वाद, हेमंत गोरेच्या उत्साहाने मांडलेल्या योजना व त्याची उडविली जाणारी टर. मित्रांपैकी कुणाला नवीन हनी (मैत्रीण) मिळाली व कुणाची हनी गेली यावर होणारे चर्वितचर्वण, हा आमचा जणू काही नित्यपाठच झाला होता. दोन-चार दिवसांत अशी रात्रीची बैठक झाली नाही की कुणालाच चैन पडायचे नाही. ज्ञानेश्वरकडे कुणीही मोठा माणूस आला तरी त्याला घेऊन तो आमच्या पार्टीला यायचा. त्यामुळे कधी शरद पवार, विठ्ठलराव गाडगीळ यांच्यासारखे राजकारणी, कधी माधव आपटे, अजित गुलाबचंद, अरुण डहाणूकर यांच्यासारखे कारखानदार, कधी चंदू बोर्डे, बापू नाडकर्णी यांसारखे कसोटीवीर आमच्या सहवासात यायचे. आम्हा मित्रांमधला अकृत्रिम स्नेह पाहून त्यांनाही आश्चर्य वाटायचे. ज्ञानेश्वरचा पार्टीमधील नेहमीचा खेळ म्हणजे समोरच्या माणसाला मुद्दाम Provoke करायचे. समोरचा माणूस भाजपचा असला की आगाशे मुद्दाम भाजप विरुध्द बोलणार व वादाला तोंड फोडणार. जर समोरचा काँग्रेसचा असला की काँग्रेसने देशाचे नुकसान केले असे जाहीर करून त्यांना बोलते करणार. त्यामुळे गप्पांची रंगत तर वाढायचीच पण अनेक नवीन गोष्टी कळून यायच्या.

या रात्रीच्या गप्पांचे स्वरूप हलके फुलके असायचे, परंतु या गप्पातूनच अनेक योजना साकार झाल्या; नवीन नाती निर्माण झाली व सर्व मित्रांच्या आयुष्याचा आशय बदलून गेला. आंतरराष्ट्रीय कॅलेंडर शो भरवण्याचा निर्णय, बँक काढण्याचा निर्धार, राजस मासिक सुरू करायचा प्रस्ताव, महाराष्ट्र क्रिकेट संघटनेत करावयाचा प्रवेश, पुणे विद्यापीठाच्या सिनेटची आगाशे - एकबोटे यांची निवडणूक, या व अशा अनेक गोष्टींचा अंकुर आमच्या रंगलेल्या रात्रीतच रुजला आहे. या रात्रींमध्ये लहान-थोर, नवा-जुना, स्त्री-पुरुष असा कोणताच भेदभाव नव्हता. तेथे सर्व कारभार खुल्लम खुल्ला होता. कधीच कोणतीही खलबते, कट कारस्थाने नव्हती. एखाद्याने आगाशांच्या कानाशी जाऊन काही कामाच्या गोष्टी बोलण्याचा प्रयत्न नव्हता. टिंगलीत विखार नव्हता व करीत असलेल्या चुकांबद्दल विषादही नव्हता. वयाची साठी ओलांडत असतानाही आम्ही बऱ्यापैकी तरुण राहिलो आहोत यामागे या रंगलेल्या रात्रीच आहेत. आमच्या आयुष्याची रात्र अजूनही तरुण आहे व ती तशीच यापुढेही राहो हीच सदिच्छा ! अशा या माझ्या सर्वगुणसंपन्न मित्राला दोन मोठ्या जीवघेण्या आजारातून बाहेर पडून ६० वर्षे पूर्ण झाली. याबद्दल त्याचे अभिनंदन ! अशीच त्याने वयाची शंभरी गाठावी अशी मनापासून इच्छा.

•

# इंटरनॅशनल कॅलेंडर शो

**रमाकांत पेठकर**



चक्क ५ फूट उंचीचे एका परदेशी कंपनीचे खास कॅलेंडर

१९६६ सालच्या उन्हाळ्याचे दिवस होते. आम्ही विशीपंचविशीतली मित्रमंडळी उसाचा रस पीत होतो. उसाच्या गुऱ्हाळात पूर्वी अनेक देवादिकांची कॅलेंडर्स लावलेली असत. माझ्या मनात मी त्याला कॅलेंडर शो म्हणायचो.

एकदा आम्ही ज्ञानेश्वरच्या शिवाजी प्रेसमध्ये गप्पा मारत बसलो होतो. तेवढ्यात ताराप्रकाश वर्तक आला. त्याच्या डोक्यात नेहमी काहीतरी भन्नाट कल्पना यायच्या. तो म्हणाला, आपण एक कॅलेंडर शो करूया का? आम्हाला उसाच्या गुऱ्हाळातील कॅलेंडर बघण्याची सवय. आम्ही सर्वांनी त्याची प्रथम टिंगलच केली.

ताराप्रकाशने मग त्याची कल्पना समजावून सांगितली. त्याने परदेशातील बरीच कॅलेंडर्स पाहिलेली होती. त्याकाळी परदेशात उच्च दर्जाची छपाई असलेली कॅलेंडर्स असत. ती आपल्या दिवाणखान्यात असणे हे उच्चभ्रू लक्षण समजले जाई. अशा प्रकारची कॅलेंडर्स तेव्हा आपल्याकडे हातावर मोजता येईल एवढ्याच कंपन्या छापत असत. आता प्रदर्शन भरवायचे तर निदान शंभर कॅलेंडर्स तरी हवीत. देशी कॅलेंडर्स लावायची झाल्यास बरीचशी उसाच्या गुऱ्हाळातीलच. तो म्हणाला, अरे त्यात काय, पंचवीस परदेशी उत्तम कॅलेंडर्स मिळविली की झाले. प्रत्येक कॅलेंडरमध्ये ६ किंवा १२ चित्रांची पाने. ती वेगळी केल्यावर बरीच चित्रे होतात. ती लावायची. परत टिंगल.

अशी टिंगल ज्ञानेश्वर उर्फ श्रीमंतही करीत होते आणि त्यावर विचारही. त्याने ती कल्पना उचलून धरली. मग काय? काम सुरू. रोज रात्री मीटिंग्ज् होऊ लागल्या. मग मीटिंग झाली की बाजीराव रोडला महाराष्ट्र बँकेजवळ फ्रूट डिश खाण्याचा कार्यक्रम व्हायचा. प्राथमिक तयारीत सर्वप्रथम काय तर परदेशी कंपन्यांचे पत्ते गोळा करणे, सदर पत्रव्यवहार परदेशी कंपन्या व परदेशी वकिलातींशी होणार असल्याने लेटर हेड व पाकिटे उत्कृष्ट पाहिजेत. प्रदर्शनासाठी हॉल रिझर्व करणे, प्रदर्शनाला किती लोक येणार कोणास ठाऊक पण त्यासाठी जाहिरात करणे, त्यासाठी पुण्यातील

प्रमुख वर्तमानपत्रांशी संपर्क साधणे इ. जनसंपर्काचे काम अर्थात् ज्ञानेश्वरचे.

खासगी माणसाने कॅलेंडर मागवले तर परदेशांतून पाठवणार कोण म्हणून एक संस्था काढायचे ठरले. त्याचे नाव काय तर फोरम फॉर इंटरनॅशनल इन्फोरमेशन. या नावाचा अर्थ काय? देवच जाणे. या इंटरनॅशनल संस्थेचा पत्ता बघा. ४२५, शनवार (म्हणजे वर्तकांचे मोडकळीस आलेले तीन खोल्यांचे बिऱ्हाड)! लेटरहेड उत्कृष्ट अशा ओनियन स्किन पेपरवर. पत्र व्यवहाराचे काम अर्थात रामभाऊ (जोशी) च्या कडे. मग कॅलेंडर्सची वाट पाहणे कार्यक्रम. एक दिवस मी ताराप्रकाशला चेष्टेत विचारले. काय आली कां ? त्याने मला त्याच्या घरी नेले.



गरीबापासून श्रीमंतापर्यंत साऱ्यांना आकर्षण

स्कॅन्डेनेव्हिअन एअर सर्व्हिसेसच्या (SAS) एकमेव आलेल्या कॅलेन्डरकडे किती वेळ बघतच बसलो. ज्ञानेश्वरला पेशन्स फार. त्याने लगेच म्हटले, जरा दम धरा, येतील कॅलेन्डर्स. त्यानंतर मात्र बऱ्यापैकी गतीने कॅलेन्डर्स येऊ लागली. त्यामुळे पुढची तयारी करणे आलेच.


येथे ज्ञानेश्वरचे ऑर्गनायझेशनचे स्किल दिसते. त्याने वेगाने हालचाली केल्या. त्यावेळी गोखले हॉल म्हणजे पुण्यातील सांस्कृतिक कार्यक्रम व प्रदर्शने भरवायचे मध्यवर्ती ठिकाण, खर्चिक, तारीख मिळणेही अवघडच होते. पण खर्चाला मागे पुढे न बघता, ऐसपैस व व्यवस्थित गोष्टी करावयाची ज्ञानेश्वरला सवय. त्याने गोखले हॉलच प्रदर्शनासाठी पसंत केला. मग प्रसिद्धी करणे आले. माझे शेजारी चित्रकार भैय्यासाहेब ओंकार यांची ज्ञानेश्वरबरोबर गाठ घालून दिली. ज्ञानेश्वरने दोन मिंनिटात भैय्यासाहेबांना आपलेसे केले व 'सकाळ' मध्ये प्रदर्शनाच्या आदल्या दिवशी माहितीवजा लेख छापून आणण्याची व्यवस्था केली.

आता गावात ठिकठिकाणी लावावयाची बॅनर्स, फलक इ. तयार करावयाचे होते. ते काम दिलीप देशपांडेकडे सोपविले. ही कामे रात्रीच करावी लागायची. पण एवढी जाहिरात करूनही प्रदर्शनाला लोक येणार कां अशी शंका. असा नवखा उपक्रम आम्ही नवख्या मंडळींनी जुन्या काळच्या पुण्यात सुरू केला म्हणजे थोडी धाकधूक वाटणारच. म्हणून ज्ञानेश्वर म्हणाला, 'आपण एक सल्लागार मंडळ करू'. भैय्यासाहेब ओंकार, आर्किटेक्ट व्ही.व्ही. बडवे, इकॉनॉमिस्ट विलास एकबोटे, प्रोफेसर बाळकृष्ण चोपडे इ. चा त्यात समावेश होता. प्रथम विनामूल्य प्रवेश ठेवण्याचे ठरले. अभिनव कला विद्यालयाचे प्राचार्य दि. कृ. डेंगळे यांचा सल्ला मात्र फारच मोलाचा होता. त्यांनी सांगितले की प्रदर्शन फुकट ठेवायचे नाही. त्याला काहीतरी शुल्क घेतलेच पाहिजे नाहीतर फक्त फुकट्यांची गर्दी होईल. खरा रसिक खर्च करून प्रदर्शनाला येतोच. त्यातून तुमचे प्रदर्शन तर सर्वस्वी नावीन्यपूर्ण होणार आहे. आम्हाला हुरूप आला. तरीपण लोक येणार कां? शंका म्हणून प्रवेश शुल्क फक्त १० पैसे ठेवले.

एकदा सल्लागार समितीची बैठक होती. मला थोडा उशीर झाला. ज्ञानेश्वर बटाटेवडा खात होता. वडा जवळजवळ तोंडात घातलाच होता आणि मी आलो. त्याचे एवढे लक्ष होते की रमाकांत आला आणि त्याला वडा नाही. त्याने ताबडतोब तोंडाजवळ नेलेल्यातील अर्धा वडा मला दिला. ही गोष्ट लहान आहे पण त्यातून ज्ञानेश्वरचा मित्रांवरील स्नेह

दिसतो.

पुढे कॅलेंडर्स येऊ लागली. त्यात विविधता खूपच. के. एल.एम. चे कॅलेंडर अंदाजे ५ फूट उंचीचे होते. तर एक ॲल्युमिनिअम फॉईलवर छापलेले होते. जपान व इमिरेट्स्मधून आलेली कॅलेंडर्स थ्री डी होती. काही कॅलेंडर्सची चित्रे वेगवेगळ्या बाजूने पाहिल्यावर वेगवेगळी चित्रे दिसत. काही चावट चित्रांची. अर्थात ती सेन्सॉर करावी लागली. एका कंपनीने एक चौकोनी चित्राचे कॅलेंडर पाठविले होते. त्यावर फक्त वर्तुळे दिसत होती. लिहिलेली भाषाही इंग्रजी नव्हती. बराच विचार झाला. काय असावे?



प्रदर्शन पाहण्याकरिता गोखले हॉल समोर लागलेला क्यू

ती ग्रामोफोन रेकॉर्ड होती. आम्ही ती वाजवून पाहिली. त्या कंपनीची जाहिरात होती.

मग प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभाची तयारी. ज्ञानेश्वरच्या सर्व स्तरामध्ये ओळखी. आदल्या रात्री गोखले हॉल ताब्यात मिळाल्यावर एवढ्या कॅलेंडरची पाने सुटी करून रातोरात लावायची कशी. पण ज्ञानेश्वरचा मित्रपरिवार मोठा. सर्वजण कामाला लागले व पहाटेपर्यंत सर्व सिध्द. नंतर अरबटचरबट खायला मिळायचे.मग मोहन धारिया यांच्या अध्यक्षतेखाली तसेच महाराष्ट्र बँकेचे जोग साहेब यांच्या शुभहस्ते उद्घाटन समारंभ करावयाचे ठरले होते आणि उद्घाटनाचा दिवस उजाडला. गोखले हॉलच्या बाहेरच्या मोकळ्या जागेत स्टेज उभारण्यात आले होते. आणि उद्घाटनाचा कार्यक्रम सकाळी १० वाजता होता. आम्ही पहाटेपर्यंत काम करून परत घरी जाऊन आंघोळी आटपून जरा चांगले कपडे वगैरे घालून उद्घाटनाला हजर झालो. उद्घाटनाला लोक येणार का? शंका होतीच. पण काय सांगू. उद्घाटन समारंभ आमच्या लेले सरांच्या भाषेत अगदी झोकात झाला. त्यामुळे प्रदर्शनाला गर्दी होणारच अशी खात्री झाली.

पुण्यातील लोक चोखंदळ म्हणून प्रसिद्ध. आमच्या कॅलेंडर शो ला एवढा प्रतिसाद दिला की तिकिटासाठी गोखले हॉल ते उंबऱ्या गणपती चौक अशी मोठी रांगच रांग सकाळ संध्याकाळ लागलेली असायची. कॅलेंडर शो ची वेळ संपल्यावर व्हॉलेन्टीअर्ससाठी ज्ञानेश्वरच्या घरून बटाटा रस्साभाजी व ब्रेड यायचा. मग आम्ही दिवसभर काम केल्यावर त्यावर ताव मारत असू. लोकाग्रहास्तव प्रदर्शन बरेच दिवस चालले. पण सगळ्यांनाच आपापली कामे होती. मग आवराआवरी.

असाच कॅलेंडर शो पुढील तीन वर्षे पुण्यातच नव्हे तर मुंबई व कलकत्ता येथेही केला. असा हा आमचा कॅलेंडर शो. याचे विस्ताराने वर्णन करण्याचे कारण म्हणजे ज्ञानेश्वर व त्याच्या मित्रपरिवाराचे अनेक एकत्र उपक्रम झाले पण हा पहिला व नावीन्यपूर्ण होता व या वेळेपासूनच त्याची ऑर्गनायझिंग ॲबिलिटी व लोकसंग्रहाची चुणूक दिसत होती. सहकाऱ्यांना मोकळीक देऊन उगाच प्रत्येक गोष्टीत नाक खुपसायचे नाही. पण हात लावेल त्याचे सोने करणारा हा परीस. त्याच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या निमित्ताने आम्हा सर्व मित्रमंडळींतर्फे अभिष्टचिंतन!

•



पूज्य गुळवणीमहाराज श्री. व सौ. आगाशे यांना सुवर्ण बँकेच्या उद्‌घाटन प्रसंगी आशिर्वाद देताना

# ज्ञानेश्वर व श्री सुवर्ण सहकारी बँक

**विलास एकबोटे**

ज्ञानेश्वरच्या आयुष्यात अपत्य जन्माचा आनंद चारवेळा त्याच्या वाट्याला आला. त्यापैकी तीन वेळा म्हणजे मंदार, आशुतोष आणि शीतल यांचे जन्म आणि चौथा सुवर्ण सहकारी बँकेच्या स्थापनेच्या दिवशी.

गेली चाळीस वर्षे ज्ञानेश्वर व माझ्यासारख्यी त्याची मित्रमंडळी यांनी अनेक उपद्व्याप, उचापती, उठाठेवी किंवा सभ्य भाषेत ज्याला उपक्रम म्हणतात अशा गोष्टी केल्या. सुवर्ण बँकेच्या स्थापनेपासूनच्या आज तागायत केलेल्या अनेकविध प्रयत्नांतून ज्ञानेश्वरच्या अंगचे खूप गुणविशेष प्रकट झाले. या सर्व ठिकाणी मी स्वतः उपस्थित असल्याने मला ते प्रकर्षाने जाणवले आणि आज या गौरवग्रंथाच्या निमित्ताने साऱ्यांसमोर मांडावेत असे मनापासून वाटले.

१९६९ मधे साऱ्या प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले आणि त्याचवेळी आमच्या डोक्यात सुवर्ण सहकारी बँकेच्या स्थापनेची कल्पना रूजली. लगेचच आम्ही रिझर्व्ह बँकेत अर्ज केला आणि त्या दिवसापासून फक्त ४० दिवसात आम्ही सहकारी संस्था म्हणून लागणारं रिझर्व्ह बँकेचं लायसेन्स हाती घेतलं. मी, ज्ञानेश्वर आणि डॉ. भिडे बँकेचा प्रस्ताव घेऊन रिझर्व्ह बँकेत गेलो होतो. त्यावेळी ज्ञानेश्वरचं वय सत्ताविस. साहजिकच बँकेच्या उच्चाधिकाऱ्यांपुढे आम्ही अगदी 'पोरे' होतो. त्यामुळे उच्चाधिकारी श्री. के. पी. कुलकर्णी यांचा प्रथम दृष्टीकोन ही मुले बँक म्हणजे पोरखेळ समजतात की काय? असा होणं स्वाभाविकच त्यांनी आमच्यावर प्रश्नांचा अक्षरशः भडिमार केला. परंतु ज्ञानेश्वरनं खराब विकेटवर जोरदार बॅटिंग करून 'के. पी.' नां आपलसं केलं. आमचे प्रामाणिक हेतु आणि आमची जबर इच्छाशक्ती 'के. पीं' च्या मनावर ठसविण्यास ज्ञानेश्वरचं संभाषणचातुर्य यशस्वी झालं. आजही श्री. के. पी. कुलकर्णी सुवर्ण बँकेचे खास मित्र आणि सल्लागार आहेत.

त्यावेळचे रिझर्व्ह बँकेचे एक प्रमुख अधिकारी गुलामघौस हे तर स्वतःच उत्तम क्रिकेटीअर होते. ज्ञानेश्वरचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व, गोड बोलणं आणि क्रिकेटची पार्श्वभूमी या साऱ्या गोष्टींची त्यांच्यावर खास छाप पडली. ते चक्क ज्ञानेश्वरच्या प्रेमातच पडले. ज्ञानेश्वरच्या व्यक्तिमत्त्वातील या गुणांची प्रचिती पुढे वारंवार आली. अनेक मीटिंगमध्ये समोरच्या लोकांनी विरोधी भूमिका घेतलेली असतांना मीटिंग संपतासंपता त्यांनीच ज्ञानेश्वरची भूमिका उचलून धरावी असं घडल्याचं मी स्वतः पाहिलेलं आहे.

१९६९ च्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर नोंदणी झालेली

भारतातील पहिली सहकारी बँक म्हणून सुवर्ण सहकारी बँकेकडे बघावं लागेल. आश्चर्य असं की, १९५२ ते १९६९ या सतरा वर्षाच्या दीर्घ काळात पुण्यात एकहि नवीन सहकारी बँक स्थापन झाली नव्हती. जणू या क्षेत्रातील पुणेकरांची उपक्रमशीलता गोठून गेली होती. सुवर्ण सहकारी बँकेच्या स्थापनेनंतर मात्र पुण्यामधे पंचवीस तीस बँका निघाल्या. इतकंच नव्हे तर महाराष्ट्रात नागरी सहकारी बँकांचं जाळं विलक्षण वेगानं पसरलं, शूम्पिटर या ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञाने संयोजकाचा मोठेपणा वर्णन करतांना असं म्हटलंय, 'Success of initial entrepreneur smoothens the path of others.' सुवर्ण सहकारी बँकेची स्थापना करून ज्ञानेश्वरनं आद्य उद्योजकाचं हे स्थान मिळवलं आणि इतर बँकांचा मार्ग सोपा केला हे निर्विवाद सत्य आहे.

अर्थशास्त्रामधे निर्णयाच्या अंमलबजावणीची वेळ ही निर्णयाएवढीच महत्वाची असते असं मूळ तत्त्व आहे. जगदीश भगवती हा आंतरराष्ट्रीय कीर्तिचा अर्थशास्त्रज्ञ म्हणतो, 'भारतीय संयोजक संधि मिळूनही तिच्या वेळेचं मोल जाणत नाहीत.' वेळेची अमूल्यता हे सूत्र ज्ञानेश्वरनं पक्कं सांभाळलं आणि ते बँकेच्या यशाचं महत्त्वाचं कारण ठरलं. आमच्या बँकेचं उद्‌घाटन त्यावेळचे महाराष्ट्राचे अर्थमंत्री बॅ. शेषराव वानखेडे यांच्या हस्ते झालं. त्यांनी आपल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरूंची एक आठवण सांगितली. 'पंडितजींना उत्तर प्रदेशात सहकारी संस्था उभी करायची होती. तो काळ ब्रिटीश आमदनीचा होता. अनेक वर्षे वाट पाहून पंडितजींनी शेवटी तो नाद सोडून दिला.' वेळ वाया घालवणं म्हणजे संधि गमावणं. वेळेचं हे भान ज्ञानेश्वरानं कायमच संभाळलं 'Parlysis by analysis' या आर्थिक रोगापासून सुवर्ण बँक दूर राहिली याचं श्रेय फक्त ज्ञानेश्वरचं. निर्णयाची झटपट कार्यवाही हेच यशाचं गमक.

सुवर्ण बँकेची प्रगती अफाट वेगानं घडली. ज्ञानेश्वरचा पुण्यामधील विविध क्षेत्रातील सहभाग, त्याचं योगदान, तसंच पुणेकरांना आवडणारी त्याची मध्यम वर्गीय प्रतिमा आणि सर्वसामान्यांचा त्याच्यावर असलेला दृढ विश्वास यामधूनच बँकेच्या प्रगतीला वेग आला. आज मितीस सुवर्ण बँकेचे चार लाखाहून अधिक खातेदार आहेत. मला वाटतं त्यातील पन्नास हजार पेक्षा जास्त खातेदार ज्ञानेश्वरच्या प्रत्यक्ष ओळखीचे आहेत. सुवर्ण बँक वृत्तपत्रातून किंवा सार्वजनिक ठिकाणी जाहिरातीच्या रूपानं फारशी झळकत नाही. तरीहि बँकेकडे खातेदारांची आणि ठेवीदारांची अक्षरशः रीघ लागलेली असते. एवढ्या व्यापक स्वरूपात जनसामान्यांच्या मनामध्ये सुवर्ण बँकेची प्रतिमा ठसवणं ही ज्ञानेश्वरची किमया. मंगेशकर कुटुंबीय, मा. शरद पवार, मा. प्रतापराव पवार, पंडित भीमसेन जोशी, कै. वसंतराव देशपांडे, क्रिकेट महर्षी कै. दि. ब. देवधर, श्री. सुनील गावसकर, श्री. चंदू बोर्डे यासारखे क्रिकेट पटू, श्री. अमोल पालेकर, श्री राम गबाले, सरपोतदार कुटुंबीय, श्री. जयराम कुलकर्णी, श्री. जब्बार पटेल असे अनेक सिनेसृष्टीतील मान्यवर, एवढंच कशाला श्री. दिनेश अफझुलपूरकर, डॉ. पुरूषोत्तम पाळंदे असे उच्च सनदी अधिकारी अशा नानाविध क्षेत्रातील मान्यवरांनी सुवर्ण बँकेकडे आपली कष्टसाध्य ठेव सोपवली आहे. याचं संपूर्ण श्रेय ज्ञानेश्वरलाच द्यायला हवं.

कुठलीही बँक शेवटी एक व्यवसाय म्हणून चालविण्यासाठी व्यावहारिक दूरदृष्टी लागते. एक यशस्वी उद्योजक म्हणून ज्ञानेश्वरजवळ ती प्रगल्भता होतीच. आमची बँक स्थापन झाल्यापासून म्हणजे अगदी पहिल्या वर्षापासून नफा मिळवत आली. त्या उत्पन्नातूनच संशयित किंवा बुडीत कर्जांसाठी तरतूद करण्याचे धोरण ज्ञानेश्वरने सुरूवातीपासूनच आम्हाला आखून दिले. १९९३ नंतर रिझर्व्ह बँकेने एन्.पी.अकाऊंट्स व त्या संबंधीची तरतूद याबद्दल मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली. त्या तत्त्वांचे पालन सुवर्ण बँकेत मात्र १९६९ पासूनच होत होते. रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणांमुळे अनेक बँका १९९३ नंतर अडचणीत आल्या. त्यांचे उत्पन्न रोडावले. सुवर्ण बँकेला मात्र या निर्णयामुळे झळ पोहचली नाही. बँकेला नफा होताच,

बँकधारक लाभांश वाढवून देण्याची मागणी करतात. झालेला नफा वाटून भागधारकांना खूष करण्याचा मोह टाळून सुवर्ण बँकेने नफ्याचा जास्तीत जास्त भाग गंगाजळीत टाकला आहे आणि आपला निधि वाढवला आहे. या यशाला ज्ञानेश्वरचं नेतृत्त्व कारणीभूत आहे.

पूर्वीच्या बँका बऱ्याच अंशी जुन्या सावकारांप्रमाणे वागत. कर्ज मागणारा माणूस हा जणू काही नडलेला याचक आहे असं समजत. तो काळहि तसा होता की भांडवलाचं दुर्भिक्ष होतं आणि म्हणून कर्जाचं रेशन पध्दतीनं वाटप करावं लागे. त्यावेळी कर्ज मागणाऱ्याला कर्जासाठी अनेक हेलपाटे मारायला लावायचे आणि शेवटी कमीत कमी कर्ज द्यायचं यातच बँकांना भूषण वाटे. पण ज्ञानेश्वरचा दृष्टीकोण अशा काळातही खूपच पुरोगामी होता. कर्जावर व्याज देऊ शकणारा उद्योजक हा राष्ट्रीय संपत्तीत मोलाची भर घालतो, अशा उद्योजकाला सन्माननीय ग्राहक समजून उत्तम वागणूक देणे हे बँकेचे प्रथम कर्तव्य असं तो नेहमी म्हणे. त्याचा हा दृष्टीकोण आमच्या बँकेच्या अधिकाऱ्यापर्यंतही नीट समजला आहे. बँकेच्या या वृत्तीमधून मध्यम वर्गातून नव्यानं पुढं आलेल्या उद्योजकांना सुवर्ण बँक हा फार मोठा आधार वाटत आला आहे. आज परिस्थिती बदलली आहे. बँकांच्या हाताशी भांडवलाची समृध्दी आहे. अशा वेळी साऱ्या बँका उद्योजकांचा अनुनय करू लागल्या आहेत. पण जेव्हा कर्ज देणे अवघड होते, त्या काळातहि ज्ञानेश्वरने कर्ज घेणाऱ्या उद्योजकांना दिलेली मानाची वागणूक आमच्या बँकेचे खास वैशिष्ट्य ठरलं आहे आणि आमच्या भरभराटीचं कारणसुध्दा.

माझ्यासारख्या समाजवादी विचारसरणीच्या माणसाला भावलेला ज्ञानेश्वरचा आणखी एक गुण म्हणजे समाजातील दुर्बल घटकांबद्दल असलेली कणव. अगदी अलीकडच्या काळातील एक प्रसंग. आदर्श जनता बँक ही मुंबईतील एक आजारी बँक होती. बहुसंख्य खातेदार दलित समाजाचे आणि आर्थिक दुर्बल गटातील. बँकेच्या दुःस्थितीमुळे या गरीब खातेदारांवरचं तर आकाश फाटलेलं होतं. ठरलेली लग्नं मोडत होती आणि घरातल्या औषधोपचाराला देखील पैसा नव्हता. बँकेमुळे झालेली ही दैना पाहून ज्ञानेश्वरचं मन हेलावलं. आदर्श जनता बँकेचं पुनर्वसन हे एक आव्हान म्हणून त्यानं स्वीकारलं. याकरिता बँकेचं प्रशासन पहिल्यांदा ताब्यात घेऊन तोट्यात चाललेली बँक नफ्यात आणून दाखवली. अडचणीत असलेल्या खातेदारांना जरूर तेवढे पैसे त्वरित परत दिले. या गरीब लोकांच्या बुध्दविहार इमारतीच्या मागणीलाहि ज्ञानेश्वरनं होकार दिला आणि इमारत बांधून दिली. 'गरीबांसाठी कणव असलेला श्रीमंत' हे ज्ञानेश्वरचं आगळं रूप माझ्या मनात ठसलं.

याच बँकेची अजून एक आठवण अगदी आवर्जून सांगावी अशी. आदर्श जनता बँकेच्या प्रशासकीय मंडळावर ज्ञानेश्वर, मी व खडके यांची नेमणूक झाली आणि त्याच दिवशी ज्ञानेश्वरने आपल्या एका व्यावसायिक मित्राकडून एक कोटी रूपयांची ठेव बँकेसाठी आणली. तीहि मुदत ठेव म्हणून नव्हे तर करंट(चालू) अकाउंट या बिनव्याजी खात्यासाठी. एखाद्या बुडू शकणाऱ्या बँकेत ज्ञानेश्वरच्या शब्दाखातर एक कोटी रूपये पणाला लावणारे मित्र आमच्या ज्ञानेश्वरला लाभले आहेत. असा नेता लाभला म्हणूनच आदर्श जनता बँकेनं पुन्हा उभारी धरली.

ज्ञानेश्वरच्या नेतृत्वाखाली सुवर्ण सहकारी बँकेचे संचालक व कर्मचारी जणू एका कुटुंबाचे घटक म्हणून काम करतात. ज्ञानेश्वरला कर्मचाऱ्यांबद्दल विशेष आत्मीयता आहे. त्यांच्या मागण्यांना तो सहजी हो म्हणत नाही, पण प्रत्यक्षात त्या सहसा फेटाळतहि नाही. एकदा कर्मचारी ज्ञानेश्वरकडे बोनस मागायला आले. ज्ञानेश्वरने नाही म्हणून सांगितले आणि आश्चर्य म्हणजे टाळ्यांचा कडकडाट झाला. 'साहेब नाही म्हणतात ना, म्हणजे निश्चित बोनस देणार' अशी त्यांची मनोमन खात्री. या परस्परांवरील प्रेमामुळे बँकेत कधीच संप, निदर्शने असे प्रकार झाले नाहीत. साहेबांनी दिलेला निर्णय शिरसावंद्य मानून सर्व कर्मचारी बँकेशी समरस झाले आहेत. आजारपण असो, लग्न कार्य असो किंवा कौटुंबिक कुरबूर असो, कुठल्याहि

प्रसंगी कर्मचाऱ्यांना साहेबांचा आधार वाटतो.

बँकेचे संचालक मंडळ तर कुठल्याही सहकारी बँकेला हेवा वाटेल असे गुणवंत आहे. प्रा. चोपडेसारखे हुषार इंजिनिअर, बडव्यांसारखे ख्यातनाम वास्तुशिल्पकार, बाळ इनामदारसारखे अव्वल दर्जाचे कर सल्लागार, मंदार सारखे संगणक तज्ञ, आशुतोष सारखे तरूण रक्ताचे उमदे क्रीडापटू, सौ. रेखासारख्या उद्योजक महिला, रमाकांत पेठकर, दादा जाधव, भास्कर पाटील नि पुरूषोत्तम लिमये सारखे विविध क्षेत्रातील इंजिनिअर्स, राम जोशी सारखे जुने नि ष्ठावान सहकारी व विमलताई खऱ्यांसारख्या वकिलीणबाई - प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रात नावाजलेला तर आहेच, पण सारे बँकेसाठी आपलं सर्वस्व देण्यास तयार असलेले. यात ज्ञानेश्वरची गुणग्राहकता दिसतेच, पण त्याबरोबर सर्व संचालकांची परस्पर मैत्री व समान ध्येयासाठीची धडपडही व्यक्त होते.

बँकेच्या संदर्भातील ज्ञानेश्वरचे हे गुणगान अजूनही चालू ठेवता येईल. अनेक गुणांबरोबर ज्ञानेश्वरच्या स्वभावाच्या काही मर्यादाही सांगता येतील. सामान्यतः कुठलाही निर्णय कटु असेल तर तो घेतांना ज्ञानेश्वर दिरंगाई करतो. शक्यतो कठोर कारवाई न करावी लागेल तर बरे, अशी त्याची मनोवृत्ती. समोरच्या माणसावर संपूर्ण विश्वास टाकण्याचा मूळ स्वभाव. त्यामुळे कित्येकदा त्याचे वागणे भाबडेपणाचे ठरते. आधी आपण सारे माणसे आहोत आणि मग उद्योजक आहोत, बँकर आहोत अशी त्याची श्रध्दा. वैयक्तिक पातळीवर हे सारे सद्गुणच आहेत. पण संस्थेच्या हिताच्या दृष्टीने अडचणीचे ठरू शकतात. अर्थात, आज पावेतो एक संस्था म्हणूनहीसुवर्ण बँक यशस्वी ठरली आहे हेही नक्कीच.

असो. ज्ञानेश्वरची पंच्चाहत्तरी अशीच गौरवाने साजरी होवो!

•

१९६७ साली महाराष्ट्र रणजी ट्रॉफी क्रिकेट संघासाठी माझी प्रथमतः निवड झाली आणि याच सुमारास ज्ञानेश्वर आगाशेंशी माझी तोंडओळख झाली. महाराष्ट्र विरुध्द बडोदा रणजी करंडक सामना वालचंदनगर येथे खेळला गेला. या सामन्यामध्ये आम्ही एकत्र खेळलो. या सामन्यामध्ये त्यांनी केलेल्या चाळीस दणकेबाज धावा व उत्तम यष्टिरक्षण अजूनही माझ्या स्मरणांत आहे. साखर उद्योगाची धुरा अत्यंत तरुणपणी पेलावी लागल्यामुळे आगाशेंना क्रिकेटला रामराम करावा लागला व महाराष्ट्र क्रिकेट संघ किंबहुना भारतीय संघ एक उत्कृष्ट यष्टिरक्षकाला मुकला.

एक अत्यंत गुणवान क्रिकेटपटू, यशस्वी उद्योजक व कुशल क्रीडा संघटक या भूमिकेतून गेली ३५ वर्षे मी त्यांची कारकीर्द पाहिली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन व भारतीय नियामक मंडळ यांच्या विविध समित्यांवर काम करून त्यांनी क्रिकेटची महान सेवा केलेली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड अपेक्षित होती. ज्ञानेश्वर आगाशेमुळे ज्या ज्या महाराष्ट्रीय खेळाडूंना भारतीय क्रिकेट संघाचे व्यवस्थापक, निवड समिती सदस्य म्हणून संधी मिळाली त्यांनी थोडी फार अंग मेहेनत घेतली असती तरी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली असती.

माझ्यासारख्या अनेक व्यक्तींना अनंत हस्ते निस्वार्थीपणे मदत करणाऱ्या या माझ्या सहृदास भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष होण्याची संधी नजीकच्या भविष्यात प्राप्त व्हावी हीच गजाननाच्या चरणी प्रार्थना.

**विठ्ठल जोशी, सांगली**

# ॥ चंदनाते कायसेनि चर्चावे ॥

**शरच्चंद्र बेलवलकर**

अगदी चारच दिवसांपूर्वीची गोष्ट. मी धावत पळत सुवर्ण सहकारी बँकेत शिरत होतो. तेवढ्यात बँकेतल्या कुलकर्णींनी हाक मारली. मी थबकलो आणि त्यांच्याकडे पाहू लागलो. ते म्हणाले, 'माझं थोडं काम आहे'. मी म्हटलं, "अहो, मी निघालोय आगाशे साहेबांकडे आणि मुळातच तीन-चार मिनीटं उशीर झालाय". त्यावर घाबरल्या मुद्रेने कुलकर्णी म्हणाले, 'अरे बापरे, नको, नको, मग जा तुम्ही. पण मीटिंग संपली की मात्र आपण भेटूया'.



ए. व्ही. भट कंपनीच्या कृतज्ञता समारंभत बेलवलकर, ज्ञानेश्वर आगाशे, प्रतापराव पवार

आगाशेसाहेबांच्या वक्तशीरपणाचा असा धाक आम्हा सर्वांनाच आहे. पण गंमत अशी की उशीर केल्याबद्दल आगाशेसाहेब दुसऱ्याला कधी रागवत नाहीत. ठरलेली वेळ स्वतः काटेकोर पाळून त्यांनी हा धाक निर्माण केलाय.

आगाशेसाहेबांबरोबरची मीटिंग संपवून मी कुलकर्णींना भेटलो अन् विचारलं, "काय हो ! काय काम होतं?" कुलकर्णी म्हणाले, "तुम्ही साहेबांना खूप जवळून बघितलंय्. तुमच्या आठवणींवर आधारित असा एक साहेबांबद्दलचा लेख द्याना मला लिहून". मी विचारलं, "पण काय निमित्ताने लेख लिहायचा आहे?" 'नेमकं तेच नका विचारू ते आमचं गुपित आहे'. इति कुलकर्णी. मी म्हटलं, 'बरं नका सांगू. पण केव्हा हवा आहे लेख?'कुलकर्णी स्वतःशी हिशोब करत म्हणाले, 'सतरा एप्रिल पूर्वी'. पटकन् माझ्या डोक्यात प्रकाश पडला. १७ एप्रिल हा आगाशेसाहेबांचा जन्मदिवस आणि सन २००२ म्हणजे वय वर्षे साठ पूर्ण'. अरेच्चा, हेच कुलकर्णींचं गुपित दिसतंय्.

माझी आगाशेसाहेबांशी असलेली जवळीक साऱ्यांनाच माहिती. त्यामुळे आमच्या आठवणीही खूप. पण मला नेहेमी असं वाटतं की "आठवणी" म्हणजे मखमली पेटीत

जपलेला रत्नहार.आपल्या हृदयमंजुषेत त्या जपायच्या असतात. अगदी क्वचित् प्रसंगी मंजुषा उघडून, डोळे भरून त्या न्याहाळायच्या असतात. आता मात्र तो क्वचित् प्रसंग समोर उभा ठाकलाय. 'ज्ञानेश्वर' षष्ट्यब्दिपूर्तीच्या मंगल सीमेवर उभे आहेत.

'ज्ञानेश्वर' बद्दल काही आठवतांना 'ज्ञानेश्वरी' ची आठवण होणं अगदी साहजिकच. दहाव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच सद्गुरू, सत्पुरुषाचं वर्णन करताना ज्ञानोबाराय म्हणतात,

चंदनाते कायसेनि चर्चावे । अमृताते केऊते रांधावे।
गगनावरी उभवावे। घडे केवि।।

"अहो, चंदनाला कुठलं गंध लावणार? अमृताचं पक्वान्न हो कसं करणार? आकाशाचं स्वागत कुठल्या मांडवात करणार?"

आगाशे साहेबांबद्दल लिहिणं म्हणजे नेमकी हीच चूक मी करणं आहे. या माणसाच्या भलेपणाला माझ्या शब्दांनी बहुधा उणेपणच येईल अशी खन्त बाळगत मी लिहितो आहे. अमृताशी पैजा घेणारी अक्षरं हाती नसताना तर माझं हे धाडस म्हणजे चक्क वेडेपणा आहे.

उणीपुरी आठदहा वर्षं झाली असतील. माझ्यासाठी तो काळ मोठा कठीण होता. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, परमेश्वराऐवजी गडद अंधारच दिसत होता. काही दिवस असे असतात, की तुम्ही हाती घेतल्या मातीचं सोनं होतं पण ते दिवस होते हाती घेतल्या सोन्याची माती करणारे. आमच्या व्यवसायावरचं आकाशच फाटलं होतं. प्रत्येक प्रयत्नाला अपयशाची ठोकर बसत होती. माणुसकीवरचा विश्वासच उडून जावा अशा असंख्य वेळा वाट्याला आल्या होत्या.

तीन वर्षांच्या अशा काळ्या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर आमच्या एका हितचिंतक मित्रानं आगाशेसाहेबांशी ओळख करून दिली आणि म्हणाला, "ज्ञानेश्वर, फक्त तुझ्यासारखाच माणूस या लोकांना संकटातून सुखरूप बाहेर काढील". ज्ञानेश्वर आगाशे हे नाव तर माहीत होतं पण पुण्यात चक्क पंचवीस-तीस वर्षे राहूनही कधी ओळख होण्याचा योगच आला नाही. कुठलीही ओळख किंवा नातंगोतं नसताना या माणसानं आम्हाला का मदत करावी, असा प्रश्न मलाच पडला. आधीचे कटु अनुभव गाठीला असल्यानं मदत मागतानासुध्दा मी बिचकतच होतो. पण आमची कर्मकहाणी ऐकून घेतल्यावर आणि आमच्या रखडलेल्या गृहयोजना पाहिल्यावर त्यांनी मला माझी योजना घेऊन येण्यास सांगितलं. नकारघंटा ऐकायला मिळणार अशा जवळजवळ खात्रीनंच मी त्यांच्यापुढे एक कागद ठेवला अन् म्हणालो, ए. व्ही. भट कंपनी व तिच्यावर विश्वासून फ्लॅट घेणारे सुमारे ५५० मध्यमवर्गीय ग्राहक संकटातून बाहेर पडण्याचा हा मार्ग. पण आधीचा आमच्यावर असलेला कर्जाचा डोंगर पाहूनही कोणीतरी पुनः भलं मोठं नवीन कर्ज द्यायला हवं, त्यांनी माझा तो फुलस्केप कागद हाती घेतला. मिनीटभर न्याहाळला आणि म्हणाले, 'आमच्या बँकेला जास्तीत जास्त ७५ लाख रुपयापर्यंत कर्ज देता येतं. तू आमच्या टिळक रोड ब्रँचवर खातं उघड. तेवढं कर्ज मंजूर झालंय. तू कामाला लाग'.

मिनीटभर तरी मी सुन्न होतो. काय बोलावं तेच कळेना. त्यावेळी मी 'थँक्यू व्हेरी मच' असं म्हणालो खरा पण आजही त्यावेळच्या आनंदाचं वर्णन करायला माझ्याजवळ शब्द नाहीत. तो अविस्मरणीय दिवस म्हणजे माझ्या आयुष्यातील 'रात्रीच्या गर्भात असलेला उद्याचा उषःकाल' होता.

त्यानंतरचे दिवस भराभर पालटत गेले. आम्ही सारेच मोठ्या उत्साहाने कामे पार पाडत होतो. व्यवसायात जुन्या नव्या अडचणी होत्या, पण त्या साऱ्यांवर मात करूशकणारी एक शक्ती आगाशेसाहेबांच्या रूपानं आमच्या पाठीशी उभी होती. हा फक्त शाब्दिक दिलासा नव्हता. ती वस्तुस्थिती होती. काहीही हातचं न राखता ते मदत करीत होते. फक्त एक बँकर म्हणून नव्हे तर एक मित्र म्हणूनही. इंग्रजीत friend and philosopher असा शब्दप्रयोग वापरतात. आगाशेसाहेबांसारख्या विचारवंतानं आपली विचारशक्ती

आमच्या कामी जुंपली होती.

सेंट्रल बँकेच्या कर्जाची गोष्ट. बँकेनं आमच्या विरुध्द कोर्टात दावा दाखल केला होता. बँकेच्या उच्च अधिकारी लोकांशी बोलणी करणं, समझोत्याची रक्कम ठरवणं हे काम तर आगाशेसाहेबांनी केलंच पण बँकेच्या चेअरमनला त्यांनी आमची कंपनी पैसे भरू शकली नाही तर मी स्वतः रक्कम भरीन अशी ग्वाही दिली. पुढे कोर्टात येऊन पावणेदोन कोटी रूपये एवढ्या रकमेला ते जामीन म्हणून उभे राहिले.

अत्यंत साधी, अगदी मध्यमवर्गीय राहणी, तितकंच साधं बोलणं, कुठेही स्वकर्तृत्वाचा एका शब्दानंही उल्लेख नाही. अशा या माणसाच्या साध्या शब्दात आणि कृतीत केवढे अपार सामर्थ्य आहे याचा प्रत्यक्ष अनुभव मला आला.

व्यवसाय उद्योगात लागणारी कुशाग्र बुद्धिमत्ता त्यांच्याजवळ आहे. कुठल्याही कंपनीचा ताळेबंद दोन मिनिटांत बघून कंपनीची नेमकी परिस्थिती त्यांच्या डोळ्यासमोर सहज उभी राहू शकते. पण याहीपेक्षा विशेष म्हणजे त्यांच्या कुशाग्र बुद्धिला जी माणुसकीची आणि सहृदयतेची झालर आहे, ती नाही कुठे बघायला मिळत.

आगाशेसाहेबांबद्दलच्या व्यवसायातील मोठेपणाच्या दूरदृष्टीच्या अनेक गोष्टी सांगता येतील. पण एक यशस्वी उद्योगपती किंवा एक मोठा बँकर ही आगाशेसाहेबांची खरी प्रतिमाच नव्हे. ती त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेवर भाळून नियतीनेच पदरात टाकलेली छोटी बक्षिसं आहेत. एक आदर्श पुरुषोत्तम म्हणून त्यांची ओळख करून घेणं खूप महत्त्वाचं आहे. एक मित्र या नात्यानं त्यांची ही ओळख होण्याचं भाग्य माझ्या वाट्याला आलं. गाडीमधून जाताना ड्रायव्हर व ते स्वतः अशा दोनच व्यक्ती गाडीत असतील तर तुम्हाला ड्रायव्हर शेजारीच बसलेले दिसतील. त्यांच्या केबीनमध्ये कमरेला फक्त पंचा गुंडाळून आलेल्या माणसालादेखील सहज प्रवेश मिळू शकतो. इतकेच नव्हे कधी-कधी अशी व्यक्ती त्यांच्याशी अरे-तुरेत बोलत असते आणि ते हसतहसत उत्तर देत असतात. सर्वांना समान लेखण्याचा हा त्यांचा मूळ स्वभाव. त्यांच्या केबीनमध्ये मोठे राजकारणी, पुढारी, उद्योगपती, उद्योजक, क्रीडापटू, सिने कलावंत आणि असंख्य मित्रमंडळी अशा व्यक्तींचा राबता सतत चालू असतो. परंतु जी वागणूक कोट्यधिशाला तितकीच चांगली वागणूक भिक्षाधिशालाही आणि तीही मुद्दाम ओढूनताणून आणलेली नव्हे, तो स्वभावधर्मच!

क्रिकेटचा खेळ हा आगाशेसाहेबांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक. क्रिकेटच्या क्षेत्रातला त्यांचा नावलौकिकही मोठा. अगदी खरं सांगायचं तर क्रिकेट हा काही माझ्या आवडीचा विषय नाही, पण क्रिकेटच्या खेळातून आगाशे- साहेबांनी जीवनविषयक जी एक दृष्टी मिळवली आहे ती विलक्षण आहे, याचं मात्र मला कौतुक वाटतं. प्रसंग कुठलाही असो, एखादी सभा भरली आहे आणि आगाशेसाहेब बोलायला उभे राहिले आहेत. मग नक्की समजावं की त्या विषयाचं आणि क्रिकेटच्या खेळाचं असलेलं साम्य आता आपल्याला नक्की ऐकायला मिळणार. चौकार, षटकार ही यशाची विजयचिन्हं आणि कॅच किंवा बोल्ड हे अपयशाचं विशेषण. एवढंच कशाला पहिल्या इनिंग मधील यशापयशाचा संबंध सहजपणे दुसऱ्या इनिंग बद्दलच्या आशावादाशी ते सहजपणे जोडतील. "आयुष्य म्हणजे जणू एक क्रिकेटचा खेळ आहे". हे त्यांचं एक लाडकं वाक्य आहे. मला वाटतं 'सुखदुःखे समे कृत्वा'. ही त्यांना लाभलेली वृत्ती बहुधा क्रिकेटचीच देणगी आहे.

वर्षसहामहिन्याच्या छोट्या बाळापासून ते २५-३० वर्षांच्या तरुण-तरुणींपर्यंत कुणाशीही बोलताना साहेबांचं वात्सल्य शब्दाशब्दातून झिरपत असतं. या वात्सल्यवर्षावाचा लाभ खुद्द माझ्या मुलांनीच अनुभवला आहे. थोडीशी हुशारी, किंचितसं कर्तृत्व कुणा मुलामुलींनी दाखवलं की पाठीवरून त्यांचा प्रेमळ हात फिरलाच म्हणून समजा. क्रिकेट खेळणाऱ्या मुलाला ते सहजपणे "या तेंडुलकर" अशी हाक मारतील. एखाद्या तरुण उद्योजकानं सुंदरसा बॅलन्सशीट समोर आणला तर त्याला "Well done, finance minister" म्हणतील. दुसऱ्यांच्या

कामाचं कौतुक करणं ही आगाशेसाहेबांची खासियत आहे.

जेव्हा कुणी पुरुषोत्तम यशस्वी उद्योगपती असून निरहंकारी असतो, तेव्हा अतीव समाधान त्याच्या प्रत्येक कृतीतून जाणवत असतं. आयुष्यातला सारा आनंद जणू त्याच्या वाट्याला आला आहे, असं भोवतालच्या साऱ्यांना वाटत असतं. तेव्हा त्याच्या या भाग्याचं श्रेय एकट्याचं कधीच नसतं.

आगाशेसाहेबांच्या या श्रेयाचा मोठा वाटा सौ. रेखाताईंना द्यावा लागेल. देखणं रूप तर त्यांना ईश्वरानं दिलंच आहे, पण सदैव प्रसन्न आणि हसतमुख राहण्याचा



ज्ञानेश्वर आगाशे भट कंपनीच्या फ्लॅट धारकांचा सत्कार करताना

वरही त्यांनी आपल्या स्वभावातल्या मधुरतेच्या जोरावर मिळवला आहे. रेखाताईंच्या अनेक कलागुणांनी आगाशांच्या घराला सौंदर्य दिलंय, प्रसन्नता दिलीय, शांती दिलीय. तुम्ही त्यांच्या घरात पाऊल ठेवलंत की 'अगर फिरदौस जमी अस्त, हमी अस्त, हमी अस्त', 'म्हणजेच जर पृथ्वीवर स्वर्ग असेल तर तो इथे आहे अन् इथेच आहे, असा झंकार तुमच्या मनात उठेल'. ही सारी किमया मात्र रेखाताईंचीच!

श्रीमान ज्ञानेश्वर आगाशे, षष्ट्यब्दिपूर्तिच्या या मंगलप्रसंगी आम्हा सर्वांच्या तर्फे तुमच्यामधल्या क्रिकेटवीराला मी इतकंच म्हणेन,

"पहिली इनिंग तर तुम्ही गाजवलीच. दुसरीही तितक्याच जोमानं तुम्ही खेळालच, पण आयुष्याचं शतक मात्र पूर्ण करायलाच हवं".

आमच्या मित्र ज्ञानेश्वरावरची ही लघुज्ञानेश्वरी पूर्ण करताना माझ्या मनात मात्र असं येतंय,

"छान रंगीत पाट मांडावेत, भोवती सुंदर रांगोळ्या रेखाव्यात, चांदीच्या तबकात सुबक निरांजनं पेटवावीत आणि पाटावर बसलेल्या ज्ञानेश्वर, रेखाताई यांना पंचारती ओवाळताना तुम्ही - आम्ही म्हणावं,

शांतिरस्तु। तृष्टिरस्तु। सौभाग्यमस्तु।

आणि परमेश्वरानं हे पसायदान आपल्या पदरात टाकावं".

•




मित्रांसवे भटकंती... चोपडे, गोळे व आगाशे

# शुभास्ते पंथानः सन्तु।

## मुकुंद चोपडे

माझं आणि ज्ञानेश्वरचं नातं खूप जवळचं. मी ज्ञानेश्वरचा सख्खा मित्र. ज्ञानेश्वरसारख्या असामान्य माणसाचं मित्रत्व मला मिळालं हे माझं भाग्य. ज्ञानेश्वरला इतक्या जवळून पाहूनसुध्दा आम्ही सामान्य ते सामान्यच राहिलो आणि तो मात्र सहजपणे आपलं असामान्यत्व टिकवून राहिला.

आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय मुलांची श्रीमंत मुलांशी सामान्यतः दोस्ती होत नाही पण ज्ञानेश्वरच्या आमच्या सारख्यांच्या मित्रमंडळाला ज्ञानेश्वरची श्रीमंती कधीच आडवी आली नाही. इतकचं कशाला, उलट बरेचदा त्या श्रीमंतीचा उपयोगच झाला. शाळेतील दिवसात आमचं क्रिकेट तसा खर्चिक प्रकार होता. पण साऱ्या मित्रांच्या पाठीशी ज्ञानेश्वरच्या मनाची आणि हाताची श्रीमंती उभी होती. त्यामुळे साऱ्यांचंच क्रिकेटमधलं कौशल्य मैदानावर झळकलं.

ज्ञानेश्वरनं अनेक मित्रांना अनेक प्रसंगी सर्वार्थानं भरपूर मदत केली. पण आम्हां कुणाच मित्राला त्याच्या मदतीचं ओझं कधीच वाटलं नाही. जणू अशी मदत देण्याचं ज्ञानेश्वरचं कर्तव्य आहे आणि आमचा जणू तो हक्क आहे, अशा थाटात गोष्टी घडल्या ! आजहि घडत आहेत. ज्ञानेश्वरच्या मित्रांपैकी कुणीही उपकृत, कृतज्ञ, अंकित अशा शब्दांनी त्याच्याशी बांधलेला नाही. 'रूपाली' किंवा 'रणजीत' मध्ये आमचा मित्रांचा अड्डा बसला की जी भाषा वापरली जाते, चेष्टामस्करी केली जाते, वाद घातले जातात त्यावरून कुणाच्याही हे सहज लक्षात येईल.

पुण्यामध्ये कुठेही काही मोठा नागरी कार्यक्रम असेल तर बहुधा ज्ञानेश्वरची जागा व्यासपीठावर असते आणि जर समजा नसेल, तर ज्ञानेश्वर कुठल्या तरी मोठ्या व्यावसायिक मीटिंगमध्ये गुंतलेला असतो पण असं काही नसेल तर मात्र तो आमच्यासारख्या मित्रांच्या घोळक्यात दंग झालेला असतो. मग कधी तो पत्ते खेळत असेल किंवा गप्पा मारत कॉफी पीत असेल किंवा बॅडमिंटनचे दोन सेट खेळत असेल. आमच्यापैकी कित्येक मित्रांचा ज्ञानेश्वरच्या अनेक व्यवसायांशीसुध्दा सक्रिय सहभाग आहे. ज्ञानेश्वरनं व्यवसायात जी नेत्रदीपक प्रगती केली आहे, त्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावरचे आम्ही साक्षीदार आहोत. ज्ञानेश्वरच्या आयुष्यातले अनेक सुखाचे प्रसंग आणि दुःखद घटना आम्ही सुध्दा भोगलेल्या आहेत.

मित्रांपैकी कुणाच्याही डोक्यात काही नवीन कल्पना आली की, त्याचं स्वागत करताना ज्ञानेश्वर कायम म्हणत आला, "करा रे, मी आहे ना निस्तरायला बिनसलं तर".

बसं एवढेच त्याचे शब्द आम्हांला अनेकदा खूप धैर्य देऊन गेलेत. आणि त्यातूनच आमच्याही कर्तृत्वाला पंख फुटलेले आहेत.

ज्ञानेश्वर उत्तम खेळाडू, उत्तम संघटक, प्रथितयश बँकर, आणि मोठा उद्योगपती आहे हे तर सगळ्यांनाच माहिती आहे पण या सगळ्यांपेक्षाही तो एक अत्यंत भला माणूस आहे हे आम्हां मित्रांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. व्यवसायांमध्ये यश मिळवूनही उद्योजकांमध्ये आढळणारा पाषाणहृदयीपणा त्याच्यात लवमात्रही नाही. त्याचं भावनाप्रधान मन त्यानं जसंच्या तसं जपलं आहे. दुसऱ्याच्या मदतीला धावण्याचं जे व्रत त्यानं घेतलं आहे त्यामागे त्याचं हे कोमल मन आहे.

आमच्या सुवर्ण सहकारी बँकेचा उल्लेख लोक अडचणीला उपयोगी पडणारी बँक असा करतात. हजारो लोकांनी बँकेतून मदत मिळवली याचं मुख्य कारण ज्ञानेश्वरची सहृदयता. अर्थात ही सहृदयता बँकेच्या प्रगतीच्या आड मात्र कधीच आली नाही. हे खास कौशल्य मात्र त्याचंचं. काही काही वेळा हे कौशल्य अगदी पणाला लागतं. अशा वेळी ज्ञानेश्वर खूप ताण सहन करतो. त्याच्या चांगुलपणाला जेव्हा काही वेळा विषारी फळं येतात, तेव्हा आम्हाला मनापासून वाईट वाटतं.

कारखाने म्हणा, इतर उद्योग म्हणा, सारे चालवताना त्यानं त्या त्या ठिकाणी काम करणारी प्रत्येक व्यक्ती खूप महत्वाची मानली; एवढंच नव्हे तर प्रत्येक व्यक्तिला आपण आगाशे कुटुंबातले आहोत असा एक वेगळा आनंद त्याने मिळवून दिला. जर्मनीमधली अल्फ्रेड क्रपची स्टील इंडस्ट्री जगत्‌विख्यात आहे. दुसऱ्या महायुध्दात दोस्त राष्ट्रांनी हा कारखाना धुळीला मिळवला. त्यानंतरही दहा वर्षांनंतर अल्फ्रेडच्या एका हाकेनुसार हजारो कामगार पुन्हा एकत्र झाले. आम्ही क्रपियन्स आहोत हे म्हणत असलेल्या कामगारांच्या हृदयामध्ये क्रपच्या अद्वितीय स्थानाबद्दल संदेह नव्हता. आज शुगर सिंडिकेटचा साखर कारखाना सहकारी झाला असला तरीही ज्ञानेश्वरचं स्वागत मालक या शब्दानेच प्रत्येकजण करतो. कामगारांच्या हृदयात असलेलं ज्ञानेश्वरचं 'मालक' हे स्थान पुसण्यास नियतीसुध्दा असमर्थ ठरली.

हाताशी असलेल्या प्रत्येक गोष्टीतून ज्ञानेश्वर अनेकांना मदत करत गेला आहे. अनेक आजारी उद्योगांना ज्ञानेश्वरनं अपार मदत केली आहे. कित्येक वेळा तर असं वाटतं की माणसं ज्ञानेश्वरच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेतात. आमच्यासारख्या मित्रांना वाटतं की, जे आम्हांला कळतं ते ज्ञानेश्वरला कळत कसं नाही ? पण मनात येतं कळत असेल पण वळत नाही. नुकत्याच घडलेल्या एका प्रसंगात आम्हां दोघातिघा मित्रांचा ज्ञानेश्वरशी या अपात्र मदतीबद्दल मोठा वाद झाला, खूप खडाजंगी झाली. ज्ञानेश्वरने हसत हसत सारं ऐकून घेतलं आणि नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केलं.

या प्रसंगानंतर मी एकटाच शांतपणे विचार करत बसलो. माझ्या मनात आलं, जिजाईच्या तक्रारी तुकारामानं मनावर घेतल्या असत्या तर तुकाराम संत ठरला नसता. त्यानं व्यवहार सांभाळला असता आणि संतपण गमावलं असतं. आमच्या तक्रारी जिजाईसारख्याच नव्हेत काय? ज्ञानेश्वर असामान्य आहे त्याला आम्ही सामान्य व्यावहारिक पातळीवर ओढणंच चूक आहे.

तरीपण आम्हा मित्रांना ज्ञानेश्वरची काळजी वाटते. भोवतालच्या जगातल्या मतलबी माणसांपासून परमेश्वरानं ज्ञानेश्वरचं रक्षण करावं, असं मनापासून वाटतं. वटवृक्षाच्या सावलीला निवांत बसणाऱ्या वाटसरूंनी निदान आपल्याला सावली देणाऱ्या या वृक्षाच्या फांद्या तोडू नये, इतकं शहाणपण ठेवावं.

शेवटी असं म्हणावंसं वाटतं, आमचं काही बिनसलं तर निस्तरायला आम्हाला ज्ञानेश्वर आहे. ह्या ज्ञानेश्वराचं संतत्व जपण्याची सारी जबाबदारी परमेश्वराच्या खांद्यावर आहे. ज्ञानेश्वर साठीच्या उंबरठ्यावर उभा आहे. आमच्या सदिच्छाच कशाला पण आमचं सर्वस्व सतत त्याच्या शुभासाठी प्रार्थना करीत राहील.
शुभास्ते पंथानः सन्तु !

# गाठा हसत शंभरी

**विजयकांत कुदळे**

ब्रिटिशांच्या काळात महाराष्ट्रात जे साखर कारखाने उभे राहिले, त्यामध्ये श्रीपूर येथील बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. हा एक आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करून शेतकऱ्यांना चांगला दर देणारा व त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी मदतीचा हात देणारा कारखाना म्हणून श्रीपूरच्या साखर कारखान्याने नावलौकिक मिळविला आहे.

कै. चंद्रशेखर आगाशे यांच्या अथक प्रयत्नातून या साखर कारखान्याची स्थापना झाली. त्यांनी अनेक अडचणींवर मात करुन साखर कारखाना नावारूपास आणला. यानंतर त्यांचे चिरंजीव पंडितराव व ज्ञानेश्वर यांनी हा कारखाना तितक्याच समर्थपणे व लोकाभिमुखतेने चालविला. आगाशे फक्त साखर कारखाना काढून थांबले नाहीत तर काळाबरोबर बदलत जाऊन त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रातील उद्योगधंदे काढून ते यशस्वीपणे कार्यान्वित ठेवले आहेत.

श्रीपूरचा हा कारखाना शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. पंडितराव किंवा ज्ञानेश्वर जेंव्हा श्रीपूरला यायचे त्यावेळी त्यांना भेटण्यासाठी शेतकऱ्यांची तोबा गर्दी असायची. कामाचे अनेक व्याप असतानादेखील वेळात वेळ काढून प्रत्येक शेतकऱ्याला भेटण्याची संधी मिळायची. त्यांच्या अडचणी सोडवल्या ज़ात असत. हा कारखाना म्हणजे शेतकरी व कामगारांचे एक मोठे कुटुंबच होते आणि या कुटुंबाचा प्रमुख म्हणून आगाशेसाहेब नेहमीच त्यांची जबाबदारी पार पाडीत. सर्व शेतकरी त्यांना 'मालक' म्हणूनच ओळखतात.

शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत, याची प्रचीती आम्हांस १९८०-८१ साली आली. त्यावेळी आमचा माळीनगरचा कारखाना बंद होता. त्यांनी आमच्या सर्व शेतकऱ्यांच्या संपूर्ण उसाचे गळीत करून त्यांना नुकसानीतून वाचवले. त्या साखरेला पुढे चांगले दर मिळाले म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना उसाची पूर्ण रक्कम दिल्यानंतरसुध्दा दोन वर्षांनी पुन्हा जादा रक्कम दिली हे आमचे शेतकरी कधीही विसरणार नाहीत.

आगाशेसाहेबांचा मित्रपरिवार मोठा. अनेक क्षेत्रातील व्यक्ती त्यांच्या परिचयाच्या. पूर्वी ते अशा सर्व मित्रपरिवाराला श्रीपूरला बोलवित असत. आम्ही त्यावेळी कॉलेजमधून आलेलो. मोठ्या भावाच्याबरोबर आम्ही जात असू. दोन दिवस अनेक विषयांवर चर्चा व्हावयाची. आठवणींना उजाळा मिळावयाचा. मनोरंजक माहिती,

विचारांची देवाण घेवाण व हास्यविनोद यामध्ये दोन दिवस कधी गेले ते कळायचे नाही.

महाराष्ट्राच्या जीवनातील असे एकही क्षेत्र नाही की, ज्याला आगाशेसाहेबांचा 'परीसस्पर्श' झालेला नाही. संत ज्ञानेश्वरांची पालखी दरवर्षी आळंदीहून पंढरपूरला जाते तेव्हा वेळापूर मुक्कामी आगाशेसाहेबांकडून माऊलीची सेवा म्हणून वारकऱ्यांना अनेक सुविधा पुरविल्या जातात.पण त्याचा कोठे गाजावाजा होत नाही की वर्तमानपत्रात छापून येत नाही.या संदर्भात 'दे दान गुप्त, उपकार करी न बोले' अशी त्यांची विनम्र वृती असते. पंढरपूरच्या पांडुरंगावर त्यांची असीम श्रध्दा आहे.

क्रिकेट हा लहान थोरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. क्रिकेटचे सामने पाहण्यात आणि त्याची चर्चा करण्यात लाखो लोक गुंग होऊन जातात.पण क्रिकेट व्यवस्थापनामध्ये आगाशेसाहेबांचा कुशल हात असतो. हे फार थोड्या लोकांना माहीत आहे. महाराष्ट्र क्रिकेट नियामक मंडळामध्ये एक जबाबदार पदाधिकारी म्हणून काम करताना त्यांनी क्रिकेटला नवचैतन्य दिले आहे. खेळाडूंना उभारी दिली आहे आणि भारतीय क्रिकेटची यशोध्वजा सर्वत्र फडकत राहील. याची काळजी घेतली आहे. आगाशेसाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वामधे असे गुण सहजपणे दिसून येतात. त्यांचे वर्णन करण्यासाठी 'अष्टपैलू' हा शब्द कदाचित कमी पडेल. त्यांच्यासाठी 'शतपैलू' हा शब्द योग्य होईल .

मी माळीनगर कारखान्याचा संचालक, चेअरमन, होलटाईम डायरेक्टर म्हणून काम पाहिले.आता मॅनेजिंग डायरेक्टर या पदावर काम करीत असताना एक अनुभवी उद्योगपती म्हणून मा.ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांकडून मला मार्गदर्शन लाभते.त्यामुळेच ते मला आदरणीय वाटतात.

यशस्वी उद्योजक,उत्तम क्रीडा संघटक, सांस्कृतिक कार्यात सहभाग , धार्मिक मनोवृती, मार्गदर्शक मित्र,आदर्श सहकारी असे ज्ञानेश्वर आगाशेसाहेब यांना उत्तम आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा!

सुवर्ण क्षण अवतरला दारी,
उधळीत आनंदाच्या सरी ।
ईश कृपेने ओलांडलीत,
तुम्ही आज षष्ट्यब्दि ॥
शुभेच्छा देण्यास तुम्हाला,
जमली आप्तेष्ट मंडळी सारी ।
देतो शुभेच्छा मी तुम्हाला,
गाठा हसत हसत शंभरी ॥

•

# शब्दास जपणारा मालक

**भास्करराव गायकवाड**

आजच समजले की, मा.ज्ञानेश्वरजी आगाशे यांची षष्ट्यब्दिपूर्ति होणार आहे. गेल्या २० वर्षापासून बघता बघता मालक ६० वर्षाचे झाले. या ६० वर्षातील सर्व राजकीय, सामाजिक, तसेच उद्योगपती म्हणून कारखानदारीतील त्यांचे काम व या सर्वात मा.सौ वहिनीसाहेबांचे सहकार्य हे मी जवळून अनुभवले, पाहिले, त्याचा वृत्तांत लिहीणे म्हणजे एक कोशच होईल. त्यापेक्षा २० वर्षातील मालक व त्यांचे सहवासातील क्षणांवर लिहिलेले बरे.

तशी मालकांची प्रत्यक्ष भेट १९८२ सालीच श्रीपूर मुक्कामी झाली. प्रथम भेटीतच त्यांच्या हसऱ्या व्यक्तिमत्वाने भारावून गेलो. त्यातून दृढ विश्वासाचे व मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले ते आजतागायत आहेत. मालक व पंढरपूरचे श्रीमंत सुधाकरपंत परिचारक यांच्या संबंधातून व गरजेतून श्री.पांडुरंग सहकारीचे साखर कारखाना निर्मितीचे स्वप्न साकार झाले. ब्रिमा शुगरचे सहकारीकरण करणे, कामगारासाठी श्रीपूर परिसराचा विकास करणे. कुटुंबाचा प्रमुख या नात्याने मोठ्या ममतेने व साऱ्या नागरिकांच्या भविष्याचा विचार करणे व ती सारी कामे कराराने बांधून घेणे यातून नागरिक व त्यांचे कामगारावरचे सच्चे प्रेम दिसून आले.

त्याच बरोबर कारखाना हस्तांतर केल्यावर आपले व पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संबंध संपले असे कधीच दिसून आले नाही. ज्यावेळी श्री पांडुरंग सहकारी कारखान्यास किंवा व्यवस्थापनास ज्या पध्दतीची गरज असेल मग ती आर्थिक असो की जागेची असो, अगर सामाजिक स्वरूपाची असो त्या सर्व गरजा पुऱ्या करण्यास मालकांनी कधीच टाळाटाळ न करता वेळेपूर्वीच सर्व सहकार्य आणि तेही प्रेमाने व आपुलकीनं देऊ केले आणि त्याचेच प्रतीक म्हणून पांडुरंग सहकारीचे नूतनीकरण करून कारखाना उत्कर्षास नेण्यासाठी मालक व त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी अनेक प्रकारचे सहकार्य दिले. पांडुरंग सहकारीच्या सर्व उत्कर्षास मा. मालक यांचे सहकार्य व आशीर्वाद आहेत व त्यातूनच आगाशे कुटुंबीयांचा पंढरीच्या पांडुरंगावरील श्रध्दा व विश्वास दिसून आला आहे.

आज आगाशे मालकांना ६० वर्षे पुरी झाली . त्यांच्या सहचारिणी सौ. वहिनीसाहेब, दोन चिरंजीव व एक कन्या या मालकांना अभिष्टचिंतन करण्यासाठी सज्ज आहेत. त्याच्या कुटुंबीयांप्रमाणेच श्रीपूर परिसरातील सर्व कामगार, नागरिक व पांडुरंग सहकारीचे सर्व सभासद, मी व माझे

कुटुंब हे मा .मालक यांचे अभिष्टचिंतन करीत आहोत. आज मी जो आहे व घडविला गेलो ते मा. मालक यांचा आदर्श व त्यांच्या प्रेमळ वागणुकीने, त्यांच्या सहकार्याने , आशीर्वादानेच. हे सांगण्यास मला अभिमान वाटतो. मालकांचे भावी आयुष्य पांडुरंगाचे आशीर्वादाने व सर्वाच्या शुभेच्छेने वैभवाचे, उत्कर्षाचे व निरोगी जावो, ही पांडुरंग चरणी प्रार्थना.

•

## जुना सहृदयमित्र

रमणबागेत मी ज्ञानेश्वरपेक्षा पुढे. पण क्रिकेट टीम मध्ये एकत्र खेळलो. पुढे कॉलेजमध्ये विरुध्दही खेळलो. त्यानंतर व्यवसायामध्ये अनेक ठिकाणी एकत्र भेटत गेलो. मी आर.पी.जी ग्रुपचा मुख्याधिकारी असताना आम्ही उशरीं उीळलज्ञशीं ठरींळपस काढत असू व क्रिकेट सामने स्पॉन्सर करीत असू. त्यावेळीही मी अनेक वेळा या विषयावर ज्ञानेश्वरशी सल्लामसलत करीत असे. आता निवृत्त झाल्यावर त्याच्यापुढील पिढीलाही लागल्यास मी सल्ला देत असतोच. मित्र म्हणून, खेळाडू म्हणून, खेळांचा प्रायोजक म्हणून व नवीन पिढीचा हितचिंतक म्हणून असा आमचा सुमारे पंचेचाळीस वर्षांचा संबंध.

उमेदवारीच्या काळांत मी परदेशी ठिकठिकाणी नोकऱ्या केल्या. मला एवढे आठवते की मलेशिया असो स्वीडन असो की मध्यपूर्वेत असो, मी जिथे नोकरीला गेलो त्या भागात ज्ञानेश्वर कोठेही व्यवसायानिमित्त आला की वेळ काढून नक्की येऊन जाई. विभावरीच्या हातचे मराठी जेवण हवे आहे अशी प्रेमाची मागणी करीत असे.

१९६९ सालची मलेशिया ट्रिपची आठवण म्हणजे माझ्या पहिल्यावहिल्या दोन दारांच्या बारक्या गाडीतून आम्ही एका छोट्या रेस्टॉरंटमध्ये गेलो होतो. तेथील इरलूलहरा नावाची एक शॅम्पेनवजा वाईन त्याला एवढी आवडली की आम्ही सर्वांनी तेथील सर्व इरलूलहरा चा फडशा पाडला.

भारतात त्यावेळी इंपोर्टेड वस्तू आणायच्या म्हणजे एअरपोर्टवर कस्टम अधिकारी काय वाभाडे काढतील याचीच चिंता असायची. ज्ञानेश्वरच्या तर दोन बॅगा भरलेल्या. बॅगेत जागा नाही म्हणून वापरातले कपडे परदेशी टाकूनच द्यायचे. एवढ्या वस्तू न्यायच्या त्यातील निम्म्याहून जास्ती मित्रांसाठी असायच्या हे त्याचे वैशिष्ट्य आजपर्यंत तसेच आहे.

खरे सांगायचे तर त्याचा एवढा मोठा मित्रपरिवार; कुणाचाही आर्थिक दर्जा न पाहता त्या सर्वांशी चांगुलपणाने वागण्याचा त्याचा हा गुण. त्याचा काहींनी गैरफायदा घेतलाही. इंग्रजीत Virtue to a fault असे म्हणतात ते खरेच. एकसष्टीनिमित्त त्याला शुभेच्छा.

**शरद कुलकर्णी**



ज्ञानेश्वर आगाशे ... वारसांसह

# आमचे पेशवे

मधू गुप्ते

उद्योगपती, कुशल कारखानदार, क्रीडासंघटक म्हणून साऱ्या महाराष्ट्रात सुप्रसिध्द असणारे ज्ञानेश्वर आगाशे मला मित्र म्हणून गेली पन्नास वर्षे जवळचे आहेत. हे मैत्रीचे ऋणानुबंध वयाच्या अकराव्या वर्षापासून नवीन मराठी, रमणबाग या शाळांतून कॉलेज, क्रिकेट व व्यवसाय अशा आमच्या आयुष्यातील विविध भूमिकांतून दडलेले आहेत. या मैत्रीतसुध्दा निसर्ग नियमाप्रमाणेच उन्हाळे, पावसाळे आलेच. परंतु एका वाक्यात सांगायचे झाले तर, 'तुझं माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना' अशी ही आमची मैत्री. आमच्या घरात एखादी चांगली गोष्ट घडली तर हजारो मैलांवर मायदेशी फोन करून ज्यांना सांगावं असं वाटणारी जी बोटावर मोजण्या इतकी माणसे आहेत, त्यात ज्ञानेश्वर आणि रेखा आहेत.

माझी आणि ज्ञानेश्वरची मैत्री रमणबागेत झाली. रामभाऊ लेल्यांच्या देखरेखीखाली आम्ही क्रिकेट, हॉकी, फुटबॉल व बॅडमिंटन या खेळांचे बाळकडू घेतले. ज्ञानेश्वरची खासीयत म्हणजे क्रिकेट असो किंवा हॉकी तो सारेच खेळ आक्रमक पध्दतीने खेळत असे. क्रिकेटमध्ये तडाखेबाज फलंदाजी आणि हॉकीमध्ये सेंटर फॉर्वर्ड या अवघड जागी खेळ ही ज्ञानेश्वरची वैशिष्ट्ये. त्याच्या यष्टिरक्षणाबद्दल बोलायचे झाल्यास पुण्याने भारताला जे बोटावर मोजण्याइतके यष्टिरक्षक दिले त्यामधे ज्ञानेश्वरची गणना होते. भारतीय कुमार संघाचे प्रतिनिधित्व करणारा ज्ञानेश्वर महाराष्ट्राकडून रणजी करंडक स्पर्धेत खूप चमकला. पण योग्यता असतानाही भारताकडून कसोटी सामने खेळू शकला नाही. याचे कारण त्याला व्यवसायासाठी क्रिकेटला रामराम ठोकणे भाग पडले.

ज्ञानेश्वरने बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट राखली आणि सुवर्ण सहकारी बँक स्थापन करून खऱ्या अर्थाने बँक खूप वाढवली. ही बँक आज कित्येक पुणेकरांना आपल्या पाठीशी उभी राहणारी बँक म्हणून परिचित आहे. खरे तर ज्ञानेश्वरचे स्वतःचे तेच वैशिष्टय आहे. आयुष्यातील कठीण प्रसंगी आपल्याशेजारी उभा राहणारा मित्र म्हणजे ज्ञानेश्वर. म्हणूनच माझी आई आमच्या मैत्रीच्या उन्हाळ्यात मला एकदा म्हणाली ' ज्ञानेश्वरला खूप मित्र आहेत रे! पण तुला मात्र एकच ज्ञानेश्वर आहे'.

गेल्या काही वर्षात आमचा ज्ञानेश्वर खूपच मोठा झाला आहे. पुण्यातील मोठ्या उद्योगपतींपैकी तो एक आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळामधे ज्ञानेश्वरच्या मताला मोठी किंमत आहे. मात्र याचे कारण ज्ञानेश्वरची श्रीमंती नसून

त्याची वागण्याची पद्धत आहे. तो जणू अजातशत्रू भासतो. त्याच्या निळ्याघाऱ्या डोळ्यांमधे मनात काय चालले आहे याचा ठाव लागत नसला तरी त्याच्या वागण्या बोलण्याच्या पद्धतीमुळे तो त्याच्या असंख्य ओळखीच्या माणसांना जवळचा वाटतो. ज्ञानेश्वरचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे पाय कायम जमिनीवर असणं. अगदी शाळेपासूनचे मित्र, जुने सहकारी, सारे नातेवाईक यांच्याशी त्याचे असलेले संबंध अजूनही कायम आहेत. सकाळी अकरा वाजण्यापूर्वी रूपालीत आणि सध्या रणजितवर होणारी मित्रांची कॉफी वर्षानुवर्षे अबाधित आहे.

आज ज्ञानेश्वरकडे पुण्यामधील यशस्वी उद्योजकांपैकी एक म्हणून पाहिले जाते. परंतु त्याच्याही आयुष्यात काटेरी दिवस येऊन गेले. या काटेरी दिवसात आणि नंतरच्या यशस्वी काळात रेखाने ज्ञानेश्वरला दिलेली साथ ही खऱ्या अर्थाने सहचारिणीची आहे. पेशवे घोड्यावर मोहिमेत दंग असताना या पेशवीणबाईंनी समर्थपणे घर चालवले. मंदार आणि आशुतोष आज आपापल्यापरीने व्यवसायाचा भार सांभाळत असताना ज्ञानेश्वर आणि रेखा आदित्यशी खेळण्यात स्वतःला हरवून जातात. गेल्या वर्षी लंडनमधे मी, रेखा आणि ज्ञानेश्वर यांनी हॅमलीज् या खेळण्यांच्या दुकानात चार तास काढले ते याच नातवाच्या प्रेमापोटी.

आमच्या मैत्रीच्या गेल्या पाच दशकांच्या कालखंडाकडे मागे वळून पाहिले तर अजून एक गोष्ट मनाला भावून जाते. आमच्या दोघांची पुढचीही पिढी म्हणजेच आमची मुलं आणि सुनादेखील मैत्रीच्या नात्यानं बांधले गेले आहेत. मला वाटतं, रक्ताच्या नात्यापेक्षा मैत्रीचंच नातं अधिक घट्ट असतं. माझ्या या मित्र ज्ञानेश्वराला उदंड आयुरारोग्य लाभो ही प्रार्थना!

•

## स्थितप्रज्ञ ?

सुमारे ३०-३२ वर्षापूर्वीची गोष्ट. मी आणि ज्ञानेश्वर जमिनीपासून २०,००० फूटांच्या उंचीवर होतो. विमानातल्या प्रवाशांचे चेहरे भीतिग्रस्त झाले होते. साऱ्या विमानात स्मशान शांतता पसरली होती. नेमकं काय घडलंय ते नीटसं कळलं नव्हतं. काही मिनीटे आधी विमानानं अचानक खूप धक्के दिले होते व नंतर पट्टे बांधण्याचा इशारा देण्यात आला. आणि पाठोपाठ कॅप्टननं स्पीकरवर सूचना दिली, “आपलं विमान परत मुंबईला जात आहे”. ज्ञानेश्वरनं हवाईसुंदरीला विचारलं, “काय हो, काय झालं ?” तेव्हा पडेल चेहऱ्याने आणि घाबऱ्या आवाजात ती म्हणाली, “आपल्या विमानाच्या एका इंजिनाने पेट घेतला म्हणून कॅप्टननं ते इंजिन बंद केलं आणि एका इंजिनावर परतीचा प्रवास सुरू केला आहे. अर्ध्या तासात पुन्हा आपण मुंबईला पोहोचू.” हे ऐकून माझ्यासकट साऱ्या प्रवाशांना चक्क घाम फुटला. परदेश प्रवासाच्या आनंदात अर्ध्या तासापूर्वी आम्ही मुंबई सोडली आणि आता कुठे पोहोचणार कोणास ठाऊक या कल्पनेन साऱ्यांचे चेहरे काळवंडून गेले. परदेश प्रवासाची आमची सुरूवात आवडत्या शॅम्पेननं व्हायची आणि त्याहि परिस्थितीत ज्ञानेश्वरनं हवाईसुंदरीला विचारलं, “बरं ते असू दे आमच्या शॅम्पेनचं काय झालं?” माझ्या घामेजलेल्या अन् प्रश्नार्थक चेहऱ्याकडे पाहात ज्ञानेश्वर म्हणाला, “अरे आता आपण जर गुडबायच म्हणणार असू तर शॅम्पेनचा आनंद का सोडायचा ?” आता कोणी याला स्थितप्रज्ञता म्हणतील. पण त्यावेळी माझ्या मनात आलं “हा गडी बेदरकार आहे बरं का”

**टी. पी. वर्तक**

# *My association with Dnyaneshwar*

**Prakash Joshi**

Today lacs of people know and recognise Dnyaneshwar Agashe by name but Agashe knows only a few hundred of them personally. The situation was not much different during his student days. I was among that vast majority of students of M.E. Society whereas Agashe was in D.E. Society's Ramanbag School. In those days, whenever I used to pass by Ramanbag School with my mother (she happened to be a student of Ramanbag during 1932 to 1937 ) we used to peep into the school ground to see the students playing hockey, football and cricket under the watchful eyes of the coach Rambhau Lele - Dronacharya of Ramanbag sports. There were no sports academies in those days. But it was Lele sir who moulded the life and mind-set of Agashe, who now heads and sponsors many sports academies/ Trusts and sports events.

I came in contact with Agashe in the year 1962, when I was included in the chosen twenties for the cricket coaching camp at Hirabag maidan. Needless to say that Agashe (alongwith his dear pal Madhu) was there on account of his superb wicket-keeping abilities. From then onwards, for over 40 years, I am in that small minority whom Agashe also knows personally. During the academic year 1964-65, I remember to have filled 2 different college admission forms for Agashe to two different colleges. For BMCC in the 1st term and in the 2nd term for Law College ... perhaps at the behest of his mother. Even though Agashe has not these Degrees in Commerce and Law in academic sense, I can vouch for his admirable business foresight and legal brain--- both qualities that he seems to have inherited from his father.

I have worked with him for over 30 years on different projects in various capacities. It is my personal assessment that in business he has not struggled or faltered in keeping the wickets efficiently on a sticky wicket. He has also shown tremendous patience while batting on a wet wicket. I have seen him play a hurricane innings of over 90 runs before lunch against a formidable bowler like Ramakant Desai in his hay days.

It is my sincere and earnest request to the next generation ( to whom Agashe is Baba,

Mama and Kaka), to follow his footsteps and take over the burden of business responsibilities from him. This would enable him to walk his way happily and peacefuly to his century. Like they say in Johnny Walker's advertisemnt "Danny keep walking, we friends will give you company".

## सुवर्ण बँक

१) १९५२ पासून १९६९ पर्यंत पुणे शहरात एकही नवीन सहकारी बँक निघाली नसतांना हा उपक्रम नव्याने सुरू करण्याचे धाडस करणारी पहिली बँक कोणती?

२) १९६९ च्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर सहकारी संस्था म्हणून नोंदणी करून रिझर्व्ह बँकेचे लायसेन्स मिळविणारी भारतातील पहिली सहकारी बँक कोणती ?

३) आधी रिझर्व्ह बँकेचे लायसेन्स मिळवून मगच व्यवहार सुरू करणारी पुण्यातील पहिली सहकारी बँक कोणती?

४) दर रविवारी बँकिंग व्यवहार चालू ठेवणारी पुण्यातील पहिली बँक कोणती?

५) मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्रातील सर्वात मोठी नॉन शेड्यूल्ड सहकारी बँक कोणती ?

६) बहुसंख्य दलित खातेदार असलेल्या दुर्बल बँकेला अवसायनाच्या (लिक्विडेशनच्या) गर्तेतून बाहेर काढून सामावून घेणारी बँक कोणती?

साऱ्या प्रश्नांचे उत्तर अर्थातच आपली श्री सुवर्ण सहकारी बँक.

# क्षण आला भाग्याचा !

**जयंत भिडे**

उद्योगाच्या इतिहासातील सुवर्णाक्षरी पान
कर्तृत्वासह, दातृत्वाचा, मंगलमय सन्मान ॥धृ॥

कुलीन शालीन, थोर घराणे
सुसंस्कृतीचे सुंदर लेणे
ज्ञानेशाचे जीवन अवघे, संस्काराचे गान ॥१॥

वदनी विलसे,विनय लीनता
हात जोडूनी, उभी नम्रता
उद्योगाच्या, दरबारी तुज, नित मानाचे पान ॥२॥

मायपित्यांची कृपा सावली
सदैव पाठी, विठू माऊली
सरस्वतीसह, जिथे लक्ष्मी, झाली विराजमान ॥३॥

उद्योगाचे रोप लावले
माळरानी, नंदनवन झाले
प्रगतीचा आलेख, असा की, वैभवशाली कमान ॥४॥

ऋतुराजाचे वैभव दारी
गजांत लक्ष्मी झुलते स्वारी
माय मराठी, मातीचा हा, खराखुरा बहुमान ॥५॥

कुशल संघटक,मित्रसोबती
बंध रेशमी, अतूट नाती
नात्यामधला, माणुसकीचा, धागा एक समान ॥६॥

भाग्य उजळले, उज्ज्वल रेखा
भाग्यवंत तू , तुझ्यासारखा
आरोग्यासह, शत वर्षाचे, लाभो आयुष्यमान ॥७॥

इंद्रधनुसम लोभसवाणे
कृतार्थ जीवन सुस्वर गाणे
सदैव राहो, कीर्ति यशाची, चढती उंच कमान ॥८॥

•

# मित्रसंपन्न आगाशे

**अण्णा जोशी**

ज्ञानेश्वर आगाशे यांच्या दैनंदिन कार्यक्रमाचा व कामाचा झपाटा पाहता त्यांनी आपल्या वयाची ६० वर्षे पूर्ण केली असतील यावर विश्वासच बसत नाही. ज्ञानेश्वर आगाशे हे सर्वांना हवंहवंस वाटणारं प्रसन्न व गोड व्यक्तिमत्व आहे. एका प्रथितयश बँकेचे संस्थापक अध्यक्ष,दोन -तीन कारखान्यांचे मालक, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष असून या जबाबदाऱ्या कौशल्याने व यशस्वीपणे पार पाडत असताना ते अनेक क्षेत्रातील प्रासंगिक जबाबदाऱ्याही कुशलतेने पार पाडतात.वेदाचार्य घैसासगुरुजी वेदपाठशाळेचा तप:पूर्ती समारंभ असो, अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अमृतमहोत्सवी अधिवेशन असो, शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सवामध्ये लतादीदींचा सत्कार असो, नेहरु स्टेडियमवरील आंतरराष्ट्रीय क्रिकेटची मॅच असो, राष्ट्रपतींच्या हस्ते ज्ञानेश्वरांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन असो किंवा पुणे व्यासपीठातर्फे माहिती तंत्रज्ञान व जैव तंत्रज्ञानावरील (I.T.&B.T.) जागतिक कीर्तीच्या तंत्रज्ञांचे व उद्योजकांचे संमेलन असो, यातील प्रत्येक ठिकाणी आगाशे यांना आदरपूर्वक बोलाविले जाते व त्यांच्या मार्गदर्शनाचा, संघटन कौशल्याचा पुरेपूर उपयोग केला जातो. आगाशेही नित्यनूतन उत्साहाने अशा कार्यक्रमांत भाग घेतात व असे कार्यक्रम यशस्वी करीत असतात.

आगाशे हे जगन्मित्र आहेत. राजकारणात काँग्रेस पासून भाजपा पर्यंत सर्व पक्षात व संघटनेत त्यांचे मित्र आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा, उद्योग, व्यापार, साहित्य, संगीत,नाट्य, अध्यात्म, बँकिंग अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांचा मित्र परिवार आहे.

आपल्या अंगच्या अनेक सद्गुणांच्या जोरावर ते पैशाने जेवढे श्रीमंत आहेत त्यापेक्षाही त्यांची मित्रांच्या रुपाने मिळविलेली मानवसंपत्ती प्रचंड आहे. आगाशांच्या ह्या वैभवाचा कुणालाही हेवा वाटावा. इतके सगळे व्याप सांभाळत असतानाही फर्ग्युसन रोडवरच्या रूपाली हॉटेलात मित्र-मंडळींच्या मध्ये गप्पा मारून अर्धा कप कॉफी पिण्याचा आनंद ते नियमाने लुटतात. त्याचप्रमाणे आपल्या सर्वांचे मित्र ए.व्ही. भट यांच्या अकाली व अपघाती मृत्युमुळे भट परिवारावर आलेल्या संकटात त्यांना सर्व प्रकारची मदत करून त्यांना दिलासाही देतात.

या व अशा अनेक प्रसंगांतून आगाशेंच्या सप्तरंगी जीवनाला एक मानवतेची सुंदर सोनेरी किनार ठळकपणे नजरेत येते.

बऱ्याच वेळा जगाच्या उचापती करणारा माणूस आपल्या घराकडे दुर्लक्ष करून घराचे घरपण घालवतो. परंतु समर्थांच्या उक्तीप्रमाणे 'प्रपंच करावा नेटका' ही जाणीवही त्यांच्या मनात असल्यामुळे त्यांना सदैव साथ देणारी सुशील पत्नी, कर्तबगार चिरंजीव व अन्य नातेवाईक मंडळी या सर्वांच्या बाबतीत ते आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडत आहेत. त्याचप्रमाणे आपले दिवंगत वडील व थोरले बंधू यांच्याबाबतही त्यांच्या आदरपूर्वक निष्ठा कायम आहेत.

आजच्या काळाप्रमाणे साठी हे वय सेवानिवृत्तीचे नाही तर आणखी नवी क्षेत्रे पादाक्रांत करण्याचा निश्चय करण्याचे वय आहे. आणि म्हणून सर्वांगाने विकसित होत जाणाऱ्या ज्ञानेश्वर आगाशे या व्यक्तिमत्वाला मी मनापासून शुभेच्छा देतो की,

जीवेत् शरदः शतम् ।
शतम् जीवो वर्धमानः ॥

•

## जगन्मित्र आगाशे

जगन्मित्र म्हणून ज्ञानेश्वर आगाशे सर्वांना ठाऊक आहेत. परंतु महाराष्ट्राच्या आजपर्यंतच्या अनेक मुख्यमंत्र्यांचे आणि आगाशांचे मैत्र काही औरच आहे.

- विद्यमान मुख्यमंत्री मा. विलासराव देशमुख आगाशांना आपले स्नेही मानतात.
- मा. शरदराव पवार, खरं म्हणजे विद्यार्थी बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे पण एस्.पी. कॉलेज वरच्या श्रीनिवास पाटलांच्या खोलीत पवारसाहेबांची आणि आगाशेसाहेबांची जी दोस्ती जमली ती अजून तशीच भक्कम आहे.
- मा. वसंतदादा पाटील हे आगाशांचे वडील मित्र. ज्ञानेश्वरला मदत करायला कायम उत्सुक. शरदाचे चांदणे आणि वसंताची बहार या दोन्हीचे ज्ञानेश्वर आगाशे धनी.
- मा. मनोहर जोशी आणि ज्ञानेश्वर आगाशे एकाच वेळी क्रिकेटचे अध्यक्ष, जोशीसाहेब मुंबई क्रिकेट असोसिएशनचे तर आगाशे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे. दोघेही क्रिकेट प्रशासक असल्याने कायमचे समदुःखी.
- कोकणातले बॅरिस्टर ए. आर. अंतुले आणि आगाशे तर आपण दोघेही एकारान्त कोकणस्थ म्हणून एकमेकांना टाळी देत.

आगाशांच्या या मैत्रीतले कौतुक वेगळेच आहे. हे मुख्यमंत्री सत्तेवर असतांना त्यांना शक्यतो त्रास द्यायचा नाही आणि सत्तेवर नसतांना मात्र त्यांच्यापासून दूर राहायचं नाही हे ब्रीद आगाशांनी निष्ठेने पाळलं आहे. म्हणून ही मैत्री टिकलेली.

**विलास एकबोटे**



श्री. मोहन धारिया व महाबँकेचे श्री. जोग साहेब यांच्यासह ज्ञानेश्वर आगाशे

# हसतमुख उद्योगपती

**मोहन धारिया**

ज्ञानेश्वर आगाशे १७ एप्रिल २००२ रोजी वयाची ६० वर्षे पूर्ण करतील या घटनेवर विश्वास ठेवणेही अवघड आहे. सुमारे ५० वर्षांपासून ज्ञानेश्वरला मी जवळून पाहत आहे. आक्रमक फलंदाज, यष्टीरक्षक व चपळ क्षेत्ररक्षक असा त्याचा लौकिक होता आणि तो आंतरराष्ट्रीय दर्जाचा क्रिकेट खेळाडू लवकरच होईल, असे सर्व क्रिकेट शौकीनांना वाटत असे. पूजनीय वडिलांच्या निधनामुळे आणि भाऊ पंडीत अचानकपणे सर्वांना सोडून गेल्यामुळे वडिलांनी उभारलेल्या उद्योगाची व मोठ्या कुटुंबाची जबाबदारी ऐन तारुण्यात ज्ञानेश्वरवर आली. जीवनरूपी अवघड खेळमैदानावर ज्ञानेश्वरला उतरावे लागले. आलेली जबाबदारी त्याने स्वीकारली आणि ते क्षेत्ररक्षण करीत असतानाच संधी साधून पुन्हा आक्रमक फलंदाजी करून त्याने वडिलांनी स्थापन केलेले उद्योग नावारूपास आणले.

जन्मापासून खेळाडू राहिल्यामुळे व्यवहारी जीवनातील चढउतारांना सामोरे जाताना ज्ञानेश्वरच्या चेहऱ्यावरील हास्य केंव्हाही मावळले नाही. ऐन तारुण्यातच विविध उद्योगांची जबाबदारी जीवनात समर्थपणे स्वीकारली आणि असंख्य संकटांवर ज्ञानेश्वरने कौशल्यपूर्वक मात केली. कायद्यामुळे वैयक्तिक शेती धारणेवर मर्यादा आली आणि वडिलांनी मोठ्या जिद्दीने उभारलेला साखरकारखानाच संकटात सापडला. त्यावर मात करण्यासाठी स्पिरिट निर्मितीच्या उद्योगांचा झपाट्याने विस्तार होत असताना दारुबंदी कायद्यामुळे पुन्हा आघात झाला. त्यावेळी कॅनडामध्ये जाऊन रमनिर्मिती करण्याचा धाडसी निर्णय ज्ञानेश्वरने घेतला. परंतु परदेशात कारखानदारीसाठी लागणारे भांडवल उभे करणे विविध कारणांमुळे अवघड झाले. शिताफीने त्यातून मार्ग काढून ज्ञानेश्वरने कित्येक संकटावर मात करीत पुन्हा विजयाकडे वाटचाल सुरू केली. या सर्व प्रकारात वडिलांनी घालून दिलेले धडे ज्ञानेश्वरला नेहमीच पथदर्शक ठरले.

सर्व सामान्य नागरिक, व्यावसायिक, उद्योजक यांच्यासाठी सहकार क्षेत्रात पदार्पण करण्याचे ज्ञानेश्वरने ठरविले. त्या भावनेतूनच १९६९ साली श्री सुवर्ण सहकारी बँकेची स्थापना ज्ञानेश्वरने केली. त्यावेळी मी संसद सदस्य होतो. आम्हा काही मित्रांचे नाव देशभर 'यंगटर्क' म्हणून गाजत होते. ज्ञानेश्वरला हा उपक्रम मात्र मनापासून आवडला. ज्ञानेश्वरच्या नेतृत्वाखाली नावारूपास आलेल्या

या सहकारी बँकेचे उद्‌घाटन माझ्या हस्ते झाले. ही घटना मला नेहमीच समाधान देत असते.

ज्ञानेश्वर म्हणजे विनयशीलता, संयम, सभ्यता, संस्कृती या गुणांचे उत्कट प्रतीक आहे. विश्वास आणि विश्वासार्हता हा ज्ञानेश्वरचा स्थायी भाव आहे. सदैव हसतमुख राहून कोणतेही कार्य निर्धाराने तडीस नेण्याचा त्याचा स्वभाव नेहमीच अनुकरणीय आहे. क्रिकेट, खो-खो आदि क्रीडाक्षेत्रांशी त्याचे अतूट नाते राहिले असून व्यवहाराबरोबरच समाजसेवी वृती ज्ञानेश्वरने सातत्याने जोपासलेली आहे. विविध सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना ज्ञानेश्वर एखाद्या आधारस्तंभासारखा वाटतो.

आजकाल तरुणांपुढे आदर्श राहिलेले नाहीत असा सूर नेहमीच उमटत असतो. दुर्दैवाने राजकीय सत्तेमध्ये असणाऱ्या नेत्याकडे पाहूनच आदर्शाचे मोजमाप घेतले जाते. राष्ट्र आणि समाज उभारणीचे कार्य केवळ राजकीयच नव्हे तर विविध क्षेत्रात सुरू असते. उद्योग, कृषी, सहकार, शिक्षण, क्रीडा, साहित्य, समाजसेवा आदि विविध क्षेत्रातील प्रगतीतून राष्ट्र अथवा समाज आपली प्रगती करत असतो. या क्षेत्रात अविरतपणे व प्रामाणिकपणे, निष्ठेने काम करणाऱ्यांकडे पाहून आदर्शाचा मापदंड लावल्यास या विविध क्षेत्रात आदर्श नेतृत्वाचे दर्शन जागोजागी होऊ शकते. स्वत:च्या अबोल व समर्थ कर्तृत्वातून ज्ञानेश्वरने एक नवा आदर्श तरुण पिढीसमोर निर्माण केला आहे. भावी जीवनात अधिक वेगाने ज्ञानेश्वरचे जीवन सर्वार्थाने संपन्न, समृध्द व आनंदमय व्हावे हीच शुभकामना !

•

आगाशेसाहेबांच्या सहृदयतेची उदाहरणे म्हणजे एखादा कर्मचारी निवृत्त झाल्यावरही त्याची अडचण असेल तर त्याला दुसरे घर मिळेपर्यंत पूर्ण सुविधा कारखान्यातून मिळत. तसेच कामगारांचे नुकसान होऊ नये म्हणून कारखान्याचे सहकारीकरण झाले त्यावेळी अशी अट घातली की ह्याच जागेवर व ह्याच कामगारांसह कारखाना चालविला पाहिजे.

एवढेच नव्हे तर कर्मचारी युनियनच्या आपसातील भांडणामुळे एखाद्याला निलंबित केल्यानंतरही त्याच्या मुलांच्या शिक्षणाचे व प्रपंचाचे नुकसान होऊ नये म्हणून परत कामावर घेतल्याचेही उदाहरण आहे.

असा हा माणुसकीचा झरा.

**गोविंद कुलकर्णी, पुणे**

# कर्तृत्व व समृद्धी याचा सुरेख समन्वय

**वसंत काणे**

६०-६५ वर्षापूर्वी मला घडलेले चंद्रशेखर गोविंद आगाशे या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन आजही हा लेख लिहिताना जसेच्या तसे माझ्या नजरेसमोर आले आहे. आर्थिक संकटाच्या डोंगरराशीवर दीर्घकाळ अगदी शांतपणे वावरताना मी त्यांना पाहिले आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या कार्यालयात पत्रकाराच्या भूमिकेतून मी ज्या ज्या वेळी त्यांना भेटण्यास गेलो त्या प्रत्येक वेळी ते अगदी मोजके पण अर्थपूर्ण असे बोलत असत आणि बोलताना मागील भिंतीवर असलेल्या ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेकडे अंगुलीनिर्देश करीत आणि अप्रत्यक्षपणे सांगत असत की, "तो सर्व करणारा आहे".

ज्ञानेश्वर आगाशे यांची केवळ औद्योगिक नव्हे तर आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा, अध्यात्म अशा विविध क्षेत्रात जी गुणसंपदा दिसते आहे त्याचे उगमस्थान, "तो सर्व करणारा" या चंद्रशेखर आगाशे यांच्या त्या वाणीत आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात अकलूजजवळ श्रीपूर येथे माळरानावर जो साखर कारखाना निर्माण झाला त्या भूमीच्या सामर्थ्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्याकरिता जे जबदरदस्त कर्तृत्व अंगी असावे लागते ते पंडित आणि ज्ञानेश्वर या राम-लक्ष्मणासारख्या भावंडांचेकडे पुरेपूर होते म्हणूनच केवळ मध्यमवर्गीयांच्या भांडवलावर एक साखर कारखाना टिकू शकला.

औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील विविध उपक्रमात ज्ञानेश्वरला सतत यश मिळत गेले याचे कारण त्याचे कौटुंबिक जीवन. पत्नी सौ. रेखा हिने तर लक्ष्मीच्या पावलानेच आगाशे कुटुंबात गृहप्रवेश केला. कर्नाटकातील प्रसिध्द उद्योगपती रावसाहेब गोगटे ह्यांचा माझा चांगला परिचय. एकदा सहज गप्पा मारतांना ते मला मोठ्या अभिमानाने म्हणाले, "वसंतराव, तुमच्या पुण्याच्या आगाशे कुटुंबात आमची पुतणी दिलीय."

औद्योगिक, सामाजिक क्षेत्रात वावरणाऱ्या अनेक व्यक्तींना त्या त्या क्षेत्रात यश, लौकिक, धनसंपदा यांचा लाभ होत असला तरी त्यांना कौटुंबिक समाधान असतेच असे नाही. ज्ञानेश्वर आगाशे हे त्याही बाबतीत भाग्यवान आहेत. केवळ कौटुंबिकच नव्हे तर ज्ञानेश्वर आगाशे यांचा मित्रपरिवार हा एक त्यांच्याजवळची वेगळी धनसंपदा आहे. तोही एक निराळा इतिहासच आहे. कारण विलासराव एकबोटे, बाळकृष्ण चोपडे, रामभाऊ जोशी, टी. पी. वर्तक, प्रकाश जोशी, अनंत माटे या सारखे अनेक त्यांचे मित्र हे केवळ मित्रच नाहीतर व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक,

सांपत्तिक क्षेत्रातील सुखदुःखाचे यशाचे कमीअधिक प्रमाणात वाटेकरी आहेत. आजची ३२ वर्षांची श्री सुवर्ण सहकारी बँक हे एक त्याचे प्रतीक आहे. या बँकेच्या स्थापनेपूर्वी आमच्या 'रोहिणी' मासिकाच्या अंकात खास संपादकीय लिहून मी जे संस्थेला शुभाशिर्वाद दिले होते. त्यात म्हटले होते की :

" भारताच्या आर्थिक क्षेत्रात एका नव्या क्रांतीचे पर्व सुरू होत असताना महाराष्ट्रात श्री सुवर्ण सहकारी बँकेची सुरूवात व्हावी ही घटना महाराष्ट्राच्या नवीन दृष्टीकोनाचे प्रतीक समजावे लागते. वास्तविक सहकारी बँक महाराष्ट्रात नवी नाही. अर्थशास्त्रज्ञ आणि भारताच्या नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी महाराष्ट्राला हे बाळकडू फार वर्षापूर्वी पाजले. महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर आगाशे यांच्यासारख्या विचारवंत व विधायक वृत्तीच्या तरुणाने मात्र या आर्थिक परिवर्तनाचा सूक्ष्म व व्यवहारी दृष्टीने अभ्यास करून ही सहकारी अर्थव्यवस्था आत्मसात केली आणि ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी जनतेलाही याचा पुरेपूर फायदा उपलब्ध करून द्यावा असे ठरविले. तेही प्रत्यक्ष कृतीने आणि म्हणूनच श्री सुवर्ण सहकारी बँकेची पुणे शहरात होणारी स्थापना ही शहराच्या तरुण वर्गातील पुरागामी विधायक कार्याची सुरुवात आहे असे आम्ही मानतो."

रोहिणी ऑक्टोबर १९६९ च्या संपादकीयात प्रकट केलेल्या सदिच्छा भावनांचे आज प्रत्यक्ष दर्शन घडते आहे.

याहीपेक्षा आणखी बरेचसे काही लिहिण्यासारखे आहे. कारण हे व्यक्तिदर्शन आजच्या आणि उद्याच्या तरुण पिढीला मार्गदर्शक ठरणार आहे म्हणूनच या गौरव अंक प्रकाशनासाठी माझेकडे लेखाची जी मागणी करण्यात आली ती लगेच मी मान्य केली. मात्र हे लेखाच्या मागणीचे विनंतीपत्र वाचत असतांना मनात थोडेसे आश्चर्य वाटून गेले. आपण ८ - १० वर्षाचा पाहिलेला ज्ञानेश्वर ६० वर्षांचा झाला. या सुखद जाणीवेनेही आनंद वाटला. त्या ज्ञानेश्वर विषयी हा गौरव लेख लिहिण्याची संधी मला लाभली आहे त्या ज्ञानेश्वरास एकसष्टीनिमित्त शुभाशीर्वाद व अभिष्टचिंतन.

•



ज्ञानेश्वर आणि पंडितराव ...सह

# एक स्वगत

**जयराम कुलकर्णी**

बघताबघता ज्ञानेश्वर वयाची साठी पार करीत आहे आणि आता खऱ्या अर्थाने ज्येष्ठ नागरिक होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ही कल्पनाच मोठी गमतीची आणि खूप खूप सुखावणारी वाटली.

नुकतच पुण्यात साहित्य संमेलन भरलं होत. त्या शोभायात्रेत ज्ञानेश्वरला पगडी घातलेल्या पोषाखात पाहिला आणि पन्नास वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवला. फर्ग्युसन कॉलेजातील एका समारंभात पहिल्या रांगेत अशीच पगडी आणि उपरणं घालून बसलेले कै. चंद्रशेखर आगाशे आठवले. त्या वेळच्या त्यांच्या रूपात आणि आत्ताच्या ज्ञानेश्वरच्या दिसण्यांत कमालीचं साम्य वाटलं.

ज्ञानेश्वरचे थोरले बंधू कै. पंडितराव आणि मी फर्ग्युसन मध्ये त्यावेळी बरोबरच शिकत होतो. नाटक हा आम्हा दोघांच्याही आवडीचा प्रांत असल्यामुळे आमचे स्नेहबंध जुळून आले. आगाशे कुटुंबीयांशी ५० वर्षांपूर्वी जुळून आलेले हे स्नेहबंध आजही तसेच भक्कम आहेत, हा मी माझ्या भाग्याचा ठेवा समजतो. कै.पंडितराव हयात होते तेंव्हाही कारभाराचा बराचसा भाग ज्ञानेश्वरच पहात होता. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी ज्ञानेश्वर आवर्जून थोरल्या भावाचा - पंडितरावाचा - सल्ला घेत असे. तसेच कोणतीही गोष्ट धाकट्या भावाला - ज्ञानेश्वराला - सांगितल्या शिवाय पंडितराव करत नसे, याचा मी अनेक वेळा अनुभव घेतला आहे. पंडितराव हयात होता तोपर्यंत आपल्या जिवलग मित्राचा भाऊ एवढीच ज्ञानेश्वरची ओळख होती. त्यापलीकडे जाऊन आणखी ओळख करून घेण्याचा व वाढविण्याचा असा प्रयत्न मी कधी केला नाही, किंबहुना तशी गरजही वाटली नाही.

पंडितराव गेल्यावर निरपेक्ष मैत्रीचा एक भरभक्कम आधार गेला, ही वस्तुस्थिती होती. पण ती मान्य करणं, पचवणं अत्यंत अवघड होतं. पंडितरावांच्या पश्चात साऱ्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांचा अवघड भाग ज्ञानेश्वर पेलत होता. त्याचवेळी आपल्या पंडितरावांचे निकटचे मित्र दुरावणार नाहीत याची काळजी मोठ्या आपुलकीने घेत होता. हा ज्ञानेश्वरच्या मनाचा खरा मोठेपणा. आमच्यासारख्या पंडितरावांच्या मित्रांचा आगाशे कुटुंबावरचा मैत्रीचा हक्क रेखा वहिनी व मंदार आणि आशुतोष या कर्तबगार मुलांनी मोठ्या मनाने स्वीकारला हे आम्हा मित्रमंडळींचं भाग्य !

विविध क्षेत्रातील ज्ञानेश्वरच्या कर्तृत्वाचा, नेतृत्वाचा आणि दातृत्वाचा आलेख अनेक संबंधित व्यक्ती अधिकार

वाणीनं मांडतील यात मला तिळमात्रही शंका नाही. आपल्या स्वतःच्या परिवारातील सख्या-मित्राप्रमाणेच आपल्या थोरल्या भावाच्या आमच्यासारख्या मित्रांचे स्नेहबंध अधिक दृढ करणाऱ्या ज्ञानेश्वरला मनापासून सलाम!

तरीही दोन स्वानुभव सांगितल्याशिवाय राहवत नाही.

काही दिवसांपूर्वी अपघातात माझ्या एका डोळ्याला इजा झाली. प्लॅस्टिक सर्जरी करणं आवश्यक होतं. त्यासाठी तातडीनं मुंबईला जाणं जरुरीच होतं. डोळ्याला विशेष धक्का पोहचणार नाही अशा काळजीने प्रवास करावा लागणार होता. त्यासाठी स्वतंत्र मोटारीने प्रवास करण भाग होतं. ज्ञानेश्वर पुण्यात नव्हता, पण गाडीची आमची अडचण समजताच रेखा वहिनींनी तत्परतेने गाडी आणि ड्रायव्हर पाठवून दिला आणि मी तातडीच्या ऑपरेशनसाठी वेळेवर मुंबईत पोहोचलो. ज्ञानेश्वरला हे समजल्यावर तोही २-३ वेळा मुंबईला हॉस्पिटलमध्ये येऊन विचारपूस करून धीर देऊन गेला. केवढा आधार वाटला.

गेल्या वर्षी मे मध्ये मला हृदयविकाराचा फार त्रास झाला. दवाखान्यात दाखल व्हावं लागलं. त्यातच डॉक्टरांनी बायपास सर्जरी करण्याचा निर्णय घेतला. दुसरा पर्याय नव्हता. अचानक उद्भवलेल्या या संकटामुळे माझे कुटुंबीय थोडेसे गांगरून गेले. अशा वेळी ज्ञानेश्वरने माझ्या पत्नीची आणि मुलांची तातडीने भेट घेतली. दवाखान्यात आणि दवाखान्याबाहेर कसलीही मदत लागली तर मला ताबडतोब कळवा. कसलीही काळजी करू नका. मी तुमच्या बरोबर आहे. असा मनापासून धीर दिला. हे आमचं पूर्वसंचितच म्हणायला हवं, नाही का?

आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत, महाराष्ट्रातील मध्यमवर्गीयांचं हित विश्वस्तांच्या भूमिकेतून जपणाऱ्या कै. चंद्रशेखर आगाशेंचा हा सुपुत्र त्याच विश्वस्तांचा वारसा जाणीवपूर्वक समर्थपणे पुढं चालवितोय - आणखी काय हवंय? आगे बढो ज्ञानेश्वर, आगे बढो!

।। जीवेत् शरदः शतम्।।

•

**भोंदूपणा**

ज्ञानेश्वर आगाशे यांना राग येतो तो फक्त भोंदूपणाचा. समोरचा माणूस भोंदूपणा करू लागला, की मिश्किलपणानं त्याची फिरकी घ्यायला ते मागे पुढे बघत नाहीत. त्यांच्या एका कंपनीत वरच्या स्तरावरची एक नोकरी मिळवण्यासाठी कॉन्व्हेंटमधे शिकलेला एक तरुण आला होता. स्वतःच्या बोलीभाषेतील इंग्लिशवर तो स्वतःच खूष होता आणि विषयातलं ज्ञान नसताना त्या इंग्रजीच्या बळावर मुलाखत जिंकू पाहत होता. मराठीत बोलणाऱ्या आगाशांवर 'इंप्रेशन' टाकण्यासाठी तो म्हणाला, 'सर, पैशासाठी मला नोकरी हवी अशातला भाग नाही. मला, माझं कर्तृत्त्व सिध्द करायचंय. माझं कर्तृत्त्व बघा आणि मग पगार ठरवा,' त्यावर आगाशांनी शांतपणे प्रश्न केला, 'तुमचं म्हणणं ठीक आहे, पण किमान वेतनाचा कायदा तुम्ही कसा बदलणार ? '

**विलास एकबोटे**

# आवडीची निवड

**अरविंद गोगटे**

१९६० साली मी बेळगावहून पुण्याला बी.एम.सी.सी. मध्ये Pre-Degree ला प्रवेश घेतला. बेळगावला शाळेत मी क्रिकेट खेळत असे. कॉलेजच्या टीममध्ये प्रवेश मिळविण्यासाठी नेट प्रॅक्टिसला जाऊ लागलो. कॉलेजच्या टीमचे कॅप्टन हेमंत गोरेंनी मला विचारले, 'अरविंद, तू शाळेच्या टीममध्ये कोणत्या नंबरला बॅटिंग करीत होतास?' मी विचार केला, की ओपनिंगला बॅटिंग करतो, असे सांगितले म्हणजे अकरात तरी नंबर लागेल. लगेचच गोरेंनी मला पॅड अप करायला सांगितले व मी नेटमध्ये बॅटिंगला गेलो. नवीन बॉल घेऊन बीन सहस्त्रबुध्दे व अविनाश जोशी यांनी बॉलिंग सुरूकेली. बारा बॉलपैकी फक्त दोन बॅटला, अनेक कानाजवळून आणि काही सरळ दांडके घेऊन गेले. त्यानंतर गोरेनी विचारले, 'बॉलिंग करत होतास काय? आमच्या टीमला लेगस्पिनरची गरज आहे'. मी म्हटले, चला सांगावं, मी लेग स्पिन करतो. दोन ओव्हर्स नेटमध्ये देण्यात आल्या. पाच बॉल फुलटॉस बाकी सगळे इकडे तिकडे! एकच बॉल वळला आणि तोही ऑफस्पिन झाला. असाच एक आठवडा गेला. मग हेमंत गोरेंनी मला सांगितले, 'अरविंद, तुला कॉलेजच्या टीममध्ये यायचे असेल तर डेक्कन जिमखान्यावर नाना जोशी आणि हजरनवीस यांच्या कोचिंग क्लासला नाव घाल'.

कोचिंग क्लासला जाऊ लागलो. बॅटिंग, बोलिंग, फील्डिंगची प्रॅक्टिस देताना नाना जोशी आपल्या टेस्ट मॅचेसच्या कथा आणि अनुभव सांगत. असेच एकदा गप्पागोष्टी करतांना आमच्यापैकी एकाने विचारले, 'सर, आपल्याकडे गॉडफ्रे एव्हन्स आणि वॉली ग्राउट यांच्या तोडीचा विकेटकीपर कोण आणि केव्हा होणार?' त्यावर नाना जोशी म्हणाले, 'माझ्या डोळ्यासमोर तीन प्रॉस्पेक्ट्स आहेत, फारुक इंजिनियर, बुधी कुंदरन आणि आपल्या पुण्यातील कॉलेजचा ज्ञानेश्वर आगाशे.' हजरनवीस सरांनी सांगितले, 'आगाशेचा हुकचा फटका पण क्लासिक असतो'.

हिराबाग मैदानावर इंटर कॉलेजिएट मॅचेस सुरूहोत्या. भाऊ कॉलेजची मॅच होती आणि सरांनी एवढे सांगितल्यावर ज्ञानेश्वरला खेळताना पाहाण्याचे औत्सुक्य फारच होते.

ग्राऊंडवर गेल्यावर पाहतो तो एस.पी. कॉलेजची बॅटिंग होती व माझ्या आठवणीप्रमाणे स्कोअर होता तीन बाद तेवीस आणि सर्वांना असेच वाटत होते की शंभरच्या आत ऑलडाऊन होणार. थोड्याच वेळात आणखी दोन विकेट गेल्या आणि मग ज्ञानेश्वर खेळायला आला. पहिले चार

बॉल खेळून मग त्याने फटके हाणायला सुरुवात केली आणि स्कोअर १५० ला केव्हा गेला ते कळलेच नाही. दिवस अखेरच्या शेवटच्या ओव्हरमध्ये तो एल.बी.डब्ल्यू. आऊट झाला. जातांना बोलरला 'व्हेरी गुड बॉल' असे सांगून ज्ञानेश्वरने बोलरचे अभिनंदन केले. पॅव्हिलियनमध्ये आल्यावर बॉल बॅटला लागून मग पॅडला लागला ही सर्व साधारणपणे प्रत्येक बॅट्समनची तक्रार त्याने केली नाही.

दुसऱ्या दिवशी ज्ञानेश्वरची विकेट कीपिंग. ती दाखविण्यासाठी स्वतः नाना जोशी आमच्याबरोबर आले होते. पाहतो तो काय फास्ट बोलरला ज्ञानेश्वर स्टंप जवळ उभा. नाना म्हणाले, 'ज्ञानेश्वरचा आत्मविश्वास दांडगा आहे. त्याने खूप बोलर्स बरोबर प्रॅक्टिस केली आहे'. त्यादिवशी ज्ञानेश्वरने दोन अप्रतिम झेल घेतले आणि लेग साईडला झुकत जाऊन क्लासिक स्टंपिंग केले.

आत्मविश्वास, धडाडी, खिलाडूपणा, जिद्द व त्यासाठी परिश्रम हे ज्ञानेश्वर क्रिकेट खेळत असताना शिकला. हे त्याचे गुण ज्ञानेश्वरला पुढील आयुष्यात सर्व क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यात फार फार उपयोगी पडले.

ज्ञानेश्वरची ओळख कशी काढायची याचा मी विचार करू लागलो. काही महिन्यांनंतर हेमंत गोरेनी जीवन रेस्टॉरंटमध्ये ज्ञानेश्वरची आणि माझी पहिल्यांदा ओळख करून दिली. जसा ज्ञानेश्वरचा खेळ, तसेच त्याचे बोलणे आणि वागणे. अगदी खेळकर, आनंदी व मैत्रीपूर्ण. ओळख झाल्यानंतर, आमची दररोज नसली तरी आठवड्यातून एकदा तरी भेट व्हायची. झाली नाही तर मी आणि अरुण बापट मुद्दाम जीवनला जाऊन त्याची भेट घ्यायचो. अशी आमची ओळख वाढतच गेली. कॉलेजची चार वर्षे पूर्ण झाल्यावर मी अमेरिकेला गेलो आणि नंतर बेळगावला स्थायिक झालो. जवळ जवळ सहा-सात वर्षे ज्ञानेश्वरची आणि माझी भेट झाली नाही.

१९६६ साली मी पुण्यात होतो. माझी आजी अंबुताई, एक दिवशी मला म्हणाली, 'अरे, तुझ्या ज्ञानेश्वर आगाशेचं स्थळ, मी आपल्या रेखासाठी विचारणार आहे. तुझा तो मित्र आहे ना? मग त्याला विचार की, त्याचे कुठे ठरले आहे का? आणि नसेल तर यंदा लग्न करणार आहे का?' मी विचार केला की सरळ ज्ञानेश्वरला विचारले तर तो मला सांगेल, 'माझे लग्न होऊन मला एक मुलगा पण आहे!' हा ज्ञानेश्वरचा मिस्किलपणा माहित असल्यामुळेच मी डेक्कनवर कॉफी हाऊसला जाऊन अरविंद मेहेंदळेला गाठले. एक घोट कॉफी घेत घेत मेहेंदळेनं मला सांगितले की ज्ञानेश्वरच्या आईने त्याचे यंदा लग्न करण्याचे ठरविले आहे आणि तो पण तयार झाला आहे. दुपारी लगेच मी अंबुताईला सर्व माहिती दिली.

अंबुताईनी प्रयत्न सुरूकेले. रावसाहेब आणि वासूनाना यांना ज्ञानेश्वरच्या वडिलांबद्दल अत्यंत आदर होता. रेखा आमच्या सर्वांची फार आवडीची. आम्हां गोगटे लोकांना सात आकडा शुभ असतो. योगायोग म्हणजे माझी आणि ज्ञानेश्वरची ओळख झाल्यानंतर सात वर्षांनीच अंबुताईनी ज्ञानेश्वरचे स्थळ आमच्या रेखासाठी शोधले.

आगाशे म्हणजे पुण्यातील एक प्रथितयश, नावाजलेले, मान्यवर कुटुंब. ज्ञानेश्वर आणि त्याची आई रेखाला पसंत करतील याची आम्हां सर्वांपेक्षा अंबुताईला खात्री होती. काही दिवसांतच रेखाला दाखविण्याचा कार्यक्रम झाला आणि दहा पंधरा दिवसातच आगाशेंचा होकार आला. रेखाचे लग्न ठरले. अमेरिकेला फोन करून अरुण बापटला कळविले. तो म्हणाला, 'रेखा इज व्हेरी व्हेरी लकी'. मैत्रीचे नात्यात रूपांतर झाले आणि नाते व मैत्री दोन्ही वृध्दिंगत होत गेले.

आमच्या अंबुताईंनी रेखासाठी ज्ञानेश्वरच्या स्थळाची केलेली निवड आणि ज्ञानेश्वरने रेखाची केलेली निवड गोगटे आणि आगाशे परिवारांच्या आवडीची निवड ठरली.

•



पंढरीहून देहूला चांदीच्या पादुका आणताना

# बहुत सुकृतांची जोडी

**ह. भ. प. रामदास महाराज**

श्री संत तुकाराम महाराज हे माझ्या जीवनातील नितांत आदराचं, श्रध्देचं, प्रेमाचं स्थान. गाथ्यातील विविध अभंगातून तुकोबारायाचं आकाशाएवढं विशाल दर्शन घडलं आणि काही झालं तरी गाथ्याचा पारायण सोहळा भव्य दिव्य प्रमाणात याच देही, याच डोळा साजरा व्हावा असं मनोमन वाटू लागलं... हा सोहळा तुकोबारायांची जन्मभूमी, कर्मभूमी देहू येथेच घडून यावा - असा एकच ध्यास मनाला लागून राहिला.

पाच-सहा वर्षे निघून गेली. प्रयत्न रात्रंदिवस चालूच होते. गाथा पारायणाच्या दृष्टीने तयारी हळूहळू आकार घेत होती. रात्रंदिवस जवळचे स्नेही, कार्यकर्ते हितचिंतक झटू लागले. जाहिराती, पॅम्प्लेट या माध्यमातून प्रचार-प्रसार वाढू लागला. निधी जमू लागला.

पाच मार्च ते चौदा मार्च दोन हजार हा कालावधी गाथा पारायणासाठी निश्चित झाला. माझे परमस्नेही राष्ट्रीय नेते शरदचंद्रजी पवार, यांना ही गाथा पारायणाची कल्पना फारच आवडली होती... त्यामुळे त्यांनीही आपल्या सर्व सहकाऱ्यांना, हितचिंतकांना या गाथा पारायण सोहळ्यास मदत करण्याचे मनोगत बोलून दाखविले होते...

माझ्या मनात पारायणासंबंधी आणखी एक कल्पना तरळत होती, ती म्हणजे पंढरपूरवरून श्री विठ्ठलाच्या चांदीच्या पादुका हेलिकॉप्टरने देहूला न्यायच्या. हा सोहळा गाथा पारायणाच्या पहिल्याच दिवशी संपन्न होऊन त्या चांदीच्या पादुकांची प्रतिष्ठापना पारायण सोहळ्यात करावी व मगच गाथा पारायणाचा शुभारंभ व्हावा.

मग त्या दृष्टीने पुन्हा शोधकार्य सुरू झाले. सहज चर्चा करता करता माझे थोरले जावई महादेवराव माने यांना विचारणा केली. तेव्हा ते आत्मविश्वासाने एकदम म्हणाले "काही काळजी करू नका... आपलं हे काम झालंच म्हणून समजा... ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांची आणि माझी ओळख आहे. अनेक वर्षांचा स्नेह आहे... तुम्हालाही ते ओळखतात."

आगाशेसाहेबांची अपॉईंटमेन्ट घेऊन आम्ही सर्वजण त्यांना भेटायला गेलो. त्यांनी शांतपणे सर्व ऐकून घेतलं

आणि एका क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी होकार दिला. एका विलक्षण समाधानाचं स्मित हास्य त्यांच्या चेहऱ्यावर तरळत होतं... माझ्याही आनंदाला पारावार राहिला नाही. आगाशेसाहेब म्हणाले "बरं झालं या निमित्ताने मलाही श्री विठ्ठलाच्या महापूजेचा योग आलाय. जवळ जवळ पंधरा-वीस वर्षानंतर हा योग येतोय. मी स्वतः त्या दिवशी महापूजा करून श्री विठ्ठलाच्या पादुका घेऊन देहूला गाथा पारायणाच्या ठिकाणी येईन. आपण काळजी करू नका."

आणि खरंच ठरल्याप्रमाणे पारायणाच्या आदल्या दिवशी आगाशेसाहेब सपत्निक पंढरपूरी आले. पहाटे साडेचार वाजता ठरल्याप्रमाणे त्यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची महापूजा संपन्न झाली... मंदिराच्या गाभाऱ्यात जवळ जवळ अडीच ते तीन तास आपले सर्व व्यावहारिक व्याप सोडून साहेब शांतपणे बसून होते. भक्तीचा वारसा त्यांच्या घराण्यात आहे. पंढरीच्या वारीची ओढ, सातत्य त्यांच्या आधीच्या पिढीतही आढळून येते. तोच हा अमृतमय वारसा होता. त्यातूनच हे सत्कार्य साहेबांच्या हातून सहज घडत होतं.

हरिनामाच्या धुंद गजरात, टाळमृदुंगाच्या नादातच आगाशेसाहेब सपत्नीक श्री विठ्ठलाच्या पवित्र पादुका मोठ्या आदराने हातात घेऊनच हेलिकॉप्टरमधून देहूला खाली उतरले व अनवाणी पायांनीच नियोजित स्टेजकडे चालू लागले. वारकऱ्यांच्या भक्तिभावनेचा जणू बांधच फुटला. श्री विठ्ठलाच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी साहेबांभोवती मुंग्यांसारखी भाविकांची गर्दी दाटली.

गाथा पारायण सोहळ्याच्या भव्य प्रशस्त राजवाड्या-सारख्या देखण्या मंडपात श्री विठ्ठलाच्या पादुकांची स्थापना आगाशेसाहेबांच्या शुभहस्ते करण्यात आली आणि पुढील सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडले. हा एक अत्यंत शुभ सोहळा माझ्या मनात कायमचा कोरलेला राहील.

या षष्ट्यब्दिपूर्तीच्या मधुर वळणावर माझे परमस्नेही आदरणीय ज्ञानेश्वरजी आगाशेसाहेब यांना हार्दिक शुभेच्छा देणं हाही माझ्या जीवनातील एक आनंददायी अमृतक्षणच मला वाटतो. शेवटी मी इतकंच म्हणेन...

'कुळी कन्यापुत्र होती जे सात्विक।
तयाचा हारिख वाटे देवा॥'

•

# एक योगी उद्योगपती

**रमेश बर्वे**

सुमारे ३० वर्षापूर्वी जेव्हा मी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडीकेट लि. या कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवार या पदासाठी मुलाखत देण्यासाठी आलो तेंव्हा एका गोऱ्यापान रंगाच्या व निळ्या डोळ्याच्या परंतु अत्यंत भेदक नजर असणाऱ्या व्यक्तीने माझा अर्ज पाहून मला पुढील फक्त दोनच प्रश्न विचारले.

कॉलेज किती वाजता असते?

कॉलेज व अभ्यास सांभाळून नोकरीला वेळेवर येता येईल नां?

या दोन प्रश्नांचा खरा अर्थ मला तेव्हा समजला नव्हता. परंतु नंतर काही वर्षांनी त्या मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीची शिक्षणावर असली मनस्वी निष्ठा व वेळ पाळण्याबाबतचा काटेकोरपणा माझ्या ध्यानात आला. माझी ती मुलाखत घेणारी व्यक्ती म्हणजेच आमचे आदरणीय आगाशे साहेब.

क्रिकेट हा त्यांचा अत्यंत आवडता खेळ व या खेळाच्या बदलत्या स्वरूपाबद्दल तसेच सद्य स्थितीबद्दल आम्हासर्वांशी मोकळ्या वेळांत चर्चा करणे हा त्यांचा एक छंद आहे. या चर्चेतून त्यांचे क्रिकेट बद्दलचे प्रचंड ज्ञान व अचूक आडाखे यांचा आम्हांस वारंवार प्रत्यय येत असतो. क्रिकेट क्षेत्रातील या महान व्यक्तीचे आम्हांस अत्यंत जवळून दर्शन होत असल्याने नेहमी 'वन्-डे' मॅच प्रत्यक्ष मैदानावर जाऊन पहात असल्याचा आनंद मिळतो. स्वतःची हार होत असताना प्रतिस्पर्ध्याचे मनमोकळेपणाने अभिनंदन करण्यारत खरी खिलाडूवृत्ती आहे हे आम्ही आगाशेसाहेब यांचेकडून शिकलो. तसेच स्वतःचा विजय होत असताना 'खेळात हार जीत ही होतच असते' असे म्हणून प्रतिस्पर्ध्याचे मनोबल राखणे अशी आमच्या मनाची घडण मा. आगाशे साहेब यांनीच केली. 'महाराष्ट्राकडून खेळल्याने मला नेहमी पराभवाचीच सवय आहे' असे म्हणत धंद्यातील येणारे अवघड प्रसंग त्यांनी अत्यंत लीलया पेलल्याचे आम्ही सर्वांनी पाहिले आहेत. 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळ' या जगन्मान्य संस्थेचे ते गेली अनेक वर्षे पदाधिकारी असल्याने क्रिकेट या खेळाविषयी व क्रिकेटपटूंविषयी खरीखुरी माहिती समजण्याचे भाग्य आम्हांस लाभले.

आगाशेसाहेबांनी त्यांच्यातला या खिलाडू वृत्तीचा स्वतःचे व्यवसायात व एकूणच जीवनात अत्यंत खुबीने करून घेतलेला उपयोग पाहिला की, भारतामधील सर्व उद्योगपती प्रथम खेळाडू असतील तर किती बरे असा विचार मनांत चमकून जातो.

राजकारण हा माझा प्रांत नाही असे ते आम्हांस वारंवार

सांगत असले तरी प्रत्यक्षांत राजकारणातील सर्व पक्षांच्या व्यक्तींशी असलेल्या त्यांच्या ओळखी व संबंध पाहिले की थक्क व्हायला होते. अनेक आजी माजी मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री खासदार, नामदार, आमदार आगाशे साहेबांना स्वतःचे मित्र मानतात यातच काय ते आले.

मात्र राजकारणी व्यक्तींच्या अशा ओळखींचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करून घेणे हे त्यांच्या स्वभावात बसत नाही. मात्र आपल्या अशा ओळखींचा गरजू व्यक्तींना निःस्वार्थीपणे लाभ मिळवून देणे हा त्यांचा एक छंदच आहे. कोणत्याही व्यक्तीचे अत्यंत महत्वाचे व अवघड असणारे काम सहजपणे करून त्यापासून अलगदपणे बाजूला होऊन 'इदं न मम' म्हणणारा हा खरा तर राजकारणी योगीच. उद्योग धंद्यांमधील अडचणी समजावून घेण्यासाठी व त्यानुसार सरकारी धोरणे ठरविण्यासाठी राजकारणी लोकांकडून बोलावले जाणे ही त्याच्या कर्तृत्वाला मिळालेली पावतीच आहे. स्वतः आमदार वा खासदार नसताना असणारा त्यांचा जनसंपर्क हा निवडून आलेल्या भल्या भल्या आमदार-खासदारांनाही बुचकळ्यात पाडणारा आहे. राजकारणी व्यक्तींची त्या कोणत्या पक्षांत असताना तसेच सत्तेत असताना वा नसतानासुध्दा ओळख ठेवणाऱ्या या मनस्वी योगी राजकारण्याचे अशा व्यक्तींनी केलेले कौतुक ऐकण्याची संधी आम्हांस लाभली हे आमचे केवढे भाग्य!

आगाशे साहेबांचे आम्हांस जाणवलेले असे दोनच वीक-पॉईंट आहेत. पहिला वीक-पॉईंट म्हणजे त्यांची कन्या शीतल (याजागी सध्या आहे तो त्यांचा लाडका नातू आदित्य) दुसरा वीक पॉईंट म्हणजे त्यांचा मित्र परिवार. एकदा मित्र म्हटल्यावर त्यासाठी तन-मन-धन अर्पावे ते आगाशे साहेबांनीच. कित्येक मित्रांच्या हाकेसरशी स्वतःची सर्व कामे बाजूला सारून व स्वतःला होणाऱ्या शारीरिक व मानसिक कष्टांची पर्वा न करताना धावून जाणारे आगाशेसाहेब आम्ही गेली अनेक वर्षे पहात आहोत. कठीण प्रसंगी आर्थिक मदतीचा हात न मागताना सुध्दा पुढे करणारे आगाशेसाहेब हे ज्यांचे मित्र आहेत त्या व्यक्तिंच्या भाग्याचा आम्हांला राहून राहून खरोखरच हेवा वाटतो.

भावंडांवर प्रेम कसे करावे याचे चालते बोलते उदाहरण घालून देणारे आगाशेसाहेब, थोरल्या साहेबांच्या निधनाचे प्रसंगी व त्यानंतरही आपल्या धीरोदात्त वागणुकीने इतर भावंडांना सांभाळणारे आगाशेसाहेब, आपल्या बालपणींच्या आठवणीत रमून जाऊन त्यासंदर्भात आजकालच्या वाढत्या महागाईची मजेशीर तुलना करणारे आगाशेसाहेब, अत्यंत उच्च वर्तुळात सततचा वावर असूनसुध्दा स्वतःची राहणी साधी राखू शकणारे आगाशेसाहेब, मोठमोठ्या प्रोफेशनल लोकांना त्यांनी आत्ताच शोधून काढली आहे अशी वाटणारी सोल्यूशन्स वीस वर्षांपूर्वीच प्रत्यक्षांत उतरविणारे आगाशेसाहेब, ब्रिटनचे पंतप्रधान जॉन मेजर ते कंपनीचा तळातील कर्मचारी यांना एकाच सहजतेने भेटणारे आगाशेसाहेब हे आमच्या जीवनातील प्रॅक्टीकल्सचे एक आदर्श शिक्षकच.

'प्रसंग पाहोनी वर्तावे, सांडावे भय पोटीचे' ही समर्थांची शिकवण आचरणात आणावयाला आम्हास शिकवले ते आगाशेसाहेबांनीच.

कामगार हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रत्येक कामगारास तो आगाशे कुटुंबाचा एक घटक असल्यासारखी जी वागणूक मिळते यातच त्यांच्या यशाचे रहस्य दडलेले आहे असे मला वाटते व म्हणूनच आगाशेसाहेबांच्या कोणत्याही संस्थेमध्ये कधी संप झाल्याचे कोणी पाहिलेले अथवा ऐकलेले नाही. आपले घरी ज्या मॉडेलची मोटार आहे त्याच मॉडेलची मोटार कंपनीचे सेवकास स्वतः घेऊन देणे म्हणजे 'दया करणे जे पुत्राशी तेच दासा आणि दासी' ही ओवी त्यांनी स्वतःचे आचरणात आणल्याचा प्रत्यक्ष पुरावाच नव्हे काय?

लग्न - मग ते जनरल मॅनेजरच्या घरचे असो वा कंपनीच्या अन्य कोणत्याही कामगाराच्या घरचे असो, आगाशेसाहेब गावाला गेलेले नसतील तर लग्नाला येणारच

हा नियम सर्वांच्या अंगवळणी पडलेला आहे. गळित हंगामाचे उद्‌घाटन प्रसंगीचे भोजन समारंभात सुमारे दीड ते दोन हजार व्यक्तींमधून अमुक एक कर्मचारी कसा दिसत नाही, अशी घारीची नजर असणारे आगाशेसाहेब आम्हा कर्मचाऱ्यांच्या गळ्यातील ताईत न बनले तरच नवल. खिशास परवडत नसताना देखील ठरल्या वेळी पगारवाढ देताना तसेच तोटा असतानासुध्दा कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर करताना त्यांच्या चेहेऱ्यावरून ओसंडणाऱ्या सात्विक आनंदाचे आम्ही साक्षीदार आहोत.

आमचे कंपनीत काम करताना झालेल्या चुकीसाठी शिक्षा नाही. कारण काम करतो तोच चुकतो हे आगाशेसाहेबांचे धोरण. प्रसंगी आम्हा कर्मचाऱ्यांच्या चुकांसाठी स्वतःस जबाबदार मानणारा हा मालक विरळाच. मात्र फ्रॉड खपवून घेतल्याचे एकही उदाहरण मला दिसू शकलेले नाही.

स्वतःच्या मालकीच्या साखर कारखान्याचे नाईलाजाने सहकारीकरण करताना त्यांच्या जिवाची झालेली तगमग आठवून आजही माझ्या डोळ्यात अश्रू येतात. मात्र अशाही प्रसंगी स्वतःचा धीर सुटू न देता हस्तांतरणाचे करारनाम्यात कामगारांच्या सुरक्षित भवितव्याचे कलम स्वतः ड्राफ्ट करणारे आगाशेसाहेब हे कामगारांना आपले मालक का वाटतात याचे समर्पक उत्तर आहे. मला काय मिळते याच्यापेक्षा माझा कामगार कसा सुखी होईल हे ब्रीद उराशी बाळगणारा हा योगी उद्योगपती.

हे परमेश्वरा! आमच्या आगाशे साहेबांना दीर्घ आयुरारोग्य तर तू प्रदान करच, पण जेव्हा जेव्हा मला या पृथ्वीवर जन्म देशील तेव्हा तेव्हा आमच्या आगाशे साहेबांकडे नोकरी करण्याचे भाग्य मला लाभूदे, हीच तुझे चरणी प्रार्थना.

•

१९६९ साली सुवर्ण सहकारी बँक स्थापन करायची ठरली. त्यावेळी डेप्युटी रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये बँकिंग विभागाची जबाबदारी माझ्याकडे होती.

आगाशे व विलास एकबोटे ८ ऑगस्टला माझेकडे तसा अर्ज घेऊन आले. सरकारी खाक्याप्रमाणे बँक रजिस्टर व्हायला महिनाभर तरी लागेल असे मी सांगितले. पण आगाशांनी इतक्या आर्जवीपणे त्यांची बाजू मांडली की मी व आमच्या साहेबांनी तीन दिवसांत रजिस्ट्रेशन देऊन टाकले.

२२ सप्टेंबरला शेषराव वानखेडे यांचे हस्ते बँकेची मुहूर्तमेढ रोवली. त्या समारंभातील भाषणात वानखेड्यांनी कोपरखळी मारली की तीन दिवसात बँकेला रजिस्ट्रेशन आणलेत म्हणजे त्यात काही गडबड नाही ना !

हा आर्जवी स्वभाव आगाशे साहेबांचा आजही तसाच असून समोरच्या माणसाला आपलेसे करून घेतो.

**जी. एच्. उमरजी**



मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आगाशे साहेब मान्यवरांसह

# मित्रत्त्वाचे नाते

**मुकुंद अनगळ**

पुणे मराठी ग्रंथालयाकडे अखिल भारतीय मराठी साहित्य समेंलनाच्या आयोजनाचा मान गेल्या १२ वर्षात दोन वेळा सोपविण्यात आला. जानेवारी १९९० आणि जानेवारी २००२ या दोन वर्षात म्हणजेच ६३ वे आणि ७५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे मराठी ग्रंथालयाच्या यजमानपदाखाली यशस्वीपणे पार पाडले. या दोन्हीप्रसंगी स्वागतमंडळाच्या नेतृत्वाची म्हणजे १९९० साली प्रमुख कार्यवाह आणि २००२ साली कार्याध्यक्ष या नात्याने मी जबाबदारी पार पाडली.

मुलीचे लग्न सध्याच्या काळांत सोपे असते. मात्र सद्यकाळात या संमेलनामध्ये व्याप, ताप, मानपान, रुसवे-फुगवे, उलट सुलट प्रतिक्रिया, अर्धवट माहितीवर आधारित बातम्या याचा जणू सुकाळच दिसत आहे. तरीदेखील शब्दांचा आनंद घेण्यासाठी जे सर्वसामान्य रसिकजन अशा प्रसंगी जमतात त्यांच्या अमोल सहकार्याची बूज राखून संयोजक संस्थेने या संमेलनाचे आयोजन जास्तीत जास्त थंड डोक्याने परंतु कल्पकतेने परिपूर्ण करण्यासाठी धडपडावे लागते. अशावेळी पु.ल. देशपांडे यांच्या कथेतील नारायणाच्या भूमिकेत जावेच लागते. पु.लं.च्या त्या नारायणांना अर्थिक उभारणी केल्याशिवाय गत्यंतरच नसते. त्यामुळेच वर उल्लेखलेल्या दोन्ही प्रसंगी असे नारायण साकारण्याचे काम मी आणि माझ्या असंख्य सहकाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडले. अशा या कात्रीच्या दोन्ही धारदार पात्यांवर बसलेल्या कार्यकर्त्यांना त्या धारेचा स्पर्श जणू पिसासारखा वाटावा यासाठी एखाद्या खंबीर हाताची गरज असते. त्या हाताने कात्रीची मूठ योग्य प्रमाणांत धरलेली असते. म्हणूनच साऱ्या कार्यामध्ये श्रमांचा अतिरेक होऊनही शेवट सुखान्त होत असतो.

ज्ञानेश्वर हे नाव मराठी साहित्यक्षेत्रातील आद्यनाव ! ते नाव धारण करणारी व्यक्ती अमृतमहोत्सवी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी विराजमान होते हा एक आयोजनाला लाभलेला शुभशकुनच होता . त्यातही ज्ञानेश्वर आगाशे यांनी काही वर्षे 'राजस' व 'योगिता' ही मराठी मासिके यशस्वीपणे प्रकाशित केली होती. त्यामुळे मराठी साहित्य क्षेत्राची तोंडओळख नव्हे तर त्या क्षेत्राचा चांगलाच परिचय त्यांना आहे. त्यामुळेच त्यांचे स्वागताध्यक्षपदी असणे केवळ शोभेचे, मार्गदर्शक किंवा केवळ अर्थिक बाजू भक्कमपणे

पाहणारे असे ठरले नाही, तर संपूर्ण संयोजनामध्ये व्यावहारिकतेचा आणि दिलदारपणाचा आदर्श घालून देणारे स्वागताध्यक्षपद कसे असावे याचा उत्कृष्ट परिपाठच जणू पाहावयास मिळाला. व्यासपीठाची किंवा माईकची यत्किंचितही हौस नाही पण वेळेप्रसंगी व्यासपीठावरील भूमिका सौम्य,सरळ, साध्या शब्दांत आणि कोणत्याही अभिनिवेशाचा स्पर्श नसणारी ठरली. इतरांच्या कल्पनाशक्तीला, कार्यकुशलतेला वाव देणारी वृत्ती असल्याने चौफेर बारीक लक्ष असूनही वर्चस्व गाजविण्याची वृत्ती अजिबात नाही याचे प्रत्यंतर त्यांच्या सहवासात वारंवार आले.

राबणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना असा हा खंबीर हात स्वागताध्यक्षांच्या रूपाने जेव्हा मिळतो, तेव्हा संयोजन चालू असतांनाच्या क्षणांना कदाचित त्रास जाणवला तरीही कार्यकर्त्यांना दिलासा मिळत रहातो. अशी खंबीर दिलासा देणारी व्यक्ती या वेळच्या ७५ व्या म्हणजेच अमृतमहोत्सवी अ. भा. मराठी साहित्य संमेलनप्रसंगी लाभली - ती म्हणजे ज्ञानेश्वर आगाशे !

ज्ञानेश्वर आगाशे यांनी स्वागताध्यक्षपद स्वीकारावे यासाठी विजयादशमी २००१ या शुभदिवशी पुणे मराठी ग्रंथालयामधील सरस्वती पूजनानंतर आम्ही सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी एकमुखी निर्णय घेतला. त्यांच्याशी कुणी संपर्क साधावा, त्यांची संमती कशी मिळवावी याची रचना करण्यांत आली. अर्थातच ही जबाबदारी मी व माझा मित्र म्हणजेच पुणे मराठी ग्रंथालयाचे कार्यवाहक श्री मोहन दाते यांच्या कडे आली. एक दिवस सकाळी आगाशे साहेबांशी त्यांच्या बँकेतील कार्यालयात भेटण्याचे मी दूरध्वनी द्वारे निश्चित केले. मात्र माझ्याकडून ठरलेली वेळ पाळली गेली नाही.पण योग चांगला होता. आगाशेसाहेब मला थोडे फार ओळखतात त्यामुळेच की काय ते बँकेच्या जिन्यावरून बाहेर जाण्यासाठी उतरत असताना त्यांची माझी गाठ पडली. मी काहीसा खजील अवस्थेत होतो. दिलगिरी व्यक्त केली आणि तुमच्या सवडीने सायंकाळी भेटतो असे त्यांना मी म्हटले. परंतु तिथेच आगाशेसाहेबांनी 'नेमके माझ्याशी काय काम काढले आहे? इथे बोललात तरी चालेल.' असे उद्‌गार काढले. आलेला संकोच थोडा फार कमी झाला. आणि मी त्यांना भेटण्याचा माझा हेतू थोडक्यात सांगितला. त्यांच्या ऋजुतापूर्ण स्वभावाप्रमाणे, 'ही भलतीच कुठली जबाबदारी माझ्याकडे सोपविता?' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली पण मी आग्रहपूर्वक तुम्ही आमच्या बरोबर पाहिजे, असे मनापासून सांगितले. इतक्या संवादानंतर सायंकाळी निवांत पुन्हा भेटण्याचे आम्ही ठरविले.

सायंकाळी मात्र वेळ व्यवस्थित पाळली. माझ्या बरोबर मोहन दाते होतेच, त्यावेळी सविस्तर चर्चा झाली. आगाशेसाहेबांनी पुण्यातील अनेक मान्यवरांची नावे स्वागताध्यक्षपदासाठी सुचविली व 'मी स्वत: तुम्ही सांगाल त्या कार्यकर्त्याच्या भूमिकेत असेन' असे मोकळेपणाने सांगितले. हे त्यांनी सुचविताना कोणताही खोटा अभिनिवेश त्यांच्या शब्दातून प्रकट झाला नाही. गेली काही वर्षे माझा अनेक व्यक्तींशी विविध निमित्ताने संपर्क आलेला आहे. त्यामुळे मनातील भाव व शब्दातील भाव यांचे नेमकेपण लक्षात येत असे. पण हे दोन्ही भाव एकाच भावातून जेंव्हा व्यक्त झाल्याचे लक्षात येते तेंव्हा एका खऱ्या मित्रत्वाचा आविष्कार जाणवून जातो. असा आविष्कार याप्रसंगी आला. साहजिकच ज्ञानेश्वर आगाशे हेच स्वागताध्यक्षपदी असले पाहिजे असे आम्हा दोघांच्याही मनात एकाच वेळेस आले. त्यानंतर आगाशेसाहेबांना आम्ही मोकळेपणाने, पण खरं म्हटल तर गळच घातली आणि त्याच बैठकीत त्यांचा होकार मिळवून बाहेर पडलो. त्यांच्या होकाराची बातमी आमच्या इतर सहकाऱ्यांना सांगितली. सर्वांनाच मन:पूर्वक आनंद झाला.

प्रत्यक्ष संमेलनामध्ये सुरूवातीस म्हटल्याप्रमाणे एक आत्मविश्वासपूर्वक परंतु सर्व सहकाऱ्यांना सातत्याने मार्गदर्शन देण्याची भूमिका त्यांनी पार पाडली. त्या मार्गदर्शनामध्ये प्रामुख्याने छोट्यातल्या छोट्या

कार्यकर्त्यालासुध्दा त्याने पार पाडवयाचे काम तो कार्यकर्ता निश्चितपणे व्यवस्थित पार पाडेल असा विश्वास व्यक्त करणारा संवाद आगाशेसाहेबांनी सगळ्यांशी केला. त्यामुळेच त्यांचा आधार सर्वांनाच मित्रत्वाचा ठरला. मला व्यक्तिगत कोणी विचारले तर मी असे सांगतो की १९९० सालच्या संमेलनामुळे संघटन कौशल्याचा आनंद मिळाला तर या अमृत महोत्सवी साहित्य संमेलनप्रसंगी माझ्यातील संघटन कौशल्याचे मनःपूर्वक कौतुक करणारा एक ज्येष्ठ मित्र आयुष्यात लाभला हे समाधान मिळाले. खरं म्हटलं तर असा जबरदस्त दिलासा देणारी व्यक्ती जेव्हा आपल्या मागे उभी राहते तेव्हा कार्य कितीही मोठे असले किंवा अडचणीचे असले तरी कार्याचे यश नक्की लाभते, असा विश्वास ज्ञानेश्वर आगाशे यांच्या सहवासामुळे लाभला. त्यांचा हा आधार मला तसेच अनेकांना असाच मिळत राहो त्यासाठी परमेश्वराने त्यांना उदंड व दीर्घायुरारोग्यसंपन्न आयुष्य देत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

•

### भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्षपद

आगाशांना भारतीय क्रिकेट मधील राजकारण कधीच जमले नाही, भावले नाही असे त्यांच्या माझ्यासारख्या मित्रांचे प्रामाणिक मत आहे. आगाशे १० वर्षाहून अधिक काळ बी.सी.सी.आय. चे उपाध्यक्ष होते. त्यावेळी अध्यक्षपदासाठी पश्चिम विभागाची टर्न होती व आगाशे पश्चिम विभागाचे प्रतिनिधी म्हणून अध्यक्षपदाच्या निवडणुकीला उभे राहिले होते. परंतु त्याच वेळी पंजाब क्रिकेट संघटनेचे अध्वर्यु आय. एस्. बिंद्रा यांना पश्चिम विभागातील बडोदा संघटनेने आपले प्रतिनिधी म्हणून घुसवले. आगाशे व ब्रिंदा यांच्या लढतीत सुरुवातीला आगाशांचे पारडे जड होते. आगाशांच्या पाठीमागे गुजरात, सौराष्ट्र, कर्नाटक, अशा अनेक संघटना भक्कमपणे उभ्या होत्या. परंतु नेहमीप्रमाणे मराठी माणसाला दुहीचा शाप भोवला. त्यावेळी भारतीय क्रिकेट बोर्डाचे त्यावेळचे अध्यक्ष कै. माधवराव शिंदे, मध्य प्रदेशचे कनमाडीकर, बडोद्याचे जयवंत लेले, मुंबईचे कै. नरेंद्र ताम्हाणे, विदर्भातले मुंडले, महाराष्ट्राचे ज्ञानेश्वर आगाशे व गोव्याचे प्रशांत जोशी तसेच विद्यापीठ क्रीडा मंडळाचे डॉ. पवार अशी तब्बल आठ मंडळी मराठी होती. या सर्वांनी एकजूट दाखविली असती तर आगाशे हमखास निवडून आले असते. पण मराठी माणसाचा आत्मघातकीपणा नडला व आगाशे निवडणूक हरले.

तथापि या निवडणुकीतही आगाशांबद्दल अभिमान वाटावा अशी घटना घडली. त्या वेळी विरोधी गटाकडून आगाशांना 'ऑफर' आली की तुम्हाला अध्यक्षपद देतो, पण तुमच्या सहकाऱ्यांनी इतर पदांचा आग्रह सोडायला हवा. त्यावेळी आगाशे यांनी एका क्षणाचाही विचार न करता ही ऑफर फेटाळली. 'मी माझ्या अध्यक्षपदासाठी माझ्या मित्रांची, सहकाऱ्यांची साथ कदापि सोडणार नाही'. असे निक्षून सांगितले. आगाशे अध्यक्ष म्हणून हरले पण माणूस म्हणून जिंकले!

**प्रा. विलास एकबोटे**

# झाले बहू, आहेत बहू, होतील बहू - पण या सम हाच

**रेवणसिद्ध भादुले**

आंग्ल भाषेत एक विचार आहे की काही माणसे जन्मतःच मोठी असतात. काहीजणं मोठेपणा प्रयत्नाने प्राप्त करतात तर काही जणांवर मोठेपणा लादला जातो. यापैकी पहिल्या प्रकारात मोडणारे ज्ञानेश्वर आगाशे आहेत. आगाशे-भादुले या दोन्ही घराण्याचा गेल्या तीन पिढ्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. पुण्यात आगाशेंच्या पायाला ठेच लागली तर पंढरीत आमच्या नेत्रात पाणी येते अन् येथे आम्हावर एखादे संकट आले तर पुण्यात आगाशे बेचैन होतात.

ज्ञानेश्वर आगाशे आज ६१ व्या वर्षात पदार्पण करीत असताना मन आनंदाने भरून येत आहे. आमच्यातील आठवणींचा गोफ त्या निमित्ताने खुला करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्याकडे अन् त्यांच्या कामाच्या पध्दतीकडे पाहिल्यावर ज्ञानेश्वरांनी साठी पूर्ण केली आहे हे सांगूनही पटत नाही. अंतर्बाह्य निर्मळ असणारा, खिलाडू वृत्तीचा ज्ञानेश्वर म्हणजे आमचा बहिश्चर प्राण आहे.

आगाशे केव्हाही पंढरीत आल्यावर प्रथम आमच्या घरी येत. मगच विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनास जात असत. आमच्या घरातील संत्र्यांचा रस हे त्यांचे सर्वात आवडते पेय आहे. संतुष्ट मनाने तो रस प्राशन केल्यावर ते उठून उभे राहातात अन् म्हणतात 'भादुलेचे घरी उभा क्षणभरी.'

आगाशे कुटुंबियांच्या दातृत्वाला सीमा नाही. एक गोदाम पंढरीत होते. त्याचे काय करावे? असा विचार पुढे येताच अनेकांनी भरपूर रक्कम देऊन ते घेण्याचा विचार कथन केला. तेव्हा त्यांनी मला विचारले - याचे काय करावे? माझ्या सांगण्यास मान देऊन त्यांनी ही जागा पंढरपूर मर्चंट बँकेस दिली.

पंढरपूर शहरातील दोन मोठे रस्ते जोडणारा जो रस्ता बस स्थानकासमोर आहे त्या रस्त्यास कै. चंद्रशेखर आगाशे पथ यांचे नाव देण्याचा सोहळा आम्ही ह.भ.प. अनंतराव आठवले यांचे हस्ते संपन्न केला.

अशा या मित्राच्या षष्ट्यब्दिपूर्तिचा समस्त पंढरी निवासियांना व भादुले घराण्याला आनंद होत आहे. या मित्राच्या अपार प्रेमाची अल्पशी आठवण म्हणून आमच्या मुलांच्या बंगल्याला 'श्री ज्ञानेश्वर कृपा' असे नाव दिले आहे. या मंगल प्रसंगी मी रुक्मिणी पांडुरंग चरणी विनम्रपणे प्रार्थना करतो की, आगाशे व परिवार यांना आयुरारोग्य, धनसंपदा, कीर्ति प्राप्त व्हावी व पुढील आयुष्य सुखासमाधानाचे जावो.

•

# विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई रंगा येई गो ये ...

**डॉ. सुरेश गोगटे**

ज्ञानोबा माऊलींनी भक्तांच्या मदतीसाठी विठोबाला केलेले आवाहन आणि आजच्या आधुनिक युगातील ज्ञानेश्वरांनी जनताजनार्दनाच्या सुखासाठी तऱ्हेतऱ्हेचे उपक्रम हाती घेतांना पंढरपूरच्या विठ्ठलाला भक्तिभावाने घातलेली साद... दोन्हींचा भाव एकच.

आपल्या मुलाच्या हातून ज्ञानेश्वरांसारखे मोठे अद्वितीय कार्य घडावे ह्या हेतूनेच बहुदा त्यांच्या वडिलांनी, चंद्रशेखर आगाशांनी त्यांचे नाव ज्ञानेश्वर ठेवले असावे. ज्ञानेश्वरांना जसे निवृत्तीनाथांसारखे गुरू लाभले होते तसेच ह्या ज्ञानेश्वराला थोरले बंधू पंडितराव गुरूस्थानी लाभले. शिरीनरावांच्या लहानपणीच पितृछत्र हरपल्यावर या जगातील बऱ्यावाईट अनुभवाचे चटके स्वतः सोसून इतर कुटुंबीयांना दुःखाची झळही पंडितरावांनी पोहोचू दिली नाही. शिरीनरावांना तरुण वयातल्या सर्व हौशी, छंद जोपासायची संधी पंडितरावांमुळे मिळाली. शिरीनराव उद्योगधंद्यात तरबेज आणि परिपक्व होईपर्यंत आगाशांच्या उद्योगधंद्याची धुरा ह्या एकट्या कर्त्या पुरुषाने सांभाळली. आणि मग शिरीनराव धंद्यात पारंगत झाले. पुढे पंडितरावांचे अचानक निधन झाल्यावर उद्योगाची पूर्ण इमारत शिरीनरावांनी एकट्याने कळसापर्यंत नेली. न चुकता विठोबाच्या पालखीचा मान ठेवणारा, भक्तिभावाने विठुमाऊलीच्या चरणी नत होणारा आणि श्रीपूरच्या वारकऱ्यांत रममाण होणारा हा ज्ञानेश्वर आहे. गीतेवर भाष्य करण्याचे कौशल्य आणि विस्तृत विश्लेषण करण्याची क्षमता असणाऱ्या ज्ञानेश्वरांचे वर्णन करणे जसे खूप कठीण आहे तसेच या ज्ञानेश्वरांच्या कार्याला शब्दात बांधणे खूप कठीण आहे. प्रत्येक जण आपल्या कुवतीप्रमाणे ह्या तेजस्वी हिऱ्याचा कोणता पैलू आपल्याला जास्त आवडला हे सांगणार आहे.

कुणासाठी माऊली, कुणासाठी सखा, कुणासाठी शिरीनमामा, कुणासाठी धाकटे साहेब, तर कुणासाठी बाबा.... अशी अनेक रूपे....

माझ्या मोठ्या बहिणीशी त्यांचे लग्न झाल्यावर पहिली काही वर्षे त्यांना जवळून ओळखण्यासाठी घडलेले प्रसंग माझ्यापाशी नाहीत. ह्याला दोन कारणे आहेत. एक तर आम्ही समवयस्क नाही आणि दुसरे म्हणजे मी शिकायला दूर गुलबर्ग्याला होतो. मी त्यांच्याहून बराच लहान असल्याने कायम त्यांच्याविषयी आदरयुक्त कुतूहल वाटले. एवढ्या तरुण वयात एवढी मोठी औद्योगिक घडामोडींची धुरा लीलया पेलण्याचे काम हे कसे करू शकतात? असे प्रश्नच

कायम मनात यायचे.

माझे काका रावसाहेब गोगटे यांनी शिरीनरावांना "लाडके जावई" ही पदवी देऊन टाकली होती. ही पदवी मला वाटतं त्या दोघांच्यातील गुण साधर्म्यामुळे मिळाली असावी. खरंच यशस्वी उद्योगपती होण्यासाठी कोणते गुण असावेत? या प्रश्नाचे उत्तर शोधतांना मला शिरीनरावांमधले काही गुण प्रकर्षाने आढळले. पहिला म्हणजे खूप मोठा जिवाभावाचा मित्रपरिवार - ह्यातले काही मित्र तर अगदी बालपणापासूनचे. गुणग्राहकता आणि माणसांची उत्तम पारख हे गुण असल्याशिवाय माणूस यशस्वी उद्योगपती होऊच शकत नाही.


दुसरा गुण प्रामुख्याने दिसला म्हणजे बोलण्यातील मार्दव आणि मोठ्या वयाच्या व्यक्तींविषयी आदरभाव. कोणत्याही मोठ्या प्रकल्पाआधी थोरामोठ्यांच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घेऊनच ते कामाला जायचे.

ज्या माणसाच्या घरी ऋद्धि सिद्धि पाणी भरत आहेत तो माणूस इतका साधा कसा राहू शकतो? हे मला न सुटलेलं कोडं आहे. बहुधा "साधी राहणी आणि उच्च विचारसरणी" हे बाळकडू त्यांना घरच्या खानदानी संस्कारातून मिळाले असावे. त्यांच्या घरी मोठ्या व्यक्तींच्या अनुभवाला मान आहे. साहित्य, वेदविद्येचा सन्मान आहे आणि अडचणीला सर्वांना मदतीचा हात पुढे करायचे भान आहे.

माझे दोन्ही भाचे मंदार आणि आशुतोष मोठे झाल्यावर आणि उद्योगधंद्यात वडिलांच्या तालमीत तयार होऊ लागल्यावर त्यांच्या मार्फत माझे शिरीनरावांबरोबरचे संवाद वाढू लागले, सूर जुळू लागले. प्रत्येक वेळी पाच मिनिटे भेटले तरी त्यांना असलेले वेळेचे महत्त्व, काटेकोरपणे वेळ पाळण्याची शिकस्त, झट्‌कन निर्णय घेण्याची क्षमता हे गुण नजरेतून सुटू शकले नाहीत. मी क्रिकेटचा भोक्ता आणि मेव्हणे पूर्वीचे रणजी ट्रॉफी प्लेअर त्यामुळे त्यांच्या विषयीचा आदर आणखीनच द्विगुणित व्हायचा.

शिरीनरावांच्या कर्तृत्वाचा वृक्ष बहरण्यासाठी जे मानसिक अनुकूलतेचे खतपाणी लागते ते माझ्या बहिणीने पुरविले. आमचे बाबा गेल्यानंतर माझ्या मोठ्या बहिणीने आम्हाला वारंवार मानसिक आधार दिलाच. पण मेव्हण्यांचेही भक्कम पाठबळ असणे मोलाचे आहे. असे प्रेमळ पाठबळ आम्हाला अनेक वर्षे लाभावे, ही देवाजवळ प्रार्थना.

•



कै. जगन्नाथ महाराज पंडित व कै. चंद्रशेखर आगाशे

# ज्ञानेश्वर

**बाळ पंडित**

ज्ञानेश्वर या नावाबद्दल आमच्या घरात माझ्या लहानपणापासूनच आस्था, प्रेम आणि जिव्हाळा. संत ज्ञानेश्वर महाराज हे आमचं आराध्य दैवत. त्यामुळे ज्ञानेश्वर आगाशेबद्दल मला पहिल्यापासून आपुलकी वाटत आली असल्यास नवल नाही. पण हे एकच कारण नाही.

ज्ञानेश्वरचे वडील चंद्रशेखर आगाशे व माझे वडील जगन्नाथ महाराज पंडित हे एकमेकांचे परमस्नेही. दोघंही बृहन् महाराष्ट्र शुगर सिंडिकेटशी संबंधित,वडिल चेअरमन तर थोरले आगाशे साहेब मॅनेजिंग डायरेक्टर. त्याशिवाय ज्ञानेश्वर हा न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेचा विद्यार्थी आणि मीही त्याच शाळेचा.

एवढंच काय पण त्याचे आणि माझे क्रिकेट शिक्षक एकच. ते म्हणजे रामभाऊ लेले. आम्हा दोघांनाही रामभाऊ लेले यांच्याबद्दल नितांत आदर. आजही रामभाऊंचा विषय निघाला की त्यांच्यासारखे हातवारे करण्यात व त्यांच्याप्रमाणे ठसक्यात बोलण्यात आम्हाला आनंद वाटतो.

घराच्या फाटकातून लांबलचक पांढरी गाडी आत शिरली की मी ओळखत असे, आगाशेसाहेब आले. एक दिवस वडिलांनी त्यांच्याशी माझी ओळख करून दिली. तेंव्हा ते लगेच म्हणाले, "माझा धाकटा मुलगाही क्रिकेट खेळतो बरं का !" म्हणजे मीही खेळतो हे त्यांना कळलेलं दिसलं.

ज्ञानेश्वरला मी प्रथम पाहिलं ते मुंबईला, १९५८ साली. तेव्हा मी ए.सी.सी. कंपनीत नोकरीला होतो आणि सरदार गृहात राहात होतो. ती खोली बृहन्महाराष्ट्राचीच होती. आणि तिथेच एके दिवशी सकाळी एक शाळकरी मुलगा क्रिकेटचे सामान घेऊन आला. तोच ज्ञानेश्वर आगाशे.

तो भारतीय शालेय संघात निवडला गेला होता आणि सिलोनला चालला होता. मी त्याचं अभिनंदन केल्याचं व शुभेच्छा दिल्याचं आठवतं. नंतर आमची समोरासमोर गाठ पडली ती एका सामन्यात. मी क्लब ऑफ महाराष्ट्राचा कप्तान होतो आणि ज्ञानेश्वर युनिअन क्लबचा. त्या सामन्यात मला असं दिसून आलं की ज्ञानेश्वरची विकेट काढणं अवघड आहे, जोरदार फटके मारायचा आणि कोणत्या बाजूला चेंडू टोलवेल याचा नेम नसायचा. त्याचा खेळ अन् ऑर्थोडॉक्स या प्रकारात मोडणारा होता.

पण बॅटिंगपेक्षा मला त्याची विकेटकीपिंग जास्त आवडली होती. सदानंद मोहोळच्या चेंडूवरही तो स्टंप्सच्या जवळ उभा रहायचा. त्याच्या हालचाली जलद होत्या आणि

चेंडू गॅदर करण्याची पध्दत नजरेत भरणारी होती. रनिंग बिटवीन दी विकेटस् तर उत्कृष्टच होतं! लेले सरांचा चेला फुकट जाणार नाही हे स्पष्ट दिसत होते.

पुढं मी रणजी ट्रॉफीत खेळलो तेव्हा ज्ञानेश्वर रिझर्व्हमध्ये होता. नंतर मी रणजी ट्रॉफीच्या सिलेक्शन कमिटीत आलो तेव्हा प्रश्न आला ज्ञानेश्वरला टीममध्ये घ्यावं की नाही हा! एक दोघं जण अनुकूल नव्हते. ज्ञानेश्वर नेट प्रॅक्टीसला येत नाही ही मुख्य तक्रार होती. पण ज्ञानेश्वरचा खेळ रणजी ट्रॉफीच्या दर्जाचा आहे असं माझं निःसंदिग्ध मत होतं. बरंच भांडावं लागलं, सिलेक्शन कमिटीची मीटिंग रेल्वे स्टेशनच्या पहिल्या मजल्यावर होती. खूप आर्ग्युमेंटस् झाली. आम्ही तिघे ठाम राहिलो. सरते शेवटी रात्री १ वाजता ज्ञानेश्वरच्या निवडीवर शिक्कामोर्तब झालं. घरी आल्याबरोबर मी ज्ञानेश्वरला फोन केला. तो आणि त्याचे मित्र जागेच होते! ज्ञानेश्वरनेच फोन उचलला होता. बातमी सांगितल्याबरोबर जल्लोष झाल्याचे ऐकू आले.

विशेष बातमी सांगायची म्हणजे ज्ञानेश्वर रणजी सामन्यात खेळला. चांगला खेळला. ५० पेक्षा जास्त धावा काढल्या आणि त्याचं यष्टिरक्षणही उत्तम झालं. त्यानं आपली निवड सार्थ केली होती. पण नंतर जास्त काळ रणजी ट्रॉफी खेळू शकला नाही. खरं म्हणजे मन लावून जिद्दीनं खेळला असता तर खूपच पुढं गेला असता.... पण... त्यानंतर तोही रणजी ट्रॉफीच्या सिलेक्शन कमिटीत आला. सुमारे ५/६ वर्षे आम्ही निवडसमितीत एकत्र काम केलं. त्याची व माझी मतं जुळत असल्यानं आम्ही निवड समितीत हिरीरिनं बोलत असू. इतरांशी मतभेदाचे प्रश्न आले तरी ज्ञानेश्वर व मी सतत एकत्र होतो. ही गोष्ट अर्थातच अन्य सभासदांच्या डोळ्यात सलायची! आमची जोडी फोडण्याचा काही जणांनी प्रयत्न केला होता. पण ते त्यांना जमले नाही. पुढंही जमेल असं वाटत नाही.

पुणे विद्यापीठाच्या क्रिकेट निवड समितीतही आम्ही एकत्र होतो. तेव्हाही रोज फोनाफोनी चालायची. संघ कसा बलवान होईल याबद्दल आमचा खल चालायचा. एम्.सी.ए.च्या कार्यकारिणीत असताना प्रामुख्याने आम्ही तिघांनीच - नारायण ठकार, माधव रानडे व मी - ज्ञानेश्वरला बोर्डावर पाठवण्यासाठी त्याच्या नावाचा आग्रह धरला होता.

ज्ञानेश्वर बोर्डावर जाऊ लागला. तिथलं राजकारण त्याच्या अंगवळणी पडलं आणि बघता बघता स्वतःच्या हिंमतीवर बोर्डाचा उपाध्यक्ष झालादेखील! उपाध्यक्ष झाल्यावर साहजिकच अध्यक्षपदाचे वेध लागले. पण तिथलं गणित चुकलं. नक्की अध्यक्षपद मिळणार असं वाटत असतानांच मीटिंगच्या आदल्या रात्री वारं प्रतिकूल वाहू लागलं. दोन-तीनदा प्रयत्न करूनही हिशोब चुकले ते चुकलेच! पण तो उपाध्यक्षपदापर्यंत पोहोचला हेही काही कमी नव्हतं. एम्.सी.ए. चे फक्त दोघेच जण आजवर उपाध्यक्ष झालेले होते. एक देवधर व दुसरे नानासाहेब तुळपुळे. अजूनही नेटाने शिस्तशीर प्रयत्न केला तर ज्ञानेश्वरला अध्यक्षपद मिळेलही. जगात कोणती गोष्ट अशक्य असते?

दरम्यान इकडे एम.सी.ए. च्या कार्यकारिणीचा तो कार्याध्यक्ष झालेला होता. त्यामुळे मकरंद भावे व नानासाहेब तुळपुळे यांच्याप्रमाणे असोसिएशनचा सर्वेसर्वा बनला. कार्याध्यक्ष बनल्यावर नवोदित खेळाडूंना प्रकाशात आणण्यासाठी त्यानं बृहन्स इलेव्हनचा संघ तयार केला आणि असोसिएशनच्या प्रमुख स्पर्धेत त्या संघाला उतरवले. एवढेच नव्हे तर पुण्याच्या इन्व्हिटेशन लीगचा खर्च गेले काही वर्ष तोच करत आलेला आहे.

याशिवाय गरजू खेळाडूंना नोकऱ्या देणं, आर्थिक मदत करणं, कोणाचीही बेनिफिट मॅच असली की त्याला दहा हजार रुपये देणं अशा गोष्टी त्यानं अनेकांच्या बाबतीत केल्या आहेत. देणग्या देण्याबरोबरच असोसिएशनसाठी देणग्या मिळवणं हे देखील त्याला जमतं. विशेष म्हणजे, कोणाला अर्थसहाय्य केलं तरी त्याबद्दल कधी बोलबाला नाही की बढाई नाही! अनेकांना त्यानं संकटाच्या वेळी मदतीचा हात दिलेला आहे.

त्यानं शब्द टाकल्याबरोबर त्याला देणग्या मिळतात हे माहीत असल्यामुळेच आळंदीच्या ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या विश्वस्तपदासाठी मी त्याचं नाव सुचवलं. परंतु वेळ कसा होईल हा त्याच्यापुढे मोठा प्रश्न होता. तरीही अडचण आली की त्याचा बाऊ करायचा नाही. त्यातून मार्ग काढायचा हा त्याचा स्वभाव असल्यामुळे कुरकुरत का होईना त्याने होकार दिला! दोन-तीन सभा झाल्यावरच त्यानं राजीनाम्याची भाषा काढली. परंतु मी त्याला थोपवलं. सुमारे सात वर्ष तो ट्रस्टी पदावर राहिला, पण त्याला इन्टरेस्ट निर्माण झाला नाही तो नाही.

इतक्या वर्षाच्या अनुभवातून मी पाहिलं की ज्ञानेश्वर हा निर्भय वृत्तीचा आहे. तो समाजात आत्मविश्वासानं वावरतो. कुणाच्याही टीकेला घाबरत नाही की धमक्यांना जुमानत नाही. माझ्यावरची टीका थांबवण्याचं कारण नाही, जरूर टीका करत जा, तेवढीच मला प्रसिध्दी मिळेल, असा टोमणा मारायलाही कमी करत नाही. अनेक उद्योग एकाच वेळी करण्याची क्षमता त्याच्याजवळ आहे. कुठल्याही गोष्टीचं आकलन त्याला चटकन होतं. त्यामुळे तो झटकन अचूक निर्णय घेऊ शकतो. इतरांना गुंतागुंतीची व अवघड वाटणारी समस्या तो लीलया सोडवतो. याचे कारण म्हणजे त्याच्याजवळ असलेले व्यवहारचातुर्य.

हे सगळं बघूनच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी समारंभात मी म्हणालो होतो की ज्ञानेश्वरच्या रूपानं असोसिएशनला नवं नेतृत्व लाभत आहे ते बोल खरे ठरले आणि आज त्याच्या खंबीर नेतृत्वामुळेच असोसिएशनची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे.

आज ज्या काळात भाऊ भावाला विचारत नाही त्या काळात ज्ञानेश्वरनं आपल्या थोरल्या भावाच्या नावानं - पंडितराव आगाशे या नावानं आंतर सहकारी बँकांची क्रिकेट स्पर्धा सुरू केली आहे. आता साठीत शिरत असताना खरं म्हणजे ज्ञानेश्वरनं थोडी विश्रांती घेतली पाहिजे. हल्ली बॅक टू बॅक क्रिकेटचे सामने असतात तशी ज्ञानेश्वरची भ्रमंती सारखी चालू असते. आज कलकत्ता, उद्या दिल्ली, कधी लंडन, कधी श्रीपूर, आणि मुंबई तर नेहमीचीच. मध्यंतरी त्याच्यावर एक गंडांतर येऊन गेलं. पत्नी रेखाताईंनाही खूपच बरं नव्हतं. या दोन्ही संकटांना त्यानं धीरोदात्तपणे तोंड दिले. प्रकृतीनं त्रास दिला होता तरीही आज त्याचा प्रवास सतत चालूच असतो.

कधी कधी ज्ञानेश्वर मला थोरला भाऊ मानतो. त्यामुळे माझ्या चुका काढण्याचा, त्याबद्दल बोलण्याचा त्याला मी परवानाच देऊन टाकला आहे. पण त्याच नात्याने, षष्ट्यब्दिच्या शुभेच्छा देताना व त्याचं अभिनंदन करताना मी त्याला सूचना करीन की 'ज्ञानेश्वरा, आता जरा पायाला लावलेली भिंगरी काढून टाक.' त्याच्या दोन्ही मुलांची लग्नं त्यानं थाटात केली होती. त्यापैकी एका लग्नाच्या वेळी ज्ञानेश्वरनं क्रीम कलरची शेरवानी परिधान केली होती आणि तांबड्या रंगाची खास पुणेरी पगडी घातलेली होती. त्यावेळी मी त्याला म्हटले होते, 'आता तू तुझ्या वडिलांसारखा दिसतोस.'

ज्ञानेश्वरचं हे रूप आम्हाला सतत पाहायला मिळो हीच इच्छा आहे.

•

# नामानिराळा

**रमेश दामले**

मा. ज्ञानेश्वर आगाशे यांच्या साठीनिमित्त एक गौरव अंक काढणार आहेत त्यासाठी आठवणी लिहा, असं जेव्हा मला सांगण्यात आलं तेंव्हा मनात अनेक आठवणींनी गर्दी केली.

माझे वडील शिवरामपंत आणि ज्ञानेश्वरचे वडील चंद्रशेखर यांचा जुना स्नेह. चंद्रशेखरांना पण कुस्तीचा शौक होता. मी पण आखाड्यात रमणारा, कुस्ती खेळणारा. त्यामुळे पहिली ज्ञानेश्वरबद्दलची आठवण आली ती कुस्तीबद्दलची.

मा.चंद्रशेखरांच्या शनिवारातल्या घरातच आखाडा होता. घरातच सलामीची कुस्ती लावली गेली.त्यातला एक भिडू होता 'ज्ञानेश्वर'. आता क्रिकेटमुळे आगाशे सर्वदूर माहिती झाले तरी कुस्ती हा त्यांच्या आवडीचा खेळ होता.

पुढे रमणबागेत ज्ञानेश्वर शालेय शिक्षणासाठी जेंव्हा दाखल झाला.तेव्हा मला आठवतय की,रामभाऊ लेले ज्ञानेश्वरला क्रिकेट शिकवायचे.मग महाराष्ट्रीय मंडळात मॅचेस व्हायला ११जणांच्या टीम ऐवजी चक्क १५ जणांची टीम असायची. त्यात ज्ञानेश्वर असायचा. दणक्यात खेळीमेळीत क्रिकेट रंगायचा. अहो,पण एक गोष्ट आवर्जून सांगतो की, मॅच जेवढी दणक्यात त्या पेक्षा त्यानंतरचा जेवणाचा समारंभ जास्त दणक्यात होत असे.

पूर्वी माझा ओंकारेश्वरला जाण्याचा नेम होता. ७ ची वेळ मी कधी चुकवली नाही.त्यानंतर मी शनिवारात आगाशांच्या घरी आवर्जून जात असे. मा.चंद्रशेखर यांच्या निधनानंतर कंपनीचा व्याप पंडित आणि ज्ञानेश्वर यांच्यावर पडला. आपला माणूस चांगला व्यवसाय करतोय. त्याच्या मागे राहायलाच हवं. अशा वृतीची अनेक माणसे ज्ञानेश्वरच्या पाठी होती. आजही आहेत. मी त्यापैकी एक आहे.

आज सारं वैभव,सुख ज्ञानेश्वर जवळ आहे. पण मी कोणत्याही समारंभात टाय, सूट,बूट ,कोट अशा वेशात ज्ञानेश्वरला कधीच पाहिला नाही.गर्दीतून ज्ञानेश्वरला शोधून काढावं लागतं. प्रसिध्दीचा गवगवा नाही,उगाच छानछोकी नाही,नावासाठी आग्रह नाही.म्हणूनच ज्ञानेश्वर आपला मोठेपणा टिकवून आहे.खेळाडू माणसाचं व्यक्तिमत्व चहुबाजूंनी उमललेल दिसतं, फुलतं, तसं ज्ञानेश्वरच आहे.पण क्रिकेटच्या तुलनेत अन्य खेळ त्याने कधी दुय्यम मानले नाहीत. कोणत्याही खेळाची प्रगती व्हावी ही तळमळ. अनेक खेळांच्या संघटनांमध्ये त्याचा प्रत्यक्ष सहभाग असतो.

मृदुभाषी, सर्वांना सांभाळून घेणारा आणि मुख्य म्हणजे

त्यांच्याकडे मदतीसाठी येणाऱ्यांना कधीही विन्मुख न पाठवणारा ज्ञानेश्वर मनात ठसतो.

माझे वडील शिवरामपंत यांनी आगाशे कॉलेज (बी एड) ची मुहूर्तमेढ रोवली ती आगाशे बंधूंच्या भरघोस मदतीवरच. पुढे हा वारसा ज्ञानेश्वरने चालविला. नुकतीच त्यांनी वाढीव इमारतीसाठी भरघोस देणगी दिली. आमचे संबंध अशा अनेक प्रसंगांनी दृढ झाले.

सर्व क्षेत्रातील, सर्व थरातील व्यक्तींशी ज्ञानेश्वरची मैत्री, याला राजकारणीसुध्दा अपवाद नाहीत. पण पुन्हा या साऱ्यामधून ज्ञानेश्वर अलिप्त राहू शकतो, हे महत्त्वाच. मनात येत, ज्ञानेश्वरला विचारावं, तुझं गोत्र अत्रि आहे की काय? कारण 'अत्रि अन सर्वाशी मैत्री' असं म्हणतात. साऱ्यांशी मैत्री करून, सगळ्यांना मदत करून पुन्हा 'नामानिराळा' राहणारा ज्ञानेश्वर आज वयाची साठी पूर्ण करतो आहे.त्याने वयाची शंभरी गाठावी हा आशीर्वाद देऊन मी थांबतो.

•

**पत्तेग्रुप**

आगाशेसाहेबांचा एक लाडका छंद म्हणजे रविवारी दुपारी रमी खेळणे. मी, वसंत चिंचाळकर, बंडू लिमये, सुरेश बापट व कै. विजय माने इत्यादींनी १९६० सालापासून सुरू केलेल्या ग्रुपमध्ये आगाशे जे सामील झाले ते आजपर्यंत. मधून मधून नवीन मेंबर येत गेले. बालरोग तज्ज्ञ डॉ. अजय जोशी, शाळू, ग्रोव्हर, मधू साळवी, कॅप्टन गोखले इतकेच काय तर अधून मधून खासदार अशोक मोहोळ पण येत असत. काहीजण कार्यबाहुल्यामुळे येईनासे झाले तर माने, गुमास्ते, राजन आपटे इत्यादींना काळाने ओढून नेले. आमच्या सध्याच्या ग्रुपमधील मेंबर मध्यमवर्गीयांपासून उच्च उत्पन्नापर्यंत सर्व श्रेणीचे असून करमणुकीसाठी मामुली स्टेकने आम्ही रमी खेळतो. आगाशे हा आमच्यातला सर्वाधिक श्रीमंत मनुष्य पण तुम्ही जर पडद्याआडून आमचा रमीचा खेळ पाहिलात तर तुम्हाला हाच खेळाडू आठ आण्याचे मार्क कमी दाखविल्याबद्दल शेजाऱ्याशी तावातावाने भांडताना दिसेल. सर्वात गंमत म्हणजे हे सर्व झाल्यावर कधी-कधी गाडीत आणलेली शंभर-दोनशे रुपयांची मिठाई सर्वांना वाटेल व त्याहीपेक्षा गंमत म्हणजे सर्व मित्र दुसऱ्या दिवशी कॉफी प्यायला भेटले की कालच्या आठ आणेवाल्याशी ज्ञानेश्वरची परत जुंपणार.

आज ग्रुपमधील बरेच जण साठीचे झालो. आम्ही सर्व म्हणजे अरविंद मेहेंदळे, मामा धूत, विनायक पानसे, सुहास दाते, रमाकांत पेठकर, अनंत माटे आमच्या प्रिय मित्रास आयुरारोग्य चिंतितो.

**विलास (डॅडी) कुलकर्णी**

# माझा मित्र

**मनोहर भिडे**

माझी व ज्ञानेश्वरची ओळख कशामुळे झाली हे आठवत नाही. तसंच ती गेली चाळीस वर्ष कशी गडद होत गेली हेही आज मागे वळून पाहताना समजत नाही. हा गृहस्थ कुठेही काम म्हणा, किंवा कोणाशीही संबंध म्हणा इतक्या नैसर्गिकपणे आणि सहजगत्या करत असतो की दुसऱ्या व्यक्तीला कळत नाही की त्यामागे ज्ञानेश्वरने केलेले प्रयत्न असतात. ह्या सर्व करण्यात एक प्रकारचं विलोभनीय साधेपण असत. मग तो मित्रांबरोबर कॉफी हाऊसमध्ये कॉफी पीत असो वा एखाद्या मर्चंट बँकर बरोबर वा परदेशस्थ माणसाबरोबर महत्वाच्या चर्चेत असो. ज्ञानेश्वर आपल्याकडे लीनपणा घेऊन इतका साधा असतो की अनोळखी माणसाला कल्पनाही येणार नाही ह्या माणसात नैसर्गिक समज, खंबीरपणा किती आहे. आपण विविध गोष्टीत गुंतूनही नामानिराळा राहण्याची कला या गृहस्थाला फारच चांगली साधली आहे. त्याच्या ह्या अशा वागण्याने काही वेळा गंमतीदार प्रसंगही निर्माण होतात. मला आठवतं, एकदा ज्ञानेश्वरची मुंबईत एका मोठ्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बैठक होती. तो त्यांच्याबरोबर परदेशात कारखाना काढणे व भांडवल उभे करणे अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करणार होता. बैठकीला अर्थातच नेहमीप्रमाणे ज्ञानेश्वर आपल्या बुश-शर्ट, पँट व चप्पल ह्या वेशांत आला. तेंव्हा त्या वरिष्ठ अधिकाऱ्याने संबंधित विषय बाजूला ठेवून, ज्ञानेश्वरनें अशा बैठकीसाठी सूट घालणे व त्यावर फूल लावून बैठकीला जाणे किती आवश्यक आहे ह्यावर आपला मौलिक सल्ला दिला. गंमत म्हणजे ज्ञानेश्वरने ते सर्व शांतपणे ऐकून घेतले. आजही त्या बैठकीची आठवण झाली तरी हसू येते.

त्याच्या ह्या अशा साधेपणामुळेच त्याचा लोकसंग्रह अक्षरशः प्रचंड आहे. ज्ञानेश्वर बरोबर १/२ तास बसलं तरी त्याचा अनुभव येतो. मी त्याच्याबरोबर एकदा २/३ तास होतो. तेवढ्या वेळात, आर्थिक अडचणीतल्यापासून आणि नडलेल्या व्यावसायिकापासून ते एका जवळ जवळ मोडीत निघालेल्या राजकीय नेत्यापर्यंत अशा विविध क्षेत्रातल्या माणसांनी आपली मने मोकळी केलेली मी ऐकली आणि त्या सर्वांना ज्ञानेश्वरने आधाराचा सल्ला दिला. ज्ञानेश्वर कोणाला भेटला नाही असं होतच नाही. साधारणपणे तो मदतीचा हातच पुढे करतो. पण काही वेळा ते शक्य नसेल तर नकारसुध्दा अशा प्रकारे देतो की त्यात व्यावसायिक सफाई नसून व्यक्तिगत प्रामाणिक भावनाच दिसतात. ज्ञानेश्वर जरी असला तरी तो साधारणतः तात्विक

मते देत नाही. पण एकदां माझ्याशी बोलताना तो म्हणाला, 'करतां येत नसेल तर करू नये. पण कटू शब्दांचा नकार टाळावा.' ह्या गुणामुळेच की काय पण ज्ञानेश्वर हा केवळ ओळखीचा न राहता मैत्रीतला वाटतो. आणि ह्या माणसाचे मित्रक्षेत्र तर लिजंडरीच आहे. त्याचे मित्र असणं हा एक आनंददायी अनुभव आहे. त्याचे मित्र इतक्या निरनिराळ्या थरातले आहेत की कल्पनाच येणार नाही. आपल्या मित्राची आर्थिक परिस्थिती कमी असली तरी ज्ञानेश्वर त्याला वेगळ्या विश्वातच नेतो. अगदी श्रीकृष्ण-सुदाम्याच्या मैत्रीची आठवण व्हावी. हा आपल्या आनंदाच्या क्षणी आवर्जून मित्रांची आठवण काढतो. तसंच मित्रांच्या सुखदुःखाच्या प्रसंगी हा हमखास हजर. आमच्या एका परदेशस्थ मित्राची पत्नी बरीच आजारी असल्याचं कळल्याबरोबर हा मदतीला गेला. एखाद्या मित्राला आर्थिक अडचण आहे हे कळल्यावर हा आपणहून त्याला मदत करायला जातो. आज त्याच्या आधारावर कितीतरी व्यवसाय तग धरून आहेत. ह्याचा अर्थ असा नव्हे की ज्ञानेश्वर भाबडा आहे. उलट, तो अत्यंत व्यवहारी व कर्तबगार आहे. जो जितका प्रेमळ तितकाच खंबीरही आहे. केवळ साखर व्यवसायात न राहता निरनिराळ्या क्षेत्रात पदार्पण करून यशस्वी उद्योजक म्हणून आज पुण्यातील तो एक प्रमुख उद्योगपती आहे. येणाऱ्या काळाची चाहूल घेऊन त्याला अनुकूल अशी क्षेत्रे ज्ञानेश्वरने निवडली हे त्याची दूरदृष्टी दाखविते. हे करताना त्याला आलेल्या अडचणींची मला थोडी फार कल्पना आहे. पण त्यामुळे न डगमगता ज्ञानेश्वरने अत्यंत सफाईने मार्ग काढलेला आहे. हे सर्व करत असतांना तो जरी असे बोलला नाही तरी कुठेतरी कनेक्शन असत.

सुवर्ण सहकारी बँकेच्या व्यवहारात ध्येय धोरणे आखतांना व अमलात आणतांना काही वेळा प्रस्थापित व्यवस्थेत पेच निर्माण होतो. पण ज्ञानेश्वर ह्याला न नमता, आपल्याला जे योग्य वाटेल तेच निर्णय घेऊन, प्रस्थापित व्यवस्थेत ते बसविण्यात यशस्वी झाल्याची उदाहरणे आहेत. हे courage of conviction असल्यानेच तो अत्यंत सहजावस्थेत वावरत असतो.

हे सर्व व अधिक उद्योग - व उचापती - करत असतांना, हे माझं, मी अशा व्याधींनी तो ग्रस्त नसतो. शक्यतो प्रसिध्दी टाळण्याकडेच त्याचा कल व आपण बरे आणि आपलं काम बरं अशी वृत्ती. शिवाय, त्याने आपल्याकरिता काही लक्ष्मणरेषा आखलेल्या दिसतात. मग ते व्यक्तिगत वा कौटुंबिक संबंध असोत वा व्यावसायिक वाढ असो. म्हणूनच कित्येकदा अनेक मित्रांनी निरनिराळ्या, मोठमोठ्या व्यावसायिक व गुंतवणूकीच्या संधी समोर मांडल्या तरी त्या ठामपणे बाजूला सारल्याचे मला माहीत आहे. अशा प्रकारच्या संयमी वृत्तीमुळेच बाजारातून पैसे गोळा करून नवीन नवीन न पेलणारी धनुष्येही तो उचलत नाही.

असा हा आमचा मित्र क्रिकेटर असल्याने दुसरी इनिंग सुरू करतोय. ही पहिल्या इनिंगच्या इतकीच रंगतदार यशस्वी व दीर्घ ठरो.

•



शाळेच्या मैदानावर आपल्या चाहत्यांसह ज्ञानेश्वर

# शिरीन ... माझा भाऊ

**शकुंतला करंदीकर**

उपनिषदात मनाला परमेश्वर, गणपती असे मानले आहे. मन हेच महत्वाचे आहे. मन प्रसन्न असले की माणूस यशस्वी होतो. तुकाराम महाराज तर म्हणतात 'मन करा रे प्रसन्न !' या संत वचनाप्रमाणे आज माझे मन प्रसन्न झाले आहे. श्रीपूरहून फोन आला की काही हितचिंतक मंडळी ज्ञानेश्वरचा षष्ट्यब्दिपूर्ति समारंभ करणार आहेत व त्या समारंभात एक गौरव अंक काढणार आहेत व त्याकरिता ज्ञानेश्वरच्या लहानपणीच्या आठवणींचा लेख पाहिजे. मला खूप आनंद वाटला. आठवणीतर खूप आहेत. पण परत विचार आला, आपल्या माणसाचे कौतुकाचे आपणच काय गोडवे गायचे ! दुसऱ्यांनी कौतुक केले पाहिजे. पण असेही आहे की, लोकांनी कितीही कौतुक केले तरी जिव्हाळ्याच्या माणसांनी पाठीवर प्रेमाने मारलेली थाप व कौतुकाचे दोन शब्द हे जास्त मोलाचे असतात. म्हणून प्रसन्न मनाने मी त्याचे कौतुक, त्याच्या आठवणी लिहायला सुरुवात केली.

ज्ञानेश्वर ६० वर्षाचा, मोठा झालाय हेच मनाला अजून पटत नाहीय. मला तर तो खूपच लहान वाटतो.आज त्याच्या बालपणीच्या आठवर्णीनी तर मनात विचारांची गर्दी झालीय,

एप्रिल महिना म्हणजे उन्हाळा, पण १६-१७ एप्रिल १९४२ या दिवशी आमच्या आगाशांच्या घरात सोनियाचा दिवस उगवला. 'दिसलास तू फुलले ऋतु' या काव्यपंक्तिप्रमाणे ज्ञानेश्वरचा जन्म झाला. वसंत ऋतू फुलला. ही जुळी भावंडे जन्माला आली. थाटामाटात नामकरण विधी झाला. या ज्ञानेश्वर व मुक्ताबाईला पाळण्यांत जोजविले सगळ्या आनंदात वैशाख -वणवा जाणवला देखील नाही. ज्ञानेश्वर नाजूक दिसायचा व नाजूक तब्येतीचा होता. मुक्ता बरी होती ७-८ महिन्यानंतर फार आजारी झाली. अल्पायुषी ठरली. ज्ञानेश्वर लहानपणापासून खूप चळवळ्या, हुशार होता. पण तब्येतीने जरा अशक्त म्हणून त्याची खूप जपणूक सर्वजण करीत असत. कै. ती. मामा व मामी म्हणजेच आमचे आईवडील, हाताचा कोनाडा करुन जशी दिव्याची ज्योत जपतात, तशी ज्ञानेश्वरची जपणूक करीत, काळजी घेत. त्याच्याबद्दलच्या त्यांच्या भावना अगदी हळुवार व कोमल होत्या. तो मुलींसारखा नाजुक दिसायचा म्हणून आमच्या कै.ती. सौ. ताईने त्याला शिरीन नावाने (खरं तर मुलीचे नांव) हाक मारण्यास सुरुवात केली,आजही आम्ही सर्वजण त्याला शिरीनच म्हणतो व सर्वाचा, भाचेकंपनीचा तो लाडका शिरीनमामाच आहे.

पाच सहा वर्षा नंतर त्याची तब्येत चांगली सुधारली,आठव्या वर्षानंतर,मुंजीनंतर सर्व व्यवस्थित झाले.

लहानपणी तो सुदृढ व्हावा म्हणून आमच्या वडिलांनी त्याच्याकरितां खास तालीम आखाडा तयार केला होता. सध्या 'चंद्रशेखर' ही वास्तु आहे, तेथे तालीम होती. तेथे तो मलखांब, कुस्ती, त्याचे पेच वगैरे शिकला. तब्येतीकरिता व्यायामानंतर थंडाई केली जायची. बदाम, गुलाबकली वगैरेची रेलचेल होती. त्यामुळे त्याची तब्येत थोडी सुधारली. या व्यायामाचे फलीत म्हणजे १९५३ साली ज्ञानेश्वरने नाशिकच्या 'यमासा -भिकुसा-क्षत्रिय' यांच्या मुलाबरोबर कुस्ती खेळली होती. असे आहेत आमचे बंधुराज.

हे आमचे पैलवान बंधू पुण्याच्या नवीन मराठी शाळा, पुढे रमणबाग न्यू इंग्लिश-स्कूलचे विद्यार्थी. शाळेचा किंवा अभ्यासाचा कंटाळा नाही, पण ग्राऊंड जास्त प्रिय. खेळणे, उड्या मारणे, क्रिकेटसाठी मेहनत म्हणून दोरीवरच्या उड्यादेखील खेळायचा. अजूनसुध्दां त्याला ग्राऊंडवरची राऊंड प्रिय आहे.

शाळेत दरवर्षी पास होत होता. अभ्यासात मागे नाही पण क्रिकेटचे वेड जास्त. त्याचे क्रिकेटमधले गुरु कै. लेलेसर, त्यांनी त्याला क्रिकेट खेळाचे इतके उत्कृष्ट ट्रेनिंग दिले, की तो त्यांचा पट्टशिष्य व तरबेज असा क्रिकेटपटू झाला. कोणत्याही दाराला दोरीला चेंडू बांधून तासन् तास बॅटवर स्ट्रोक मारत असे. रोज ग्राउंडवर पळण्याचा, फेऱ्या मारण्याचा, अनेक तऱ्हेचे व्यायाम शिकून व करून तो खेळात पारंगत झाला. अतिशय मेहनत करीत असे. शाळेत असतानाच त्याची सिलोनला मॅच होती. एवढ्या लहान वयांत तो एकटा विमान प्रवास करून क्रिकेट मॅच खेळून आला. तो लहान असल्यामुळे त्याला इतर धर्मीय मुलांनी खूप त्रास दिला होता. परंतु अतिशय सुज्ञपणे व समजूतदारपणे वागून, मारामारी किंवा संघर्ष न करतां सुखरूप परत आला. त्याच्या कै. लेलेसरांनी त्याला, सिलोनला एक बोधप्रद पत्र पाठविले होते. परदेशात कसे राहायचे, वागायचे हे त्यांनी लिहिले होते. ज्ञानेश्वर येथे परत आल्यावर आम्हांला ते दाखविले होते. अतिशय वळणदार अक्षरांतले ते विचारधन असलेले पत्र मला अजूनही आठवते.

शाळेपासून याचेकडे पुढारीपण असायचे. पूर्वी 'S.T.C' म्हणून शिक्षण कोर्स होता. त्याच्याकरिता ट्रेनिंग घेणारे शिक्षक शाळेत वर्गावर पाठ घ्यायचे. ती त्यांची परीक्षा असायची. मुलांना कंटाळा यायचा. कांही वेळा मुलांनी उत्तरे दिली नाही की त्यांचा पाठ फेल जायचा. ज्ञानेश्वर पुष्कळदा मित्रांना सांगायचा, आज उत्तरे नाही द्यायची आणि मुले ऐकायची. एकदा आमची बहीण विमल हिची मैत्रीण (प्रेमा सोहोनी) त्याच्या वर्गावर पाठ घेणार होती. पण तिला ज्ञानेश्वरची भीती होतीच. मग तिने युक्ति केली. तिने त्याला आणि त्याच्या मित्रांना आईस्क्रीम देईन असे सांगितले. मुले खूष हा खूष. तिचा पाठ चांगला झाला व तिचा पहिला नंबर आला. लहान वयांत आपण वागतो ते बरोबर की चूक हे कळत नसल्यामुळे अशा गंमती घडतात. बाकी एरवी कधीही गैरवर्तन त्याने केले नाही.

तो ८ वीत असताना आमचे वडील गेले. मग त्याच्या आयुष्यात फरकच पडला. पुण्याच्या S. P. कॉलेज मधुन बी.ए. ची पदवी परीक्षा पास झाला. क्रिकेटमध्ये प्रगती होतीच.कुचबिहार ट्रॉफी, रणजी ट्रॉफी,वगैरे मॅचेस् मधून तो विकेटकीपर व ओपनींग बॅट्समन म्हणून खेळायचा. कै. नाना जोशी (प्रसिध्द विकेटकीपर) हे त्याचे गुरु. त्यांनी त्याला विकेट-कीपिंग शिकविले व पुढे महाराष्ट्राचा विकेटकीपर म्हणून तो ओळखला जाऊ लागला.

पुढे औद्योगिक जबाबदारी वाढली. क्रिकेटकडे कमी लक्ष देता आले. तरी क्रिकेट क्षेत्रात त्याने चांगला लौकिक मिळविला आहे. त्याचप्रमाणे त्याने अनेक जबाबदारीची व मानाची पदे या क्षेत्रात भूषविली आहेत त्याचा मला अभिमान आहे. सुनील गावसकरपासून ते लिटिलमास्टर सचिन तेंडुलकरपर्यंत सर्व क्रिकेटियर्सशी त्याचे जिव्हाळ्याचे, मैत्रीचे नाते आहे . सर्व जण ज्ञानेश्वरशी प्रेमाने व आदराने वागतात, भेटतात. ज्ञानेश्वरही मोठाच आहे पण अतिशय साधा आहे. म्हणून या सर्व दृष्टीने मोठे असणाऱ्या लोकांशी त्याचे जमते. बाहेरच्या जगातील लोकांशी तर तो चांगलाच आहे. पण घरातही तो साधेपणाने

व प्रेमळपणानेच वागतो. क्वचित् कामाच्या ताणतणावामुळे रागवत असेल तर, अशा वेळेला नवरा बायकोवरच जास्त राग काढत असतो. तेव्हां त्याचा राग माझ्यापेक्षा सौ. रेखाच सांगू शकेल.

त्याचे बंधुप्रेम व मातृप्रेम हे पण अतिशय उत्कट आहे. त्याचे बंधूप्रेम तर अवर्णनीयच आहे. कै. पंडितने पण



शाळेच्या ग्राऊंडवरील विजयाच्या क्षणी ज्ञानेश्वर

याचे खूप लाड केले आहेत. वडील नसल्याची जाणीवही होऊ दिली नाही. दोघे भाऊ म्हणजे ज्ञान व नाम यांची गळा मिठीच म्हटली पाहिजे. कोणत्याही कामात, घरचे असो, कंपनीचे असो, बँकेचे असो दोघांची एकमेकांना अजोड अशी जोड होती. पण पंडितच्या अचानक झालेल्या निधनामुळे आमच्या या ज्ञानाची कसोटीच चालू झाली. सर्व जबाबदाऱ्या पुऱ्या करताना तो पुरता थकून गेलाय. तब्येतीची कुरकुर सुरू झालीय, त्यात भर सरकारी धोरणांची, सालंकृत कन्यादान केल्याप्रमाणे वडिलांनी सुरू केलेली, मुलांनी सांभाळलेली, रक्ताचं पाणी करून जपलेला साखर - कारखाना दुसऱ्याच्या ताब्यात देताना काय मानसिक यातना झाल्या असतील त्या त्याच्या त्यालाच ठाऊक. पण त्यातूनही तो पार पडतोय. त्याला काही आम्ही विचारले तर 'काय करणार' एवढेच म्हणतो.

पुष्कळ उद्योगपती मी पाहिलेत. आपण पाहतो, पण त्यांच्या जवळ माझ्या भावाजवळ असणारी सामाजिक बांधिलकीची जाणीव, माणुसकीची वागणूक , व सर्वांशी वागताना असणारा साधेपणा या गोष्टी सापडतीलच असे नाही. त्याचे मातृप्रेम पण कौतुकास्पद होते. आमच्या आईवर पण त्याचा फार जीव. तिनेच त्याला कै. वडिलांच्या मागे चांगले संस्कार देऊन घडविला आहे. आईला तर मुलाची माया असतेच पण मुलाला आईबद्दलचे प्रेम असणे महत्वाचे. एवढ्या व्यापातही तो कै.ती. मामीजवळ येणार, बोलणार. एखादे वेळी दोन मिनिटेका होईना तिच्या मांडीवर डोके ठेवून तिच्याकडून मायेचा हात फिरवून घेणार.

आईची मांडी हे एक विद्यापीठ आहे . आई इतके कोणीच देत नाही.मातेला फक्त दानच माहीत असते. तिला प्रतिदानाची अपेक्षा नसते. आईचा देणं हा धर्म, समर्पण हा स्वभाव आणि सेवा हे तिचे कर्म असते. अशीच आमची आई होती. अतिशय अनुग्रहशील असल्याने ज्ञानेश्वरने आईला तिच्या अखेरपर्यंत फुलासारखे जपले. अतिशय सुख दिले.

ज्ञानेश्वरची सध्याही सर्व क्षेत्रात घोडदौड चालू आहे . सुवर्ण सहकारी बँकेची भरभराट झाली आहे. नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनाचा तो स्वागताध्यक्ष होता.त्याची जबाबदारी त्याने छान पार पाडली. क्रिकेट क्षेत्रांत विशेषत: महाराष्ट्र क्रिकेट बोर्डात तो असतोच. एकंदर त्याची सर्व क्षेत्रांत चौफेर टोलेबाजी चालू आहे . त्याच्या बालपणापासूनच्या आठवणींची अशी आहे साठवण . तो मुळात क्रियाशील आहे. कारण जो क्रियाशील व उद्योगी नसतो त्याचे भाग्य झोप घेते. हे तो जाणतो. उद्योग आहे तिथे गती आहे . गती आहे तिथे प्रगती आहे. हे तत्त्व त्याच्यापाशी आहे. त्याचे जीवन,त्याचे आयुष्य म्हणजे क्रिकेट मॅच आहे .

ज्ञानेश्वरला, आमच्या लाडक्या भावाला, ज्ञानेश्वर्य, आरोग्यलक्ष्मी व गजान्तलक्ष्मीचे वैभव प्राप्त होऊ दे. ती अनुपगामिनी राहू दे .आरोग्य संपन्न दीर्घायुष्य लाभू दे. हीच परमेश्वराजवळ, त्या सुखनिधान श्री पांडुरंगाजवळ प्रार्थना. त्याची कृपा अखंड राहू दे, हीच सदिच्छा !

•



बहिणींचा लाडका शिरीन

# अथ श्री ज्ञानेश्वरी

**नीला (सरला) भिडे**

वातावरणांतील ऋतु-बदल जाणवत आहे. चैत्र पालवीची चाहूल लागली आहे. गुलमोहर, सोनमोहर बहराला येऊ लागले आहेत. कडुलिंबाची कोवळी नाजूक पाने गुढीपाडव्याची तयारी करीत आहेत. सर्व कसे प्रसन्न आहे. अशा ह्या प्रफुल्लित समयी सर्व आप्त -संबंधी, मित्रपरिवार आमच्या बंधुराजाचा वाढदिवस अगदी मनापासून , निखळ प्रेमाने साजरा करीत आहेत.त्याबद्दल शुभेच्छा व धन्यवाद !

माझा भाऊ - 'सरले' आहे म्हणता म्हणता पुनर्जन्म घेऊन अवतीर्ण झालेल्या रंगनाथच्या अकाली बालमृत्यूचे दुःख मावळून टाकणारा, माझ्या पाठीला पाठ लावून आलेला - माझा पाठीराखा भाऊ - ज्ञानेश्वर तथा शिरीन !

जवळ जवळ पाच तपे उलटून गेली. 'पुलाखालून पुष्कळ पाणी वाहून गेले.' म्हणतात ना तसेच ! पानशेतच्या पुराबरोबर आमचं घर, तेथील स्मृती बऱ्याचशा पुसट झाल्या. पण कांही कांही आठवणी अजूनही ताज्याच वाटत आहेत. आमचं बालपण---

'मुलांचे भावविश्व जपा' असे मुद्दामहून सांगण्याचा तो काळ नव्हता. आम्हाला आमच्या जन्मतिथी वगैरे माहीत नव्हत्या, फक्त एवढेच माहीत होते की आमची आई, आमचा म्हणजे धाकटी बहीण श्यामल, ज्ञानेश्वर व मी, वाढदिवस एकाच दिवशी करायची. पक्वान्नही बहुतेक ठरलेले असायचे, एकतर श्रीखंड तरी नाहीतर पाकांतल्या पुऱ्या. आई औक्षण करायची आणि घुसळखांबाची पूजा करावयास सांगायची . आत्तासारखे केक्स, मेणबत्त्या वगैरे प्रकार माहीतही नव्हते.

श्रीखंडावरून आठवण झाली शिरीनला श्रीखंड अति प्रिय .त्याच्या मोटारीचा रंगही श्रीखंडासारखा पाहिजे म्हणून आमची त्यावेळची गाडी व्हॅनगार्ड (नं. १९४६) मुद्दाम त्या रंगाची रंगवून घेतली होती. इतर सर्व गाड्या सोडून तो त्याच गाडीत बसायचा, ड्रायव्हर असायचे जोशीबुवा (भगवान). शिवाय सर्वांच्या पुढे ह्याची गाडी जावयास

पाहिजे म्हणून सगळ्यांना मागे टाकून हा आपला 'पुढे'!

लहानपणापासूनच ह्याचा मित्र -परिवार मोठा. लहानपणी आमच्या वाड्यांतले मित्र होते - देवांचे विन्या व नाग्या आणि महाशब्देंचा पम्या. वाड्यात इतर मुली नसल्याने आम्ही मुलीदेखील त्यांच्याच बरोबर विटी- दांडू, गोट्या, कॅरम व क्रिकेटही खेळायचो. शिरीन सर्वात



भाऊराया (ज्ञानेश्वर) क्रिकेटच्या मैदानावर

लहान असला तरी वर्चस्व मात्र त्याचेच असायचे.

आमच्या भाऊरायाच्या डोक्यांत कांही ना कांही तरी अजब करामती असायच्या आणि त्यांचं कौतुकही व्हायचं. रस्त्यावरची कुत्र्याची पिल्लं उचलून आणायची. त्यांना दूध पाजायचं, गोंजारायचं. मग ते पिलू घरांत कायमचं ठेवून घेण्याचा हट्ट. मग वडील नाहींतर काका त्याला कुत्र्याची परीक्षा करायला सांगायचे.पिल्लाला नखं किती आहेत ? कान धरून उचलल्यावर ते कँव कँव करतंय कां गप्प बसतंय ? बरीच वर्षे आमच्याकडे असलेली देखणी आणि गुणी 'मोती' कुत्री हें शिरीनचंच फाईन्ड होतं. मध्येच केव्हां मग शेळीचं एखादं करडू कुशींत पकडून घेऊन यावयाचा. चार दिवस चारा-पाणी केले की शेळीचा मालक यायचा त्याचं करडू परत न्यायला. करडू तर न्यायचाच शिवाय वर दक्षिणा पण घेऊन जायचा.

ह्यांचे बालहट्ट तर असे की बिरबलसुध्दां पुरा पडला नसता.त्याचा चपळपणा (जो अजूनही तसाच आहे.) विलक्षण कसरती करून दाखविण्यांत देवांचा नागा (नागेश) त्याचा गुरु. पटापटा कमानी टाकणे, दोन हातांवर उलटे चालणे, वाट्टेल तिथून उड्या मारणे - अर्थात हे सर्व त्याला पुढे यष्टिरक्षण करतांना चांगलेच उपयोगी पडले.

मी त्याच्यापेक्षा मोठी ---पाठीवर भाऊ घेऊन आले म्हणून लाड -कौतुक व्हायचे . पण आमच्या दोघांत झालेल्या भांडाभांडीचा निवाडा करायची वेळ आली की निकाल त्याच्या बाजूचाच लागायचा. कारण तो लहान व अशक्त आहे असे समजावले जायचे. तेंव्हा खूप राग यायचा . वाटायचं अशक्त वगैरे कांही नाहीये चांगला चिवट आहे . त्याशिवाय कां खोड्या करतोय ?

आमच्या वाड्याचं अंगण चांगलं प्रशस्त होतं तेथे मी आणि ज्ञानेश्वर दोघंही सायकली घेऊन गरागरा गोल चक्कर मारत असायचो. हा मुद्दाम माझ्या सायकलीमध्यें आपली सायकल घालायचा, मी पडावं म्हणून ! एक दिवस असं करताना स्वत:च जोरातं आपटला. हाताला थोडेफार लागलं, गेला काकांच्याकडे की "सरलीनं मला मुद्दाम पाडलं." नेहमीप्रमाणे काका मला रागावलेच. ह्याच्या डोळ्यांत मात्र 'जितं मया' चे भाव होते. अजूनसुध्दा कधी आठवलं की मला चिडवतो आणि म्हणतो, माझा लहानपणी हात मोडलास म्हणून तुला 'हात मोडका' नवरा मिळाला .

बालपणीचा शिरीन म्हणजे खरोखरच नाजूक . खरंच बकुळ्या जुळ्यातला असल्यामुळे अशक्त - हातापायाच्या काड्या आणि डोक्याचे गाडगे ! पण काका व वडील दोघांनाही व्यायामाची आवड . त्यामुळे त्यांनी तालीम-आखाडा बांधून घेतला होता. माझे दोघेही भाऊ तेथे लाल मातीत व्यायामाला, जोर - बैठका, कुस्ती करायला जात असत. काकाच्या माहितीचे एक पैलवान मित्र होते- एकनाथ साठे. ते ह्या दोघांना कुस्तीतले डावपेच शिकवायचे. सांगायची गोष्ट अशी की, आमचे हे काडी पहिलवान चक्क 'सलामीची कुस्ती' खेळले. शनिवार

पेठेत लावलेली पोस्टर्स मला अजून आठवताहेत.

खरं तर आमचे वडील आम्हां सर्वच भावडांचे अतोनात लाड करायचे. पण आम्ही दोघं पाठोपाठची. त्यामुळे आमच्यांत स्पर्धा जास्त असायची.माझ्या हट्टापायी एक आरसा असलेले कपाट वडिलांनी करून घेतलं. लागलीच त्या कपाटाशी अगदी तसंच कपाट,आमच्या भाऊरायाच खेटून उभं राहिलं ! आम्हा दोघांसाठी दोन छोट्या पेट्या - तिजोऱ्या आणल्या होत्या.पण मजा अशी की माझ्या पेटीत जेमतेम ५, १० रुपये साठायचे आणि ह्याची पैशाची पेटी भरलेली ! कारण जरा हट्ट केला की वडील लागलीच खिशांतील पैसे काढून त्याला द्यायचे.त्यांचा 'सिंह' रडलेला त्यांना चालायचा नाही. त्यामुळे ह्याची पैशाची पेटी भरलेली. मला वाटतं 'सुवर्ण सहकारी बँकेची पायाभरणी' बहुतेक तेंव्हाच झाली असावी !

शिरीन स्वत:ही आमच्या वडिलांसारखेच करतो . कोणत्याही भाचराचा सूर निघाला की, आलाच शिरीन मामा धावून. मग त्या रड्या भाचरालाच नाही तर तमाम सर्व भाचेमंडळींना घेऊन बाहेर जाणार, कांहीतरी वस्तू घेऊन देणार. एकदा तर त्याने सर्व भाचेमंडळींना (वय वर्षे ३ते ६ च्या दरम्यान) पोलिस -ड्रेस आणून दिले.घरी आल्यावर सर्व भाचे मंडळींनी शिट्ट्या फुंकून घर डोक्यावर घेतले. शेवटी पंडित मामा येऊन ओरडल्यावर घर शांत झाले.आज ''आदित्य'' सुध्दा आजोबांचा 'वीक पॉईन्ट' ओळखून आहे. शिरीनने म्हणावं ''वत्सा,पाहिजे तो वर माग'' आणि मग आदित्य त्याच्या न संपणाऱ्या वरांची यादी पुढे करतो.

शिरीनच्या आयुष्यांतील महत्वाची आणि मुख्य म्हणजे समतोल राखणारी समन्वय साधणारी व्यक्ती म्हणजे सौ.रेखा, तिला विसरून कसे चालेल. सर्व समस्यांना हसत हसत सामोरी जाणारी आमची वहिनी. शिरीनएवढेच तिचेही आम्हाला कौतुक आहे. आम्ही सर्व बहिणी आता वयाने पन्नाशीच्या पुढे आहोत. पण अजूनही आम्हाला आमचे हक्काचे 'माहेर' आहे ते सौ. रेखामुळेच . आमची तीनही भाचरं -मंदार-आशु -शीतल गुणी आहेत. सर्वांच्या उपयोगी पडणारी अशीच आहेत.

आज आमचा भाऊ खूप मोठा झाला आहे. मान -सन्मान, प्रतिष्ठा, पैसा सर्व आहे. पण हे सर्व आमच्या प्रेमात, नाते-संबंधात आड येत नाही.आमच्या सुखाच्या प्रत्येक क्षणी तो आमचा भाऊच असतो-रक्षणकर्ता, पाठीराखा भाऊ. कोणतेही सुख असो वा दु:खाचे क्षण आम्ही आठवणीच्या शिंपल्यांत बंद करून ठेवले आहेत. ती आमची इस्टेट आहे-मिळकत आहे. कर्तृत्वाचा चढा आलेख असलेला, आपल्या बरोबर इतरांचीही उंची वाढविणारा. वडिलांच्या दातृत्वाचा वारसा कायम ठेवणारा. अनेकविध क्षेत्रांत चौफेर टोलेबाजी करणारा माझा क्रिकेटियर भाऊ. लोकांची स्तुतीसुमने झेलणारा व तेवढ्याच लीलयेने टीकाकारांची टीका हसत खेळत टोलविणारा माझा क्रिकेटियर 'यष्टिरक्षक' भाऊ.

ज्ञानेश्वरचं कर्तृत्व तर लोकांपुढे आहेच. ते वेगळे सांगणे न लगे. पण त्यासाठी अनेक लहान -थोर लोकांचे त्याला निश्चितच साह्य झाले आहे. त्याच्यावर मनापासून प्रेम करणारे, आपणहून मदतीचा हात पुढे करणारे अनेक लोक आहेत. त्या सर्वांचे ऋण आम्ही सर्व कुटुंबीय, आनंदाने स्वीकार करतो आणि हा कर्तृत्वाचा, दातृत्वाचा साधेपणाचा वारसा असाच पुढे चालू राहावा अशी प्रार्थना करतो.

वयाच्या अधिकाराने मी त्याच्यापेक्षा मोठी आहे. तेव्हा त्याला शुभाशीर्वाद देते व दृष्ट काढून अमंगलाला मंगल होऊन येण्यासाठी आवाहन करते. वर मागते.शिवाय समर्थाचा उपदेशही सांगते -

उत्कट भव्य तेचि घ्यावे ।
मळमळीत अवघेची टाकावे ।
नि:स्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ॥
॥ शुभं भवतु ॥

•

# निगर्वी उद्योगपती

**नितीन दाबक**

आपल्या सर्वांच्या आदरस्थानी असणारे आदरणीय व्यक्तिमत्व ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशेसाहेब हे दिनांक १७ एप्रिल २००२ रोजी वयाची साठ वर्षे पूर्ण करीत आहेत. त्यानिमित्त गौरव अंक निघत आहे. श्रीपूरच्या लोकांनी ही कल्पना मांडताच पुण्यातील बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट व सुवर्ण सहकारी बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी लगेचच आनंदाने स्वीकारली. आमचे सर्व डायरेक्टर व साहेबांच्या मित्र परिवाराने जुन्या आठवणी, फोटो गोळा करावयास सांगितले. काम सुरू झाले पण संकलनाची महत्त्वाची जबाबदारी व फोटो ले-आऊट इत्यादी कामे कोणी करावयाची हा प्रश्न निर्माण झाला. ही जबाबदारी एकबोटे सर व बेलवलकर यांनी आनंदाने स्वीकारली.

मा. शरद पवार, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, केंद्रीय मंत्री मनोहर जोशी, खा. प्रदीप रावत इत्यादींच्या शुभेच्छा, संदेश मला ताबडतोब मिळाले. मा. आगाशेसाहेबांचा असा अंक निघतोय ही आनंदाची बाब आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. सर्व पक्षीय सदस्यांमध्ये साहेबांची असणारी रिलेशन्स या निमित्ताने दिसून आली.

आगाशेसाहेब, बी.एम.एस.एस. व सुवर्ण बँक या दोन्हींचे चेअरमन असतांना दिनांक १५ जानेवारी ९१ रोजी कंपनीत रुजू होण्याची मला संधी मिळाली, त्या वेळचा छोटासा पण महत्त्वाचा प्रसंग माझ्या कायम स्मरणात राहील तो असा. फूड डिव्हीजनचे काम करतांना सॉसच्या पेट्या मला कॅम्प मधील हॉटेलांत द्यायच्या होत्या. भोसरीतून माल आला पण टेम्पोची त्या दिवशी नेमकी व्यवस्था झाली नाही. मी साहेबांच्या बंगल्यावर कामानिमित्त गेलो होतो. त्या वेळी साहेबांना ही गोष्ट समजली व हॉटेल मालकाला मी दिलेला शब्द पाळावा यासाठी साहेबांनी स्वतःची मर्सिडिज मला देऊन काम पूर्ण करण्यास सांगितले व मला खऱ्या अर्थाने 'उद्योगपती' या शब्दाचा अर्थ उमजला.

फेब्रुवारी १९९९ मध्ये मी काढलेल्या फोटोंचे प्रदर्शन मला भरवायचे होते. आगाशे साहेबांना ही कल्पना सांगितल्यावर त्यांनी पुढे मला वाव मिळावा म्हणून 'हॉलिडे इन' या पंचतारांकित हॉटेलमध्ये माझे फोटोंचे प्रदर्शन भरविण्यास मदत केली व माझ्या कलेला प्रोत्साहन दिले.

साहेबांनी आयुष्याचे शतक यशस्वीरीत्या पूर्ण करावे हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

तेज भरे ते ग्रहनक्षत्री, प्रकाशते जे दिवसा रात्री।<br>
मंगलमय ते करी धरित्री, त्याने उजळो तव जीवन।।<br>
जीवेत् शरदः शतम्।

# एक नामवंत पेढी !

**विजय वाडेकर**

ज्ञानेश्वर आगाशे यांचा माझा परिचय गेल्या तीस-पस्तीस वर्षांचा आहे. महाविद्यालयीन मैत्री व ओळख ही अप-डाऊन करणाऱ्या प्रवासातील ओळखीसारखी असते. पण ही ओळखही या भल्या माणसाने जाणीवपूर्वक जपलेली आहे. ज्या रमणबागेत ज्ञानेश्वर आगाशेंनी शालेय शिक्षण घेतले, तिथे मी एक तपभर शिक्षक होतो. १९६७-६८ दरम्यान शालेय नियतकालिकाच्या कामासाठी, मी आगाशेंच्या प्रेस मध्ये आलो. "अरे, वाडेकर, तू इथे कसा ?" यातून पुन: मैत्रीचे ऋणानुबंध जागे झाले.

१९७० मध्येच पंधरा दिवसांच्या मुदतीत, 'राजस' या ललित मासिकाचे प्रकाशन करायचे ठरले आणि त्या मासिकाच्या मानद संपादकत्वाची जबाबदारी अखेरपर्यंत माझ्याकडे होती. याच सुमारास महिलांसाठी मराठीतील पहिले डायजेस्ट, 'योगिता' ही आम्ही सुरु केले. १९७६ पासून ज्ञानेश्वर आगाशे यांच्या 'मंदार प्रिंटर्स' चा व्यवस्थापक म्हणून पंचवीस वर्षे जबाबदारी सांभाळून नुकताच निवृत्त झालो !

एवढं सविस्तर सांगण्याचा हेतू, ज्ञानेश्वर आगाशे हे व्यक्तिमत्व मला विविध दृष्टिकोनातून पाहता आले. ज्याला वडिलांमाघारी कर्तेपणा येतो. त्या कर्त्याला पूर्व पुण्याईतील शेष प्रारब्धही भोगावे लागते. हे प्रारब्धाचे हलाहल भोगूनसुध्दा ह्या साठ वर्षाच्या तरुणाचा उमदा स्वभाव आणि हसरा चेहरा संघर्षाला नेहमी आवाहन देत असतो.व्यक्तिगत जीवनातल्या किंवा व्यावसायिक वाटचालीतही कोणात्याही प्रसंगात मुसंडी मारून हसतहसत बाहेर पडणे हा या भल्या माणसाचा जन्मस्वभाव आहे. निवांतपणा हा शब्द आणि 'निवांतपणा' चा वापर हा माणूस कधी करत नाही.सदैव काहीतरी नवनवीन करण्याचा, नव्हे धाडस करण्याच्या नादात या सन्मित्राने साठीही गाठली हे खरेच वाटत नाही.

'ज्ञानेश्वर आगाशे' ही अशी एक नामवंत पेढी आहे की, त्या पेढीमध्ये प्रत्येक मित्राच्या मैत्रीच्या ठेवी स्वतंत्र आहेत.त्यांचा प्रत्येक मित्र स्वतंत्र आहे. ह्या प्रत्येकापाशी आलेला हा मित्रही तितकाच वेगळा आहे. खरं तर या ग्रंथाच्या संपादकाने दिलेली लेखन मर्यादा त्रासदायक आहे. आणि 'ज्ञानेश्वर आगाशे' या गतिमानतेचे स्थिरचित्रण शब्दात करणेही तितकेच अवघड आहे. तरीही मैत्रीतील, नोकरीतील, सहवासातील काही अगदी निवडक घटना सांगतो.त्यात ह्या माणसाच्या काही स्वभाव छटा दिसतील.

**परंपरा !**

कंपनी कॅलेंडरसाठी श्री ज्ञानेश्वर माऊली, आळंदीचा फोटो ठरला. त्यावेळचे आळंदीच्या एका विश्वस्तांचा आग्रह होता की, श्री माऊलीचा नव्याने घडविलेला चांदीचा मुखवटा घालून फोटो घ्यावा. आम्ही तसा फोटो घेतला. आगाशे मिस्किल डोळ्यांनी हसत म्हणाले, “कोण म्हणेल ही माऊलीची समाधी - हा माऊलीचा मुखवटा- हे तर गजानन महाराज वाटतात! आमचा परंपरेने आलेला चांदीचा पहिलाच मुखवटा घाला, ते माऊलीचे विष्णुरुप दर्शन आहे.”

**उद्गार !**

मुद्रणालयाच्या कामाच्या वाढत्या गरजात प्रारंभी, ‘राजस’ व नंतर ‘योगिता’ ही वाचकप्रिय ललित मासिके बंद करावी लागली. ‘राजस’ बंद झाल्यावर अक्षरश: शेकडो पत्रे आली. याच सुमारास आगाशे मुद्रणालयात आले. मी त्यांना वाचकांची आलेली पत्रे दाखविण्यासाठी त्यांच्या पुढ्यात गेलो. ज्ञानेश्वर आगाशे हसत म्हणाले, “वाडेकर, मला फक्त यातील विक्रेत्यांची आलेली पत्रे दाखवा !” अर्थात् माझा पूर्ण पराभव झालेला होता.

‘राजस’ मराठी मनाचा उद्गार ! अशी आम्ही जाहिरात करत होतो. संचालक आगाशेंचा उद्गार मला जास्त वास्तव वाटत होता ! कारण विक्रेत्यांची पत्रे तुलनेत फारच कमी होती.

**व्यवहार !**

मध्यप्रदेशामध्ये खंजिरीवर भजने म्हणणारे एक बुवा महाराज होते. ते पुण्याला नेहमी येत. त्यांना त्यांच्या भजनाचे पुस्तक छापायचे होते. मी मोठ्या भक्तिभावाने त्यांचे पुस्तक छापून दिले.पण बिलाची रक्कम काही जमा होईना. हे महाराज पुण्यात आले की, मी न विसरता श्रीफळ, हार घेऊन पळत जात असे. आणि आपल्या कामाचा चेक मिळावा या आशेने महाराजांकडे पहात असे. पण मला साखरफुटाणे मिळत असत. शेवटी पुणे न्यायालयात मी या महाराजांविरुध्द दावा दाखल केला.या बुवाच्या मठातच त्यांच्या आरतीच्या वेळी कोर्टाचे समन्स बजावले गेले. मग मात्र धावपळीने बुवांच्या भक्तांनी तडजोडीत रकमेचा भरणा केला. या प्रकरणा नंतर हे बुवा पुन: नव्या पुस्तकाच्या मुद्रणासाठी माझ्या पाठीशी लागले. मी त्यांना रागात टाळू लागलो. मी बाहेरगावी असताना, हे बुवा साहेबांच्या बंगल्यावर, त्यांना गळ घालायला गेले.आधीच आगाशे विनोदी, त्यात या महाराजांशी झालेली भेट होती, मला म्हणाले, “ या वाडेकर, आता माझ्याकडे महाराजही पाठवायला लागलात का ?” मी खरं कारण सांगताच आगाशे म्हणाले, “वाडेकर व्यवहार व्यवहाराने सोडवावा. आपण, हे बुवा ग्राहक म्हणून पहावेत. महाराज वगैरे भक्तांसाठी आहेत. आपला संबंध कामाशी ! ते काम चोख करावे म्हणजे झाले!”

**धोरण !**

एकदा आगाशेना लागोपाठ तीन ॲस्पिरिनच्या गोळ्या घेताना पाहिले. मी म्हणालो, ‘अहो, काय हे ! एकदम तीन गोळ्या ! तब्येतीची नीट काळजी घ्या !’ यावर अंगात फणफणून ताप असणारा हा भला माणूस म्हणाला, “तब्येतीची काळजी घेऊ ना त्यात काय आहे वाडेकर,आमचे हे असेच चालणार ! कोणत्याही गोष्टीला नाही म्हणायचे नाही ! तू म्हणतोस ना प्रकृतीची काळजी घ्या. मी म्हणणार बघू -पाहू -करू ! बघू- करू -पाहू यावर आमचे चालले आहे!”

**बरे आणि चांगले !**

एका खासगी वितरकाने ‘अष्टपैलू ज्ञानेश्वर आगाशे’ शीर्षकाची टेलि-फिल्म तयार केली. ती पहाण्यास मी साहेबांबरोबर गेलो होतो. स्वत:च्या कर्तृत्वाकडे त्रयस्थपणे पाहणारे आगाशे मी पहात होतो. टेलि-फिल्म विषयी, ‘बरी आहे!’ असे म्हणत आगाशे बाहेरही पडले. साहेबांना मी

म्हणलो, "काय हे, ह्या माणसाने इतक्या श्रमाने ही फिल्म तयार केली. चांगलेपणाचा भाग त्यात मोठाच आहे! तुम्ही साधं चांगलेसुध्दा म्हणाला नाहीत!" त्यावर हा सन्मित्र म्हणतो, "आपणच आपल्याला चांगले कसे म्हणून घ्यायचे ? बरे आहे म्हणावे." "मी ज्या वेळी बरे आहे म्हणतो, त्या वेळी ते चांगलेच असते. पण एकदम असे म्हणून गेलो तर समोरच्याचा उत्साह तात्पुरताच वाढत असतो किंवा आपण चांगले म्हणतो याचीही खात्री वाटत नसते. म्हणून मी बरे आहे असे म्हणतो!"

**संगीतज्ञ !**

सौ. रेखावहिनींजवळ उपजत गायनी कला आहे व त्यांचा रियाजही आहे. कदाचित हा अनुवांशिक गुण मंदारजवळ आला असेल. पण ज्ञानेश्वर आगाशे यांना संगीताची आवड कितपत आहे याचा अंदाज घेत एका ख्यातनाम संगीतकाराने विचारले,

"आपल्याला संगीताची आवड कितपत आहे ?"

"आहे ना ! मला संगीत आवडते !"

"कोणते ! कोणत्या प्रकारचे !"

"ज्यावेळी, बोलर बोलिंग करतो व बॅट्समन तो बॉल आपल्या बॅटवर फार नजाकतीने मारतो, तो बॉल बॅटवर आदळताना एक आवाज होतो, तो आवाज - हेच माझे संगीत.!"

ज्ञानेश्वर आगाशे आता साठीचा उंबरा ओलांडून एकसष्टाव्या वर्षात प्रवेश करत आहेत. नेहमी वाटते, या कर्तृत्ववान माणसाच्या यशाचे गमक कशात असेल? आहे ते सत्य शोधून तसे सापडणारे नाही. कोणताही माणूस वा मित्र प्रथमदर्शनी भेटल्यावर, पहिल्या भेटीतील वाक्ये, संवाद आणि त्याची गरज या गृहस्थाच्या ध्यानी असते. त्याच क्षणी समोरच्या माणसाचे मतही या भल्या माणसाच्या संगणकात नोंद झालेले असते. काळ बदलला, समोरचा माणूसही बदलला तरीही पहिल्या क्षणाची मते या माणसाची तीच असतात आणि तीच सिध्द होतात.कोणीही कितीही कसाही वागला तरीही तो आपल्या कर्माने नेतो व कर्माने भोगतो. मात्र आपल्या नशिबात आहे ते कोणी नेत नाही, असा कदाचित् या सन्मानाचा ठोकताळा असावा म्हणूनच, ना खंत,ना खेद करत, हा माणूस सतत हसत हसत समस्यांची कोंडी फोडत पुढं चाललाय .

आगाशे धनवान श्रीमंत असूनही त्यांच्याजवळ एक मध्यमवर्गीय संस्कारांची छाप आहे. मध्यमवर्गीयात आज लोप पावत चाललेली 'कृतज्ञता व नम्रता' ही ठेव व देणगी ज्ञानेश्वर आगाशेंनी नीट राखून ठेवलेली आहे. म्हणूनच साधेपणातील साधेपणा सहजपणे वापरणारा हा मित्र 'साठी' ओलांडत हसत हसत एकसष्टीकडे आलाय हे खरं वाटत नाही. !

श्री माऊली व श्री विठ्ठल रखुमाईकृपे ज्ञानेश्वर आगाशे यांना उदंड आयुष्य लाभो ! ही ईश्वर चरणी प्रार्थना!

•

# प्रसन्न मित्र

**डॉ. जब्बार पटेल**

तळेगावला Internship करताना मला एक विलक्षण माणूस भेटला, म्हटलं तर शिक्षक म्हणून. त्याचं नाव डॉ. अजेय जोशी. ज्येष्ठ समाजवादी नेते एस.एम.जोशी, यांचे थोरले चिरंजीव. आमच्यात तसं जेमतेम तीन एक वर्षाचं वयाचं अंतर असेल. तळेगावात पहिली भेट झाली तेव्हा सर म्हटल्याबरोबर तो वैतागल्याचं मला आठवतं आणि ह्या व्यक्तीमुळेच Pediatrics करायचं पक्क केलं.

एम.बी.बी.एस. नंतर पदव्युत्तर शिक्षण घेत होतो. ससूनमध्ये डॉ. अजेय जोशी आम्हाला Pediatrics शिकवीत. 'मणी' के.ई.एम.ला डॉ. बानू कोयाजींकडे Gynaecology करीत होती.

आमचं लग्न झालेलं होतं. सकाळी, नायडूत डॉ. फडक्यांबरोबर पेशंट्स पाहायचे, नंतर धावपळ करीत ससूनमध्ये क्लिनिक्ससाठी यायचं. परत नायडूला आणि संध्याकाळी मणीकडे के.ई.एम.ला चक्कर आणि रात्री जिमखान्याला महिला निवासवर पी.डी.ए. च्या नाटकाच्या तालमी. हे सारं सायकलीवर. फार नसला तरी माझा आणि मणीचा पगार होता. आपण स्कूटर घ्यावी, असं दोघांच्या मनात आलं. पण तेवढे पैसे साठलेले नव्हते.

सहज बोलतांना अजेयकडे विषय निघाला. सायकलीवरची माझी धावपळ तो पाहत होता, माझी पैशांची अडचणही त्याला कळत होती.

दुसऱ्या दिवशी क्लिनिक संपल्यावर बी.जे. च्या कँटीनमध्ये चहा घेताना मला तो म्हणाला, "संध्याकाळी माझ्या एका मित्राला भेटवतोय तुला."

जिमखान्यावर आम्ही एका बँकेत भेटलो आणि त्यानं त्याच्या एका मित्राची ओळख करून दिली. तरुण, गोरापान, देखणा आणि चेहऱ्यावर कायम स्मित, मिस्किलपणाही भरपूर.

"जब्बार, हा आमचा दोस्त, ज्ञानेश्वर आगाशे. या बँकेचा सर्वेसर्वा. तुझ्या स्कूटरसाठी तो कर्ज देतोय. हे फॉर्म्स भरून टाक."

अर्धाएक तास आम्ही एकत्र होतो. नाटकांमुळे तो मला ओळखत होता, हा एक प्रख्यात क्रिकेटपटू आहे हे मला माहीत होतं. प्रत्यक्ष ओळख प्रथमच होत होती. माझ्या कर्जाचा १/३ वाटा अजेयनं स्वतः दिला. उरलेले ज्ञानेश्वरने बँकेतून दिले. हे माझ्या आयुष्यातलं पहिलं वहिलं कर्ज.

कर्जानं मी अनेकांना दडपून जातांना पाहिलंय. परंतु अजेय आणि ज्ञानेश्वर या दोघांनी इतक्या सहजपणे हे घडवून आणलं की कर्ज घेण्याच्या प्रक्रियेतून एका आगळ्या

वेगळ्या मैत्रीचा जन्म झाला. दौंडला दवाखाना सुरू करायचं मी आणि मणीनं पक्कं केलं आणि ज्ञानेश्वर आणि अजेयनं पुन्हा एकदा दडपण न जाणवू देता मदत केली. हे 'दडपण' न येऊ देता कर्जाची व्यवस्था करणं हे ज्ञानेश्वरचं खास वैशिष्ट्य त्याच्या 'सुवर्ण सहकारी बँके' ची भरभराट होण्याचं हे महत्त्वाचं कारण आहे.

गेली तीसबत्तीस वर्ष ज्ञानेश्वराचे हे रूप मी पाहतो आहे, नुसत्या बँकिंग किंवा उद्योग-उपक्रमातच नव्हे तर अगदी परवा परवा पुण्यात झालेल्या साहित्यसंमेलनापर्यंत. पहिलीपासून इंग्रजी आणि अकरावीला मराठीऐवजी आय.टी. हे वाद व्यासपीठावरून हा शांतपणे ऐकत होता. बोलणारा प्रत्येकजण आपली बाजू ठासून मांडत होता. दूरदर्शनचा कॅमेरा सगळं काही टिपत होता. माळशिरस तालुक्यातल्या श्रीपूर येथे वडिलांनी सुरू केलेली शाळा चालवणारा आणि आसपासच्या खेड्यातली ज्ञानासाठी हपापणारी गोरगरीब मुलंमुली, गेली तीसपस्तीस वर्षे जवळून माहिती असणारा ज्ञानेश्वर मी पाहत होतो. खेडोपाडीच्या परिस्थितीचा गंध नसणारे पण मराठी भाषेविषयीचा अतोनात कळवळा अचानकपणे व्यक्त करणारे ठेकेदार पाहून तो हतबुध्द झाल्याचं चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं.

वास्तविक, त्याचा मोठा मुलगा मंदार आय.टी.तला मातब्बर असामी. तरीही(पुण्याच्या) आपल्या खास मिस्किल शैलीत त्यानं स्वतःचे संयत विचार मांडले आणि साहित्यसंमेलनातल्या स्वागताध्यक्ष या आपल्या पदाची शान राखत तो म्हणाला, "आपण वयस्कर मंडळींनी हा वाद घालण्यापेक्षा तरुण मंडळींनाच त्यांच्या भविष्याबद्दलचे निर्णय मोकळेपणाने घेऊ द्यावेत. जगभराचे वारे त्यांनाच जास्त कळतात."

इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षाला असताना या मंदारनं ज्ञानेश्वरांची झोप उडवली. बीटल्स या जगप्रसिध्द संगीतकारांमुळे तो इतका भारावला की रॉक-संगीताशिवाय त्याला काही सुचेना. त्यानं ज्ञानेश्वरांकडे चक्क गिटारसाठी हट्ट धरला. ज्ञानेश्वरांना पेच पडला, हा मुलगा इंजिनीयर होणार की....! परंतु त्यानं मुलाचं मन राखलं, आपल्या एका मित्राकडची गिटार त्याला दिली. मंदारची संगीत कंपोझ करायची आणि गायची जिद्द पाहून, त्यानं मित्रांना मुलाच्या रचना ऐकवल्या. कवी सुरेश भटांनी मंदारला खूप उत्तेजन दिलं. पुढे हृदयनाथ मंगेशकर, आशाताई या मंडळींनी मंदारच्या रॉक रचना नावाजल्यावर ज्ञानेश्वर आणि वहिनींना प्रश्न पडला, सुगम संगीतातली आपली ही दैवतं आपल्या पोराच्या पाश्चात्य ढंगाच्या संगीताच्या प्रेमात पडताहेत हे काहीतरी विलक्षण आहे. मंदारनं आय.टी.वरचं प्रभुत्वही या सुमारास सिध्द केलेलं होतं. या काळात माझी आणि ज्ञानेश्वरची पुन्हा गाठ पडली. मी मंदारचा एम-टी.व्ही. वरचा अल्बम पाहिला आणि ऐकला होता. "मलाही तो काय करतो ते आवडतं, पण त्याच्याकडे कम्प्युटरची प्रचंड जाण आहे ती या नादात वाया जाऊ नये रे." असं म्हणून त्याच्या मिश्किल शैलीत मलाही टोमणा हाणला. "तुझ्यासारखं नको हां... डॉक्टरी सोडून नाटक-सिनेमात जाणं. ती वहिनी बिचारी एकटी दौंडला प्रॅक्टीस करते आणि पोरींनाही बघते." 'वा ज्ञानदेवा, तब्बल वीस वर्षे प्रॅक्टीस केलीय हं मी, अजेयला विचार', मी म्हणालो. 'माहीत आहे रे, गंमत केली. मंदारनं बॅलन्स सांभाळावा. इतकंच' असं म्हणून तो हसला. आणि खरोखरच मंदारनं सुरेख तोल सांभाळलाय. आता त्याचा तिसरा अल्बम येऊ घातलाय. Musicurry.com ही त्याची वेब साईट तर आता जगप्रसिध्द आहे. त्याच्या आय.टी.च्या प्रभुत्वाबद्दल अनेक जाणकार खूष आहेत, विशेषतः बायोटेक आणि बँकिंग मधल्या.

ज्ञानेश्वरच्या बॅटिंगचा जोरकस 'rhythm'आणि विकेटकीपिंग करतांना अवघड झेल घेते वेळी नेमक्या क्षणी सम पकडण्याची सवय मंदारच्या रॉक संगीताला पोषक ठरली असावी. आय.टी. क्षेत्रातले मंदारचे सम व्यावसायिक मित्र त्याच्या संगीताचेही शौकीन आहेत.

धाकटा आशुतोष तर उत्तम बोलर आहे.

वडीलांसारखाच रणजी ट्रॉफी खेळलेला आहे शिवाय आता बँकेत लक्ष देतोय. मुलगी शीतल, तिनं मॅनेजटमेंटचा कोर्स केलाय, ऑफिस पाहतेच शिवाय सीरीयल्यमध्ये अभिनय करते.

मंदार एकदा मजेत म्हणाला, "बाबा आणि माझं संगीत याचं नातं मजेशीर आहे. त्यांना ते आवडतं.... कसं आहे सांगू कां? खरं तर ते अकबरासारखे आहेत पण उगाच औरंगजेब असल्यासारखे भासवतात."

ज्ञानेश्वर आता साठ वर्षांचा होतोय. खरं तर मला तो ६९ साली भेटला, तेंव्हाचा त्याचा ताजेपणा तो आजही टिकवून आहे.

आज त्याच्या बँकेत तरूण ताज्या दमाची मंडळी कार्यरत आहेत. बँकेत ती अत्यंत सौजन्यानं वागतात. खेळात असतात, नाटकात, संगीतात असतात. ज्ञानेश्वरच्या प्रसन्न वृत्तीचा शिडकावा त्याच्या संस्थांमधून सगळ्या सहकाऱ्यांमध्ये गडदपणे उमटलेला जाणवतो.

त्याचे मित्रही जगभर पसरलेले आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रातले जानेमाने आहेत. या मित्रमंडळीतही तो तसाच सहजपणाने रमतो, आमच्या या प्रसन्न मित्राला आणि वहिनींना उदंड आयुष्य लाभो.

•



ज्ञानेश्वर आगाशे आणि मित्र बनलेले पुत्र - आशुतोष व मंदार




क्रिकेटच्या मैदानावर सचिन तेंडुलकर समवेत

# *Unique Relationship*

**Jaywant Lele**

The year was 1978/79, place Chalukya Hotel, Bangalore. Mr. A. R. (Bapusaheb) Joshi, Hony. Secretary, Maharashtra Cricket Association came to my room with young man, may be around 40 years of age and introduced him to me, 'saying he is Dnyaneshwar Agashe, Chairman of our Committee' and said 'he will henceforth attend BCCI meetings'. This was to be my first meeting with Shri. D. C. Agashe. We exchanged pleasantries and address each other in singular. After five or six years into the friendship which had grown very much, we had a meeting in Pune and I came to know in Pune that, Shri. D. C. Agashe is a big industrialist in the town. Until then I was addressing him in singular and so was he. The moment I came to know of his greatness, I offer my apology for calling him in singular, but to my surprise, he point blank said, Jaya, 'Don't be silly we are friends now and that should continue'. Indeed it has continued. Such a great person in private and public life. Worthy to become head of any institution but down to earth simpleton. Hats off to him.

My relationship with him is unique. In spite of the fact that I was in Shri. J. Dalmiya group in BCCI politics and he was in other opposition group never ever there was a bad vibe between us. As on date when we meet during meetings either at a lunch or dinner or breakfast we are always together and a lot of friendly talk takes place.

Last month I was in Pune during Sankranti and in Baroda on 19th and 20th January. Brahman Sabha Baroda was celebrating 75 years. I met Dnyaneshwar Agashe and told him, 'I want Rs. 3000/- from you as advertisement for Brahman Sabha celebration'. He just called out his Manager and told him to give me a cheque for Rs. 3000/-. I said, 'I will send you papers in due course of time'. He said, 'you have asked and I have given, there is no necessity for me to have details. I trust you'. I am very proud to say that Dnyaneshwar Agashe is my personal friend.

I am extremely happy to note that Shri Dnyaneshwar Agashe my fast friend for about 25 years is entering his SIXTY FIRST year. I

now pray to God to bestow on him best of health, happiness and prosperity. Smt. Rekha Vahini, the most versatile and extremely able business woman is his wife and has worthy sons viz., Mandar and Ashutosh and daughter Sheetal, to look after him and his business empire. I once again wish him all success.

•

केवळ क्रिकेटच नव्हे तर ज्ञानेश्वरची अनेक खेळांत गति होती. त्यामुळे तो रामभाऊ लेले यांचा लाडका खेळाडू होता. हॉकी असो, फुटबॉल असो की बॅडमिन्टन, तितक्याच जोमाने खेळ चालायचे.

ऑर्नेला हायस्कूलची मुले ही खडकी घोरपडीची. ही काळी-सावळी धुसमुसळी मुले ही इंटरस्कूलला हॉकी विजेतेपद घेऊन जात.

ज्ञानेश्वर शाळेत इतर मुलांपेक्षा भराभर उंच व बळकट झाला. रामभाऊ त्याला सांगत अरे, जर ऑर्नेलाच्या मुलाने नडगीवर स्टिक मारली तर तू पण एक मार.

पडत्या फळाची आज्ञा घेऊन हा गोरा बामण दोनचार तरी नडग्यांना टेंगळे आणी. रेफरीने बाहेर काढायचा दम दिल्यावरच जरा शिस्तीचा देखावा करी.

दुसऱ्या दिवशी या सामन्याची चर्चा करताना रामभाऊंच्या नजरेत जे कौतुक असे त्याची ज्ञानेश्वर अजून आठवण काढतो. म्हणतो. 'कसे उत्तर द्यायचे हे रामभाऊंनी शिकवले.'

**टी. पी. वर्तक**

# एक सच्चा स्नेही

## डॉ. वि. वि. घाणेकर

दिवस झपाट्याने पुढे जातात. बघता बघता आगाशेसाहेब साठ वर्षांचे झाले. आमच्या कुटुंबाचा व आगाशे कुटुंबीयांचा तसा जुना संबंध आहे. माझे वडील त्यांच्या साखर कारखान्याच्या परिसरात सोलापूर जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी असताना साखर कारखान्याच्या अतिथिगृहात मुक्कामास येण्याची विनंती आगाशेसाहेबांचे वडील नेहमी करत असत व वडीलही मान्य करत असत. तसेच आगाशे साहेबांचे वडीलबंधू कै. पंडितराव यांचा अन् माझा जुना परिचय होता. त्यांच्या मेव्हण्याचा अन् माझाही चांगला परिचय आहे. हा झाला कौटुंबिक परिचय, परंतु सार्वजनिक जीवनातील त्यांचा अन् माझा संबंध आलेला आहे.

सुवर्ण सहकारी बँक ही सुरुवातीला छोटी बँक होती. सुरुवातीच्या काळात आगाशेसाहेबांनी व संचालक अधिकारी मंडळींनी बँकेची वाढ होण्यासाठी मोठे श्रम केले आहेत. ते मी माझ्या डोळ्यांनी बघितलेले आहेत. त्या श्रमांना पारावार नव्हता. सहकारी चळवळीचा एक प्राध्यपक, प्राचार्य, म्हणून सहकारी क्षेत्राबाबत चर्चा करण्याची संधी अनेकदा आम्हांला प्राप्त झाली. आगाशेसाहेबांना एखादा मुद्दा पटला नाही तरीही मुद्दा मांडणाऱ्याला ते नाराज करीत नाहीत. तर बघू या कसं जमतं आहे ते ! असे म्हणून स्नेहसंबंधाला बाधा आणत नाहीत.

अनेकदा स्नेहसंबंधांना बाधा येऊ नये म्हणून केवळ स्नेहसंबंधांना जपावयाचे म्हणून त्यांनी अनेक स्नेह्यांना भरपूर मदत केली आहे व केलेल्या सहाय्याचा ते परत उल्लेखही करत नाहीत. हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य आहे.

इतर बँकांच्या सर्वसाधारण सभा आठ-आठ, दहा-दहा तास चालतात. परंतु सुवर्ण सहकारी बँकेची सर्वसाधारण सभा मात्र फारच थोड्या वेळात संपते याचे अनेकांना आश्चर्य वाटते. परंतु याचे श्रेय बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळाला आहे. सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य सभासदांना असतानाही सभासदांचा आगाशेसाहेबांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळेच सभा फारच थोड्या वेळात संपते. मिसळ व इतर खाद्य पदार्थांचा समाचार घेण्यात सर्वजण गर्क होतात.

श्रीमंती व विनय याचे फारसे सख्य नसते परंतु आगाशेसाहेबांच्या बाबतीत मात्र ही सांगड पक्की आहे. अनेक संस्थांना भरीव देणग्या देऊनही आगाशेसाहेबांचे अस्तित्व अनेक लोकांच्या लक्षातही येत नाही. अगदी अलीकडील प्रसंग म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य

संमेलनाचा प्रसंग . आगाशेसाहेब स्वागताध्यक्ष होते व मी स्वागत समितीचा सदस्य होतो. आम्ही काही विशिष्ट कामासाठी आगाशे- साहेबांची वाट पाहात होतो. आम्ही समोर बघत होतो व पाठीमागून आगाशे साहेब आले व हलक्या आवाज़ात काय काम आहे असं म्हणाले ! आपले अस्तित्व भासू न देण्याचे कौशल्य त्यांच्या कडे आहे, असे कौशल्य अनेक धनिकांमध्ये आढळत नाही.

त्यांचे क्रिकेट खेळाबद्दलचे प्रेम सर्वांना माहीतच आहे. महाराष्ट्रातील व भारतातील राजकीय नेत्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. असे संबंध असणाऱ्या व्यक्ती वारंवार हा उल्लेख करतात. परंतु आगाशेसाहेब मात्र फक्त कामाविषयी विचारतात व बघतो म्हणतात व काम करतातही.

साहित्य,संगीत, कला या विषयी सर्व आगाशे कुटुंबीयांना आपुलकी आहे. त्यामुळे त्यांचा मित्रपरिवारही मोठा आहे.त्यामध्ये रोज नवनवीन भर पडत असते.

सर्व क्षेत्रांत चमकणाऱ्या या आमच्या स्नेह्याला दीर्घायुष्य व आरोग्यसंपदा प्राप्त व्हावी आणि त्यांचेकडून त्यांनी स्वीकारलेले जनसेवेचे व्रत चालू राहावे हीच या प्रसंगी परमेश्वराकडे प्रार्थना.

•

ज्ञानेश्वरची साधी राहणी आपण पहातोच पण लहानपणापासून आगाशे बंधू हे साध्या वेषांत असल्यामुळे काय गंमती घडत हे मी स्वत: पाहिलेले आहे.

पंडितराव आगाशे हा श्रीमंत माणूस एक हरकचा पायजमा व वरती अर्ध्या बाह्यांचा सुती शर्ट घालून हिंडत असे. आम्ही चार-पाच मित्र प्रभात टॉकीजला सिनेमाला गेलो होतो. सिगरेट संपायची होती म्हणून पंडितराव दोन मिनिटे दरवाजापाशी उभा राहिला. तेवढ्यात चार लोकांनी तर त्यालाच डोअरकीपर समजून तिकिटे पुढे केली.

एकदा कोल्हापूरला अंबाबाईच्या दर्शनाला गेलो होतो तेव्हा एक म्हातारबुवांचे पाकिट कोणीतरी मारले म्हणून आरडाओरडा झाला. ते पळत पळत बाहेर आले व संशयित म्हणून त्यांनी पंडितलाच धरला. चुरगाळलेल्या लेंग्यातील पंडितराव गोंधळूनच गेला. खरी ओळख सांगितल्यावर म्हातारबुवा जे खजील झाले ते पहाण्यासारखे होते.

**उत्तम लिमये**

# तुका आकाशा एवढा

**श. वि. दप्तरदार**

"अणुरणीया तोकडा..... तुका आकाशा एवढा." ही आळवणी पं. भीमसेन जोशींच्या आवाजात ऐकणं म्हणजे एका ओळीत तुकारामाची महती समजणं. जो पांडुरंग तुकारामा- सारख्या भक्ताचा दास बनला, संकटात धावून आला, त्या पांडुरंगाचे भक्त म्हणजे आगाशे कुटुंबीय, मग त्यांच्या घराण्यांत संताचे गुण येणारच.

आमचा त्यांच्या दोन पिढ्यांशी संबंध आला. माझे सासरे कै. शं. ज. महाजन थोरल्या आगाशेसाहेबांच्या सेवेत वाहक म्हणून सुमारे १९३५ पासून नोकरीस होते. थोरल्यासाहेबांनी त्यांना कधीही हीन दर्जाची वागणूक दिली नाही. त्यांना नेहमी बरोबरीने वागविले. माझ्या सासऱ्यांनी सुध्दा तेवढ्याच निष्ठेने त्यांची सेवा केली. माझ्या सासऱ्यांनी ज्ञानेश्वरसाहेब व पंडितसाहेब यांना लहानपणापासून बघितले होते. १९६६ साली सासरे सेवानिवृत्त झाले. त्यावेळी त्यांना भविष्यनिर्वाह निधी वगैरेची फारच कमी रक्कम हातात आली. पुण्यासारख्या शहरांत स्वत:चे घर नाही. मुलांचे शिक्षण पूर्ण झालेले नाही. त्यातच शारीरिक व्याधी लागल्या. आंतरिक ओढीने ज्ञानेश्वर मालकांनी हे ओळखले. निवृत्तीनंतरही दरमहा त्यांना त्यांचे वेतन घरपोच करीत. सासरे १९८० साली निवर्तले तोपर्यंत त्यांची ही मदत चालूच होती.

१९८१-८२ साली माझी बदली श्रीपूरला झाली. मी तेथे रहावयास गेलो. ज्ञानेश्वर मालक जेव्हां-जेव्हां श्रीपूरला येत त्या त्या वेळी "काय म्हणतात आमचे जावई" म्हणून माझी आस्थेने चौकशी करीत . वास्तविक पाहतां आधीच्या पिढीचे संबंध पुढच्या पिढीने ठेवले पाहिजेत असा काही नियम नाही. परंतु ज्ञानेश्वर मालकांनी हा माणुसकीचा झरा त्यांच्या पिढीत सुध्दा सुरू ठेवला आहे.

आगाशे कुटुंबीयांचे आमच्यावरचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहे. १९८७ साली माझ्या मुलीचा विवाह झाला. जावयांचा कोरुगेटेड बॉक्सेसचा छोटासा कारखाना होता. १९९०-९१ पर्यंत सर्व व्यवस्थित होते. परंतु काही कारणाने कारखाना बंद पडण्याच्या मार्गावर होता. परिस्थिती बिकट झाली. शिक्षण असूनही नोकरीचे वय होऊन गेलेले. मी त्यावेळेस नांदेडला होतो. माझी बदली माळीनगरला १९९२ मध्ये झाली. जावयासाठी एक प्रयत्न म्हणून मी ज्ञानेश्वर मालकांना भेटलो. सर्व परिस्थिती समजावून सांगितली.ते म्हणाले, 'तुमचे जावई ते आमचे जावई. त्यांना नोकरी देऊ.' २/३ महिने होऊन गेले. परंतु काहीच हालचाल दिसेना. मी पुन्हा भेटलो. त्यावेळी मालक

म्हणाले की एकदा शब्द दिलेला आहे. तो खरा होईल. त्यावेळी मालकांनी जावयाची काहीसुध्दा चौकशी केली नाही. परंतु १५/२० दिवसांनी नोकरीस बोलावले. त्यावेळी माझ्या मुलीच्या घरात किती आनंद झाला त्याचे वर्णन करता येणार नाही. मुलीला जिवावरचे दुखणे आले होते, ते बरे झाले. त्यामुळे आमच्या दोन्ही कुटुंबांत सुखाचे दिवस आले. श्रीपूरसारखी नगरी वसवून आगाशे कुटुंबीयांनी हजारो लोकांना अन्नास लावले. अनेकविध क्षेत्रात कार्य करताना त्यांना ईश्वरी प्रेरणेचा लाभ होवो. तसेच ईश्वराने त्यांना उदंड आयुष्य द्यावे, हीच प्रार्थना. त्यांच्या पाठीशी माझ्यासारख्या अनेकांच्या सदिच्छा आहेतच.

•

**महाराष्ट्रीयन ब्राह्मण व्यावसायिक मित्रमंडळ, पुणे यांच्या दिलेल्या मानपत्रातून.......**

"आपला स्वाभिमान न सोडताही जिभेवर मृदुता असायला हवी. आपण मिळविलेल्या प्रत्येक पै पैशाचा विनियोग योग्य ठिकाणी म्हणजेच व्यवसायाच्या वाढीसाठी करीत आहोत याचे भान असायला हवे आणि व्यवसायाचे हिशोब हा व्यवसायाचे यथायोग्य प्रतिबिंब दाखविणारा आरसा आहे याची जाण ठेवून ते सदासर्वकाळ स्वच्छ ठेवून व्यवसायाचे नेमके चित्र सतत डोळ्यासमोर उभे असेल याची खात्री करून घ्यायला हवी. अशा काही गोष्टी मराठी व्यावसायिकांनी अंगी बिंबवल्या तर कधी काळी साऱ्या हिंदुस्थानवर सत्ता गाजवणारी मराठी माणसे व्यावसायिक जगतावरही हुकुमत गाजवू शकतील". हा त्यांचा आशावाद हाच आपल्या आजच्या कार्यक्रमाचा मूलमंत्र म्हणून आपण सर्वजण त्यांना उद्योगपिता पुरस्कार देऊन मानाचा मुजरा करू या.

**अरविंद पटवर्धन**

# कामगार मित्र

**म. वि. पोंक्षे**

मी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरचा राहणारा एक काँग्रेसचा कार्यकर्ता व स्वातंत्र्य सैनिक. श्रीपूर व अकलूज नजीकच्या भागात दोन कारखाने निघाल्यावर आमच्यासारख्या तरुणांना आनंद वाटला. भविष्याबद्दल, नोकरी, व्यापार याच्या संधीमुळे उज्ज्वल भविष्याची शाश्वती वाटू लागली. विशेषतः आगाशे यांचा कारखाना निघाल्यावर मध्यमवर्ग, सुशिक्षित वर्गांच्या आशा पालवल्या आणि बऱ्याच अंशी त्या सफलही झाल्या. कारखान्याचा वारसा पुढे नेणारे ज्ञानेश्वर आगाशे यांनी धुरा घेतल्यावर तर सर्व क्षेत्रातील लोकांना आनंद वाटला.

माझी महाराष्ट्र राज्यात कामगार विभागात राजपत्रित अधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्यामुळे कारखान्यातील कामगार व मालक यांचे औद्योगिक संबंध मला जवळून पाहाता आले. ज्ञानेश्वर यांचे विरुध्द कामगार वा त्यांची युनियन यांची कधीही तक्रार आली नाही. तसेच या उभयतांच्या मतभेदांचे जाहीर प्रदर्शनही झाले नाही. श्रीपूर कारखान्याबरोबरच त्यांचे पुणे येथील कारखाने, प्रिंटिंग प्रेस अशा अनेक प्रकारच्या उद्योगातही कामगार विषयात कधीही तंटे झाले नाहीत. बोनस, पगारवाढ या कामगारांच्या मागण्या ज्ञानेश्वर सर्वांना मान्य होतील अशा तऱ्हेने मिटवीत असत. बहुधा कामगारांना त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त मिळत असे. त्यामुळे कुठलीही युनियन अथवा कुठलाही कामगार यांना कधीही औद्योगिक कोर्टापुढे जाण्याची वेळच आली नाही.

मी १९७९ साली अॅडिशनल लेबर कमिशनर म्हणून निवृत्त झाल्यावर त्यांनी मला सल्लागार नेमले. परंतु कामगारविषयक वादात स्वतः आगाशेसाहेब पडले की तडजोड झालीच समजायचे. असा मालक क्वचितच भेटतो. मी सुवर्ण सहकारी बँकेचा सल्लागार होतो पण एकही वाद कन्सिलिअेशन, कोर्ट यापुढे न जाता ज्ञानेश्वरसाहेबांनी काही तासांत मिटविल्याची दरवर्षीची उदाहरणे आहेत.

ते उत्तम खेळाडू असल्याने औद्योगिक तंटे खिलाडूवृत्तीने मिटविण्याचा इतिहास आहे. चर्चेच्या सुरुवातीला साहेब कार्यकर्त्यांची विनोदाने खिल्ली उडवितात पण तितक्याच सहजतेने तडजोडही करतात, असा अनुभव. कामगाराने गैरवर्तणूक केल्यास शिक्षा होऊ शकते. पण कामगारास पश्चात्ताप झाल्याची खात्री पटली तर पुन्हा कामावर घेतात आणि कुणाच्याही घरावर आपत्ती येऊ देणं टाळतात.


त्यांची मूळ वृत्ती धार्मिक आहे. दरवर्षी आषाढीच्या दिंडीचे स्वागत फॅक्टरीमधे करण्याची प्रथा सांभाळली जाते.

आळंदीच्या ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त म्हणून साहेब काम बघत असताना तेथील कामगार व संस्थान यांच्यात पगारवाढ किंवा इतर कुठल्याही विषयावरून कधीच वाद निर्माण झाला नाही. पंढरपूरच्या मंदिर समितीचा मी सल्लागार होतो, तसाच दादरच्या गणपतीच्या मंदिराचाही होतो. तिथले तंटे माझ्यापर्यंत येत व मला तडजोडीही कराव्या लागत. पण आळंदी संस्थानचा वाद माझ्यापुढे कधीच आला नाही.म्हणून वाटतं की मालक वा चालक असावा तो ज्ञानेश्वर आगाशे यांच्यासारखा!

माझा अजून एक अनुभव म्हणजे स्वातंत्र्य लढ्यातील लोकांबद्दलचं त्यांचं प्रेम. त्यांनी मला दिलेला आधार, राजाभाऊ कुलकर्णी यांच्यावरील त्यांचं प्रेम आणि नरूभाऊ लिमये यांच्याबद्दल त्यांच्या मनात असलेला आदर ही त्याची साक्ष उदाहरणे आहेत.

या शुभ समयी परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

•



# एकवचनी

**ॲड. सुहास देव**

लिखाण करणे ही कला आहे व त्यात निपुण असणारे लोक थोर लेखक अगर साहित्यिक होतात. पण ती कला मला फारशी अवगत नसतानाही ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांचे एकसष्टीच्या निमित्ताने त्यांचे विषयी थोडेसे लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे.

आगाशे कुटुंबीय व आमच्या घरचा तसा तीन पिढ्यांचा संबंध आहे. तरी पण आमचा सर्वात जास्त संबंध ज्ञानेश्वर साहेबांशी आला. साहजिकच त्यांच्या अनेक आठवणी आजही मनात घोळत आहेत. परंतु त्यामध्ये प्रत्येक वेळी त्यांच्यात जाणवलेला 'एकवचनी' बाणा ही आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट आहे.

गर्भश्रीमंत असूनही त्यांची अत्यंत साधी राहणी हीच बाब प्रथम मोहित करते. तसेच सतत हसरा चेहरा व निगर्वी स्वभाव व दुर्मिळ आढळणारी स्मरणशक्ती. कोणत्याही विषयावर पूर्वीचे काहीही न सांगता लगेच चर्चा सुरूकरून त्वरित निर्णय देणे ही साहेबांची खासियत आहे. त्यामुळे कोणताही विषय रेंगाळला नाही.

माझे वडील कै.आप्पासाहेब देव हे साहेबांच्या बृहन्स उद्योगसमूहांचे सुरुवातीपासूनचे वकील व कायदेविषयक सल्लागार होते. ते असताना कै. पंडितराव आगाशेसाहेब यांनी आमच्या माळशिरस येथील शाळेला त्या काळात रु. १,००,००० देणगी देण्याचे मान्य केले होते. पण दुर्दैवाने माझे वडील व पंडितराव आगाशे हे दोघेही अकस्मात निधन पावले. त्यानंतर निव्वळ आमच्या शब्दावर विश्वास ठेवून ज्ञानेश्वरसाहेब यांनी कै. पंडितरावांनी कबूल केलेली रु. १,००,००० ची देणगी प्रत्यक्षात दिली.

माझ्या वडिलांचे पश्चात त्यांचे वकीलपत्र माझ्याकडेच राहिले. त्यात कोणताही बदल होणार नाही, असे माझ्या आईला ज्ञानेश्वरसाहेबांनी सांगितले होते. त्यामुळे मी निर्धास्त होतो. पण त्यांचा एकवचनी बाणा आमचे येथील इतर वकील मंडळींना माहीत नव्हता. त्यामुळे वकीलपत्र मिळविण्यासाठी बरेच अर्ज व भेटीचे प्रयत्न झाले. पण साहेबांची भेट कुणालाही मिळाली नाही. चर्चा लांबच राहिली.

साहेबांचे जमीन-खरेदी विक्रीचे बरेच व्यवहार मी केले. 'साहेबांनी किंमत सांगितली १० वर्षापूर्वी ! आणि व्यवहार होतोय मात्र आज. पण दर मात्र १० वर्षांपूर्वीचाच!' असेच बहुतेक सारे व्यवहार. आजच्या दराने लाखो रुपये किंमत होत असताना सुध्दा पैशापेक्षा १० वर्षापूर्वी दिलेला शब्द जास्त महत्त्वाचा मानून साहेबांनी कोणताही व्यवहार अगर

शब्द केंव्हाच बदलला नाही. खळवे येथील जमीन खरेदी घेणारे भागवत पाटील यांनी त्यावेळी मला कोर्टात सर्व वकिलांसमोर ' शब्द आगाशे साहेबांचा आहे, आता मुख्यमंत्री आले तरी त्यात बदल होणार नाही' असे सांगितले. त्याबरोबर सर्वांच्या नजरा उंचावल्या व माझीच छाती अभिमानाने भरून आली. सर्वसामान्यांचासुध्दा साहेबांच्या शब्दावर किती नितांत विश्वास आहे, याचेच हे मूर्तिमंत उदाहरण होय. असा एकवचनी श्रीमंत विरळाच.

'साहेबांना उदंड आणि आनंदमय आयुष्य लाभो, हीच या शुभदिनी प्रभुचरणी प्रार्थना'

•

खूप जुनी गोष्ट. माझी सुवर्ण सहकारी बँकेतील नोकरी संपूनही काही वर्ष उलटली होती. १५ मार्च १९७६ रोजी माझी पत्नी अश्विनी लंडनला येण्यासाठी निघाली. ही तिची परदेशप्रवासाची पहिलीच वेळ. तिच्या विमान भाड्याचे पैसे तर शिरीनने दिलेच, पण एअर इंडिया मधील अधिकारी उल्हास रानडे यांना मुद्दाम फोन करून तिला सारी मदत करण्यास सांगितले. अर्थातूच तिचा प्रवास उत्तम सुरू झाला. ही वाईसारख्या गावातील मुलगी, कधी जिने धडपणे मुंबईसुध्दा बघितली नाही, ती लंडनमधल्या घरी कशी जाणार, अशी काळजी शिरीनला वाटली. म्हणून त्यानं स्वतःच्या प्रवासाचा बेत बदलला. हातात फर्स्टक्लासचं तिकीट असूनही पॅरीसला मुद्दाम अश्विनीची फ्लाईट पकडली आणि तिच्याशेजारी इकॉनॉमी क्लास मधे येऊन बसला. हीथ्रो विमान तळावर अश्विनीला सर्व सव्यापसव्यातून बाहेर काढून, शिरीननं तिला तिच्या भावाच्या स्वाधीन केलं आणि म्हणाला, "काळजी घे, जपून रहा !" एवढं सारं करूनही आज तागायत शिरीननं कधी कुठेही याचा साधा उल्लेखही केला नाही. असा मनाचा दिलदारपणा, आपुलकी व निरपेक्ष मदत करण्याची त्याची वृत्ति माझ्या मनावर कायमची ठसलेली आहे.

**अनिल नेने (यू. के.)**

# पाठीराखा

**अरुणा भट**

१९९३ सालची गोष्ट. विजय भावे माझ्या घरी आले. खुर्चीत बसता बसताच मला म्हणाले, 'वहिनी, तुम्ही ज्ञानेश्वर आगाशेंना ओळखता का?' मी म्हणाले, "नाही, पण त्यांची शीतल आणि आमची सुप्रिया या एकाच शाळेत, एकाच वर्गात शिकतात. ही वारंवार जाते त्यांच्या घरी. पण माझी काही त्यांच्या कुणाशी ओळख नाही, आणि खरं म्हणाल तर हे आणि आगाशे रमणबागेत एका वर्गात होते असं मी ऐकलंय. पण कधीच प्रत्यक्ष गाठभेट झालेली नाही. पण का हो?" विजयराव म्हणाले, 'खरं सांगू वहिनी, तुमच्या एवढ्या मोठ्या आर्थिक अडचणीतून आणि इतर व्यावसायिक कटकटीतून तुम्हांला खूप चांगली मदत करू शकेल, असा माझ्या दृष्टीनं तो एकमेव माणूस आहे म्हणून मी तुम्हांला त्यांच्याकडे घेऊन जाणार आहे.' विजयरावांच्या बोलण्यातून ज्ञानेश्वर आगाशे या मित्राबद्दल खूप विश्वास जाणवत होता. आमच्या भेटीचं निश्चित ठरलं आणि विजयराव निघून गेले.

गेली ३ वर्षे सतत मी अनेक लोकांना भेटत होते. मदत मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. पण कशालाही यश येत नव्हतं. भोवतालची परिस्थिती अधिकाधिक बिकटच होत गेलेली होती. आता या भेटीतून तरी काय हाती येणार याबद्दल मी साशंकच होते. तरी ठरल्याप्रमाणे आम्ही भेटायला गेलो.ही त्यांची माझी पहिलीच भेट. का कोण जाणे, पण त्यांच्या केबिनमधे पाऊल ठेवल्यापासून माझ्या मनातल्या साऱ्या आशांना पुन्हा पालवी धरूलागली. विजयरावांची आणि त्यांची जुनी दोस्ती. अगदी एकमेकांना अरे तुरे बोलण्याइतकी. विजयरावांनी आगाशेसाहेबांना मैत्रीच्या अधिकारानं म्हटलं, 'ही आमची वहिनी, म्हणजे तुझी वहिनी आहे असं समज. काय घडलंय ते सारं ती सविस्तर सांगेल. पण या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा मार्ग तूच तिला दाखवायचाय.' १९९० साली माझे पती ए. व्ही. भट यांच्या मृत्यूनंतर झालेली सारी दुर्दशा, सारी कर्मकहाणी मी मोकळेपणानं त्यांना सांगितली. त्यांनी ती शांतपणे ऐकून घेतली आणि म्हणाले, "बघू या काय करता येईल ते. तुमच्या साऱ्या व्यवहारात मी मध्यस्थी करावयाचे कबूल केले आहे, असे सगळ्यांना सांगा." आणि आमची मीटिंग संपली.

त्यानंतरचे दिवस जादूची कांडी फिरल्यासारखे बदलत चालले. ए. व्ही. भट या ग्रुपची जबाबदारी आगाशेसाहेबांनी घेतली आहे, ही बातमी म्हणजेच ती जादूची कांडी होती. लोकांनी निर्माण केलेली भांडणं, वाद, कोर्टात लावलेले

दावे हे सारं भराभरा संपू लागलं. आणि माझ्या डोक्यावरचं ओझही भराभरा खाली उतरू लागलं. माणसांची अचूक पारख, अफाट निर्णयक्षमता ही आगाशे साहेबांची वैशिष्ट्ये याच काळात मला जवळून पहायला मिळाली.

आमचे मूळचे दोन मुख्य व्यवसाय. एक मसाल्याचा आणि एक बांधकाम क्षेत्रातला. या दोन्ही व्यवसायांना साहेबांनी आपले तन, मन, धन अर्पण केले. आमच्यापैकी कोणीच कष्टांत उणे पडणारे नव्हते. त्यामुळे हळूहळू या व्यवसायांची घडी बसत गेली. ए. व्ही. भटांच्या काळात आमच्याकडून दिल्या गेलेल्या सर्व कमिटमेंट्सची पूर्तता आम्ही करू शकलो. ए. व्ही. भटांच्या पश्चात आम्ही त्यांच्या नावाची ती प्रतिष्ठा सांभाळू शकलो, त्यामागचा कर्ता करविता म्हणजे आगाशेसाहेब. अर्थात हे त्यांच्यासमोर म्हणण्याची सोय नाही. कारण आपले असे शब्द झटकून टाकत ते उद्गारतात, "ती सारी पांडुरंगाची कृपा." पण माझ्या दृष्टीनं दामाजीपंतांच्या मदतीला जसा विठोबा महार बनून आला तसा तोच विठोबा आगाशेसाहेबांच्या रूपानं माझ्या मदतीला आला.

गेल्या ८ / १० वर्षात अनेक वेळेला मी त्यांच्या भेटीला गेले. कधी घरी, कधी ऑफिसमधे. प्रत्येक वेळेला मी अडचण घेऊन जावं, त्यांनी मार्ग सुचवावा आणि तो विचार शिरोधार्य मानून मी कृती करावी आणि त्याला यश यावं असंच घडत गेलं.

कित्येक घरगुती समारंभातून माझं त्यांच्या घरीही जाणं येणं झालं. साऱ्या घराशीच माझं जणू नातं जुळलं. त्यातून रेखा वहिनींचे आणि माझे तर खास संबंध जुळले. अगदी मैत्रीण म्हणावी इतके जवळचे. मुळातल्या शीतल आणि सुप्रिया या मैत्रिणी पण आज तरी त्या दोघींपेक्षा आम्ही दोघी एकमेकींना जास्ती जवळच्या झालो आहोत.

आगाशे साहेबांबद्दल, त्यांच्या भलेपणाबद्दल लिहिण्यासारखं खूप काही मनात साचलंय, पण त्यांचं वर्णन एका ओवीत करता येईल -

चंद्रमे जे अलांच्छन, मार्तंड जे तापहीन।
ते सर्वाही सदा सज्जन, सोयरें होतु।।

खरोखरच त्यांचा सहवास हा चांदण्यासारखा आल्हाददायी आहे. कर्तृत्व सूर्यासारखं असूनही जवळच्या कोणालाही न बोचणारं आहे. असा हा एक सज्जन पुरुषोत्तम, द्रौपदीच्या पाठीशी कृष्ण उभा रहावा तसा माझ्या पाठीशी उभा राहिला. या भावाच्या ऋणातून मुक्त होण्याऐवजी हे ऋण कायम डोक्यावर सांभाळणंच मला आवडेल.

"आज त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या मंगलप्रसंगी मी परमेशाची प्रार्थना करते - लोकांच्या भल्यासाठी तन, मन, धन अर्पून कष्टत राहणाऱ्या या आगाशे कुटुंबावरती तुझं कृपाछत्र सतत असू दे, सतत असू दे."

•

# कर्मयोगी

## डॉ. चिंतामणी मराठे

ज्ञानेश्वर आगाशेसाहेब यांचे नाव प्रथम ऐकले ते क्रिकेटच्या संदर्भात १९६० च्या सुमारास, परंतु प्रत्यक्ष भेटीचा योग येण्यासाठी १९९१ चा ऑगस्ट महिना उजाडावा लागला. वास्तविक हा योग फारच उशीरा आला, उशीराने का होईना पण ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांची भेट झाली आणि त्यांच्याशी आणि बृहन्स उद्योगसमूहाशी माझा संबंध जुळून आला. याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे.

बऱ्याच वेळा साधुसंत व सत्पुरुषांच्या चरित्रात उल्लेख येतो की साधकास/मुमुक्षूला त्यांची भेट झाल्याबरोबर मनोमनी ओळख पटते आणि ह्याचसाठी केला होता अट्टाहास असे अनुभवास येते. मा. आगाशे साहेबांच्या प्रथमभेटीत असाच भारावून जाण्याचा अनुभव मी अनुभवला आणि तेव्हापासून आजवर तेच प्रसन्न व्यक्तिमत्व, स्नेहल दृष्टी, आश्वासकता, इतरांबद्दल आपुलकी व आस्था यांचा अनुभव घेत आलो आहे आणि त्यात कोणत्याही प्रसंगी, कोणत्याही कारणाने आपपरभाव दिसला नाही. स्थितप्रज्ञ आणि उत्तम पुरुषाची लक्षणे याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वर आगाशेसाहेब! जणू त्यांचे जीवन ही एक साधनाच होय. एक श्रीमंत कर्मयोगी असेच म्हणावेसे वाटते.

लहान वयात सर्व जबाबदाऱ्या स्वखुशीने समर्थपणे पेलून, त्या यथाशक्ती सर्वांना बरोबर घेऊन पार पाडण्याचे अप्रतिम कौशल्य त्यांनी जगाला दाखवून दिले आहे. साधुसंताप्रमाणे इतरांची दुःखे, वेदना, अडचणी, स्वतःकडे घेऊन सहजपणे हसतमुखाने इतरांचा त्रास कमी करण्याची कळकळ आगाशेसाहेबांचेकडे बघितल्यानंतर जाणवते. त्यांना लोक 'माऊली' का म्हणतात ह्याचा उलगडाही यातूनच होतो. हा सुखद अनुभव वाट्यास यावा हे आमचे पूर्वसुकृतच होय!

काही वर्षे त्यांच्या हाताखाली काम करताना बऱ्याच गोष्टींचा अनुभव मिळाला व शिकता आले. निगर्वी, साधे व्यक्तिमत्व, उत्स्फूर्तता, साधनशूचिता व एकदा दिलेला शब्द पूर्णपणे शेवटपर्यंत पाळणे हे तर त्यांचे ब्रीदच होय आणि हे ब्रीद आगाशे कुटुंबीयांत अनुवांशिकच आहे असे दिसून येते. मनुष्यसंग्रह कसा करावा याचा वस्तुपाठ म्हणजे आगाशेसाहेब. कार्य आणि मनुष्यबळ याचा यथोचित मेळ घालून कार्यसिध्दी करण्याचे त्याचे अनुभवसिध्द तंत्र शिकण्यासारखे आहे.

आज बहुचर्चित जपानी व्यवस्थापन पध्दतीचा फार गाजावाजा होतो आहे. पण ती पध्दत आगाशेसाहेबांनी

दावे हे सारं भराभरा संपू लागलं. आणि माझ्या डोक्यावरचं ओझही भराभरा खाली उतरू लागलं. माणसांची अचूक पारख, अफाट निर्णयक्षमता ही आगाशे साहेबांची वैशिष्ट्ये याच काळात मला जवळून पहायला मिळाली.

आमचे मूळचे दोन मुख्य व्यवसाय. एक मसाल्याचा आणि एक बांधकाम क्षेत्रातला. या दोन्ही व्यवसायांना साहेबांनी आपले तन, मन, धन अर्पण केले. आमच्यापैकी कोणीच कष्टांत उणे पडणारे नव्हते. त्यामुळे हळूहळू या व्यवसायांची घडी बसत गेली. ए. व्ही. भटांच्या काळात आमच्याकडून दिल्या गेलेल्या सर्व कमिटमेंट्सूची पूर्तता आम्ही करू शकलो. ए. व्ही. भटांच्या पश्चात आम्ही त्यांच्या नावाची ती प्रतिष्ठा सांभाळू शकलो, त्यामागचा कर्ता करविता म्हणजे आगाशेसाहेब. अर्थात हे त्यांच्यासमोर म्हणण्याची सोय नाही. कारण आपले असे शब्द झटकून टाकत ते उद्‌गारतात, "ती सारी पांडुरंगाची कृपा." पण माझ्या दृष्टीनं दामाजीपंतांच्या मदतीला जसा विठोबा महार बनून आला तसा तोच विठोबा आगाशेसाहेबांच्या रूपानं माझ्या मदतीला आला.

गेल्या ८ / १० वर्षात अनेक वेळेला मी त्यांच्या भेटीला गेले. कधी घरी, कधी ऑफिसमधे. प्रत्येक वेळेला मी अडचण घेऊन जावं, त्यांनी मार्ग सुचवावा आणि तो विचार शिरोधार्य मानून मी कृती करावी आणि त्याला यश यावं असंच घडत गेलं.

कित्येक घरगुती समारंभातून माझं त्यांच्या घरीही जाणं येणं झालं. साऱ्या घराशीच माझं जणू नातं जुळलं. त्यातून रेखा वहिनींचे आणि माझे तर खास संबंध जुळले. अगदी मैत्रीण म्हणावी इतके जवळचे. मुळातल्या शीतल आणि सुप्रिया या मैत्रिणी पण आज तरी त्या दोघींपेक्षा आम्ही दोघी एकमेकींना जास्ती जवळच्या झालो आहोत.

आगाशे साहेबांबद्दल, त्यांच्या भलेपणाबद्दल लिहिण्यासारखं खूप काही मनात साचलंय, पण त्यांचं वर्णन एका ओवीत करता येईल -

चंद्रमे जे अलांच्छन, मार्तंड जे तापहीन।
ते सर्वाही सदा सज्जन, सोयरें होतु।।

खरोखरच त्यांचा सहवास हा चांदण्यासारखा आल्हाददायी आहे. कर्तृत्व सूर्यासारखं असूनही जवळच्या कोणालाही न बोचणारं आहे. असा हा एक सज्जन पुरुषोत्तम, द्रौपदीच्या पाठीशी कृष्ण उभा रहावा तसा माझ्या पाठीशी उभा राहिला. या भावाच्या ऋणातून मुक्त होण्याऐवजी हे ऋण कायम डोक्यावर सांभाळणंच मला आवडेल.

"आज त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या मंगलप्रसंगी मी परमेशाची प्रार्थना करते - लोकांच्या भल्यासाठी तन, मन, धन अर्पून कष्टत राहणाऱ्या या आगाशे कुटुंबावरती तुझं कृपाछत्र सतत असू दे, सतत असू दे."

•

# कर्मयोगी

**डॉ. चिंतामणी मराठे**

ज्ञानेश्वर आगाशेसाहेब यांचे नाव प्रथम ऐकले ते क्रिकेटच्या संदर्भात १९६० च्या सुमारास, परंतु प्रत्यक्ष भेटीचा योग येण्यासाठी १९९१ चा ऑगस्ट महिना उजाडावा लागला. वास्तविक हा योग फारच उशीरा आला, उशीराने का होईना पण ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांची भेट झाली आणि त्यांच्याशी आणि बृहन्स उद्योगसमूहाशी माझा संबंध जुळून आला. याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे.

बऱ्याच वेळा साधुसंत व सत्पुरुषांच्या चरित्रात उल्लेख येतो की साधकास/मुमुक्षूला त्यांची भेट झाल्याबरोबर मनोमनी ओळख पटते आणि ह्याचसाठी केला होता अट्टाहास असे अनुभवास येते. मा. आगाशे साहेबांच्या प्रथमभेटीत असाच भारावून जाण्याचा अनुभव मी अनुभवला आणि तेव्हापासून आजवर तेच प्रसन्न व्यक्तिमत्व, स्नेहल दृष्टी, आश्वासकता, इतरांबद्दल आपुलकी व आस्था यांचा अनुभव घेत आलो आहे आणि त्यात कोणत्याही प्रसंगी, कोणत्याही कारणाने आपपरभाव दिसला नाही. स्थितप्रज्ञ आणि उत्तम पुरुषाची लक्षणे याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वर आगाशेसाहेब! जणू त्यांचे जीवन ही एक साधनाच होय. एक श्रीमंत कर्मयोगी असेच म्हणावेसे वाटते.

लहान वयात सर्व जबाबदाऱ्या स्वखुशीने समर्थपणे पेलून, त्या यथाशक्ती सर्वांना बरोबर घेऊन पार पाडण्याचे अप्रतिम कौशल्य त्यांनी जगाला दाखवून दिले आहे. साधुसंताप्रमाणे इतरांची दुःखे, वेदना, अडचणी, स्वतःकडे घेऊन सहजपणे हसतमुखाने इतरांचा त्रास कमी करण्याची कळकळ आगाशेसाहेबांचेकडे बघितल्यानंतर जाणवते. त्यांना लोक 'माऊली' का म्हणतात ह्याचा उलगडाही यातूनच होतो. हा सुखद अनुभव वाट्यास यावा हे आमचे पूर्वसुकृतच होय!

काही वर्षे त्यांच्या हाताखाली काम करताना बऱ्याच गोष्टींचा अनुभव मिळाला व शिकता आले. निगर्वी, साधे व्यक्तिमत्व, उत्स्फूर्तता, साधनशूचिता व एकदा दिलेला शब्द पूर्णपणे शेवटपर्यंत पाळणे हे तर त्यांचे ब्रीदच होय आणि हे ब्रीद आगाशे कुटुंबीयांत अनुवांशिकच आहे असे दिसून येते. मनुष्यसंग्रह कसा करावा याचा वस्तुपाठ म्हणजे आगाशेसाहेब. कार्य आणि मनुष्यबळ याचा यथोचित मेळ घालून कार्यसिध्दी करण्याचे त्याचे अनुभवसिध्द तंत्र शिकण्यासारखे आहे.

आज बहुचर्चित जपानी व्यवस्थापन पध्दतीचा फार गाजावाजा होतो आहे. पण ती पध्दत आगाशेसाहेबांनी

गेली कित्येक वर्षे न बोलता प्रत्यक्षात राबवली आहे आणि त्याचेच फळ बृहन्सच्या डेरेदार वटवृक्षात झालेले प्रत्यक्षात दिसते आहे.

या सर्व गोष्टीचे मूळ आगाशेसाहेबांच्या क्रिकेटमधील कौशल्यामध्ये, विशेषतः यष्टिरक्षणामध्ये असावे असे मला वाटते. यष्टिरक्षक हा तिन्ही यष्ट्या व विट्यांसकट त्यांचे रक्षण करत फलंदाजावर वचक ठेवत असतो व जागरूकपणे सर्व मैदानावर, खेळाडू व खेळावर नियंत्रण ठेवत असतो. त्याचप्रमाणे आगाशे साहेब हे उद्योगाच्या सर्व अंग व उपांगावर (उत्पादन, पणन, अर्थकारण, मनुष्यबळ व व्यवस्थापन) लक्ष ठेवून त्याचा योग्य मेळ घालत, सर्वांना कामाला बांधून उद्दिष्ट गाठण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. अंतिम यश श्री पांडुरंगाच्या चरणी ठेवून विश्वस्ताच्या भूमिकेतून सर्वांना त्यांच्या उध्दाराचा मार्ग दाखवतात. हे सर्व करत असताना त्यांना यष्टिरक्षकाप्रमाणे कायम सक्षम व सतर्क राहावेच लागते. त्यासाठी उत्तम आयुरारोग्य व शक्ती लाभो आणि असे अविरत त्यांचे मार्गदर्शन सर्वांना मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

प्रत्येकास मनातील सर्वच भावना शब्दात मांडता येत नाहीत. तेव्हा तुकाराममहाराजांच्या अभंगाचा आधार घेतो -

बोलिली लेकुरे । वेडीवांकुडी उत्तरें।।
करा क्षमा अपराध। महाराज तुम्ही सिध्द।।
नाही विचारला। अधिकार म्यां आपुला।।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पायां पे किंकरा।।

•

# ज्ञानेशो भगवान विष्णू !

**राम जोशी**

ज्ञानेश्वर आगाशे आणि मी, राम जोशी, प्राथमिक, माध्यामिक शाळेत बरोबर होतोच परंतु पदवीपर्यंतच्या शिक्षण काळात आमचा स्नेह दृढ झाला. शिक्षण संपवून ज्ञानेश्वरने प्रथम श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स हा वडिलार्जित छापखाना नफ्यात आणून दाखविण्याच्या जिद्दीने ताब्यात घेतला. या कामात त्याला घरच्यासारख्या माणसाची गरज होती. त्याच्यावरील पूर्ण श्रद्धेने मी मे १९६४ पासून शिवाजी प्रेसमध्ये रुजू झालो.

तदनंतर त्याच्या विविध उद्योग, क्रीडा, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांत मी सक्रिय भाग घेतला. छापखान्यातूनच पुढे श्री प्रकाशन या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रकाशन केलेच पण राजस नावाचे ललित मासिकही काढून ते चांगल्या प्रकारे आम्ही चालविले.

या उमेदवारीच्या काळात त्याच्याबरोबर सतत राहून जवळून काम करताना मला त्याच्यातील उद्योजकता, चिकाटी, माणसांच्या आणि त्यांच्या अंगच्या गुणांची पारख इ. स्वभाव वैशिष्ट्यांची जाणीव झाली. स्वत:चा फायदा किंवा हित सांभाळताना दुसऱ्याचाही विचार तो नेहमी करत असतो हे लक्षात आले.

मला इथे नमूद करावेसे वाटते की, मी न मागता मला मिळत असलेल्या मोबदल्यात भर पडावी म्हणून मला स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देऊन सक्रिय सहाय्य केले. त्याच्या मित्रांतील व्यवसायात बरोबर काम करणारा मी कदाचित पहिलाच मित्र असावा.

जागतिक कॅलेंडर्सचे प्रदर्शन आयोजित करण्याची कल्पना १९६६ साली आमचे स्नेही ताराप्रकाश वर्तक यांनी मांडली. तेंव्हा या उपक्रमामुळे विविध क्षेत्रांतील मंडळींशी आपला संबंध येऊन आपल्या सर्वांचा लोकसंग्रह वाढेल, भीड चेपेल, आत्मविश्वासाने लोकांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण होईल, हे हेरून ज्ञानेश्वरने आम्हाला या उपक्रमात संपूर्ण पाठिंबा दिला. त्याच्या बळावर आम्ही १९६६, ६७,६८ साली पुणे, येथे तसेच मुंबई येथे १९६७ साली, तर कलकत्ता येथे १९६८ साली ही प्रदर्शने यशस्वीपणे आयोजित केली.

१९६९ साली सहकारी बँक काढावी अशी एक नवीन कल्पना विलास एकबोटेने मांडली. ज्ञानेश्वरने नेहमीप्रमाणे आमचा मित्रांचा संघ म्हणजे चोपडे, पेठकर इत्यादींना कामाला लावले. ही श्री सुवर्ण सहकारी बँक आज कुठे पोचली आहे हे सर्वश्रुतच आहे.

ज्ञानेश्वरकडून घेतलेल्या व्यावसायिक प्रशिक्षणाच्या अनुभवाच्या बळावर १९७१-७२ च्या सुमारास मी सातारा येथे स्वतंत्र व्यवसायास सुरुवात केली. पुण्यापासून जरी दूर गेलो होतो तरी त्याचे मार्गदर्शन व पाठबळ मला निरंतर मिळत होते.

१९७३ च्या सुमारास आपल्या श्रीपूर येथील साखर कारखान्यात देशी मद्य निर्मितीला त्याने सुरुवात केली. त्या वेळी देखील देशी मद्य वितरणाचे सातारा जिल्ह्यातील काम माझ्यावर सोपविण्यात आले आणि अशा प्रकारे मी पुन्हा ज्ञानेश्वरचा साताऱ्यातील व्यावसायिक मित्र झालो.

व्यवसायातील उत्कर्षापाठी आपल्या वडिलांची पुण्याई आहे, ही जशी ज्ञानेश्वरची श्रध्दा आहे तशीच माझ्या उत्कर्षाच्या मागे ज्ञानेश्वरची पुण्याई आहे अशी माझी ठाम श्रध्दा आहे.

एवढा मोठा होऊनसुध्दा मित्र, नातेवाईक, सहकारी व कर्मचारी यांच्या सुखदु:खात तो नेहमीच सामील असतो. तसेच कुठेही कंटाळा न करता सर्वांसाठी सर्व ठिकाणी केव्हाही हजर असतो.

मित्रमंडळी त्याला 'माऊली' म्हणतात तेव्हा खऱ्या अर्थाने त्याने आपले ज्ञानेश्वर हे नाव सार्थ करून दाखविले आहे. म्हणून मी म्हणतो - ज्ञानेशो भगवान विष्णू!

एखाद्या कसोटी वीराप्रमाणे ज्ञानेश्वर आयुष्याचे शतक पूर्ण करो, अशी पांडुरंग चरणी प्रार्थना !

•



रमणबागेची हॉकी टीम

# आमच्या रमणबागेचे भूषण

**प्रा. पद्माकर शंकर पुरंदरे**

माझा वर्गमित्र कै. रंगनाथ चंद्रशेखर आगाशे याचा भाऊ ज्ञानेश्वर आपल्या रमणबागेत आहे, असं मला ऐकून माहीत होतं. रमणबागेत 'ब' तुकडी हुशार मुलांची. जरा चौकशी केल्यावर मला तो 'अ' तुकडीत असल्याचं समजलं. रमणबागेत ज्ञानेश्वर 'ब' तुकडीत नाही ही गोष्ट मला खटकली आणि मी 'ब' तुकडीत असणाऱ्या मधु गुप्तेला ज्ञानेश्वरला घेऊन माझ्या घरी येण्याचा निरोप दिला. त्याप्रमाणे ते दोघेही माझ्या घरी आले. 'उद्यापासून पहाटे ५.३० वाजता अभ्यास करण्यासाठी तुम्ही दोघांनी माझ्याकडे यायचं आहे' असं मी त्यांना सांगितलं. दुसऱ्या दिवसापासून ते दोघेही नियमितपणे माझ्याकडे येऊ लागले. नियमित अभ्यासाचा इष्ट तो परिणाम होऊन ज्ञानेश्वर मधूबरोबर 'ब' तुकडीत गेला आणि मला सार्थक झाल्याचं समाधान लाभलं.

त्यानंतर मी ज्ञानेश्वरच्या प्रत्येक गोष्टीकडे लक्ष देऊ लागलो. तेव्हा त्याच्या ठिकाणी अनेक गुण असल्याचं मला जाणवलं. सायकलवरून सज्जनगडला सहलीला गेलो असताना सर्वांशी जुळवून घेणं, गुजराथच्या सहलीच्या वेळी भांडखोर सहप्रवाशांशी दोन हात करण्याची तयारी असणं, आपण श्रीमंत आहोत असं कुणालाही कधीही भासू न देणं, वेळप्रसंगी बेकरीतील बिस्किटांचा ट्रेदेखील घेऊन येणं, घरीच असणाऱ्या आखाड्यात नियमितपणे व्यायाम करणं, वर्गात नेहमी शिस्तबध्द आचरण ठेवणं, शिक्षकांशी नम्रतेनं वागणं, असे अनेक पैलू मला त्याच्या ठिकाणी आढळून आले.

क्रिकेट, फुटबॉल आणि हॉकी हे तर त्याचे आवडते खेळ! शाळेला 'सेठना कप' आणि 'पदमजी ढाल' मिळवून देण्यात ज्ञानेश्वरचा महत्त्वपूर्ण सहभाग असे. एस्.एस्.पी.एम्.एस्. शाळेबरोबरच्या क्रिकेट सामन्यात तर शतक झळकावून त्यानं पदमजी ढाल मिळवून दिली. तो सामना अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या आणि क्रिकेटमध्ये रस घेणाऱ्या शिक्षकांच्या स्मरणात राहिला. या सर्वांचा परिपाक म्हणून त्याची श्रीलंकेला जाणाऱ्या संघात यष्टिरक्षक व फलंदाज म्हणून निवड झाली. तेथेही त्याने नेत्रदीपक कामगिरी केली.

शालांत परीक्षेच्या वर्षातील वार्षिक स्नेहसंमेलनात ज्ञानेश्वरची मुख्य विद्यार्थी-प्रतिनिधी म्हणून बहुमताने निवड झाली. ऐच्छिक वर्गणीचे ते संमेलन फारच गाजले. यंदाच्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद ज्ञानेश्वरकडे आले, त्याचे बीजारोपण त्याच काळात तर झाले नसेल

ना?

एकाच वेळी समाजकार्य, क्रीडा, बँक व्यवसाय, उद्योग या सर्व क्षेत्रांत आत्मीयतेने कार्य करणाऱ्या ज्ञानेश्वर आगाशेनी जे उच्च यश प्राप्त केले आहे, त्याला त्याच्या ठिकाणी असणारे सहृदयता, निष्ठा, प्रामाणिकपणा, निरपेक्षबुद्धी, जिद्द, नियमांचे काटेकोर पालन, सर्वांशी समान वागणूक, लोकसंग्रह करण्याची वृत्ती, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे कौशल्य, मधुर वाणी, क्षमाशीलता इत्यादि गुणसमुच्चय कारणीभूत आहेत यात संदेह नाही.

ज्ञानेश्वर आगाशे यांच्या षष्ट्यब्दिपूर्ति समारंभप्रसंगी माझ्या हार्दिक शुभेच्छा! ज्ञानेश्वर, जीवेत् शरदः शतम्।

Miller of the Dee या कवितेतील शेवटच्या ओळींच्या धर्तीवर मी असं म्हणेन,

Such men as thou are NESR's boast,
Oh ! dear Dnyaneshwar Chandrashekhar Agashe!

•

# दाता

## काका जोशी

शतेषु जायते शूरः सहस्त्रेषुच पंडितः।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवती वा न वा।।

आज आमच्या सहवासातील एका दानशूराच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होत असताना होणाऱ्या गौरव ग्रंथात मित्राबद्दल चार शब्द लिहिण्याचे भाग्य मला मिळत आहे, हा मी माझा गौरव समजतो.

या सहवासाची सुरुवात फार पूर्वी म्हणजे सुमारे १९५५ साली झाली. पुण्याच्या क्रिकेटच्या क्षितिजावर शालेय जीवनात एक तारा उदयास आला होता. सामने पहावयाची आत्यंतिक ओढ असल्यामुळे सामन्यांच्या वेळी मी आवर्जून उपस्थित असे. यामुळेच आगाशे यांचा परिचय झाला. पुढे ते कॉलेजला असताना माझ्या व्यवसायाच्या ठिकाणी म्हणजे टिळक पथावरील विवेक वाचनालय या ठिकाणी सर्व मित्रांचे जमावयाचे एक ठिकाण म्हणजे कट्टा बनले. माझ्या पुढील आयुष्यांत या व्यक्तीच्या प्रभावामुळे व दातृत्वामुळे जे परिवर्तन झाले त्यावर ज्यांनी हे परिवर्तन पाहिले, अनुभवले आहे तेच विश्वास ठेवतील. आयुष्यात अनेक प्रकारच्या कष्टानंतर वाचनालयाच्या व्यवसायात १९५८ ते १९६८ अशी १० वर्षे स्थिर असताना या सुहृदाच्या आज्ञेने संपूर्ण नव्या क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त झाली. ती साहेब व मित्रपरिवाराने नियोजित केलेल्या श्री सुवर्ण सहकारी बँक लि. या संस्थेच्या स्थापनेने. या संस्थेची स्थापना म्हणजे सहकार क्षेत्रातील अनेक मापदंडांची निर्मिती होती. या संस्थेच्या स्थापनेनंतर आम्हा सर्व मित्रमंडळींनी संस्थेच्या भरभराटीसाठी जे अनंत कष्ट केले त्याचे फळ श्री सुवर्ण सहकारी बँकेच्या यशात आहे. (अर्थात त्यात सिहांचा वाटा हा आगाशेसाहेबांचाच आहे.)

आगाशेसाहेबांच्या दातृत्वाचे कितीतरी प्रसंग सांगता येतील. कोणाला मदत करताना साहेबांचा हात कधीच आखडता नसतो. व्यावसायिक, सामाजिक, प्रापंचिक कोणत्याही प्रश्नांची उकल करण्यात साहेबांचा हातखंडा आहे. मनुष्य स्वभावाचे सर्व प्रकारचे नमुने साहेबांच्याकडे येत असतात. त्यांना योग्य ती मदत व मार्गदर्शन करायचा साहेबांचा आवाका व झपाटा काही न्याराच प्रत्ययास येतो. आपण मदत करायची असेच ठरलेले असल्यामुळे मदत केलेली व्यक्ती त्याचा योग्य विनियोग करते की नाही ही काळजी साहेबांनी कधीच केली नाही. साहेबांच्या मते संबंधित व्यक्तीनेच तिची किंमत ठरवावी. समोरच्या व्यक्तीची गरज आपण पूर्णपणे भागविली पाहिजे असा एक साहेबांचा कटाक्ष असतो. करायची तर पूर्ण मदत करा

अन्यथा करू नका, असा विचार असतो आणि हाच विचार बँकेच्या आजच्या उज्ज्वल यशाचा पाया आहे. कारण बँकेचे हेच सूत्र आहे. साहेबांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने समोरच्या माणसाला आपल्या अडचणी सांगण्यास संकोच होत नाही. आमच्या संस्थेच्या ग्राहकांना विनम्र व सस्मित सेवा मिळावी याबद्दल साहेबांचा विशेष कटाक्ष असतो. आपणांस एखादी गोष्ट पटत नसेल तर ती गोष्ट शांतपणे सांगता आली पाहिजे. ज्या वेळी नकार द्यायचा असेल तर तो योग्य वेळी तितक्याच स्पष्टपणे देता आला पाहिजे. आपल्याकडे अडचणी घेऊन आलेल्या व्यक्तीचा खोळंबा होता कामा नये. योग्य वेळी नकार मिळाल्यास व्यक्ती दुसरे प्रयत्न करूशकते.

आताच्या मॅनेजमेंट कन्सल्टिंगच्या युगात साहेबांनी सुमारे २५-३० वर्षांपूर्वीपासून कामाच्या लावलेल्या व लावून घेतलेल्या सवयी काही वेगळे सांगत नाहीत. जे आपण करत होतो त्याला आता नाव दिले गेले इतकेच. जे जे व्यवसाय साहेबांनी निर्माण केले त्यातील सर्व कर्मचारी याला साक्ष असतील. साहेबांच्या व्यापात वेळेला फार महत्त्व असते. त्यानुसार आपण आपले काम केले की झाले. एखाद्या कामाविषयी काही शंका असल्यास त्याचे निराकरण करून घ्यावे एवढीच साहेबांची अपेक्षा असते. कामात झालेल्या चुका जर जाणीवपूर्वक केल्या असतील तर त्याचे परिणाम इतरांना भोगावयास लागू नयेत, असा विश्वास कर्मचाऱ्यांत साहेबांनी निर्माण केला आहे. त्यामुळे कुठल्याही स्तरातील कर्मचारी साहेबांच्या समोर जाऊ शकतो. आपल्या अडचणींचे निराकरण करून घेऊ शकतो. आपल्या ओळखीचा फायदा जर कोणाला होत असेल तर तो त्याने अवश्य करून घ्यावा, मात्र दुरुपयोग करू नये इतकी माफक अपेक्षा साहेबांची असते. कामाचा योग्य मोबदला कर्मचाऱ्यांना देण्यावरही साहेबांचा कटाक्ष असतो. कर्मचाऱ्यांची संघटना असण्यास साहेबांनी कधीच विरोध केला नाही. उलट कर्मचाऱ्यांत विश्वास निर्माण करण्यात साहेब यशस्वी होतात. आज सर्व उद्योगांत मिळून ८/१० हजार कर्मचारी सेवेत असताना कधीही संपावर जाण्याची पाळी कर्मचाऱ्यांवर आली नाही. साहेबांशी पगारवाढीची बोलणी करताना सर्व प्रकारचे हिशोब साहेबांच्या डोक्यात असतात. त्यामुळे संघर्षाची वेळ कधीही येत नाही, येणार नाही.

खेळाच्या अनेक संघटनांत मतभेद होतात. त्यातील दोनही बाजूंना साहेब हवे असतात. कारण एकदा स्वीकारलेली जबाबदारी दुसऱ्याच्या चुकांमुळे झटकायची सवय साहेबांना नाही. माझ्या कर्मचाऱ्यांनी जर काही चुका केल्या तर त्या आपल्याच आहेत व त्याची जबाबदारीही मी स्वीकारणारच या बद्दल सर्वांनाच विश्वास असतो. काही वेळेला याचा गैरफायदाही घेतला गेलेला आहे. पण त्याचे प्रमाण फार अल्प आहे. काही वेळेला ठाम निर्णय घेऊन कारवाई करायची वेळ येते. त्यावेळी कटु निर्णयही साहेबांना घ्यावे लागतात, आणि ते तसे साहेब घेतातही. साहेबांच्याकडे आलेली व्यक्ती आपले काम होणारच या अपेक्षेने येते आणि ते तसे घडतेही. अशा उमद्या व्यक्तीच्या सहवासात माझ्यासारख्या अल्पमती माणसाला इतकी वर्षे घालवता आली हे मी माझे भाग्य समजतो. आज साठी झाली असली तरी जो उत्साह आहे तो तरुणाला लाजवणारा असा आहे. तो असाच सदैव लाभावा. साहेबांनी आयुष्याचे शतक पूर्ण करावे, अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

•

# दीपस्तंभ

**आशा निरखे**

२६ जानेवारी, १९९४ या दिवशी आमच्या शाळेचे नाव सुप्रसिध्द उद्योगपती, कुशल कारखानदार, उत्तम क्रीडा संघटक ज्ञानेश्वर आगाशे यांचे ज्येष्ठ बंधू 'कै. जगदीश चंद्रशेखर तथा पंडितराव आगाशे स्कूल इंग्रजी माध्यम' असे ठेवण्यात आले आणि त्या मंगल, पवित्र दिवसापासून मा. ज्ञानेश्वर आगाशेसाहेब यांचे आमचे संस्थेच्या कुटुंबाशी एक अद्वैत, अतुट असे नाते जोडले गेले. मा. ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांनी आपल्या दिवंगत बंधू पंडितराव आगाशे यांचे स्मरणार्थ संस्थेस रु. ५ लाखाची देणगी देण्याची इच्छा व्यक्त केली. तसेच संस्थेने इंग्रजी माध्यमाच्या शाळेला (माध्यमिक विभाग) त्यांच्या बंधूंचे नांव देण्याचे मान्य केले आणि वर वर्णन केल्याप्रमाणे १९९४ साली हा नामकरण सोहळा संपन्न झाला.

आज जवळ जवळ ८ वर्षे झाली त्या गोष्टीला. पूर्वीचे ए. एम्. आय. बालक मंदिर, महाराष्ट्र विद्या मंडळ ही शाळेची जुनी नावे काळाच्या पडद्यामागे लोप पावली आणि पंडितराव आगाशे शाळेने सर्व कार्यक्षेत्रांत गरूड झेप घेतली.

असे म्हणतात, की हिऱ्याला जेवढे अधिक पैलू पाडलेले असतात तेवढा तो जास्त चमकदार, तेजस्वी बनत जातो किंवा सोने हे अग्निदिव्याने आणखीनच चमकते, झळाळते. तसेच आपल्याला मा. ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांबद्दल म्हणता येईल. या हिऱ्याला सुसंस्कारांचे पैलू पाडण्याचं, परिस्थितीला तोंड देऊन अडीअडचणींवर मात करून न खचता, न डगमगता, येईल त्या संकटातून मार्ग काढण्याचं, त्यांचं व्यक्तिमत्व फुलवण्याचं व ऋजु व्यक्तिमत्व घडविण्याचं सारं श्रेय त्यांचे प्रेमळ, कर्तृत्ववान, कुशाग्र बुद्धिमत्तेचे पिताश्री कै. मा. चंद्रशेखर गोविंद आगाशे व कष्टाळू, प्रेमळ मातोश्री कै. इंदिराबाई आगाशे यांचेच आहे.

आम्ही जेंव्हा सर्वात प्रथम त्यांच्या लक्ष्मी रोडवरील बृहन्महाराष्ट्रच्या ऑफिसमध्ये गेलो तेंव्हा तेथील पवित्र देवघर आम्हांला आवर्जून दाखविण्यात आले, कारण त्यांचा विश्वास आहे की जीवन म्हणजे भक्तियोग व कर्मयोग यांचे राजस दर्शन.

आमच्या शाळेला अनुदान नाही त्यामुळे आर्थिक अडचणी सतत येतात. दिवाळीला सरकारी अनुदानित शाळांप्रमाणे शिक्षकांना बोनस मिळत नाही. हे पाहून दरवर्षी सर्व शिक्षकांना, सेवकांना दिवाळी बोनस रु. २५,००० ते दिवाळीपूर्वी न विसरता पाठवितात. विना अनुदानित शाळेला येणाऱ्या सर्व आर्थिक अडचणी स्वतःकडे

कोणताही मोठेपणा न घेता, प्रसिध्दीची थोडीसुध्दा अपेक्षा न करता अगदी सहजपणे सोडवितात. फी भरू न शकणाऱ्या व गरजू विद्यार्थ्यांची फी पाठवून देतो, असे म्हणून तत्परतेने दुसऱ्या दिवशी फीचा चेक पाठवून देणार.

बृहन्स् ग्रुप मध्ये आम्ही म्हणजे महाराष्ट्र विद्या मंडळ संस्थेचे पंडितराव आगाशे विद्यालय (स्कूल) इंग्रजी माध्यम हे पण आता सामावून घेतलेले आहे, याचा आम्हां सर्वांना अभिमान वाटतो. आमच्यासारख्या शाळेची एका मोठ्या उद्योगपतीने केलेली कदर पाहून मन समाधानाने, आनंदाने तृप्त होते आणि त्यांच्याबद्दल वाटणारा आदर द्विगुणीत होतो.

गुलाब पुष्पाप्रमाणे सदैव टवटवीत व्यक्तिमत्व असलेल्या, बहुविध क्षेत्रांमध्ये यशवंत आणि किर्तीवंत झालेल्या, अत्यंत साधेपणाने वावरणाऱ्या, शांत आणि ऋजु ज्ञानेश्वर आगाशे साहेबांना त्यांच्या षट्यब्दिपूर्ति निमित्त वैयक्तिक माझ्यातर्फे, आमच्या संस्थेतर्फे, शाळेतर्फे मनःपूर्वक शुभेच्छा.

ज्ञानेश्वर साहेबांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य लाभू दे व या दीपस्तंभाचं मार्गदर्शन आम्हां सर्वांना सतत मिळू दे हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

जीवेत् शरदः शतम्

•

# श्रध्दावन्त आगाशे

**अचला जोशी**

ज्ञानेश्वर आगाशेंच नाव मी पहिल्यांदा माझा मामा मकरंद भावे याच्या तोंडून ऐकलं. त्याला जवळ जवळ चाळीस पंचेचाळीस वर्ष होऊन गेली असावीत. आमच्या काळात मुलांना अशोक, अजित, सुरेश, अरुण अशी त्या काळात आधुनिक वाटणारी नावं दिली जात असत. अशा नावांची सवय असल्याने साधारण आपल्याहूनही लहान वयाच्या एका मुलाचं नांव ज्ञानेश्वर असावं हे तेंव्हांही वेगळं वाटून मी मामाच्या बोलण्याकडे अधिक लक्ष द्यायला लागले होते. माझा मामा त्यावेळी क्रिकेट क्षेत्रातला एक जाणकार आणि अत्यंत निःपक्षपाती व निःस्पृह पंच म्हणून मान्यता पावलेला होता. "हा नुकताच कॉलेजमध्ये गेलेला मुलगा रणजी साठी खेळवावा असा खेळतो. अगदी तडाखेबंद असला तरी संयमी खेळ आहे त्याचा" तो म्हणाला होता. पुढे तो जे म्हणाला ते माझ्या चांगलं लक्षात राहिलं. मामा म्हणाला होता, एवढ्या मातब्बर घरातला आहे पण अगदी साधा आणि निगर्वी आहे.

काही दिवसांनी मामाबरोबर एकदा महाराष्ट्र क्लबमध्ये गेले असताना मामा म्हणाला, "तो बघ ज्ञानेश्वर. आज तो यष्टीरक्षण करतो आहे पण बॅटिंग करतानाही कसा दमदार खेळतो ते पहा एखादे दिवशी." तो गोरा घारा आणि चेहेऱ्यावर एकाग्रता असलेला मुलगा पाहून मी मामाला म्हटलं होत, "अरे हा पेशवा घरात बसून बुध्दीबळ किंवा फार तर गंजिफा खेळण्याचे सोडून इथे मैदानावर काय करतोय ?"

त्यानंतर अनेक दशकांनी परवा परवा साहित्य संमेलनाच्या ग्रंथ दिंडीत स्वागताध्यक्ष असलेले ज्ञानेश्वर आगाशे पेशवे रूपात दिसले. जरीकाठी धोतर, उंची उपरणं आणि लालभडक पगडी घालून जातांना त्यांचं खानदानी, पेशवाई दर्शन झालं तेव्हां माझे पूर्वीचे शब्द मला आठवले.

ज्या वातावरणात ज्ञानेश्वर वाढत होते ते वातावरणही अत्यंत सुसंस्कारांचं होतं. त्यांचं घर पुस्तकांनी भरलेलं असायचं. सर्व विषयांवरची पुस्तकं त्यांच्या घरी होती.

अत्यंत सच्छील व सुविद्य पत्नी, सुस्वभावी मुलं, कायम वर्धिष्णु असलेला कारखाना, जिवाला जीव देणारे मागच्या पिढीपासून कारखान्याच्या सेवेत असलेले सहकारी आणि या सर्वांइतकंच महत्त्वाचे असणारं त्यांच मित्रमंडळ. यात आगाशे तृप्त आहेत.

चंद्रशेखर आगाशेंच्या कर्तृत्वाकडे कौतुकाने आणि निखळ प्रेमाने पाहणारे त्याच उद्योगात नांव कमवलेले वसंतदादा पाटील हा पंडितराव व ज्ञानेश्वर या दोघा भावांचा

मोठा आधार होता. वडील गेल्यावर सल्ल्याची गरज वाटली तर ते वसंतदादा पाटलांकडे जात असत. त्यांचा दुसरा आधार म्हणजे मेहेंदळ्यांकडे दिलेली थोरली बहीण. अचानक वडील गेल्यावर त्यांचं कुटुंब डळमळून गेलं. अशावेळी वडिलांचे विश्वासू सहकारी तर होतेच पण कुटुंबातली त्यांची थोरली बहीण ही फार मोठा आधार होता.

आपल्या आधी आपले कामगारांची जेवणाची व्यवस्थित सोय आहे की नाही हे पाहणारा मालक विरळाच असे मागच्या पिढीतील थोरल्या मालकांचा हाच आपलेपणा अनुभवलेले स्वामीजी किंवा साठेसाहेब म्हणत. मालक येणार म्हटलं की इतर कारखान्यात कामगार घाबरलेले दिसतात, पण बृहन्महाराष्ट्रमध्ये साहेब येणार या बातमीनेच जणू नवचैतन्य येतं. पुण्याहून कंपनीचा वित्त कारभार पाहणारे बर्वे सांगतात - साहेब परदेशाहून काही नवं पाहून येतात. तसं ते आपल्याकडे झालं पाहिजे हा त्यांचा आग्रह असतो. मग तो पेपर श्रेडर असो की अपारंपरिक ऊर्जा वापरून वीजनिर्मिती करण्याचा प्रचंड मोठा प्रकल्प असो. या त्यांच्या धोरणामुळे आज श्रीपूरचे कारखान्यात बहात्तर लाख युनिट वीज प्रतिवर्षी तयार होते. तसेच एक काम पूर्ण होण्यापूर्वी दुसऱ्या कामाचे आराखडे त्यांच्या मनांत पक्के तयार असतात.

उद्योग, खेळ, साहित्य या क्षेत्रात सहज संचार असलेले ज्ञानेश्वर राजकारणापासून मात्र दूर राहिले आहेत. उमद्या स्वभावामुळे त्यांचे याही क्षेत्रात अनेक जवळचे म्हणावेत असे स्नेही आहेत. अनेकदा त्यांना राजकारणांत गोवण्याचे प्रयत्नही झाले आहेत. परंतु राजकारणापासून मात्र ते जाणीवपूर्वक दूर राहिले आहेत.

निरनिराळ्या क्षेत्रांतले त्यांचे मित्र त्यांचे आप्त बनून राहिले आहेत. ज्ञानेश्वर म्हणतात - पानशेतच्या पुरानंतर हेमंत गोरेने आमच्या कुटुंबाबरोबर त्या चिखलातून आमच्या वस्तू उपसण्याचे काम अहोरात्र केलं आहे. त्याच्यासारखा जिवाभावाचा सखा मला मिळणार नाही. आता तो राहिला नाही पण काही काळ का होईना, अशी खरी खुरी मैत्री मला मिळाली हेच मी माझं भाग्य मानतो.

ज्ञानेश्वर आगाशेंची समाधानी मानसिकता त्यांना मनःशांती देते आहे आणि देव या शक्तीवरील अढळ श्रध्दा त्यांच्या मनाचा तोल सांभाळते आहे. हीच शांती, समाधान त्यांना त्यांच्या पुढच्या जीवनांत मिळो. त्यांचा उद्योग-कुशल सहकाऱ्यांच्या सहायाने आणि त्यांच्या मार्गदर्शनाने खूप भरभराटीस जावो आणि आगाशेंच्या व्यक्तिगत आयुष्यातील वसंत असाच फुललेला राहो, अशी सदिच्छा त्यांच्या स्नेहाने बांधलेले सर्वजण करत असतील आणि त्यांची श्रध्दा असलेला तो जगन्नियंता त्याला तथास्तु म्हणत असेल.

•



श्री. व सौ. आगाशे आणि घरातलीच बनलेली माणसं

# माझे साहेब

**विजय थत्ते**

पंधरा वर्षांपूर्वी मी पुण्यात आलो. साहेबांच्या घरची कामं मी व्यवस्थित सांभाळू शकेन की नाही असं मला वाटलं. पण आगाशेसाहेब म्हणाले, अरे दोन महिने राहून बघ. पण मी राहिलो तो कायमचाच.

ज्याप्रमाणे लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला की सोने होते त्याप्रमाणे माझ्या आयुष्याचे साहेबांच्या स्पर्शाने सोने झाले आहे. साहेबांच्यामुळे नोकरी, लग्न, घर, सुखी जीवन सगळं मला मिळालं आहे. एवढंच नव्हे तर आमच्या कुटुंबाची भरकटलेली गाडी त्यांनी रुळावर आणली.

माझं कामात काही चुकलं आणि मोठ्या वहिनी रागवत असल्या तर साहेब मात्र माझी बाजू घेत असतात. मी खाण्याचे काही पदार्थ बनवले तर कधीही नावं न ठेवता ते खातात आणि माझं कौतुक करतात. काही चुकलं तर समजावून सांगतात.

या घरातले सारेच जण म्हणजे मोठ्या वहिनी, मंदारसाहेब, आशुतोषसाहेब, शीतलताई, जिजा वहिनी, शालिनी वहिनी आणि छोटे आदित्यसाहेब सगळे माझ्याशी प्रेमाने वागतात. माझ्यावर रागवत नाहीत. मला घरातलाच मानतात. मला काही मदत हवी असली किंवा अडचण आली तर सगळेजण मनापासून मदत करतात.

साहेबांचा, जणू देवाचा वरदहस्त असावा तसा आशीर्वाद माझ्या घराला आहे. म्हणून मला साहेब देवासारखे आहेत.

या माझ्या साहेबांना भरपूर आयुष्य लाभो व त्यांची सेवा करण्याची ताकद मला लाभो, हीच देवाला मी प्रार्थना करतो.

•

# माझे शिरीन साहेब

**विनायक गांगल**


माझा व आगाशे घराण्याचा संबंध १९५१ सालापासून आला. १९५१ साली मी कंपनीत कामास नव्हतो. पण कै. चंद्रशेखर आगाशेसाहेबांनी किर्लोस्कर कंपनीची तीन इंजिने केळकर ब्रदर्स कडून विकत घेतली. त्यावेळी मी केळकर ब्रदर्सकडे सेल्समन म्हणून कामास होतो. श्रीपूर येथे फॅक्टरीचे विस्तारीकरणाचे काम चालू होते. त्यावेळी इंजिन बसवून देऊन चालू करून देण्याची जबाबदारी कै. चंद्रशेखर आगाशेसाहेबांनी माझ्यावर सोपविली होती. त्यानिमित्ताने बरेच वेळा त्यांच्या घरी जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळी पहिल्यांदा मी शिरीन (ज्ञानेश्वर) साहेबांना पाहिले.

शिरीन साहेबांचे मी पाहिलेले वैशिष्टय म्हणजे माणसे जोडणे. लहान मोठा असो, गरीब श्रीमंत असो, आपले नातेवाईक असो, सगळ्याशी प्रेमाने वागणे हा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. अर्थात एवढया मोठ्या व्यापामध्ये काही वेळा विरुध्द वागणारे लोक भेटले व त्यांचा त्यांना थोडासा त्रासही होत असे. पण ही जाणीव त्यांनी त्रास देणाऱ्या माणसाला दिली नाही. आपल्याला त्रास देणाऱ्या माणसाशी सूडबुध्दीने वागणे हे त्यांच्या मनाला कधीही शिवले नाही. त्यामुळेच त्यांच्या अंगिकारलेल्या कुठल्याही धंद्यात त्यांना यशच मिळते.

माझ्या बाबतीत म्हणावयाचे झाले तर आगाशे कुटुबियांनी मी एक त्यांच्या घरातला एक घटक समजून माझ्यावर प्रेम केले, हे मी आयुष्यात कधीही विसरू शकत नाही.

शिरीन साहेब व सौ. रेखावहिनी तसेच त्यांची दोन्ही मुले यांचे माझ्यावर तसेच प्रेम आहे.कित्येक लोक मला अजुनही विचारतात की आगाशे साहेबांचे तुमच्याशी काही नाते आहे का हो? हा प्रश्न ऐकल्यावर माझी मान साहजिकच उंचावते. शिरीन साहेब हे अप्पासाहेब is my man असे म्हणतात. मला आयुष्यात आणखी काय मिळवायचे आहे, काही नाही. मिळाले हेच खूप झाले. शिरीन साहेबांच्या तोंडून मी हे शब्द ऐकले आणि मी तृप्त झालो. शिरीनसाहेबांनी चालू केलेल्या निरनिराळ्या उद्योगांत अशीच भरभराट होवो, सर्वांना ते हवेहवेसे वाटोत तसेच त्यांना व सौ. रेखावहिनींना उदंड आयुष्य लाभो, हीच गणेशाजवळ प्रार्थना !

•



ज्ञानेश्वर - कॅनेडीयन पाहुणे व सहकारी यांच्यासह

# आमचा कॅनेडियन प्रकल्प

**अ. गं. स्वामी**

ते वर्ष इ.स. १९६६ असावे. ज्ञानेश्वर बी.ए. झाले. व लगेच आपल्या कंपनीवर डायरेक्टर झाले. त्यांचे वडील बंधू पंडितसाहेब हे १९५६ पासून डायरेक्टर होतेच. आता दोघेजण काम पाहू लागल्यावर पंडितसाहेब यांनी साखर कारखान्याकडे विशेषत्वाने लक्ष देण्यास सुरूवात केली. तर ज्ञानेश्वर आगाशे यांनी डिस्टिलरी व इतर उद्योगांकडे लक्ष देण्यास सुरुवात केली.

सन १९६८च्या सुमारास विदेशी मद्य निर्मितीच्या उत्पादनास सुरुवात करावी असे ठरले. व त्यासाठी सायलेंट स्पिरिटच्या उत्पादनाची मशिनरी घेण्याचे ठरले. तशी मशिनरी पहाण्याच्या दृष्टीने चेअरमन लिमये, केळकर, ज्ञानेश्वर व स्वत: मी असे चौघेजण त्रिवेंद्रम (केरळ) येथे गेलो. ती मशीनरी व तेथील स्पिरिटचा नमुना पाहून आम्ही परत आलो व १९६९ च्या सुमारास सायलेंट स्पिरिटची सॅव्हेल (फ्रेंच) मशीनरी घेऊन ती बसवली.

दरम्यान मद्य निर्माणीची रचना करून देण्यासाठी डॉ. शुक्ला, प्राध्यापक नॅशनल शुगर इन्स्टिट्यूट कानपूर यांना पाचारण केले. त्यांना एकूण खपाचा विचार करून मद्य निर्मितीची आखणी करून दिली. त्यानंतर ज्ञानेश्वर आगाशे यांनी दुसरे ब्लेंडर्स मिळवले. त्यांची नावे येणे प्रमाणे पद्मनाभन्, थापर व डॉ. झा. या लोकांच्या हाताखाली आम्हाला बरेच ज्ञान प्राप्त झाले. व आमची उत्पादने मिलिटरी कँटीन स्टोअरला सर्व भारतभर जाण्यास सुरूवात झाली. या काळात आम्हीही काही फॅार्म्युले तयार केले. व त्यांनाही चांगले सिव्हिल मार्केट मिळाले.

याच वेळी माल्ट स्पिरिटचे उत्पादन करावयाचे ठरले व त्याची संपूर्ण मशीनरी उभी केली गेली व माल्ट एक्सट्रॅक्टचे



आगाशे साहेब, कॅनडाचे मि. कॅम्यू व उद्योगपती कै. शंतनुराव यांच्या समवेत

ड्रम आणवून माल्ट स्पिरिटच्या उत्पादनास सुरूवात झाली. सदर स्पिरिट लाकडी टाक्यात व लाकडी ड्रमात २/३ वर्षे मुरत ठेवून त्यावर चांगले स्पिरिट व मद्य निर्माण करता येवू लागले. बॅाटलिंगसाठी अद्ययावत मशीनरी बसवली गेली व आम्ही स्वतंत्रपणे (कोणत्याही ब्लेंडरच्या मदती शिवाय) मद्याचे उत्पादन करू लागलो. त्यानंतर आम्ही इंग्लंड व हरियाना येथून बार्लीमाल्ट व ब्रिटीश व्हिस्की अर्क व फ्रेंच ब्रँडी अर्क आणवून उत्तम पैकी मद्य बनविण्यास सुरूवात केली. नंतर दोन्ही अर्क आणण्याचे बंद करून स्वत:चे माल्ट स्पिरिट व ब्रँडीस्पिरिट बनविण्यास सुरुवात केली व आजही ही प्रक्रिया चालू आहे.

सन १९७४चे सुमारास मुंबईत विषारी मद्य पिऊन बरेच लोक मृत्युमुखी पडले. त्यावेळी मुख्यमंत्री नाईक यांनी ३/४ दिवसात देशी मद्य कोण देऊ शकेल या संदर्भात सर्व विदेशी मद्य निर्माण करणाऱ्या मालकांची एक बैठक घेतली. ज्ञानेश्वर आगाशे यांनी हे आव्हान स्वीकारले.

इतर कोणी ६-८ महिन्यात देशी मद्य देऊ असे सांगितले. ज्ञानेश्वर आगाशे यांनी विदेशी मद्य निर्माणीत देशी मद्य निर्माण करुन ३ दिवसात ५-६ ट्रक पाठविण्याचे सरकारला अभिवचन दिले व आम्हाला सरकारने तशी परवानगी दिली. ३ दिवसात सर्व साहित्य जमा केले व आम्ही ५ ट्रक भरून देशी मद्य मुंबईस पाठविले. महाराष्ट्रात 'मोसंबी, नारंगी' देशी मद्य आम्ही प्रथम बनवले व सहा महिने महाराष्ट्रात खूपच माल पाठविला लोकांना हा माल चांगलाच आवडला. ज्ञानेश्वर आगाशे यांच्या धाडसी निर्णयाचा पुन:प्रत्यय आला.

सन १९७५ मध्ये आमचे विदेशी मद्य कॅनडामध्ये त्यांच्या नोव्हास्कोशिया या प्रांतात निर्यात झाले. तेथे लोकांना ते आवडले व त्या प्रांताच्या सरकारने तेथे एक मद्य निर्मिती काढण्यास सांगितले व प्रोसाहन दिले. तेथे मद्य निर्मिती काढण्याचे ठरल्यावर आगाशे यांनी मी व त्यांचे मित्र इंजिनियर वर्तक यांना कॅनडा मध्ये मद्यनिर्मितीचे डिझाइन तयार करण्यास पाठविले. आमचे काम एक महिन्यात पूर्ण झाल्यावर ज्ञानेश्वर आगाशे तेथे येऊन सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्या व एक वर्षाचे आत तेथील मद्य निर्मितीचे काम पूर्ण करून देण्याचे काम तेथील आर्किटेक्ट यांना दिले व आम्ही परत आलो. परत येताना आम्ही न्यूयॉर्क, नायगारा धबधबा, टोरंटो, लंडन ही शहरे २-२ दिवस राहून पाहिली. एक अपूर्वाईची गोष्ट आम्ही पाहिली की, ज्ञानेश्वर आगाशे यांना उच्चशिक्षित असे अनेक मित्र व चाहते, न्यूयार्क, लॉस एंजिलिस, वॉशिंग्टन, हॅलिफॅक्स लंडन येथे असल्यामुळे त्यांना कधीच लॉज मध्ये उतरावे लागत नसे. आमची सोयही त्यांच्या मित्रांचे घरी होत असे. आगाशे परदेशी गेल्यानंतर परत येताना सर्व मित्रांचा ते फोनवर निरोप घेत. सगळ्यांना भेटणे शक्य होत नसे. अजूनही हाच प्रघात चालू आहे.

शासकीय पर्यावरणाचे नियम व त्याची पूर्तता करण्यासाठी ज्ञानेश्वर आगाशे यांनी अद्ययावत् बायोगॅस निर्मिती प्लँट बसविले आहे व शासकीय नियमाप्रमाणे डिस्टीलरीच्या वेस्ट वॅाटरचे शुध्दीकरणाचे प्लँट बसविले आहे. त्यातून वीज व कंपोस्ट खताची निर्मिती होऊ लागली आहे . बायोगॅस पासून वीज निर्मितीचा प्रकल्प, नॉन कन्व्हेशनल इंधनापासून बनविलेलाचा प्रकल्प हा महाराष्ट्रात पहिलाच प्रकल्प असल्याने गेल्या वर्षी महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी स्वत: श्रीपूरास येऊन त्याचे उद्घाटन केले व ज्ञानेश्वर आगाशे यांचा गौरव केला.

पुण्यात नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते.स्वत: जातीने सर्व विभागात ते भाग घेत होते. त्यांनी केलेले उद्घाटनाचे भाषण फारच चांगले झाले. पुणेरी पगडी व पेहेराव त्यांनी घालून पुणेरी विद्वत्तेची शान राखली.पगडी म्हटल्यावर विष्णूशास्त्री चिपळूणकर, न्या. रानडे, लोकमान्य टिळक, रँगलर परांजपे, आबासाहेब मुजुमदार, न. चिं. केळकर, यांच्या उत्तुंग विद्वत्तेचे स्मरण होते. ज्ञानेश्वर आगाशे यांनी पगडी घातलेली पाहिल्यावर पगडीच्या खाली तितक्याच विद्वत्तेचे व आर्थिक क्षमतेचे,उद्योगविश्व निर्माण करणारे, निरनिराळ्या क्षेत्रातील

मान्यवरांची मैत्री सांभाळणारे,आध्यात्मातही तितक्याच उत्कटतेने भाग घेणारे,क्षमाशील,लोकांस सदैव मदत करण्यास तयार असलेले व कोणाशीही शत्रुत्व नसलेले,संकटकाळी न डगमगणारे,सतत हसतमुख असलेल्या अशा या मल्टीडायमेन्शनल व्यक्तीचे उन्नत असे मस्तक आहे याची साक्ष पटते व समर्थांच्या खालील ओव्यांची आठवण येते,

सकल गुणापाशी गती । सगुण भाग्यश्री भोगती ॥
आपल्या पुरुषार्थ वैभवे । बहुतांस सुखी करावे ॥
जेही उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगूनी ठेले ॥
राखावे बहुतांचे अंतर । भाग्य येते तदनंतर ॥

ज्ञानेश्वर आगाशे यांना ६० वर्षे पूर्ण होऊन त्यांनी एकसष्टाव्या वर्षात प्रवेश केलेला आहे. नुकताच एक मोठा प्रकल्प पुरा केलेला आहे. त्यांचे हातून असेच योगदान सर्वांसाठी घडावे म्हणून त्यांना दीर्घायुष्य लाभावे अशी परमेश्वरा जवळ प्रार्थना करुन मी माझे मनोगत पूर्ण करतो, धन्यवाद!

•

# आमचे मालक

**के. एन. निबे**

आजच्या गतिमान जीवनात भोवतालच्या माणसांच्या गर्दीत माणूस स्वत:ला हरवून गेल्याचे जाणवते आहे. माणसातले माणूसपण आज जिवंत आहे का, अशी चिंता वाटत आहे. मात्र अशाही परिस्थितीत माणुसकीची शिकवण देणारी, माणसातले माणूसपण जपणारी,दु:खितांच्या पाठीशी धीरोदात्तपणे उभी राहणारी, स्वत:बरोबरच इतरांना बरोबर घेऊन विकासाच्या दिशेने चालणारी, आभाळाएवढ्या मनाची काही सुसंस्कृत माणसे पाहिली की, जगण्याला बळ येते. खऱ्या अर्थाने कर्तृत्वसंपन्न जिणे जगणाऱ्या आणि गर्दीतल्या प्रत्येकावर प्रेम करीत गर्दीतही माणसातील माणूसपण जिवंत ठेवणाऱ्या अशा थोर विभूतींचा समाजानेही नेहमीच आदर केला आहे. पोथ्या-पुराणातून, इतिहासामधून, साहित्यामधून अशा कर्तृत्वाचे स्फुरण देणारे दाखले पावलोपावली पाहायला मिळतात. मोठ्या माणसाचे मोठेपण हे सांघिक असते. ही माणसे बरोबरच्या अनेकांना मोठे करीत असतात.अशा व्यक्तींचा सहवास आपल्याला मिळावा असेही प्रत्येकाला वाटत असते. योगायोगाने माझ्या आयुष्यात मला असा माणूस भेटला आहे आणि मी अनुभवला आहे. मूळचा उद्योगपतीचा पिंड असणारे हे व्यक्तिमत्व सालस, निरागस, करुणासागर, वात्सल्यसिंधू, कलारसिक, क्रीडाप्रेमी, निराधारांचा आधार, अशा कितीतरी रूपात मी अगदी जवळून पाहिले आहे. लोक त्यांना आदराने 'मालक' म्हणतात. कारण या लोकांनी तीन पिढ्यांच्या जिव्हाळ्याची, कुटुंबप्रमुखाची त्यांची प्रतिमा मान्य केली आहे.

आजकाल बरेचसे उद्योगपती म्हणजे गर्भश्रीमंतीचा अहंभाव असणारे,वेळ न पाळणारे, सोयीनुसार शब्द फिरवणारे,अशी प्रतिमा समाजात पाहायला मिळते. मात्र ज्ञानेश्वर मालक त्यास अपवाद आहेत. ऐश्वर्याचा कोणताही आविर्भाव त्यांच्या चालण्याबोलण्यातून अथवा कृतीतून पाहायला मिळणार नाही. दिलेली वेळ आणि शब्द पाळणारे ही तर त्यांची खासियत आहे. हे सर्व मी फक्त ऐकून होतो पण गेल्या १० वर्षात मी हे सारे अनुभवले आहे.

त्यांच्या स्वत:च्या मालकीचा श्रीपूर येथील साखर कारखाना सहकारी झाला होता व त्या सहकारी कारखान्याचा कार्यकारी संचालक म्हणून माझी त्यांच्याशी झालेली पहिली भेट मला आजही आठवते. ५ मे १९९२ ला अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर या कारखान्याचे सहकारीकरणासाठी हस्तांतर होणार होते. त्यानिमित्ताने

आदल्या रात्री नऊच्या सुमारास मी वाडीबंगला येथील विश्रांतिगृहावर त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो. मालकांना भेटण्यासाठी इतरही लोक तेथे असल्याने मी प्रतीक्षा-कक्षात बसलो होतो. सुमारे १५ मिनिटांनी त्यांना मी आल्याचे समजले. त्यांनी मला पटकन बोलावून घेतले आणि सांगितले, "या, पुढे जेंव्हा जेंव्हा माझ्याकडे याल तेंव्हा सरळ माझ्यापर्यंत यायचे. तुम्ही या कारखान्याचे एम्.डी. आहात.तुम्ही वाट बघत बाहेर नाही थांबायचं." पहिल्या भेटीत त्यांनी मला दिलेला हा सन्मान आणि आपुलकीची वागणूक पाहून मीही भारावलो.

ज्ञानेश्वर मालक हे केवळ उद्योजक नाहीत, तर माणसे पारखण्यात त्यांचा हातखंडा आहे. १९९२ साली कारखान्याचे हस्तांतरण होताना काही वादाचे मुद्दे निर्माण झाले. त्यावेळी जुन्या कार्यालयासमोर केवळ तीन फुटावर आमची जागा संपत होती. त्यामुळे तेथे कुंपण घालण्यासाठी बृहन्महाराष्ट्रच्या वतीने तयारी सुरू होती. त्यावेळी मालकांना आम्ही भेटलो आणि परिस्थिती समजावून सांगितली. कार्यालयासमोर तीन फुटांची पायवाट अडचणीची ठरणार आहे, या ठिकाणी रस्ता ठेवावा अशी विनंती केली. त्यांनी ही मागणी तत्काळ मंजूर केली. आणि तेथील जागा आम्हाला रस्त्यासाठी दिली.

सहकारीकरणानंतर तिसऱ्या हंगामात आम्ही जुन्या मशिनरीमध्ये बदल करून गाळपक्षमता वाढवली. त्याचा अतिशय चांगला परिणाम होऊन साखर उतारा अर्धा टक्क्याने वाढला. या वेळी ज्ञानेश्वर मालकांनी आमच्या कामाचे कौतुक केले आणि अधिक गतिमान कामासाठी बळ दिले.

खाजगीचे सहकारीकरण केल्याने १९९५ साली आम्हाला आयकर द्यावा लागण्याची मोठी शक्यता निर्माण झाली. सुमारे दीड ते दोन कोटींचा बोजा त्यामुळे कारखान्यावर पडणार होता.या समस्येने पांडुरंग कारखान्यापुढे संकट उभे राहिले.त्यावेळीही आगाशे मालकांनी आयकरतज्ज्ञ बाळासाहेब इनामदारांची गाठ घालून दिली. सर्व गोष्टी कायद्यात बसवून इनामदार साहेबांनी मार्ग काढण्यास मदत केली.

साखर कारखान्याचे विस्तारीकरण करतानाही वेळोवेळी त्यांनी मदत केली आहे.विस्तारीकरणाला जागा नव्हती. कारखान्यातील कार्यालये कुठे हलवायची हा प्रश्न होता. त्यावेळी आगाशे मालकांना आम्ही आमची अडचण व गरज सांगितली. श्रीपूर -खंडाळी रस्त्यावर त्यांनी कै. पंडितराव आगाशे कॉम्प्लेक्स बांधले होते. या कॉम्प्लेक्समध्ये मागील बाजूस ८ फ़्लॅट होते. हे फ्लॅट आम्ही कार्यालयासाठी त्यांना मागितले. मोठ्या आत्मीयतेने त्यांनी आमची अडचण ऐकून घेतली आणि चार-आठ दिवसात त्या सर्व फ़्लॅटच्या चाव्या त्यांनी आमच्याकडे पाठविल्या. आज विस्तारीकरणानंतरही याच जागेत आमची सर्व कार्यालये आहेत.

आज कारखाना सहकारी झाला आहे. त्याचे नाव बदलले आहे.पण आजही इथले कामगार आणि नागरिकांमध्ये मालकांविषयी आदराची भावना आहे. त्यांनी आम्हास पोटापाण्यास लावले आहे. आम्ही मालकांची माणसे आहोत, हीच भावना इथे वारंवार प्रत्ययास येते. दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने जाणाऱ्या आमच्या कारखान्याचाही त्यांना अभिमान वाटतो. आमदार सुधाकरपंत परिचारकांच्या रूपाने नेमक्या माणसाच्या हाती मी माझा कारखाना दिला आहे, असे ते सांगतात. कारखान्याच्या यशाबाबत एखादी बातमी वाचनात आली किंवा कोणी सांगितली तर त्यांना समाधान वाटते ते लगेच सांगतात, "अरे, प्रगती होणारच. कारखाना माझाच आहे. माझे तन -मन -धन त्यात गुंतलेले आहे .ती माझीच माणसे आहेत आणि मी त्यांचा आहे" इथल्या प्रत्येक माणसांच्या मनात त्यांनी घर केले आहे.कौटुंबिक जिव्हाळ्याचे नातेसंबंध निर्माण केले आहेत.म्हणून तर त्यांच्या ज्येष्ठ मुलाच्या - मंदार मालकांच्या - विवाहासाठी सर्व कामगार येथून गेले होते. मंदार मालकांचा विवाह निश्चित झाल्यावर सर्व कामगार माझ्याकडे आले आणि मालकांना मोठी

भेटवस्तू देण्याबाबत बोलू लागले. तेंव्हा मी त्यांना समजावले आगाशे मालक आहेत. ती मोठी माणसे आहेत.त्यांनी आपल्याला काहीतरी द्यायचे असते. परंतु कोणताही कामगार ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. आमचा आठ दिवसाचा पगार घ्या पण मालकांना मोठे प्रेझेंट द्या, असेच सर्वजण म्हणत होते.कारखान्याच्या ऊस तोडणी मजूर व ठेकेदारांनी आपला हिस्सा उचलला, कामगारांनी आठ दिवसांचा पगार दिला. आणि आगाशे मालकांना हिऱ्याचा कंठा दिला.आपल्या धन्याविषयीची श्रध्दा आणि कृतज्ञतेचे ते प्रतीक होते .

अशा दिलदार मनाच्या या जिंदादिल व्यक्तित्वाच्या वयाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत.आपल्या पंखाखाली अनेकांना आधार देणाऱ्या या गरुडाच्या पंखात दिवसेंदिवस अधिक बळ यावे, त्यांच्या भरारीने गगनाला गवसणी घालावी, त्यांचे भावी आयुष्य सुखसमृध्दी, कर्तृत्वसंपन्न व निरोगी राहावे, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

•

जेव्हा टी. व्ही. नव्हता तेव्हाची म्हणजे अंदाजे १९६४/६५ ची गोष्ट. आगाशे व आम्ही मित्रमंडळी त्यावेळी मुंबईची प्रत्येक टेस्ट मॅच बघायला जात असू. तरुण वय, दांडगा उत्साह त्यामुळे टेस्ट मॅच पहाणे हे केवळ निमित्त. हिंडणे व तऱ्हेतऱ्हेचे खाणे यावर भर जास्त. त्यावेळी सलग ५ दिवस मॅच नसे. मधे एक दिवस सुट्टी. त्या दिवशी करायचे काय ? आमच्यातला बाबा चव्हाण हा मुंबईचा. त्याने सांगितले ताजमहाल हॉटेलमध्ये १५ रुपयात बूफे मिळतो. बूफे म्हणजे डझनभर पदार्थ व अर्धा डझन स्वीट डिशेस. हव्या तेवढ्या खाता येतील ही कल्पना पुणेकरांना भावली. रात्री जाग्रण झालेले, कुणी दाढी केली नाही, कपडे पुणेकर घालत असे बेताचेच. तसेच ताजला पोहचलो. दरवानाने विचारले - किधर जाने का है ? बूफे जाने का है. इधर कुछ बूफे नही. दरवान आत जाऊ देईना. आगाशे व बाबा भडकले. सगळे टोळके सरळ पोलिस स्टेशनवर गेले. नशिबाने तेथे एक मराठी इन्स्पेक्टर होता. विचारले, पैसे आहेत ना ? होय ! मग चला माझ्याबरोबर.

इन्स्पेक्टर साहेब मॅनेजरला भेटले. बूफेची वेळ संपून गेली होती पण ज्या आवाजात साहेबाने सांगितले त्याचा परिणाम म्हणून परत छोटा बूफे लावून ताजने आम्हा सर्वांना जेवण दिले.


सर्वांवर कडी म्हणजे बिल द्यायची वेळ आली तेव्हा Be my guest म्हणून मॅनेजर साहेबाने पैसे न घेता निरोप दिला.

**अरविंद मेहेंदळे**

# ग्रहमान काय सांगते !

**श्रीनिवास कुलकर्णी**

कुंडली पाहणे व त्यावरून आयुष्यांत मार्गदर्शन घेणे या विषयावर प्रत्येकाचा विश्वास असतोच असे नाही. मी क्रिकेट अंपायर असल्यामुळे माझा निर्णय हा ज्योतिषशास्त्राच्या बाजूने आहे. Fortune favours the brave हे खरे असले तरी दैवाची साथ ही हवीच. डिस्टिलरीपासून ते पोलाद कास्टिंगपर्यत व बँकेपासून ते MCA पर्यंत अनेक क्षेत्रात त्यांनी जे यश मिळवले त्याचे विश्लेषण कुंडलीचे आधारे करावे असे मी सुचवले. तेव्हा अनेकांनी ते हसण्यावारी नेले पण ज्ञानेश्वर त्यांच्या नेहमीचे स्वभावानुसार म्हणाले, 'करतोय तर करू दे त्याला'. ही दुसऱ्याला न दुखवायची संतवृत्ती त्यांच्या कुंडलीतील कुंभ लग्नामुळेच आली आहे. अशा ह्या पुरूषाची कुंडली पहा.




नाव : ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे

जन्म तारीख : १७.०४.१९४२

जन्मवेळ : पहाटे ०४.०० वाजता

शुभग्रह १) शुक्र-राजयोगकारक
२) बुध
३) शनि

मेष या कार्यप्रवण राशीत अश्विनी नक्षत्रात उच्चीचा रवि असल्यामुळे धैर्य व प्रयत्नवादावर विश्वास, जबरदस्त आत्मविश्वास व निर्णय क्षमता हे गुण येतात. शांतपणा कमी व सतत काहीतरी करीत राहणे व प्रवास (गतिशीलता) हा या राशीचा स्थायीभाव आहे. लग्न स्थानात शुक्र असल्याने हौशीवृत्ती व ललितकलांची आवड असून वैवाहिक सौख्य लाभते. धन स्थानात बुध असल्याने सांपत्तिक स्थिती उत्तम राहून हसत खेळत काम करवून घेण्याची हातोटी साधते. लग्नी भाग्यात शुक्र त्यांना प्रेमळ व सदाचारी बनवतो. जन्मतः त्यांची साडेसाती संपत आली होती. आता त्यांच्या आयुष्यातील तिसरी साडेसाती जुलै २००२ मध्ये संपेल. 'भृगुसंहितेमध्ये आगाशेसाहेबांच्या कुंडलीचे भविष्य पुढीलप्रमाणे दिले आहे. (पृष्ठे १५१ - १५२)'

"ही व्यक्ती प्रतिष्ठित असून रूपाने देखणे व्यक्तिमत्व असेल. जीवनात यांना मानाची जागा मिळेल. आपल्या कुटुंबाचे उत्तम पालनपोषण करेल, याला भरपूर मित्रपरिवार असेल, विलासी जीवन जगेल. बराच पैसा दुसऱ्यासाठी खर्च करेल. दीर्घायु व्यक्ती असली तरी दोन गंडांतरे आहेत. त्यात एकामध्ये पुनर्जन्म झाल्यासारखे आहे. सूर्योपासना करावी. मनासारखी सुंदर बुद्धिवान, न्यायाधिकारी पत्नी मिळेल. वैवाहिक सौख्य चांगले असेल. सर्व मनोरथ पूर्ण होतील. ही व्यक्ती दुसऱ्याचे कधीही वाईट चिंतणार नाही. याला चांगल्या लोकांची संगत लाभेल. याने स्त्रियांच्या मोहजालापासून सावध असावे. ही व्यक्ती सत्वशील असून चांगला भाग्योदय होईल. ईश्वरभक्तीत रस घेईल. गुणी व विद्वान व्यक्ती आहे."

अशा ह्या जगन्मित्रास व महाराष्ट्र क्रिकेट अंपायर्स असोसिएशनचा चेअरमन या नात्याने आम्हा सर्वांतर्फे आयुरारोग्य चिंतितो.

•

# दिल्या शब्दाला जागणारा माणूस

**वा. ना. उत्पात**

ज्ञानेश्वर आगाशे हे सदाबहार, कलासक्त व उमदे व्यक्तिमत्त्व आहे. साहित्य, संगीत, कला व क्रीडा या सर्व प्रांतात रसिकता असलेला उद्योगपती विरळा असतो. साधारणपणे पैशाच्या मागे लागलेले, आर्थिक क्षेत्रातील लोक अरसिक असतात. सर्व काळ त्यांच्या मनात व बुध्दीत पैशाचा विचार असतो व त्यामुळे इतर सर्व छंद बाजूला पडतात. पण ज्ञानेश्वर आगाशे त्याला अपवाद आहेत.

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा।।

बुध्दिमान लोकांचा वेळ काव्यशास्त्र विनोदात जातो. मूर्खांचा वेळ व्यसनात, झोपेत व भांडणात जातो. ज्ञानेश्वर आगाशे मात्र लेखक, कलावंत, राजकारणी व उद्योगपती या सर्वांच्या संगतीत सदा रमलेले दिसतात.

ज्ञानेश्वर आगाशे यांचा जन्म सुशील आणि श्रीमंत घराण्यात झाला. त्यांचे वडील कर्तृत्वसंपन्न होतेच पण त्याबरोबरच उदार, सुशील किंबहुना संतच होते. अपार कष्ट करून त्यांनी बृहन्महाराष्ट्र साखर कारखाना उभा केला व प्रतिकूल परिस्थितीशी झगडत त्यांनी यशाचे शिखर पादाक्रांत केले. ते पांडुरंगाचे व संत ज्ञानेश्वर महाराजांचे परमभक्त होते. दर बुधवारी पंढरपूरी ते पांडुरंगाच्या दर्शनाला जात असत. त्यांच्या कर्तृत्वाला दातृत्वाची आणि सत्त्वशीलतेची जोड होती. अशा पित्याच्या पोटी या पुत्राचा जन्म झाला आणि वडिलांच्या संत ज्ञानेश्वरांवरच्या श्रध्देपोटी त्याला “ज्ञानेश्वर” हे नाव मिळालं.

वडिलांच्या पश्चात पंडितराव ज्ञानेश्वर या बंधूंनी बृहन्महाराष्ट्र कंपनीची सूत्रे हातात घेतली. ‘तेव्हा ही तरुण मुले काय करणार?’ म्हणून पुष्कळांनी भुवया उंचावल्या. सहकारी साखर कारखान्यांचे आव्हान समोर उभे होते. श्रीपूर परिसरात माळीनगर व अकलूज येथील दोन साखर कारखान्यांशी स्पर्धा करून टिकायचे होते. १९४८ च्या जाळपोळीतून सुखरूप बाहेर पडलेला कारखाना सहकार क्षेत्राला टक्कर देऊन उभा करण्याचे काम आगाशे बंधूंनी केले. मद्य व मद्यार्क निर्मितीचे प्रकल्प सुरू करून डळमळणारा कारखाना सावरला. योग्य वेळ पाहून तो कारखाना, मुलगी सुस्थळी द्यावी त्याप्रमाणे श्रीमंत सुधाकर परिचारक यांच्यासारख्या सच्छील माणसाला दिला.

या कठीण काळात आम्हाला तिघांचंही कर्तृत्व बघायला मिळालं. अनुकूल, प्रतिकूल परिस्थितीत पतीला साथ देणारी आणि पुत्रांच्यामागे खंबीरपणे उभी राहणारी कुंती समान आई ज्ञानेश्वरांना मिळाली. थोरले बंधू पंडितराव

म्हणजे अंतर्बाह्य शुचितेचा पुतळा होते. त्यांचा विनयशील स्वभाव, औदार्य व सज्जनता वडिलांना साजेलशी होती. वडिलांचे संतत्वही त्यांच्यात उतरले. आगाशे घराण्यातील पंडितराव हे साक्षात धर्मराज होते. तसेच व्यवहार चातुर्य, उद्योगशीलता आणि कौशल्य ज्ञानेश्वर यांच्यात उतरले. त्यामुळे ज्ञानेश्वर हे जणू अर्जुनच.दोघांनीही कुळाचे नाव राखले, उज्ज्वल केले.

पंढरपूर नगरपालिकेने सावरकर चौक ते इंदिरा गांधी चौक या रस्त्याला चंद्रशेखर आगाशे पथ हे नाव दिले. त्या ठरावाच्या वेळी रेवण भादुले, मी व कै. बापू जोशी यांनी पुढाकार घेतला होता. कार्यक्रम संपल्यावर प्राचार्य अनंतरावजी आठवले यांच्या समवेत ज्ञानेश्वर व पंडितराव हे दोघे आमच्या सावरकर ग्रंथालयात आले होते. त्यावेळी त्यांची पंढरपुरातील जागा सावरकर क्रांती मंदिराला दान द्यावी अशी आम्ही मागणी केली. "ही मुले चांगले काम करीत आहोत. जागा द्यायला हरकत नाही". असे म्हणून पूज्य अनंतरावजींनी सुध्दा अनुमोदन दिले. त्यावर कै. पंडितराव यांनी ती जागा देतो असे वचन दिले. त्यानंतर आठ दहा वर्षे गेली. ज्ञानेश्वर परदेशात गेले व हा विषय मागे पडला. हरिभाऊ काळे यांच्या मार्फत आम्ही मधूनमधून आठवण देत होतो. पुलाखालून खूप पाणी गेले. इतकी वर्षे गेल्यावर मी व बापू जोशी हे आगाशे यांच्या निवासस्थानी गेलो. पंढरपूरची जागा देण्याचा विषय काढला. त्यावेळी ज्ञानेश्वर व पंडितराव हे दोघेही म्हणाले, "आम्ही अनंतरावजींसारख्या संताच्या देखत तुम्हाला शब्द दिला आहे. तो आम्ही पाळणार". आणि थोड्याच दिवसांत त्यांनी सदरची जागा काहीही अट न घालता सावरकर क्रांतीमंदिरासाठी दिली. वीस-पंचवीस लाखाची जागा केवळ बंधूंनी शब्द दिला म्हणून ज्ञानेश्वर यांनी आम्हाला दान दिली. त्यांच्या मनाचा हा मोठेपणा कायम आमच्या स्मरणात राहिला. बरेच दिवस आम्ही त्यावर काही बांधकाम केले नाही. म्हणून एकदा ते मिस्किलपणे म्हणाले, 'आता आम्ही तुम्हाला दिलेली जागा परत घेणार आहोत'. पण त्यांच्या त्या सहज बोलण्याने आम्हाला जोर आला व आम्ही क्रांतीमंदिराचे बांधकाम सुरू केले. सदरच्या जागेबाबत अनेकजण त्यांच्याकडे गेले. लाखो रुपयांना ती जागा घेण्याचे प्रलोभन दाखविले. पण आगाशे त्याला बधले नाहीत. दिल्या शब्दाला जागले.

त्यांचा साखर कारखाना श्रीमंत सुधाकर परिचारक यांना देण्याचा त्यांनी शब्द दिला. नंतर अनेक पुढारी, साखरसम्राट त्यांच्या मागे लागले. जास्त रकमेचे आमिष दाखविले पण ज्ञानेश्वर आगाशे बधले नाहीत. त्यांनी तो साखर कारखाना श्रीमंत परिचारकांना दिला. दिलेला शब्द पाळला. कोणी निंदा करो किंवा स्तुती करो, लक्ष्मी घरात येवो किंवा निघून जावो, आज मरण येवो किंवा युगाच्या शेवटी येवो. न्यायाच्या मार्गावरून कधी थोर पुरुषांचे पाऊल विचलित होत नाही. ह्या अर्थाचे संस्कृत सुभाषित ज्ञानेश्वर यांच्या आयुष्याचे सूत्र आहे.

ज्ञानेश्वर आगाशे यांचा मित्रपरिवार फार मोठा आहे. राजकारणी, क्रिकेटपटू, उद्योगपती, कलावंत या क्षेत्रात सर्वत्र त्यांचा वावर आहे. छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत साऱ्यांशी मैत्री आहे. प्रत्येक क्षेत्रामधे त्यांचे कर्तृत्व गाजलेले आहे आणि तरीही या निर्लोभी माणसाची पांडुरंगाच्या पायांशी अपार श्रध्दा आहे. म्हणून मी म्हणेन, ज्ञानेश्वर यांचे वर्णन....

कर्तृत्वाचा महामेरू। सामान्य जनासी आधारू।
अखंड पांडुरंगाचा विचारू। श्रीमान योगी।।

या ओवीतच करणे योग्य ठरेल. त्यांना, त्यांच्या सुविद्य पत्नीला व आगाशे कुटुंबाला उदंड आयुष्य व निरोगी जीवन प्राप्त होवो ही श्री रुक्मिणीमातेच्या चरणी प्रार्थना!

•

# एक द्रष्टा उद्योजक

**अॅड. प्रकाशराव पाटील**

नीरा उजव्या कालव्याचे पाणी नुकतेच माळशिरस तालुक्यात आले होते. त्यामुळे इथला भविष्यकाळ शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला उत्तम राहणार होता. याचा विचार करून, येथील भौगोलिक स्थितीचा अभ्यास करून व या परिसराचे औद्योगिकदृष्ट्या महत्त्व ओळखून चंद्रशेखर आगाशे यांनी १९३२ साली श्रीपूर येथे साखर निर्मिती उद्योगाचा पाया घातला. तो पारतंत्र्याचा काळ होता. औद्योगिकरण खऱ्या अर्थाने खेड्यापर्यंत पोहचलेले नव्हते. सहकार युगाची तेव्हा सुरुवातही झालेली नव्हती. अशा वेळी आगाशे यांनी इथे साखर कारखाना सुरू केला. चंद्रशेखर आगाशे व त्यांचे बंधू नारायणकाका आगाशे यांनी त्यासाठी खूप मेहनत घेतली. या परिसरातील शेतकऱ्यांच्या पडिक जमिनी त्यांनी खंडाने घेतल्या आणि ऊसमळे फुलविण्यास सुरुवात केली. त्यांनी हा व्यवसाय सुरूकरीत असताना फत्तेसिंह पाटील यांचे वडील भीमराव पाटील यांचा आगाशे कुटुंबीयांशी घनिष्ठ संबंध आला. रोजची ऊठबस सुरू झाली. कोणत्याही चांगल्या-वाईट अडचणींच्या वेळी सल्लामसलत सुरूझाली. भीमराव पाटील हे आप्पासाहेब पाटील यांचे चुलते होते. आगाशे व पाटील कुटुंबीयातील हे नाते दिवसेंदिवस अधिकच दृढ होत गेले. कौटुंबिक जिव्हाळ्याचे, जिवाभावाचे नाते त्यातून निर्माण झाले. जमिनी खंडाने घेऊन उसाची शेती करीत असताना, इतर शेतकऱ्यांनाही त्यांनी ऊस लागवडीसाठी प्रोत्साहन दिले. त्या काळात शेती व्यवसायाला अर्थपुरवठा करणाऱ्या बँका नव्हत्या. अशावेळी कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना पैसा पुरविला. अगदी शेती खरेदी करण्यासाठी देखील. शेतीची मशागत, ऊस लागवडीला, त्यासाठी लागणारी खते यासाठी त्यांनी पैसा पुरविला. शेतकऱ्यांना ऊसशेतीची आवड लागली.

वास्तविक हा परिसर तसा आडवळणी आणि अविकसित असाच होता. पण कारखान्यामुळे या परिसरात पुण्या-मुंबईच्या लोकांची ये-जा सुरू झाली. फोनसारखी सुविधा त्या काळात इथे आली. पोस्ट ऑफीस, पोलिस स्टेशन, आरोग्य या सुविधाही पाठोपाठ आल्या. कॅटरपिलर सारखे ट्रॅक्टर या परिसराने प्रथम पाहिले. विजेची निर्मिती कारखान्याच्या माध्यमातून पहायला मिळाली. कामगार कल्याण केंद्राची संकल्पनाही त्याकाळात इथे रुजली. म्हणूनच या भागात त्यांचे अनेकांशी कौटुंबिक संबंध प्रस्थापित झाले. आप्पासाहेब पाटील यांच्याबरोबरच वेळापूरचे हरीसाहेब, नेवरे येथील किसनराव इनामदार,

माळखांबीचे ज्ञानोबा गमे, भांगे कुटुंबीय, महाळुंगचे रेडे, मुंडफणे अशी अनेक माणसे त्यांनी जोडली. त्या काळातही साखर कारखाना चालविताना त्यांना अनेक अडचणी आल्या पण न डगमगता आगाशे कुटुंबीयांनी हा उद्योग सुरूच ठेवला.

कारखान्याच्या रूपाने इथे वसाहत वाढली. वेगवेगळ्या गावचे, वेगवेगळ्या जातीधर्मांचे लोक इथे वास्तव्यास आले आणि अनेकतेमधून एकतेचे उत्कट दर्शन इथे घडले. सामाजिक ऐक्यभावना या वसाहतीमधून नांदू लागली. कारखान्याच्या अनुषंगाने या भागात रस्तेही झाले. शाळा सुरू झाली आणि या परिसराची शैक्षणिक गरज पूर्ण झाली. संस्काराचे धडे तेथून घेत असताना अनेक गुणसंपन्न विद्यार्थी इथे घडले. सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रावर आपला ठसा उमटविणारे माळशिरस तालुक्याचे सभापती मोहनराव पाटील हे याच शाळेचे विद्यार्थी होते आणि मीही याच शाळेचा विद्यार्थी आहे. या कारखान्यामुळे ड्रायव्हर क्लीनरपासून उच्च प्रतीच्या तंत्रज्ञापर्यंतचे कुशल ज्ञान या परिसराला मिळाले. चंद्रशेखर व नारायणकाका आगाशे यांच्या पश्चात पंडितराव व ज्ञानेश्वर आगाशे यांनीही या परिसरावर अलोट प्रेम केले आहे. शेती खरेदी, ऊस लागवड, खते यासाठी पैसे देताना शेतीला कराव्या लागणाऱ्या पाणीपुरवठा योजनाही त्यांनी राबविल्या. पंढरपूर तालुक्यातील चळे-आंबे आणि इंदापूर तालुक्यातील भांडगाव येथे लिफ्ट इरिगेशन योजना त्यांनी राबविल्या. एकरी जास्तीत जास्त उत्पादन व जादा साखर उतारा देणाऱ्या विविध जाती त्यांनी इथे आणल्या. १९५७ साली 'कसेल त्याची जमीन' या कायद्यानुसार खंडाने घेतलेल्या जमिनीचे आगाशे मालक झाले. पण १९६० च्या सुमारास जमीन कमाल मर्यादा कायदा लागू झाला. त्यामुळे शासनाने अतिरिक्त जमिनी ताब्यात घेऊन शेतीमहामंडळाची स्थापना केली आणि त्यानंतर या कारखान्यास ऊसाचा प्रश्न भेडसावू लागला. त्यावेळी पंडितराव व ज्ञानेश्वर यांनी शेतकऱ्यांशी संपर्क वाढवून ऊसप्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. परंतु भविष्यातील संकट लक्षात घेऊन त्यांनी मद्यार्क निर्मिती प्रकल्प हाती घेतला. त्यावेळी खूप टीका झाली. परंतु उभे केलेले युनिट टिकवण्यासाठी त्यांनी अशा निरर्थक टीका टिप्पणीकडे दुर्लक्ष केले.

१९६० साली सहकार युग सुरूझाले आणि शंकरराव मोहिते पाटील यांनी अकलूजचा कारखाना काढला. त्यावेळी एक स्पर्धक म्हणून आगाशे कुटुंबाने कधीही त्यांच्याकडे पाहिले नाही. तर आगाशे बंधूंनी त्यांनाही सहकार्य केले. पंडितराव हे दिलदार वृत्तीचे होते. त्यांच्याकडे कोणताही शेतकरी, कामगार कोणत्याही अडचणीच्या वेळी गेला तर तो रिकाम्या हाताने परत येत नव्हता. ज्ञानेश्वरसाहेबांनी शेतीकडे व्यवसाय दृष्टिकोनातून पाहण्याची शेतकऱ्यांना सवय लावली. शेती हा धंदा आहे आणि त्यातील व्यवहार शेतकऱ्यांना समजला पाहिजे ही त्यांची धारणा होती. १९७९ साली मी जेव्हा वकिलीची पदवी संपादन केली तेंव्हा ज्ञानेश्वरसाहेबांनी मला सांगितले, 'तुमचे संपर्क कार्यालय हे ग्रामीण भागातच असले पाहिजे'. म्हणून मी श्रीपूर येथे माझे कार्यालय सुरूकेले. आजही त्यांच्याच जागेमध्ये हे कार्यालय आहे.

१९३२ च्या आसपास सुरूझालेला चितळे कारखाना पुढे बंद पडला. साखरवाडीचा कारखानाही बंद पडला पण आगाशे कुटुंबाने अनंत अडचणींना तोंड देत हा कारखाना सुरूठेवला. मालक व नोकर असा कधी इथे संघर्ष झाला नाही. कधी काळी फीत लावून काम झाले नाही. कधी संप झाला नाही. आपली माणसे आणि आपला कारखाना ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजविण्यात आगाशे कुटुंबीयांना आलेल्या यशाचे ते प्रतीक आहे. जी माणसे या कुटुंबाच्या संबंधात आली ती नाते संबंधातीलच होत गेली. आमच्या कुटुंबाशी त्यांचे असणारे जिव्हाळ्याचे संबंध सर्वश्रुतच आहेत. १९८९ साली मोहनराव पाटील आजारी होते. पुण्याच्या के. ई.एम. रुग्णालयात उपचार घेताना त्यांची प्रकृती अत्यावस्थ झाली होती. ज्ञानेश्वर आगाशेसाहेब दुपारी

घरी विश्रांती घेत असताना त्यांना हा निरोप मिळाला. त्यावेळी अगदी बिछान्यावरून उठून ते धावत दवाखान्यात आले. दवाखान्यात आल्याबरोबर त्यांनी डॉक्टरांना विचारले, 'पेशंटची अवस्था कशी आहे ? इथे व्यवस्थित होईल का दुसरीकडे कुठे घेऊन जावे लागेल?' अगदी परदेशात घेऊन जाण्याची त्यांनी तयारी दर्शविली आणि डॉक्टरांना सांगितले 'डॉक्टर, माझ्या तीन पिढ्यांचा संबंध असणारी ही व्यक्ती सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या शेतकऱ्यांची प्रतिनिधी आहे. कोणत्याही परिस्थितीत मोहनराव आजारातून सुखरूप बाहेर आलेच पाहिजेत' आणि १९८९ साली त्या आजारातून मोहनराव सुखरूप घरी आले. एवढे जिवाभावाचे संबंध जपणारी माणसे आज सापडणे कठीण आहे.

प्रत्येकाच्या सुखदुःखात उभे राहणारे, अडचणीच्या वेळी मदत करणारे आगाशे कुटुंबीय या तालुक्याच्या जडणघडणीतही अग्रभागी राहिले आहे. बोरगावचे विठ्ठल मंदिर, महाळुंगचे यमाईदेवी मंदिर यांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. श्रीपूर येथे हनुमान मंदिर, विठ्ठल मंदिर उभारून आध्यात्मिक भावना वाढीला लावण्याचा प्रयत्न केला. श्रीपूर क्रीडामंडळाच्या माध्यमातून कला आणि क्रीडापरंपरा निर्माण केली. हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना चंद्रशेखर आगाशे ट्रस्टच्या माध्यमातून मदत केली.

या परिसरावर मनापासून प्रेम करणाऱ्या, सर्वसामान्यांची चिंता वाहणाऱ्या या कर्तृत्वसंपन्न कर्मयोगी व्यक्तिमत्त्वाची एकसष्टी साजरी होत असताना गतकाळ डोळ्यासमोरून तरळत पुढे जातो आणि आगाशे कुटुंबाच्या दातृत्वाचे त्यात जागोजागी घडणारे दर्शन मनाला आंतरिक ओल देऊन जाते. असा लाख मोलाचा माणूस आमच्यामध्ये आहे याचा सार्थ अभिमानही वाटतो. साहेबांच्या एकसष्टी निमित्त या परिसरातील शेतकऱ्यांचा एक प्रतिनिधी, आगाशे कुटुंबीयांचा एक हितचिंतक, स्नेही या नात्याने त्यांना अंतःकरणपूर्वक लाख लाख शुभेच्छा!

•

# कर्तृत्वाचा महामेरू

## विजयकुमार पाटील

आमच्या श्रीपूर बोरगाव परिसरात चंद्रशेखर गोविंद आगाशे व नारायण आगाशे (नारायणकाका) या बंधूंनी सन १९३२ च्या सुमारास येऊन येथे शेती व्यवसायासाठी जमीन घेतली. या बंधूंनी श्रीपूर येथे गुळाचा कारखाना (गुऱ्हाळ) सुरू केला. पुढे त्यांनी सन १९३८ मधे दि. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. या नावाने साखर कारखाना सुरूकेला.

आगाशे बंधू आणि आमचे वडील कै. रावसाहेब पाटील (तात्या) यांच्यातील संबंध पिता-पुत्र या नात्याचे होते त्या विश्वासास पात्र राहून रावसाहेब यांनी आगाशे बंधूंना सर्व बाजूंनी सहकार्य केले आणि त्यांच्या अडचणी, गरजा अहोरात्र झटून आपल्या ताकदीप्रमाणे पूर्ण करून त्यांना मनापासून सहकार्य दिले. चंद्रशेखर आगाशेसाहेबांच्या नंतर साखर कारखान्याची धुरा त्यांचे चिरंजीव पंडितराव व ज्ञानेश्वर यांच्याकडे आली. त्यांनी कारखाना, शेतकरी व कामगार हे तीनही घटक स्वाभिमानी व स्वावलंबी झाले पाहिजेत असा निर्धार केला.

कै. पंडितराव यांच्यानंतर कारखान्याची व परिसराची जबाबदारी ज्ञानेश्वर यांच्यावर येऊन ठेपली. त्यांनी ही सर्व व्यवस्था पाहत असताना आपल्या वडील, काका व बंधू इत्यादींचेच धोरण या भागातील शेतकरी व कामगार यांच्यासाठी राबवले . दरम्यानच्या काळातील सरकारी अडचणीमुळे खासगी तत्त्वावरील साखर कारखान्यास अनेक अडचणी निर्माण होऊ लागल्या म्हणून आगाशेसाहेबांनी खासगी साखर कारखाना शेतकरी व कामगारांसह श्रीपूर येथेच राहील या अटीवर आमदार सुधाकरपंत परिचारक यांना दिला. आज रोजी सदरचा कारखाना श्रीपूर येथेच उत्तम स्थितीत चालत आहे.

साहेबांना वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाण आहे. त्यातूनच त्यांनी श्रीपूर येथे ऊर्जा प्रकल्प सुरूकेला. त्यांनी आपल्या लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी श्री सुवर्ण सहकारी बँक लि. पुणे या बँकेचीच एक शाखा श्रीपूर येथे स्थापन केली. क्रीडाक्षेत्रातील नावलौकिक मिळवून ते क्रिकेट मंडळाचे उपाध्यक्षही झाले. ग्रामीण भागातील मुले क्रिकेट या क्षेत्रात चमकावीत म्हणून त्यांनी पुणे येथे क्रिकेट अॅकॅडेमी स्थापन केली. ते नुकतेच पुणे येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. त्यांची मुले मंदार आगाशे व आशुतोष आगाशे वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून सामाजिक संस्था, क्रीडाक्षेत्र, उद्योग क्षेत्र इत्यादीमध्ये हिरीरिने भाग घेत आहेत.

अशा या कर्तृत्वसंपन्न आगाशे कुटुंबीयांची पंढरपूरचा पांडुरंग, आळंदीची ज्ञानेश्वर माऊली ही दैवतं आहेत. आगाशे कुटुंबीय व आमचे कुटुंब यांच्यातील हे जिव्हाळ्याचे कौटुंबिक संबंध पांडुरंगाच्या कृपेने इथून पुढील जीवनातही स्नेहपूर्ण व जिव्हाळ्याचे राहतील. असे कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्व ज्ञानेश्वर आगाशे साहेब हे ६१ व्या वर्षात पदार्पण करत असल्याने त्याप्रीत्यर्थ त्यांना व त्यांचे सर्व कुटुंबीयांना आमच्या शुभेच्छा व पुढील काळात सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील कार्य करण्यासाठी उदंड आयुष्य लाभो, हीच परमेश्वराजवळ मनोमन प्रार्थना!

•

# श्रीपूरवर प्रेम करणारा माणूस

**मुकुंद चोपडे**

१९६३-६४ च्या सुमारास ज्ञानेश्वरने बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटमधे प्रवेश केला. या कारखान्याच्यामागे चंद्रशेखर आगाशे या दूरदृष्टी असणाऱ्या उद्योजकाची पुण्याई होती आणि नारायण काकांच्या अथक परिश्रमांचं ते मूर्त स्वरूप होतं. वडिलांच्या मृत्यूनंतर ज्ञानेश्वरचे भाऊ पंडितराव यांनी अपार मेहनत घेऊन कारखाना उत्तम तऱ्हेने चालविला.

ज्ञानेश्वर कारखान्यात येऊ लागला त्याच सुमारास महाराष्ट्र सरकारने स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनची स्थापना करून कारखान्यांसाठी ऊस पिकविणाऱ्या साऱ्या जमिनी महामंडळाच्या ताब्यात दिल्या. अनेक खासगी साखर कारखाने व शेतकरी यामुळे खूप मोठ्या अडचणीत आले. ज्या जमिनीतून एक लाख टन ऊस पिकत असे, त्या जमिनी महामंडळाच्या ताब्यात गेल्यानंतर जेमतेम ३० हजार टन उत्पादन करू लागल्या. अर्थातच कारखाना नफ्यात चालविण्याकरता ऊस मिळविणे हीच मोठी जिकीरीची गोष्ट होऊन बसली. कुठल्याही परिस्थितीत खाजगी साखर कारखाना ही संकल्पनाच सरकारला मंजूर नव्हती. त्यामुळे खासगी साखर कारखान्यांची सारी दुःखं मुद्दामच नजरेआड केली जात. साऱ्या खासगी साखर कारखानदारांचे नेतृत्व ज्ञानेश्वरकडे आले आणि त्यानं ते फारच समर्थपणे सांभाळले. या नेतृत्वाचा त्याला स्वतःच्या कारखान्यासाठी नक्की फायदा करून घेता आला असता. परंतु सगळ्यांना बरोबर घेऊन जाणं हे त्यानं वैयक्तिक हितापेक्षा मोठं मानलं. त्यातून जे साऱ्याच साखर कारखानदारीचं झालं, तेच दुर्भाग्य बृहन्सच्या साखर कारखान्याच्या वाटेला आले. हा साखर कारखाना सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्थेच्या हाती सोपविणे एवढाच पर्याय उरला होता. पण तोही श्रीपूर परिसरात करणे हे मोठे बिकट काम होते.

श्रीपूरवासीयांना एकत्र करून सहकार तत्त्वावर संस्था स्थापन करण्याचं आवाहन त्यानं केलं. मिळालेल्या संधीचा श्रीपूरवासीयांना फायदा घेता आला नाही. नाइलाजाने स्वतः सहकारी संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न केला, त्यालाही प्रतिसाद मिळाला नाही. श्रीपूर परिसरावर, कामगार आणि शेतकरी यांच्या कुटुंबांवर ज्ञानेश्वरचं प्रेम होतं आणि त्याची सारी धडपड त्यांच्या हितासाठी चालू होती.

शेवटी आगाशांचं श्रध्दास्थान असलेल्या पंढरपूराकडे ज्ञानेश्वरचं लक्ष गेलं. सुदैवानं आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्यासारखा कर्तबगार आणि सतृशील माणूस कारखाना सहकारी तत्त्वावर चालविण्यास तयार झाला. जनहित डोळ्यासमोर ठेऊन ही गोष्ट ज्ञानेश्वरने स्वतःच्या मनावर दगड

ठेवून केली.

कारखाना हस्तांतर करण्याच्या वेळचा प्रसंग आजही माझ्या डोळ्यांसमोर ठळकपणे उभा राहतो. आमच्या कारखान्याच्या आवारातच दोनतीन सभा झाल्या. शेवटच्या सभेला सारे कामगार, कंपनीचे अधिकारी, सेवकवर्ग आणि बागाईतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञानेश्वरच्या अटी होत्या, "कारखाना याच परिसरात राहील, कारखान्यातील प्रत्येक अधिकारी आणि शिपायापर्यंतचा सर्व सेवकवर्ग याच परिसरातून निवडला जाईल. आमच्या शेतकऱ्यांना प्राधान्यानं सभासद करून घेऊन कुणाचाही ऊस नाकारला जाणार नाही याची हमी हवी." या सर्व अटी मान्य झाल्यावरच हे हस्तांतर केले जात होते. ज्ञानेश्वरची तळमळ बघून सारे लोक हेलावून गेले होते आणि ज्ञानेश्वरलाही आपले अश्रू आवरणे अशक्य झाले होते. आजही आठवण झाल्यावर रडू येते.

हस्तांतर झाल्यानंतरही काही काळ ज्ञानेश्वर आपल्या लोकांसह कारखान्याच्या मदतीस उभा होताच. कारखाना उत्तम चालू झाल्यावरच तो बाहेर पडला. आजही कारखान्यातील लोक आणि ज्ञानेश्वर यांच्यातील संबंध जिव्हाळ्याचे आहेत. आपल्या अंतःकरणातील दुःख बाजूला ठेवून ज्ञानेश्वर कुठल्याही आनंदप्रसंगी जाऊन साऱ्यांचं कौतुक करतो आणि अडचणीच्या वेळी मदतीचा हात पुढे करतो.

पण ज्ञानेश्वरची महत्त्वाकांक्षा इथे थांबलेली नाही. डिस्टिलरीची वाढ त्याला अपेक्षित आहे. वीज निर्मितीचा नवा प्रकल्प त्यानं नुकताच पुरा केलाय. श्रीपूर परिसर समृध्द करण्याची ही ज्ञानेश्वरची धडपड अथक चालूच आहे.

ज्ञानेश्वरच्या अनेक प्रकल्पांचे, उद्योगांचे जवळून निरीक्षण करतांना माझ्या असं लक्षात आलंय की, ज्ञानेश्वरनं अतिशय बारकाईनं अभ्यास केलेला असतो. नियोजनाबद्दलही त्याचे आडाखे ठरलेले असतात. त्याचं स्वतःचं असं एक खास गणित असतं आणि उत्तरापर्यंत त्यानं ते सोडवलेलंही असतं. बहुतेक वेळेला त्याचे अंदाज तंतोतंत खरे ठरतात. पण अशा वेळेला त्याला हवी असते ती त्या प्रकल्पात सहभागी असलेल्या साऱ्यांची मनापासूनची साथ आणि धडपड.

ज्ञानेश्वर मंगल अशा एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करतो आहे. ज्ञानेश्वरची आपल्या साऱ्यांकडून फक्त तळमळीने काम करण्याची अपेक्षा आहे. ती आपण सारे पूर्ण करू या. यातच त्याचा खरा गौरव आहे आणि असा गौरवच त्याला आवडेल अशी माझी खात्री आहे.

ईश्वराने ज्ञानेश्वरला दीर्घायुष्य द्यावे अशी प्रार्थना आपण करूया आणि त्यानं हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात त्याला यशस्वी करण्यासाठी आपली तळमळ त्याला वाहू या. ईश्वराचा कृपाप्रसाद आपल्या साऱ्यांच्या वाट्याला येईलच.

•



ज्ञानेश्वर आगाशे, माधवराव शिंदे आणि हेमंत कानिटकर
क्रिकेटच्या मैदानावर

# खिलाडी

**रमाकांत पेठकर**

नवीन मराठी शाळेचे मैदान. शाळेच्या भिंतीवर उभ्या तीन रेघा, झाल्या स्टंप्स. पांढरा स्वच्छ पायजमा आणि वर गोल गळ्याचा आडव्या पट्ट्याचा शर्ट, चप्प भांग पाडलेला. एक बारकासा गोरापान, घारा मुलगा खेळत होता. बहुतेक बॅट आणि बॉल त्याचाच. आडदांड मुलाची गोलंदाजी धीटपणे खेळत होता. बालवयातच क्रिकेटचा श्रीगणेशा झाला. तेव्हा त्याचे नाव माहीत नव्हते.

पाचवीमध्ये तो न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेत आला, त्याचे नाव ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे. शाळेत येताना नेहमी भट्टीचा शर्ट, हाफपॅन्ट, वर कोट, डोक्यावर गांधी टोपी आणि कपाळावर टिळा. बाकीची मुले तारेवरचे वाळलेले कपडे घालत असत. आमच्या लेले सरांनी लहान मुलांचा फुटबॉल सुरू केला. फक्त ज्ञानेश्वर फुटबॉलचे बूट घालून खेळावयाचा. बाकीचे साध्या पायांनी.

कै. रामभाऊ लेले शाळेत फुटबॉल, हॉकी आणि क्रिकेट शिकवीत असत. त्यामुळे हे तीनही खेळ त्यांचे बहुतेक विद्यार्थी खेळत. ज्ञानेश्वर फुटबॉलप्रमाणेच आघाडीच्या फळीमध्ये (सेन्टर फॉरवर्ड) उत्कृष्ट हॉकीपण खेळत असे. क्रिकेटप्रमाणेच या दोन्ही संघाचा तो आधारस्तंभ होता. दोन्ही खेळात त्याने शालेय संघाला अनेक विजय मिळवून दिले. तो वयानुसार लहान संघातून खेळावयाला हवा होता पण तेव्हाच्या वजन उंचीप्रमाणे टीम काढण्याच्या नियमांमुळे शाळेच्या मोठ्या क्रिकेटच्या संघात त्याने माणिक गोसावीच्या नेतृत्वाखाली आक्रमक फलंदाजी करून रमणबागेला सलग दोन वर्षे पद्मजी ढाल मिळवून दिली.

याच वर्षी त्याची पुणे जिल्हा संघात तसेच कुचबिहार ट्रॉफीसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली. पुढल्या वर्षी पश्चिम विभागाचा एन्.डी.ए. मध्ये एक क्रिकेट कोचिंग कॅम्प होता. तेथील प्रशिक्षणाचा ज्ञानेश्वरने चांगलाच फायदा घेतला. तो पुढे रणजी आणि कसोटी खेळणार असे वाटू लागले.

नंतर पश्चिम विभागाच्या संघात त्याची निवड झाली. कलकत्त्यामधील आंतरविभागीय सामन्यांमध्ये ज्ञानेश्वरची कामगिरी उत्तम झाल्यामुळे त्याची सिलोनला जाणाऱ्या

भारतीय संघामध्ये निवड झाली.

शालांत परीक्षा झाल्यावर केवळ उत्तम क्रिकेट खेळायचे म्हणून स. प. महाविद्यालयात आर्ट्‌सला प्रवेश घेतला. स. प.च्या संघामध्ये हेमंत गोरे, सदानंद मोहोळ, बाबा सिधये, अनंत धामणे यांच्यासारखे रणजी खेळाडू होते. ज्ञानेश्वरला त्यांच्या अनुभवाचा खूपच फायदा झाला.

पुणे विद्यापीठाकडून खेळण्याची ज्ञानेश्वरला संधी मिळाली. पुणे विद्यापीठाने एकदा अजिंक्यपद मिळविले, त्या संघात ज्ञानेश्वर होताच. आता पुढचा टप्पा रणजी ट्रॉफी खेळण्याचा. पण महाराष्ट्राकडून रणजीमध्ये नाना जोशी हे कसोटी खेळाडू विकेटकीपिंग करीत असत. त्यामुळे विकेटकीपर म्हणून संघात वर्णी लागणे अवघडच होते. नेहमी राखीव खेळाडू म्हणून राहावे लागे. मुंबईला ब्रेबॉर्न स्टेडिअमवर होणाऱ्या मुंबई विरूध्दच्या सामन्यात नाना जोशींना दुखापत झाल्याने ज्ञानेश्वरला रणजीमध्ये खेळायची संधी मिळाली.

आता तो महाराष्ट्राचा मुख्य खेळाडू व्हायचा खरा. पण महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आणि निवड समितीची साडेसाती त्याच्या मागे सुरू झाली. केवळ ज्ञानेश्वरला खेळवायचे नाही म्हणून कधी मुंबई संघातून डच्चू दिलेला यष्टिरक्षक किंवा बाहेरून अन्य यष्टीरक्षक बोलावून त्यांना महाराष्ट्राच्या रणजी संघातून खेळविण्यात येऊ लागले. एवढे सगळे होऊनही ज्ञानेश्वर शांत व संयमी राहिला. अशा तऱ्हेने कसोटी क्रिकेटचे स्वप्न भंग पावले. ज्ञानेश्वरने मग ठरवून टाकले. महाराष्ट्र क्रिकेटच्या व्यवस्थापनात लक्ष द्यावयाचे.

क्रिकेट खेळानंतर क्रिकेट व्यवस्थापन करण्याचे ठरवल्यावर अतिरथी महारथींचा पराभव करून तो एम्.सी.ए. मध्ये निवडून आला व नंतर अध्यक्षपदापर्यंत पोचला. त्याचप्रमाणे भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाचा सदस्य म्हणून गेला तो उपाध्यक्षापर्यंत पोचला. त्याला अध्यक्षपद का मिळाले नाही हे सर्वश्रुत आहेच.

अशा खिलाडी मित्रास एकसष्ठीच्या शुभेच्छा!

•

# परीसस्पर्श

**मिलिंद फडे**

मला समजायला लागले त्या वयापासून मी ज्ञानेश्वर आगाशे यांना बघतोय. श्रीपूर येथील त्यांचा साखर कारखाना म्हणजे त्या परिसराच्या विकासाची गंगोत्रीच ठरली. त्यांचे वडील व माझे आजोबा यांचा दाट स्नेह! हा स्नेहाचा व आपुलकीचा धागा आता तिसऱ्या पिढीतही तेवढाच दृढ राहिला आहे.

श्रीपूर साखर कारखान्याची साखर खरेदी करून विकण्याचा आमचा व्यवसाय आगाशे कुटुंबीयांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच टिकला, स्थिरावला व वाढलाही! ज्ञानेश्वर आगाशे, आम्ही त्यांना साहेब म्हणतो, त्यांचे बंधू कै. पंडितराव व माझे वडील कै. रत्नकांत फडे यांच्यातील स्नेह तर वर्णनापलीकडचा! त्यांनी आमची घडी बसवली असे सांगण्यापेक्षा, 'आज आम्ही जे काही आहोत, ते त्यांच्यामुळेच' ही कृतज्ञतेची भावना मी आवर्जून येथे नमूद करतो.

श्रीपूरला जाता-येता साहेब आमच्या अकलूजच्या पेढीवर यायचे, चहा घ्यायचे. मी तेंव्हा लहान होतो. काळाच्या ओघात मी पुण्यात स्थिरावलो. साखरेच्या पारंपरिक व्यवसाया-बरोबरच मी परदेशी फर्निचरच्या व्यवसायात आलो. वडिलांचे छत्र हरपले होते. पण ही उणीव ज्ञानेश्वर आगाशेसाहेबांनी मला कधी जाणवू दिली नाही. माझ्या नव्या व्यवसायात सर्वतोपरी मदत करून, माझ्यावर मायेचे छत्र धरले. पुण्यात लक्ष्मी रोडवरील कॉमनवेल्थ इमारतीत त्यांना भेटत राहिलो. अगदी मोजके पण मोलाचे बोलणे ही साहेबांची खासियत होती. नकळत मी त्यांच्यातील गुण शिकत गेलो.

त्यांच्या उद्योगसमूहाचे अजून एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या सर्व उद्योग-व्यवसायातील व्यक्ती ह्या पिढ्यान् पिढ्यांचे संबंध असणाऱ्याच आहेत. वडील, मुलगा, भाऊ, बहीण, सून अशी कुटुंबेच्या कुटुंबे आगाशे उद्योगसमूहाची प्रामाणिक सेवा करीत आहेत. खऱ्या अर्थाने हजारो कुटुंबीयांचे ते पोशिंदे आहेत.

साखरेच्या व्यवहारात चढ-उतार होत असतात. चढे टेंडरही भरले जाते. पण ज्यावेळी त्यांच्या लक्षात येते की या सौद्यात चूक होतेय, तेव्हा स्वतःहून आम्हाला सांगणार की, तू या सौद्यात तोट्यात जाशील. मी दर कमी करतो..... ही समज, ही आपुलकी असणारे माझ्या मते देवपुरुषच मानावे लागतील.

परीसाचा स्पर्श होताच, लोखंडाचे सोने होते ही आख्यायिका आपण ऐकतो. आज ज्ञानेश्वर आगाशे

साहेबांच्या रूपाने मी खराखुरा परीस बघितलाय. त्यांच्या स्पर्शाने आयुष्याचे सोने झालेले हजारोजण मी बघितलेत, अनुभवलेत. ज्ञानेश्वर आगाशे साहेबांना कृतज्ञतेने, अंतःकरणपूर्वक शुभेच्छा देतो आणि परमेश्वराजवळ प्रार्थना करतो की आमचे साहेब शतायुषी होवोत !

•

# चिरायू भव

**डॉ. ह. वि. सरदेसाई**

महाराष्ट्राचे भूषण असलेल्या आगाशे कुटुंबीयांचा आणि माझा परिचय मी १९५२ साली पुण्याला आलो तेंव्हापासून आहे. तेंव्हा ज्ञानेश्वर कॉलेजमध्ये शिकत होते. त्यांच्या मातोश्री आजारी असत. त्या निमित्ताने मी त्यांच्या (जुन्या) घरी जात असे. नंतर त्यांचे ज्येष्ठ बंधूंना बघण्यासाठी मी जाई. कधीतरी त्यांच्या भगिनी मेहेंदळे यांना पाहण्यास जाई. परंतु ज्ञानेश्वर यांना तपासण्याकरिता त्यांच्या घरी जाण्याची पाळी आजवर कधीच आलेली नाही. याचे कारण लहानपणापासून श्री ज्ञानेश्वर यांनी क्रिकेटच्या खेळात मिळवलेले प्राविण्य आणि त्या खेळासाठी त्यांनी जोपासलेली चांगली प्रकृती हे होय. कॉलेजमध्ये शिकत असतानासुध्दा ते एक नावाजलेले क्रिकेटपटू होतेच. पुढे तर ते या खेळातील एक अध्वर्यूच बनले हे सर्वज्ञात आहे.

असे प्राविण्य एखाद्या खेळात मिळवायचे म्हणजे स्वत:च्या जीवनात शिस्त असावी लागते. श्री.ज्ञानेश्वर यांच्या आयुष्याकडे लक्ष टाकल्यास हेच त्यांच्या आयुष्याच्या यशाचे रहस्य असल्याचे लक्षात येते. त्यांच्या घराण्यात असणाऱ्या काहीं अनुवांशिक विकारांनी जेव्हा डोके वर काढले तेव्हा आपल्या शिस्तबध्द आयुष्याने, नियमित केलेल्या व्यायामाने, काटेकोर पथ्याने आणि वेळच्या वेळी केलेल्या उपचारांनी या आजारांवर त्यांनी मात केलेली आहे.

व्यक्तिगत आयुष्यात प्रसन्नता हा त्यांचा मोठा गुण प्रथमदर्शनी दिसतो. शारीरिक व्याधींमुळे ते कधी रंजले-गांजलेले दिसले नाहीत. उलटपक्षी इतरांनाच धीर देताना दिसतात. आपल्या आजाराकडे योग्य लक्ष अवश्य देतील परंतु त्या विकारांचा ते कधीही गाजावाजा करणार नाहीत. शस्त्रक्रिया असो किंवा साधे औषधपाणी असो, जे काही योग्य आहे ते करावयास त्यांच्या बाजूने लगेच तयारी असते. चटकन निर्णय घेणे आणि अचूक निर्णय घेणे हे दोन गुण त्यांना त्यांच्या खेळात आणि आयुष्यात साथ देत आलेले मी पाहात आलेलो आहे.

ज्ञानेश्वर आगाशे कितीही मोठे झाले तरी आपल्या कुटुंबीयात रमणारे आहेत. त्यांच्या मातोश्री आणि वडीलबंधू यांच्या आजारपणात त्यांनी तसूभरही लक्ष कमी पडू दिले नाही. घरात किंवा परिचितांमध्ये कोणीही आजारी असल्याचे त्यांना समजताच त्या व्यक्तीला सर्वतोपरी मदतीचा हात दिलेला आहे. ही दानशूरतादेखील त्यांच्या घराण्यातच असावी. कारण त्यांच्या वडिलांच्या, कै. चंद्रशेखर आगाशे यांच्या दातृत्वाच्या गोष्टी अनेकांकडून

मी ऐकलेल्या आहेत.

षष्ट्यब्दिपूर्ति हा आयुष्याचा एक टप्पा आहे. ज्ञानेश्वर हे या टप्प्यावरून पुढे जात आहेत. आगामी आयुष्यात त्यांना अधिकाधिक यश मिळो ! मानसन्मान मिळो ! त्यांची कीर्ती वाढो ! समग्र ऐश्वर्य प्राप्त होवो ! मानवी जीवनाचे सार्थक होणारे ज्ञान आणि विज्ञान लाभो ! ते शतायू होवोत ! त्यांना उत्तम आरोग्य लाभो ! त्यांना चिरंतन कौटुंबिक स्वास्थ्य लाभो आणि सामाजिक प्रतिष्ठा लाभो !

•

# शुभेच्छा

मे. संघवी ट्रेडर्स
मे. क्रिस्टल इंजिनीयर्स
मे. कॅम एंटरप्रायझेस
मे. रॉयल एजन्सीज
मे. पी. पी. शहा अँड सन्स
मे. अश्वथी रोडवेज
मे. इन् व्होग क्रीएशन्स
मे. शोभा फार्म
मे. मलिक एंटरप्रायझेस
मे. अनिप्रा केमिकल्स प्रा. लि.
मे. गुजराथी कन्सलटंसी सर्व्हिसेस
मे. लोकमान्य ऑटो सेंटर
मे. अरिहंत स्टील
मे. अनिल केमिकल्स अँड मिनरल्स
मे. एच. व्ही. कॉर्पोरेशन
मे. साई सेल्स
मे. फ्लो-टेक सोल्यूशन्स
मे. सहारा इंडिया रोडलाईन्स
मे. गणेश केमिकल्स वर्क्स
मे. शिव शक्ती एंटरप्रायझेस
मे. विद्युत सेवा
मे. श्री एंटरप्रायझेस
मे. रॅविस अँड कंपनी
मे. पर्ल पॉल्युमर लि.
मे. बारमाल्ट इंडिया लि.
मे. चेन्नई बॉटल्स
मे. हैद्राबाद बॉटल हाऊस प्रा. लि.
मे. कलर पॅक्स प्रा. लि.
मे. नितीन वेईंग सिस्टिम्स
मे. फैज अली कॉन्ट्रॅक्टर
मे. पेपर क्राफ्टर
मे. सुयोग ट्रेडर्स
मे. भारत लेदर वर्क्स
मे. भाग्यश्री इंडस्ट्रीज
मे. रोलन बेअरिंग्ज
मे. टेक्नीक्स इंडिया
मे. जी. एम. जोगळेकर आणि कं.
मे. चैतन्य इंडस्ट्रिज
मे. विनिधन एंटरप्रायझेस
मे. अंबिका इंडस्ट्रिज
मे. केमि फार्म
मे. स्टँडर्ड केमिकल्स
मे. स्टँडर्ड पॅकेजिंग इंडस्ट्रिज
मे. महाराष्ट्र रोड कॅरिअर्स
मे. ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया
मे. सॅब अॅग्रो सर्व्हिसेस प्रा. लि.
मे. रत्नकांत रुपचंद फडे अँड सन्स
मे. आशुतोष एंटरप्रायझेस
मे. सोनाज आणि कंपनी
मे. शहा ब्रदर्स
मे. बाळकृष्ण प्रिंटिंग प्रेस, श्री. भंडारे
मे. लकी बॉटल्स

मे. हनुमान प्रिंटिंग प्रेस
मे. पटेल प्लायवूड अँड टिंबर्स
मे. योगिराज टेलर्स, तर्फे अरुण म्हसवडे
मे. उदय किर्ती स्टील ट्रेडर्स
मे. चिंतामणी मशिनरी डिलर्स
मे. शिवको / संगावार ब्रदर्स
मे. जिव्हाळा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था
मे. बृहन्महाराष्ट्र ग्राहक भांडार
मे. बृहन्महाराष्ट्र एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी
मे. माळशिरस तालुका राष्ट्रीय साखर कामगार संघ
मे. हिंदुस्थान ग्रीड ईलेक्ट्रीकल्स
मे. हिंदुस्थान ॲडव्हेटायझिंग
मे. यादव मोटार्स
मे. आर. के. फ्रॉस्ट प्रोसेसर्स तर्फे राजन गोखले
मे. संतोष एजन्सी
मे. श्रीयोग केटरर्स, तर्फे पिंपळे बंधू
श्री. प्रकाशराव व्यं. पाटील व बंधू
श्री. एम. एस. माने
श्री. प्रमोद महादेव वेळापुरे
श्री. अशोकराव शंकरराव पाटील
श्री. सुहास बाळकृष्ण देव
श्री. यशवंत अनंत पाटील
श्री. अविनाश कृष्णाजी इनामदार
श्री. गजानन रामचंद्र कुलकर्णी
श्री. रसूल महिबूब शेख
श्री. लक्ष्मण भीमराव शिंदे
श्री. विठ्ठल वसंत देशपांडे
डॉ. श्रीनिवास कृष्णात जामदार

श्री. प्रदीप हिम्मतलाल गांधी
श्री. अल्लाबक्ष चांदसाहेब शेख व परिवार
श्री. भारत सनकादिक ढेरे
श्री. विजयकुमार ज्ञा. शेळके - पाटील
श्री. पी. आर. पाटील, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
श्री. अनिलसिंह नामदेव रजपूत
श्री. जयदीप शरद बोरावके
श्री चंद्रशेखर विद्यालय - प्राथमिक शाळा
श्री चंद्रशेखर विद्यालय - प्रशाला
श्री नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय
श्री. मुकुंद शंकर देवधर
श्री. मच्छिंद्र एकनाथ काळे-पाटील
श्री. सूर्यकांत सदाशिव बागल
श्री. अशोक विनायक गांगल व परिवार
श्री. भादुले परिवार
श्री. कृष्णा धोंडी रेडे व परिवार
श्री. हणमंत नामदेव भांगे
श्री. गणपत नारायण कवडे व परिवार
श्री. सी. आर. मराठे
श्री. रविंद्र चिं. महाबळेश्वरकर
श्री. सुखदेव मुरलीधर शिंदे
श्री. कोंडिबा तात्या रजपूत
श्री. म्हाळु दाजी पांढरे व परिवार
श्री. रामचंद्र गोविंद ऊर्फ कुमार कुलकर्णी
श्री. राजन हणमंत काळे
श्री. यतीन शहा
श्रीमती सुनंदा गोपाळ वाळिंबे व कुटुंबिय
जयश्री भगिनी समाज

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. चे कर्मचारी
बृहन्स ग्रुप कंपनीज् चे कर्मचारी
श्री सुवर्ण सहकारी बँक लि. चे कर्मचारी

# खास निवेदन

हा गौरवांक जरी पुण्यात तयार केला गेला असला तरीही या अंकाची मूळ संकल्पना श्रीपूरवासीयांची. साऱ्याच श्रीपूरवासीयांचा उदंड उत्साह आणि सहभाग यामुळेच या अंकाला हे रूप लाभलं आहे. श्री. सुभाष दंडवते, श्री. दिनकर बेंबळकर, श्री. भास्कर सोहोनी, श्री. उमेश जोशी, श्री. चिंतामणी कुलकर्णी, श्री. दिलीप देशमुख, व श्री. बाबुलाल देशपांडे या व्यक्तींचा तर आम्हाला आवर्जून उल्लेख करावा लागेल. साऱ्याच श्रीपूरवासीयांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो.

- संपादक मंडळ



श्री चंद्रशेखर विद्यालय, श्रीपूर


शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व जाणणाऱ्या आगाशे साहेबांनी कामगारांचे मुलांच्या शिक्षणासाठी बांधलेली भव्य वास्तू



काकांचा पत्रा ... वाडी बंगला...
आगाशे साहेबांचा बागाईतदारांसाठीचा दरबार



कै. जगदीश चंद्रशेखर ऊर्फ पंडितराव आगाशे





ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे हे नांव
अनेक क्षेत्रांत गाजणारं.
यशस्वी उद्योगपती, प्रथितयश बँकर व कुशल
क्रीडा संघटक म्हणून महाराष्ट्रात प्रसिध्द.
पण याहीपेक्षा त्यांची आगळी ओळख
सांगणाऱ्या लेखांचा हा संग्रह.
आगाशे मित्र संपन्न आहेत याचा प्रत्यय इथे
मिळेल. एक सहृदय पुरुषोत्तम आणि श्रध्दाळू
पांडुरंग भक्त अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील
अनेक अप्रसिध्द पैलूंची ओळख करून देत
आहेत त्यांचे मित्र, सहकारी व कुटुंबीय.